हिंदुस्थानचे राज्यकर्ते या नांवाच्या पुस्तकमालिकेंतील

कर्नल मॅलिसनकृत

# अकबर

अथवा

# मोंगल बादशाहीचा उत्कर्ष

या पुस्तकाचें भाषांतर

तेहासिक, भूगोलविषयक व इतर माहितीच्या भरपूर टीपांसह )

क्लॅरेन्डन प्रेसच्या डेलिगेटच्या परवानगीवरून

**वासुदेव विठ्ठल चांदेकर,**

क्लार्क ऑफ धि कोर्ट, निसबत डेप्युटी कमिशनर

जिल्हा वणी प्रांत वऱ्हाड

यांनीं तयार केलें.

प्रकाशक,

मेसर्स बी. एस्. वैद्य आणि कंपनी,

बुकसेलर्स आणि पब्लिशर्स, कालबादेवी रस्ता, मुंबई.

सन १८९७ इसवी.

किंमत दीड रुपया.

मुंबईत,
"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिलें.

या पुस्तकासंबंधी सर्व हक्क सन १८६७ चा ॲक्ट २५ प्रमाणें ग्रंथकर्त्यानें
आपणाकडे ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

बिषप फर्‍यॅरर या नांवाच्या एका इंग्लिश ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, परमेश्वर ज्या अनेक रूपांनीं व मार्गांनीं आपल्या आज्ञा व निदेश या जगांत प्रदर्शित करितो, त्यांतच विशिष्ट व्यक्तींच्या चरित्रांचा समावेश होतो; म्हणजे त्यांच्या आचरणांवरून व कृतींवरून ईश्वरी इच्छा प्रदर्शित होतात व त्यांचें ह्रद्गत आपणांस समजून येतें. सुशील, नीतिमान् व उदार पुरुषांच्या विमल आणि सोज्वल आचरणांनीं सामान्यजनांस बोध व्हावा व त्यांची सदाचाराकडे प्रवृत्ति व्हावी असा ईश्वरी संकेत आहे, असें आह्मास वाटतें; व हा संकेत परिपूर्ण करण्याकरितां तो सर्व देशांत व सर्व कालांत थोर पुरुषांच्या विभूति निर्माण करितो. ज्याप्रमाणें मोठमोठाल्या शहरांत अंधाऱ्या रात्रीं पथिकजनांस मार्ग दाखविण्याकरितां जागोजागीं उंच खांबावर कंदिलांची योजना केलेली असते, त्याप्रमाणें आपल्या या संसारयात्रेचा मार्ग सर्वांस स्पष्ट दिसावा व तो सुगम व्हावा ह्मणून या थोर पुरुषांची योजना आहे. एका आधुनिक कवीनें ह्मटलें आहे:—

> "थोर* पुरुष जे होऊनि गेले त्यांचीं चरितें बोधविती ॥
> सर्वांनांही करितां येईल अल्पायासें थोरमती ॥
> घेतां येइल सत्पथ; तेणें पुढचे जातिल लोक किती" ॥

चरित्रवाचनापासून मनावर जे अनेक इष्ट ग्रह होतात त्यांत परमेश्वरावर एकनिष्ठेनें भाव ठेवणें हा प्रमुख होय. दुसऱ्या कोणावर कितीही निष्ठा ठेविली, केवढाही भाव ठेविला तरी व्यर्थ. एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे—"विश्वासोनैव कर्तव्यः स्त्रीषु राजकुलेषु च." याची प्रचीति इतिहासाकडे दृष्टि दिली असतां पदोपदीं अनुभवास येते. कार्डिनल्

* महाजनीकृत कुसुमांजली—जीवितसार.

उल्सीनें मोठ्या एकनिष्ठेनें दीर्घकालपर्यंत आठव्या हेनरीची चाकरी केली, परंतु अखेरीस वृद्धापकाळीं मरणसमयीं त्यास दरबारांतून गाशा गुंडाळावा लागला व एका भिकारड्या मठींत देहावसान ठेवावें लागलें. बहिरामखानानें अकबरास हिंदुस्थानासारखें प्रचंड राज्य मिळवून दिलें; परंतु बादशहाची मर्जी रुष्ट होतांच त्यास हद्दपार जावें लागलें. कोलंबसानें दीर्घायास सहन करून व नाना संकटें भोगून नवीन अमेरिका खंडाचा शोध लाविला व तो विस्तीर्ण प्रदेश आपल्या राजास अर्पण केला तरी त्या राजाची मर्जी खपा होतांच त्यास या नूतन खंडांतून शृंखलाबद्ध होऊन यावें लागलें. मनुष्यावर निष्ठा ह्मणून ठेवितां कामाचें नाहीं. स्नेही व इष्टमित्र यांपासून देखील कधीं कधीं दगे होतात.

ईश्वरावर मनोभावें निष्ठा ठेवावी एवढेंच नाहीं तर मनांत निरंतर त्याचीच भीति बाळगावी व जनापवादाकडे बिलकुल लक्षसुद्धां देऊं नये, असाही चरित्र वाचनापासून बोध होण्याजोगा आहे. "परमेश्वर माझा साथी आहे" असें ज्यास ह्मणतां येईल त्यास कोणाचेंही भय नाहीं. बुद्ध तुकाराम, एकनाथ व साक्रेटीस यांस नानाप्रकारचे जाच व यातना सहन कराव्या लागल्या; अनेक प्रसंगीं त्यांची हुर्यो उडाली; नाहीं नाहीं त्याप्रकारें दुष्ट लोकांनीं त्यांची फजिती केली, तथापि अखेरीस ते सर्व जगास वंदनीयच होऊन बसले. जगाचा उद्धार करण्याकरितां ह्मणून ज्यांनीं ज्यांनीं अविरत श्रम केले, त्या सर्वांना कष्ट भोगावे लागले, छी थू सहन करावी लागली, लोकांच्या शिव्या खाव्या लागल्या; इत्यादि गोष्टींचें मनन केलें असतां एखाद्या निरहंकारी आधुनिक सुधारकास केवढा बरें पाठिंबा मिळण्यासारखा आहे. त्यांची ती थोर सहिष्णुता, परहितैकबुद्धि व स्वहितत्याग इत्यादि गुणांच्या विचारांनीं ज्यांच्या मनांत निदान क्षणमात्र तरी अनुकरणेच्छा व स्फूर्ति उत्पन्न होणार नाहीं असे हरीचे लाल फारच थोडे असतील.

लहानपण व मोठेपण यांजविषयींचा आपणांत भ्रांतिमूलक समज आहे. ज्यानें आपल्या बांधवांचे गळे कापून सात तालाची माडी उभारिली आहे व जो नेहमीं दोन घोड्यांच्या फेटणींतून वस्त्रालंकारांनीं भूषित होऊन फिरतो, तो मोठा व सन्माननीय मानिला जातो; व जो कोणी आपल्या कर्तव्यास स्मरून परद्रव्य लोष्टवत् मानितो व आपल्या निढळाच्या घामानें जें कांहीं प्राप्त होईल, त्यांतच संतुष्ट राहतो तो लहान व अनादरणीय समजला जातो. याचें कारण इतकेंच कीं, सामान्यजन अदूर दृष्टीचे आहेत व त्यांस खरी थोरवी समजत नाहीं. थोर पुरुषांच्या चरित्रांचें मनन केलें असतां हा घातुक समज नाहींसा होण्यासारखा आहे.

या आपल्या आर्यभूमींत आजपर्यंत अनेक पुरुषरत्नें होऊन गेलीं. त्यांनीं आपल्या हयातींत जनसमुदायावर अनेकप्रकारें उपकार करून त्यांच्या सुखांत भर घालण्याकरितां अश्रांत व जिवापाड मेहनत केली. असे जे महापुरुष अर्वाचीनकाळीं होऊन गेले, त्यांत अकबरबादशहाची प्रमुखत्वेंकरून गणना आहे. त्याचें हें अल्पचरित्र वाचकांस सादर केलें आहे. या सेवेचा आदर पुरुषमाहात्म्यासाठीं तरी होईल अशी उमेद आहे.

हें पुस्तक भाषांतररूपानें लिहिलें आहे. यांत फक्त अकबरबादशहाचेंच इतिवृत्त आहे असें नाहीं, तर एकंदर मोंगलबादशाहीचा उत्कर्ष कोणी व कसकसा केला याची साद्यन्त व खुलासेवार माहिती दिलेली आहे. मूळचें इंग्रजी पुस्तक एका नामांकित ग्रंथकारानें लिहिलें असून तें विद्वज्जनांच्या आदरास पात्र झालें आहे. त्याची ही प्रतिकृति, मागसलेला ह्मणून गणलेल्या प्रांतांतील एका गावांत असणाऱ्या व वाग्देवीच्या मंदिराचा उंबरठा देखील ज्यानें ओलांडिला नाहीं, अशा एका अप्रसिद्ध साहसिकानें महाराष्ट्र भाषेंत उतरविण्याचें धाडस केलें आहे.

ती त्यास चांगलीशी साधली नसेल हें तो जाणून आहे. तथापि, त्यांतील दोष विद्वज्जनांच्या परीक्षणांनीं कळून आल्यास दुसरी एखादी तसबीर उतरण्याच्या कामीं मदत होईल, येवढ्याच हेतूनें ही देशभाषेची केलेली अल्पसेवा महाराष्ट्र देशांतील विद्वज्जनापुढें आणिली आहे.

हें भाषांतर छापून प्रसिद्ध करण्याच्या कामीं अनेक अडचणी आल्या. त्यांतून पार पाडण्याकरितां माझे जुने सहाध्यायी प्रोफेसर दामोदर गणेश पाध्ये एम्. ए. यांनीं साह्य केलें. शिवाय, त्यांनीं हें समग्र पुस्तक वाचून तपासिलें व अनेक योग्य फेरफार करण्याची कृपा करून तसदी घेतली याकरितां याठिकाणीं त्यांचे आभार मी आनंदानें मानतों.

एका आधुनिक नाट्याचार्यानें ह्मटल्याप्रमाणें—"जाणुनिया अवसान नसोनी महत्कृत्यभर शिरिं घेतों—" मी हा लहानातोंडीं मोठा घास घेतला व तो शेवटास कसा जाईल याची मोठी चिंता होती. परंतु गुरुवर्य रा. रा. विष्णु मोरेश्वर उर्फ अण्णा साहेब महाजनी यांचा उपदेश—"*आपण अपुलें कर्म करावें चिंता सारी प्रभु वाही"—मनांत ठेवून आरंभिलेलें कार्य अव्याहत सुरू ठेविलें व तें प्रभुकृपेनें तडीस गेलें; यास्तव त्याचे अनन्यभावें उपकार स्मरून व पदोपदीं आभार मानून ही प्रस्तावना अटोपती घेतों.

**येवतमहाल,** **वा. वि. चां.**

तारीख १ माहे एप्रिल, १८९७.

---

* कुसुमाञ्जली—जीवितसार.

# अनुक्रमणिका.


| भाग. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | उपोद्घात .... .... .... .... .... .... | १ |
| २ | बाबरचें घराणें व त्याचें लहानपण .... .... .... | ८ |
| ३ | बाबर काबूल जिंकितो .... .... .... .... | १२ |
| ४ | बाबरची हिंदुस्थानावरील स्वारी .... .... .... | २१ |
| ५ | हिंदुस्थानांत बाबरची स्थिति .... .... .... | २९ |
| ६ | हुमायून व अकबराचें बालपण .... .... .... | ४३ |
| ७ | हुमायुनाची हिंदुस्थानावरील स्वारी व त्याचा मृत्यु .... | ५४ |
| ८ | बापाची गादी मिळविण्याकरितां अकबरानें केलेलें युद्ध. | ५९ |
| ९ | सोळाव्या शतकार्धांत असलेली हिंदुस्थानची साधारण स्थिति .... .... .... .... .... .... | ६६ |
| १० | बहिरामचें अकबरास शिक्षण .... .... .... | ७५ |
| ११ | अकबराच्या कारकीर्दीचा वृत्तांत .... .... .... | ८६ |
| १२ | आईन-ए-अकबरी व देशांतील राज्यकारभार .... .... | १४२ |

D. S. Bhandarkar.
July 1897.

# अकबर बादशहा.

## भाग पहिला.

### उपोद्घात.

**ज्या** थोर बादशहानें हिंदुस्थानांत मोंगल घराण्याची स्थापना दृढ पायावर केली, त्याचें हें लहानसें चरित्र आम्हीं कोणत्या नमुन्यावर लिहिलें आहे व त्यांतील विषयरचना कशी आहे, याचा थोडक्यांत खुलासा करण्याकरितां दोन शब्द लिहितों, त्याची वाचकांनीं क्षमा करावी.

अशा प्रकारचें चिरस्थायी राष्ट्र स्थापन करण्याची मूळ कल्पना अकबराची नव्हे. अकबराचा आजा बाबर यानें हिंदुस्थानचा मोठा भाग सर केला होता. पण त्यानंतर पांच वर्षांनींच त्याचा अंत झाला; व तेवढ्या अवकाशांत मुत्सद्दीपणाची कर्तबगारी दाखवून राज्यांत व्यवस्था करण्यास त्याला फारशी संधि सांपडली नाहीं. त्यानें समरांगणांत पाडाव केलेले प्रतिस्पर्धी राजे व त्याचे हिंदु प्रजाजन हे बाबराला केवळ विजयी योद्धा ह्या पेक्षां ज्यास्त कांहीं लेखीत नसत. तो अलौकिक बुद्धिसामर्थ्याचा होता. त्याच्या आयुष्याचा बहुतेक काळ लढाया करण्यांतच गेला. साहसाच्या जोरावर स्वोन्नति करणाऱ्यांपैकीं तो एक होता; पण त्याचे साहसांस असें यश मिळे कीं त्यानें लोकांचे डोळे दिपून जात. त्याची बुद्धि अचाट होती आणि त्याच्या कल्पनाशक्तीची भरारी तत्कालीन वीरांच्यापेक्षां फार उंच जात असे. विपत्कालाच्या राकट तालमींतून तो कसून बाहेर पडला होता. काबूलच्या दुर्गावरून सुपीक हिंदुस्थानांतील

डे. ए. ए. द. पा. पोतदार,

झालेली अंधाधुंदी व फांकाफांक नजरेस येतांच त्यानें त्या देशाच्या मैदानांवर अगदीं अनिवार जोरानें झडप घातली. असा हा बाबर; त्याच्या विचाराची मजल तत्कालीन विचारांच्या फार पुढें गेलेली होती. तो उदार व मायाळू असून उदात्त विचाराचा होता. तथापि हिंदुस्थानाशीं त्याचें नातें फक्त लढाई जिंकणारा योद्धा या पलीकडे गेलेलें नव्हतें. ज्या राज्यकारभाराच्या पद्धतीचा त्याला आजन्म परिचय होता व जी पद्धति त्याच्यापूर्वी हिंदुस्थान जिंकणाऱ्या अफगाण राजांनीं सुरू केली होती, तीहून अन्य पद्धतीविषयीं विचार करण्याला त्याला अवकाशच फावला नाहीं. ही पद्धति ह्मणजे राज्याचे मोठमोठे विभाग करावयाचे, व प्रत्येक विभागांत नाक्याचीं ठिकाणें पाहून तेथें छावण्या देऊन, त्यांवर राजनिष्ठ सरदारांची योजना करून, त्यांचे हातानें, सैन्याच्या जोरावर राज्यकारभार चालवावयाचा, ही होती. हिंदुस्थानांत नव्हे, तर मध्यएशियांत राज्य स्थापन करावें हें बाबरच्या राजनीतीचें मुख्य धोरण नव्हतें कीं काय, हा प्रश्नच आहे.

ह्या, वर वर्णिलेल्या राज्यव्यवस्थेचे पद्धतींत देशांतील प्रजेचे सुखसमाधानाकडे फारसें लक्ष नसे. यदाकदाचित् बाबर आणखी बरेच दिवस वांचता व त्याचें बुद्धिसामर्थ्य तसेंच कायम राहतें, तर नातू अकबर याप्रमाणें, त्याचेही नजरेस असें आलें असतें कीं ही पद्धति व्यवहारदृष्ट्या दोषमय आहे. राज्यव्यवस्थेचें मुख्य तत्व जी सुसंगता ती या पद्धतीनें कधींच साधत नाहीं. त्याचप्रमाणें, जिंकणारे व जिंकिलेले या उभयतांचें हिताहित एकमेकाशीं साधून देण्याचें ही तत्व तींत नाहीं. तिच्या योगानें प्रजाजनांत राज्यकर्त्यांविषयीं अनुरक्ति उत्पन्न करितां येत नाहीं. त्यांच्या मनांतील दुराग्रह नाहींसे करून तीस त्यांना आपलेसे ही करून घेतां येणार नाहीं. हिच्या योगानें राज्याचा पाया बळकट होऊन तें दुर्दैवाच्या सपाट्यांत न डगमगणारें होईल, असा संभव नाहीं. बाबरनें स्वतः आपलें वृत्त लिहून ठेवलें आहे, त्यावरून त्याशीं आपला पूर्ण

परिचय झाला आहे. या वृत्तांतांत त्यानें आपल्या अंतःकरणाच्या गुह्य गोष्टी प्रगट करून आपले दोष प्रांजलपणें कबूल केले आहेत व आपल्या महत्वाकांक्षा सविस्तर कळविल्या आहेत. त्यावरून पाहतां आपणाला असें वाटेल कीं, त्याला संधि मिळाली असती तर कदाचित् त्यानें आपल्या राज्यपद्धतींतील वरील दोष काढून टाकले असते. परंतु, कर्मधर्म-संयोगानें त्याला अशी संधिच मिळाली नाहीं. पानिपतच्या पहिल्या लढाईमुळें बाबराला हिंदुस्थानच्या वायव्येकडील प्रांत मिळाले. या लढाईपासून तों त्याच्या मरणापर्यंत जो काळ लोटला तो इतका थोडा होता कीं, त्या अवसरांत जिंकिलेले प्रांत निर्धास्त करणें व त्यांत नवीन मुलुखांची भर घालणें, याहून दुसऱ्या कोणत्याही गोष्टींचा विचार त्यास करितां आला नाहीं. समरांगणीं लढाई जिंकून त्याचा हिंदुस्थानांत प्रवेश झाला, व पुढें आग्रा एथें त्यानें पांच वर्षें राज्यकारभार चालविला, तो विजयी योद्धा ह्याहून कोणत्या ही स्निग्धतर नात्यानें चालविला नाहीं.

बाबराला ज्या कामाकडे दुर्लक्ष करणें भाग पडलें तें काम तडीस नेण्याची कर्तृत्वशक्ति त्याचा मुलगा हुमायून यामध्यें स्वाभाविकतःच नव्हती. त्याचा स्वभाव अधीर व चंचल असून त्याच्यांत योजक बुद्धीचा अभाव होता, तेव्हां अर्थात या दोन्ही गोष्टींमुळें तो या कामास सारखाच अयोग्य होता. त्यानें हिंदुस्थानांत आठ वर्षें राज्य केलें. पण या अवकाशांत स्थायिक राज्याच्या पायाचा एकही दगड त्यानें बसविला नाहीं. नंतर, पूर्वीं होऊन गेलेल्या अफगाण राजांचे राज्यवृक्ष, देशांत पाळेंमुळें खोलवर न गेल्याकारणानें, जसे कोसळून पडले, त्याप्रमाणेंच या आठ वर्षांचे अखेरीस हुमायुनाचा ही राज्यद्रुम कोसळून पडला; व असा परिणाम समरांगणांत फक्त एकदां पराभव होतांच घडून आला. सिंधुनदाचे दक्षिणेस बाबरानें जेवढें ह्मणून मिळविलें होतें तें सर्व एका धक्यासरशीं पार नाहींसें झालें. तेव्हां हिंदुस्थानची राज्यसत्ता मोंगलांच्या हातांतून कायमची निघून गेली; असें निदान दिसलें तरी खरें.

म. अ. म. ए. गा. पोतदार

बाबराच्या मुलाला हार खावी लागली ती त्याहून अधिक चतुर योद्धा व मुत्सद्दी अशा शेरखानसूर नांवाच्या सेनापतीपुढें. त्यानें त्याच्या जागीं आपली सत्ता पूर्णपणें स्थापिली. परंतु, त्याचे अंगीं जरी अलौकिक बुद्धिसामर्थ्य होतें, तरी मोंगलांच्या व विशेषतः हिंदुस्थानांतील लोकांच्या सुदैवानें राष्ट्र स्थापन करण्याच्या कलेसंबंधीं, पूर्वीं होऊन गेलेल्या अफगाणसरदारांच्या विचारांत व याच्या विचारांत अणूरेणूचा देखील फरक नव्हता. हिंदुस्थानांतील कोट्यावधि प्रजाजनांना आपलेंसें करून घ्यावें हा विचार, ती पद्धति अनुसरणाऱ्यांच्या मनांत येतच नसे. आपण काबीज केलेल्या प्रांतांत छावण्या देऊन सैन्याच्या जोरावरच कारभार चालविण्यांत शेरखान यानेंही समाधान मानिलें. याचा परिणाम असा झाला कीं, शेरखानसूर मरण पावतांच, दुसरे लोक हिंदुस्थानचें राज्य संपादन करण्याच्या चढाओढींत शिरले. यामुळें थोडक्याच वर्षांत इतका गोंधळ उडाला कीं इ० स० १५५४ या वर्षी—कनोज येथील समरांगणांतून पळ काढल्यापासून बरोबर चवदा वर्षांनीं—हुमायुनानें पुनः सिंधुनद ओलांडून उत्तरहिंदुस्थान आणखी एकदां सर केला. अझूनही त्यास तारुण्याचा जोम होता; तथापि चिरस्थायी राष्ट्र स्थापन करण्याची योग्यता तो आपल्या बापानंतर गादीवर बसला त्यावेळीं जशी त्याला नव्हती, तशी आतांही पण नव्हती.

हुमायुनाच्या हातचे अनेक लेख आहेत. त्यांवरून इतकें सिद्ध होतें कीं, ईश्वर कृपेनें तो ज्यास्त दिवस वांचता तरी, पूर्वीं होऊन गेलेल्या हिंदुस्थान जिंकणाऱ्या योद्धयांच्या हातांत ज्या राज्य व्यवस्थेचा फन्ना उडाला व त्याच्या स्वतःच्या हातांत देखील जिचा चुराडा झाला, तीच व्यवस्था पुनः स्थापित करून राज्य चालविण्याचा त्यानें प्रयत्न केला असता. मरणापूर्वीं थोडे दिवस त्यानें हिंदुस्थानच्या राज्याची एक नवी व्यवस्था योजिली होती. ही पद्धति ह्मणजे नाक्याच्या ठिकाणीं छावण्या देऊन सैन्याच्या जोरावर राज्य करण्याची

जी जुनी पद्धत, तीस अनुसरूनच होती. या छावण्यांचा एकमेकांशीं संबंध ह्मणून नसे. त्या सर्वांवर बादशहाची देखरेख मात्र असे. नवीन सर केलेले प्रांत बिनधोक करण्यास ही योजना उत्तम प्रकारची होती यांत शंका नाहीं. पण निरनिराळे प्रांतांत ऐक्यभाव स्थापण्याच्या कामीं व त्यांतील प्रजाजनांचा एक सुसंमत समाज करण्याच्या कामीं ही पद्धति अगदीं अपुरी होती.

पानिपतची दुसरी लढाई होण्यापूर्वींच अपघातानें हुमायुनाचा अंत झाला. यामुळें अकबर लहान १४ वर्षांचा मुलगा असतांच त्यास बाबरानें मिळविलेलें राज्यपद प्राप्त झालें. हा योग हिंदुस्थानाला सर्वतोपरी श्रेयस्कर झाला. हुमायून दीर्घकालपर्यंत हिंदुस्थानांतून काबुलांत गेला होता. तो अनेक वर्षें दैवगतीशीं झुंजत होता. पण याकालांत त्यानें कांहीं नवें शहाणपण संपादिलें नाहीं व आपल्या जुन्या चुकीच्या समजुतीही तो विसरला नाहीं. त्याच्या मागून गादीवर बसलेला त्याचा मुलगा—अकबर अगदीं अल्पवयी खरा; तथापि, इतक्यांतच साधारण मनुष्याच्या सर्व आयुष्यांत येऊं शकतील इतके दुर्धट प्रसंग व दैवाचे फेरे त्यावर येऊन चुकले होते. अज्ञूनपर्यंत तो कसोटीस लागलेला नव्हता. त्या काळीं अतिप्रबळ ह्मणून नावाजलेला सेनापति—बहिरामखान—हा त्याच्या जवळच होता. परंतु, या प्रबळ सेनापतीची राज्यकरण्याची शैली संकटांशीं झगडतां झगडतां तयार झालेल्या हुमायुनच्या असंस्कृत पद्धतीप्रमाणेंच होती. पण, अकबर याचे अंगीं जे अनेक लोकोत्तर गुण होते त्यांत मोठा गुण हा होता कीं, जसें मोडण्याचें तसें जोडण्याचें ही पण बुद्धिसामर्थ्य त्याजपाशीं होतें. त्यानें आपल्या अलौकिक सेनापतीस आपल्या नांवानें कांहीं वर्षें राज्यकारभार चालवूं दिला; व त्या अवकाशांत पूर्वीं होऊन गेलेलीं राजघराणीं अल्पायुषी कां झालीं आणि त्यांचीं मुळें देशांत कां रुझलीं नाहींत या गोष्टींचा त्यानें खोलवर विचार केला. त्याच्या योजना व बेत परिपक्क झाल्यावर त्यानें राजवेत्र आपल्या हातीं घेऊन, अशा पद्धती-

वर आपल्या घराण्याची सत्ता बसविली कीं, त्याची पद्धति चालू होती तोंपर्यंत ती सत्ता उत्कर्षावस्थेंत राहिली. त्या पद्धतींतील तत्वांपैकीं मुख्य तत्वें—धर्मस्वातंत्र्य व प्रजानुकूलता—यांचा लय होतांच त्याचे घराण्याचा ऱ्हास होण्यास प्रारंभ झाला.

एथवर दिलेल्या संक्षिप्त हकीगतीवरून वाचकांस स्पष्टपणें कळून आलें असेल कीं, एका अर्थी बाबर हा हिंदुस्थानांत मोंगल घराण्याचा संस्थापक होऊन गेला खरा; परंतु त्यानें आपल्या नंतर येणाऱ्या बादशहांला आठवण ठेवली, ती फक्त लढाया मारणाऱ्या विजयी योद्ध्याचीच. निदान इतकें खास कीं, हुमायुनाचे अंतःकरणांत एवढीच कल्पना उतरली होती व त्यानें तिच्या जोडीस दुसरी कोणतीही कल्पना न आणिल्यामुळें बापानें कमाविलेलें सारें राज्य गमाविलें. त्यांपैकीं कांहीं भाग त्यानें अखेरीस परत मिळविला हें खरें; परंतु तो केवळ लढाई जिंकून मिळविला. त्याच्या नातवानें मात्र या राज्यरूपी वृक्षाचीं मुळें देशांत खोलवर जातील असें केलें. तीं तेथें रुझलीं व त्यांचा विशाल व जोमदार वृक्ष होऊन, त्यास पराभूत केलेल्या नानाविध प्रजाजनांच्या सुखसमाधानरूपी सुरस फळांचा मातबर बार आला.

पुढील पृष्ठांत जे मुख्य सिद्धांत सिद्ध केले आहेत त्यांचा हा एथवर उपोद्घात केला. या पुस्तकाचे स्वाभाविकपणें तीन भाग होण्याजोगे आहेत असें दिसतें. यापैकीं पहिल्या भागांत हिंदुस्थानावर स्वारी करून विजय संपादण्याची व तेथें राज्य स्थापण्याची कल्पना प्रौढतेस आणणाऱ्या बाबरचा वृत्तांत दिलेला आहे. तो एक मोठा अलौकिक पुरुष होऊन गेला; व तो कोणत्याही युगांत जन्मला असता तरी अलौकिकच झाला असता. तो आपले ४९ वे वर्षीं भर-ज्वानींत मरण पावला. त्यानें आपल्या मागें स्वतः लिहिलेली स्वतःची बखर ठेविली आहे. तिच्या वाचनापासून ह्या एकोणिसाव्या शतकाचे अखेरीस देखील मनोरंजन व लाभ होण्याजोगा आहे. याच्या वृत्तांताला बराचसा

भाग देण्याचें आह्माला विशेष जरूर वाटलें. कारण, आजाची धमक आणि उत्साह व त्याची नैसर्गिक उदार वृत्ति, हीं त्याच्या नातवाच्या–अकबराच्या–कृतींत वाचकांना पदोपदीं नजरेस आल्यावांचून राहणार नाहींत. हुमायुनाची हकीगत खरोखर या पहिल्या भागांतच समावेश करण्यासारखी आहे. तिच्यापैकीं जेवढी ह्मणून, त्याचा ऱ्हास ज्यांमुळें झाला तीं कारणें स्पष्टपणें कळण्यास व त्यानें हिंदुस्थानांतून पळ काढिला असतां मार्गांत सिंध देशांत जन्मलेल्या आमच्या चरित्रनायकाचे बालपणाचे दिवस कसे गेले हें समजण्यास अवश्य, तेवढींच येथें दिलीं आहेत.

बाकी राहिलेल्या दोन भागांत अकबराचें इतिवृत्त दिलें आहे. तथापि एथें देखील आह्मी मुख्य विषयाचे दोन विभाग केले आहेत. यापैकीं पहिल्या विभागांत तत्कालीन मुसलमान इतिहासकारांच्या ग्रंथांचा आधार घेऊन अकबराच्या राजवट्यांत घडलेल्या राजकीय गोष्टी सांगितल्या आहेत. शेवटच्या भागांत तो पुरुष कसा होता याचें चित्र दिलें आहे. त्यानें राज्य कसें केलें, तें सुयंत्रित चालण्यासाठीं त्यानें कोणकोणच्या नवीन संस्था स्थापिल्या व नवीन व्यवस्था केल्या, इंग्रजसरकारांनीं देखील पुष्कळ अंशांनीं चालू ठेविलेली राज्यपद्धति त्यानें कशी रचिली, पांच शतकांचे तंटे व वाद आणि अनादि काळापासून चालत आलेले दुराग्रह त्यानें कसे मोडले व शांत केले, याचें वर्णन या भागांत, आईन–ए–अकबरीच्या व इतर ग्रंथांच्या आधारें करण्याचा मीं यथाशक्ति प्रयत्न केला आहे. आपल्या मतांहून ज्यांचीं मतें भिन्न आहेत अशांचा छलवाद करावा असें शिकविणाऱ्या मुसलमानी धर्मांत लहानाचा मोठा झाला असतां ही ज्यानें आपल्या विशाल बुद्धीस स्वैरगति दिली, व आपल्या बुद्धिवैभवानुरूप ज्यानें आपलें वर्तन ही उदार ठेविलें, असा हा अकबर, पति, पिता, व जनसमाजांतील एक कर्ता सवर्ता पुरुष ह्या दृष्टीनें कसा होता, याचें ही वर्णन केलें आहे. या सर्व पुस्तकांत हाच

भाग अतिशय मनोरंजक आहे असें सांगण्यास आह्मांस हरकत वाटत नाहीं. ह्मणून पुस्तकांतील पहिला भाग वाचण्याची तसदी होईल तिचा मोबदला या भागांत वाचकांस मिळेल; करितां त्याबद्दल क्षमा करावी अशी त्यांस विनंति आहे.

# भाग दुसरा.

## बाबराचें घराणें व त्याचें लहानपण.

॥ भवोहि लोकाभ्युदयाय तादृशाम् ॥

॥ जन्महि अशा जनांचा भाग्योदय सकल सृष्टिचा साधी ॥

समरकंदच्या उत्तरेस, तीस मैलांवर शहर—सब्ज मुक्कामीं, शुद्ध मोंगल वंशांतील बिरबास नांवाच्या एका शाखेच्या अधिपतीस तारीख ९ एप्रील सन १३३६ ईसवी रोजीं त्याचे गादीचा वारसदार होणारा त्याचा वडील मुलगा जन्मास आला. त्याचें नांव तैमूर. तैमूरची आई चेंगीझखानाच्या वंशापैकीं होती. लोकांवर सत्ता चालविण्यास जे गुण लागतात ते निसर्गतःच त्याच्या अंगीं होते. सुदैवें करून या गुणांचा उत्तम रीतीनें उपयोग करून दाखविण्यास यास योग्य संधि मिळाली. चेंगीझखानाच्या घराण्यांतील वंशज उत्तरोत्तर दुर्बल व आळशी होत गेले, व सन १३७० ईसवी सालीं त्यांचा निर्वंश झाला. त्यावेळीं तैमूरचें वय ३४ वर्षांचें होतें. त्यानें ही रिकामी झालेली गादी बळकाविली. दैवाचें पारडें अनेक वेळां खालीं वर होऊन शेवटीं त्याची पूर्ण सरशी झाली; व आक्स आणि झगझारटिस या दोन नद्यांच्या मधील संपूर्ण प्रदेशाचा तो निष्कंटक राजा होऊन बसला. यानंतर त्यानें दिग्विजयास आरंभ केला; तो आमरण चालू होता. त्याची सत्ता मुघलीस्थानांत ह्मणजे ज्या प्रदेशाच्या दक्षिणेस तिबेट देशांतील पर्वत, सिंधुनद, आणि मेक्रान आहेत व उत्तरेस सायबेरिआ

आहे, तेथें व किपचक नामक प्रातांत, ह्मणजे ज्यांत जक्सटरस नदीच्या मुखाचे व ऑरल आणि क्यास्पिअन समुद्राचे उत्तरेकडील व डॉन आणि व्होल्गा यांसभोंवतालचा सुपीक प्रदेश हीं समाविष्ट होतात तेथें त्यानें आपली सत्ता बसविली. त्यानें हिंदुस्थान देश काबीज करून दिल्ली व डारडेनेलीस यांच्यामधील प्रदेशांतील लोकांस आपलें स्वामित्व कबूल करावयास लाविलें. तो तारीख १८ फेब्रुवारी १४०५ ई० रोजीं मरण पावला. तेवेळीं, त्याचें राज्य जगांत जीं मोठीं ह्मणून राष्ट्रें होऊन गेलीं, त्यांच्या तोडीचें विशाल होतें.

त्याच्या मरणानंतर त्याचें राज्य लागलेंच मोडकळीस आलें व जरी त्याचा पणतू अबुसय्यद यानें त्याचा अंशतः जीर्णोद्धार करून त्यांत व्यवस्था केली, तरी सन १४६९ सालीं आरडेबिल नांवाच्या पर्वताजवळील खिंडींत शत्रूंनीं त्यावर एकदम घाला घातला व त्याच्या सैन्याची धुळधाण होऊन तो मारला गेला; त्यामुळें त्या राज्याचे लागलेच पुनः तुकडे तुकडे झाले व त्याच्या मुलांनीं ते आपसांत वांटून घेतले. या मुलांपैकीं तिसरा मुलगा उमरशेखमिरझा याच्या हिश्शास फरघणा, ह्मणजे तेथील राजधानीच्या नांवानें ही प्रसिद्ध असलेला खोकंड प्रांत आला.

उमरशेख हा बाबराचा बाप. हा महत्वाकांक्षी असे. आपलें राज्य विस्तृत करण्याचा त्याचा कृतनिश्चय होता. त्याच्या घराण्यांतील इतर मंडळीस ही पण त्याच्याप्रमाणेंच महत्वाकांक्षा असल्यामुळें ती ही आपआपलें राज्य वाढविण्यास तत्पर होती. ईसवी सन १४९४ सालीं, जेव्हां तो अपघातानें मरण पावला, तेवेळीं तो अक्षी एथील किल्ल्यांत असून त्यास शत्रूनें वेढा घातला होता. हा किल्ला त्यानें आपली राजधानी केली होती. त्याचा वडील मुलगा बाबर यास तेव्हां नुकतेंच बारावें वर्ष लागलें होतें, तो अक्षीहून ३६ मैलांवर अंडीजन एथें होता. शत्रूंनीं त्यावर चाल केली होती. बापाच्या मरणाच्या दुसरे दिवशीं बाबरानें तेथील किल्ला काबीज करून घेतला, व स्वारी करणाऱ्या

शत्रूंबरोबर तहाचें बोलणें सुरू केलें. शत्रूंच्या गोटांत फूट व मत्सर नसता तर या खटपटीचा कांहीं उपयोग झाला नसता. परंतु त्या फुटाफुटीमुळें त्यास फरघणाचे राज्यापैकीं जें उरलें होतें तें मिळवून आपलेंसें करून घेतां आलें. पण खोजंड, माराघिनन आणि युरेटिप हीं महत्वाचीं शहरें त्याच्या ताब्यांतून गेलीं.

शत्रु निघून गेल्यानंतर लहान बाबर दोन वर्षेंपर्यंत स्वस्थ बसला. ह्या कालांत आपल्या राज्याची सुव्यवस्था लावून फौज फांटा व दाणा गोटा जमवून तो शत्रूवर स्वारी करण्याची संधि पहात होता. तेवेळीं समरकंद हें शहर मध्य एशियांत फार महत्वाचें होतें. तेथें बखेडा उत्पन्न झाल्याचें पाहून त्यानें त्यावर एकदम स्वारी केली व तें शहर काबीज केलें. परंतु त्यानें आपल्या सैन्यास लूट करण्याची मनाई केल्यामुळें हजारों लढाऊ लोक त्याला नाराज होऊन सोडून गेले; तरी तो तसाच टिकाव धरून राहिला. अखेरीस स्वतःचे फरघण्यावरच हल्ला झाल्याची बातमी आल्यामुळें त्याला तेथील तळ सोडणें भाग पडलें. ऐन निघण्याचे वेळीं त्याला कठीण दुखणें आलें व त्या योगानें तो अगदीं निःशक्त झाला. सरतेशेवटीं तो फरघण्यास जाऊन पोहोंचला, तेव्हां आपली राजधानी शत्रूच्या स्वाधीन झाल्याची बातमी त्याचे कानीं आली. वस्तुतः यावेळीं तो राज्याशिवाय राजा होता; कारण त्याचे अंमलाखालीं कोणाचाच प्रांत नव्हता. त्यानें स्वतःच लिहिलें आहे कीं "अंडीजन वचाविण्यास मीं समरकंदाची आशा सोडिली पण पाहतों तों अंडीजनचा बचाव तर झाला नाहींच; पण समरकंदही हातचें गेलें." यावेळीं त्याची स्थिति पंचतंत्रांतील 'मत्स्यमांस परिभ्रष्टे किं निरीक्षसि नग्निके' याच्यासारखी झाली.

तथापि त्यानें आपला यत्न तसाच चालूं ठेविला व फरघणा—पूर्वींचा सगळा नव्हे तरी बराच—काबीज करून समरकंदावर पुनः एकदम स्वारी केली; परंतु युझबेक लोकांनीं त्यास वेढा उठविण्यास लाविलें. इत-

त्यांत त्याच्या राज्यावर शत्रूंनीं हल्ला करून तें जिंकिलें; ह्मणून तो माघार घेऊन आपली जन्मभूमि जें केश शहर तिकडे वळला. संकटाचे अनेक प्रसंग येऊन गेले व दैवाशीं बऱ्याच झटापटी झाल्या. शेवटीं, बाकी राहिलेल्या थोड्याशाच अनुयायांसह समरकंदावर पुनः एकदां एकदम न कळत छापा घालण्याचा बाबर यानें निश्चय केला. ही स्वारी फारच धिटाईची व धोक्याची होती; कारण, त्याचें एकंदर सैन्य कायतें २४० लोकांचें होतें. त्यानें पहिला यत्न केला तो फसला; पण पुनः यत्न केला त्यास यश आलें. बाबर अगदीं ऐन वेळेस जाऊन पोहोंचला होता; कारण तटांतील शेवटच्या जिवंत असलेल्या शिपायानें हात टेकले व न टेकले, इतक्यांत युझबेकांचा सरदार अघाडीच्या सैन्याच्या शिरोभागीं समरकंदवरच दौड करीत येतांना दिसला. त्यास अर्थातच हार खाऊन माघारें जावें लागलें.

अशा रीतीनें मिळविलेलें समरकंद शहर बाबर यास फार वेळ राखतां आलें नाहीं. पुढील वसंतांत युझबेक लोकांचें मोठें सैन्य पुनः आलें. त्यांचा मोड करण्याकरितां शहराबाहेर बुखाऱ्याच्या रस्त्यावर जिंकण्यास कठिण अशा ठिकाणीं बाबर यानें तळ दिला. त्याचे सैन्याचे उजवे अंगास कोहिक नांवाची नदी होती. त्यामुळें तिकडून फारसें भय नव्हतें. या ठिकाणींच तो शत्रूची वाट पाहात राहता तर कदाचित् त्यानें त्यांस हांकून लाविलें असतें. कारण तें ठिकाण इतकें मजबूत होतें कीं, हल्ला करून तें सर करतां येईल असा संभव नव्हता. परंतु, युझबेक लोकांच्या सैन्यावर हल्ला करण्याकरितां तेथून पुढें जाण्यास एका ज्योतिष्यानें बाबराचें मन, त्यास स्वतः तसें करणें बरोबर नाहीं असें वाटत असतां, वळविलें. यानंतर जी लढाई झाली तींत प्रथमतः बाबरास बहुतेक जय मिळाला, पण अखेरीस त्याचा पराभव झाला व तो सैन्यासह शहराचे तटाचे आंत माघारा गेला. पांच महिनेपर्यंत तो तेथें टिकाव धरून राहिला. पण दुष्काळामुळें त्यास शेवटीं हार खावी लागली. समागमें असलेल्या

लोकांसह शहर सोडून जाण्यास त्यास परवानगी मिळाली. प्रथम तो युरेटिप एथें गेला व शेवटीं युरेटिपवर राज्य करणाऱ्या खानानें दिलेल्या डेहकाट नांवाच्या खेड्यास गेला. पुढील तीन वर्षें दैवावर हवाला ठेवून त्यानें राज्य मिळविण्याच्या खटपटींत व साहसांत घालविलीं. आज अरण्यांत हद्दपार झालेला तर उद्यां स्वारी करून गादी मिळवीत आहे. सर्वदा आनंदी, व अखेरीस आपणास जय मिळेल अशी खात्री असल्या-मुळें सदा हिंमतदार व उत्साही. अशा रीतीनें त्यानें हा काळ घालविला. फरघणा फिरून मिळविण्याचा त्यानें यत्न केला; परंतु तो त्यास सोडून देणें भाग पडलें. नंतर निरनिराळ्या प्रांतांतील दोन तीनशें लोकांनिशीं खोरासनावर स्वारी करण्याचा त्यानें निश्चय केला. हा केवळ वेडेपणा दिसत होता, पण त्या वेडेपणांत ही पद्धत होती. त्यानें ही स्वारी कशी केली व तिचा परिणाम काय झाला याचें वर्णन पुढील भागांत केलें आहे.

# भाग तिसरा.

## बाबर काबूल जिंकितो.

॥ क्रिया सिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे ॥

॥ यशसिद्धी थोरांना निजसत्वें लाभते न उपकरणें ॥

**ज्या**ला आपण सध्यां पूर्व अफगाणिस्थान ह्मणतों तो प्रदेश, ह्मणजे काबूल व गिझनी हे प्रांत, यांचाच फक्त त्या वेळचे काबूलचे राज्यांत समावेश होत असे. हिरात ही एका स्वतंत्र राज्याची राजधानी होती. या वेळीं हें राज्य मध्य एशियांत सर्वांत मोठें होतें. काबूलचे राज्याशीं ज्यांचा संबंध नाहीं असे सरदार कंदाहार, बजोर, स्वाट आणि पेशावर या प्रांतांवर राज्य करीत होते. खास काबूल प्रांतांत ही, सपाट जमी-नीवर व खिंडींत राहणारे लोक मात्र तेथील राजाची सत्ता मानीत असत. डोंगराळ प्रदेशांतील लोक त्यांच्या हल्लींच्या वंशजाप्रमाणेंच

अगदीं स्वतंत्र व आडदांड असे होते. काबूलच्या राज्यांत यावेळीं बहुतेक झोटिंग बादशाहीच होती. कंदाहारच्या राजाचा मुलगा महमद मोकीम यानें माजी राजा अब्दुल रिझाक—मागील भागांत नामनिर्देश केलेल्या अबूसय्यद याचा नातू—याजवर एकदम हल्ला करून त्यास शहराबाहेर हांकून लाविलें होतें. पण या राजास उद्यां काय होईल याचा विचार मुळींच नसे; व त्याचा कारभार अगदीं धिम्मे रीतीनें चालत होता;—जणूं काय जगांत चोहोंकडे शांतताच आहे व त्यास तरी निदान कोठून ही भय नाहीं. या वेळेस रानोमाळ हिंडून आपले आयुष्याचे दिवस काढण्याचा कंटाळा येऊन बाबर यानें खोरासन प्रांतावर स्वारी करण्याचा निश्चय केला होता, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यानें आकूसस नदी उतरून एजरावर हल्ला केला; व तो तेथें कांहीं दिवस मुक्कामास राहिला. तेथील राजा सुलतान खुस्रू याचा मुलगा बाकी हा त्यास कुमक करण्याकरितां येऊन मिळाला होता. पुढें, खुस्रूच्या तैनातींतील मोंगल लोकांनीं बंड केलें, ही बातमी ऐकून त्या बंडापासून आपला फायदा साधून घेण्याकरितां बाबर तलीकान शहरावर चाल करून गेला. या दोन गांवांच्या दरम्यान त्यास खुस्रूचे बंडखोर मोंगल येऊन मिळाले; व सुलतान खुस्रू बाकी राहिलेल्या सैन्यासह काबुलावर जात आहे अशी बातमी त्यास लागली. हीं दोन्हीं सैन्यें इतकीं जवळ जवळ आलीं कीं, त्यांच्या अधिपतींची सहजच भेट होऊन बोलणेंचालणें झालें. परिणामीं खुस्रू बाबर यास शरण आला. त्याच्या सैन्यांतील लोकांच्या झुंडीच्या झुंडी बाबर यास येऊन मिळाल्या. याप्रमाणें शुक्ल पक्षांतील चंद्रासारखें बाबराचें सैन्य वाढलें जाऊन त्यानें काबुलावर स्वारी केली व त्यास वेढा घालून तें शहर काबीज केलें. या अकल्पित भाग्योदयामुळें बाबर यास गिझनी व काबूल एथील राज्यपद एकदम प्राप्त झालें. हें राज्य वारीस ह्या नात्यानें मिळालेल्या व गमावलेल्या फरघण्याच्या राज्यापेक्षां फारच प्रबल होतें.

या नवीन राज्यांत बाबराचे पाय भुईस लागतात न लागतात तोंच त्यास भेरा प्रांतावर स्वारी करण्याचें निमंत्रण आलें. हा प्रांत जेहलमच्या दक्षिणेस हिंदुस्थानच्या सरहद्दींत होता. हें निमंत्रण बाबरचे इच्छेनुरूप असून इतकें प्रिय होतें कीं त्याच्यानें तें नाकारवेचना. तो तसाच जलालाबादेस जाण्यास निघाला. ही गोष्ट जानेवारी १५०५ मध्यें घडली. ईश्वराच्या कृपेनें संपन्न असलेला हा एशियाचा भाग जेव्हां त्यास प्रथम दृग्गोचर झाला, तेव्हां आपले मनावर झालेल्या ग्रहाची नोंद सुलतान बाबर ( त्यास या वेळीं किताब मिळालेला होता ) ह्यानें आपले रोजनिशींत केली आहे. त्यानंतर हिंदुस्थानावर ज्यांनीं ज्यांनीं स्वाऱ्या केल्या त्यांचा ग्रह याप्रमाणेंच झाला होता ही गोष्ट निर्विवाद आहे; व त्यांच्या स्वाऱ्या करण्याचा जो कृतसंकल्प होत असे त्याचें बीज तरी हेंच. बाबर यानें असें लिहिलें आहे कीं " उष्ण प्रदेश किंवा हिंदुस्थान देश हे या पूर्वीं मीं कधींच पाहिले नव्हते. तेथें पाऊल पडल्याबरोबर एक नवीनच सृष्टि उदयास आली असें मला वाटलें. तेथील वनस्पति, वेली, झाडें, जंगलीं जनावरें हीं सर्व निराळ्या प्रकारचीं. तीं पाहून मी आश्चर्यचकित झालों व खरोखर तें सर्व स्थळ विस्मित होण्यासारखेंच आहे." नंतर बाबर खैबरघाटाच्या रस्त्यानें पेशावरास गेला; व सिंधुनद न ओलांडितां, बंगाश, बानू, व देश्त दमन या गांवांवरील मार्गानें मुलतानास गेला. तेथून तो सिंधुनदाच्या कांठानें कांहीं दिवस फिरून पश्चिमेकडेस वळला, व छोटियाली आणि गिझनीच्या रस्त्यानें काबुलास परत गेला. या मोहिमेस बाबरानें केलेली हिंदुस्थानची पहिली स्वारी ह्मणतात. परंतु हींत तो केवळ या देशाच्या सरहद्दीवरूनच गेला; त्या अर्थीं या मोहिमेस पुढील स्वाऱ्या करावयाच्या प्रांतांची टेहळणी हेंच नांव शोभतें. या टेहळणीमुळें, ह्या प्रदेशांतील अधिक भाग पाहण्याचा पुनः लौकरच योग जुळवून आणावा अशी त्यास उत्कट इच्छा उत्पन्न झाली.

परंतु, हिंदुस्थानास लुब्ध होऊन त्यावर स्वारी करून फत्ते मिळविलेल्या इतर योद्ध्यांप्रमाणें, बाबर यासही प्रथमतः कंदाहार आपले काबूंत पूर्णपणें करून घेणें अतिशय अगत्याचें वाटलें. सबब स्वदेशांत दंगेधोपे उद्भवल्यामुळें त्याला स्वारीस निघण्यास बरीच दिनावधि लागली, पुढें तेथें शांतता झाल्यावर स्वदेशाच्या बाहेरील इतर गोष्टींनीं त्याचें मन वेधिलें. त्याचा पुरातन शत्रु शैबानी हा पुनः समरकंदावर राज्य करीत होता व त्यानें लहान सान प्रांत जिंकून बलख यास वेढा घातला होता. ही त्याची चढती पाहून, हिरातचा राजा सुलतान हुसेन मिरझा हा घाबरला व स्वारी करणाऱ्या शैबानीवर हल्ला करण्यास मदत मागण्याकरितां त्यानें लगबगीनें बाबराकडे जासूद पाठविला. बाबरानें त्याची विनंति विलंब न लावतां मान्य केली व तो जून १५०६ मध्यें, काबुलाहून निघाला, तो थेट काहमर्ड एथें दाखल झाला; व तेथें तळ देऊन, दाणागोटा व इतर सामुग्री गोळा करून पुढील स्वारीची तयारी करूं लागला. तो या कामीं गुंतला असतां, जासुदानें सुलतान हुसेन मिरझा मरण पावल्याची खबर आणिली. ती ऐकतांच बाबर त्वरेनें पुढें सरसावला व ८०० मैल चालून जाऊन मुरघाब नदीवर मय्यत झालेल्या सुलतानाच्या मुलांस व त्यांचे सैन्यांस जाऊन मिळाला.

सुलतान हुसेन मिरझा याचे गादीवर त्याच्या मुलांपैकीं दोघेजण बसून समायिकीनें राज्य करूं लागले होते. हीं मुलें दिसण्यांत सुरेख; शिकलीं सवरलेलीं, चालचलणुकींत चांगलीं व बुद्धिमान् अशीं होतीं; पण तीं नामर्द व ख्यालीखुशालींत गर्क असल्यामुळें, साध्या व लढाऊ शैबानीबरोबर सामना करण्यास अगदीं अयोग्य आहेत असें बाबर यास तेव्हांच दिसून आलें. ते आपले गोटांत चैन मारीत असतां, शैबानी यानें बलख काबीज करून घेतलें. नंतर थोडेसें खलबत करून या उभयतां सामायिक राजांनीं ठरविलें कीं आपले सैन्यास तूर्त फांटा द्यावा व वसंत ऋतूंत पुनः लढाई सुरू

करावी. हिंवाळा अगदीं जवळ येऊन ठेपला होता; त्यामुळें नाखुष असतां ही, बाबर हा हिरात येथें या सामायिक सुलतानांचा पाहुणचार घेण्यासाठीं गेला. या राजधानीचें वैभव वर्णन करण्यास बाबरनें आपलें वृत्त स्वतः लिहून ठेविलेल्या बखरीचीं वीस पानें दिलीं आहेत. तो वीस दिवस, प्रत्येक दिवशीं नवीन नवीन स्थळें पाहत होता. व दिसें-बरची २४ वी तारीख निघून गेल्यावर त्यानें आपल्या घराकडे परत जाण्याचा विचार केला.

हिराताहून बाबराच्या राजधानीस पोहोंचण्यास उन्हाळ्यांत २० दिवस लागत. परंतु हिंवाळ्यांत हा प्रवास किती संकटाचा, कसोटी पाहणारा, त्रासदायक व बहुतेक पार न पडण्यासारखाच आहे याचा प्रत्यक्ष अनुभव १८७९–८१ सालांतील अफगणिस्थानावर केलेल्या मोहिमेंत कढत असलेल्या ब्रिटिश सरकारच्या सेनेस पूर्णपणें आला आहे. त्याची कल्पना अनुभवाशिवाय होणें नाहीं. तो पर्वतांतील रस्ता उन्हाळ्यांत फारसा कठीण नसतो; पण ऐन हिंवाळ्यांत तो परीक्षाच पाहतो. अशा रस्त्यानें, चोंहोंकडून बर्फ पडतच आहे, अशा स्थितींत बाबर हा आपल्या राजधानीकडे वळला. तो स्वतः वाट दाखविण्यास पुढें सरसावे व कल्पितां येत नाहींत असे परिश्रम करी. शेवटीं थकून भागून व निराशेनें वाटेल तें करण्यास तयार असा आपल्या सेनेसह कसाबसा झिरिन घाटावरून रस्ता जात होता त्याचे पायथ्याशीं येऊन पोंहोचला. तेथून पुढें जाण्याची आशाच दिसेना. वादळ सोसा-ट्यानें वाहत होतें व बर्फाचे खोलखोल थर चोंहोंकडे पडले होते. खिंडींतला रस्ता इतका निरुंद होता कीं एका मनुष्यास मात्र त्यावरून जातां येई. तथापि, बाबर तसाच नेटानें पुढें चालला. रात्र पडली तेव्हां थोड्याश्या लोकांसच आश्रय देईल अशा एका गुहेपाशीं तो आला. मनाचा अत्युदार, हा बाबरमध्यें मोठा अलौकिक गुण होता; त्यास अनुसरून त्यानें आपल्या सैनिकांस त्या गुहेंत निवाऱ्यासाठीं

जाण्यास सांगितलें; व स्वतःसाठीं हातांत खोरें घेऊन भुयाराचे तोंडापाशीं बर्फांत स्वतः खणून एक लहानसें बीळ तयार केलें. इतक्यांत जसजसें पुढें जावें तसतसें तें भुयार अधिकाधिक विस्तृत आहे व त्यांत पन्नास साठ लोकांस आडोसा मिळण्याची जागा आहे असें भुयारांतील लोकांस आढळून आलें. तेव्हां बाबरही आंत शिरला व जी थोडीशी शिदोरी शिल्लक होती तिचें सेवन तो व त्याचे अनुयायी यांनीं एकेच ठिकाणीं केलें. दुसरे दिवशीं सकाळीं बर्फ पडणें बंद झालें व वादळ ही शांत झालें. तेव्हां बाबरचें सैन्य पुढें सरसावलें. शेवटीं फेब्रुवारीचे अखेरीस तो काबूल येथें दाखल झाला. पण पाहतो तों शहरांत बंडावा झाला आहे आणि किल्ल्यांतील शिपायांनीं जरी अजूनही इमान सोडिलें नव्हतें तरी एकंदरीनें प्रसंग मोठ्या आणीबाणीचाच आहे. तथापि बाबर अगदीं डगमगला नाहीं; व त्या प्रसंगास उचित अशा युक्त्या व कल्पना त्यानें योजिल्या. नगरांतील आपल्या पक्षांतील लोकांशीं दळणवळण सुरू करून त्यांस मदतीसाठीं तयार करून त्यानें शहरावर एकदम छापा घातला व तें पुनः काबीज करून घेतलें. आंतील बंडखोर लोकांस त्यानें फारच दयाळूपणानें वागविलें.

बाबर यास ज्यानें समरकंदाहून पूर्वी हांकून लाविलें होतें, त्या युझबेकांचा सरदार शैबानीखान यानें त्यावर्षी, ह्मणजे सन १५०० सालीं, वसंतकालांत बल्खवर स्वारी करून तें शहर हस्तगत करून घेतलें. नंतर त्यानें खोरासनावर हल्ला केला व हिरातही बळकाविलें. कंदाहार हें शहर त्यावेळीं बऱ्याच अंशी हिरातच्या राजाच्या आश्रयाखालीं असे. सुलतान हुसेन मिरजा याचे राज्यांत तेथें मिरझुलननबेग हा सुभेदार होता. त्याच्या मुलांनीं तें शहर आपल्या स्वाधीन करून घेऊन, शैबानी विरुद्ध लढण्यास बाबराचें सहाय्य मागितलें. तदनुसार बाबर कंदाहारावर चाल करून गेला. मार्गांत, पदच्युत झालेल्या सुलतान हुसेनच्या घराण्याचे अनेक पळपुटे अनुयायी त्यास येऊन

मिळालें. परंतु बाबर कंदाहारास पोहोंचण्यापूर्वींच शैबानीखान यानें फारच नेट केल्यामुळें सुलतान झुलननच्या मुलांनीं त्याचें स्वामित्व कबूल केलें होतें. ही गोष्ट त्यांनीं बाबर यास अशा रीतीनें कळविली कीं तिच्या बद्दल त्याला कांहीं शंका उरली नाहीं. सबब तलवारीच्या जोरानें आपला हक्क स्थापित करण्याची बाबर यानें तयारी केली.

त्याचें सैन्य मोठें नव्हतें; पण खात्रीचें होतें व स्वतःच्या पराक्रमाविषयीं ही त्याला भरंवसा होता. कंदाहारांत मोर्चा फिरल्याचा सुगावा त्यास प्रथम खिलाविलझाई येथें लागला. तेथून तो टारनाक नदी उतरून पलीकडे गेला. येथून आपली योजना सयुक्तिक आहे अशी खात्री झाल्यावर लढाईच्या बंदोबस्तानें नदीच्या कांठाकांठानें तो कंदाहारचे उत्तरेस ५,६ मैलांवर असलेल्या बाबावली मुक्कामीं गेला व त्यानें कालिशादची टेंकडी हस्तगत करून घेतली. त्याचा विचार तेथें थोडीशी विश्रांति घेण्याचा होता, ह्मणून त्यानें आपले अनुयायांस सैन्याच्या बेगमीच्या वस्तु गोळा करण्यास पाठविलें. त्यांना तळ सोडून जाण्यास फार वेळ झाला नाहीं तोंच शत्रूचें सैन्य बाबराच्या दृष्टीस पडलें. त्यांत पांच सहा हजार लोक असून ते शहराकडून आपल्याकडे येत आहेत असें त्यानें पाहिलें. तेवेळेस बाबराजवळ हत्यारबंद लोक कायते हजारच होते. बाकीचे लोक दाणागोटा आणण्यास गेले होते. परंतु तीवेळ मागें पुढें पाहण्याची नव्हती. हें तेव्हांच त्याचे लक्षांत आलें. बचावास सुलभ अशा रीतीनें सैन्याची व्यवस्था लावून तो शत्रूच्या हल्ल्याची वाट पाहत बसला. या हल्ल्यांत झुलननचीं मुलें स्वतः पुढारी होतीं व त्यांनीं मोठें शौर्य दाखविलें. परंतु बाबरानें त्यांना मागें हटवून यःपलाय करावयास लाविलें, इतकेंच नाहीं तर त्यांचा पाठलाग अशा रीतीनें केला कीं त्यांना शहरापासून अगदीं तोडून टाकिलें. असें झाल्यावर तें शहर आंतील एकंदर दौलतीसह बाबराच्या हातीं लागलें. येथें त्यास जी लूट मिळाली ती फारच मूल्याची होती. तथापि तो

कंदाहार येथें राहिला नाहीं. आपला भाऊ नसीर मिरझा यास तेथील संरक्षणासाठीं ठेवून तो काबुलास परत गेला; व जुलै अखेर तेथें पोहोंचला. या मोहिमेंत आपणास पुष्कळ कीर्ति व अपार संपत्ति मिळाली असें जें त्यानें आपले पुस्तकांत लिहिलें आहे तें यथार्थ आहे.

बाबर तेथें जाऊन पोहोंचला नाहीं तोंच त्यास असें वर्तमान समजलें कीं शैबानीखान कंदाहारावर चालून गेला आहे व त्यानें आपल्या भावास वेढा घातला आहे. आतां काय करावें याची त्यास पंचाईत पडली; कारण शैबानीबरोबर रणांत सामना करण्यास योग्य येवढें सैन्य त्याजपाशीं नव्हतें. तथापि तो खरा सेनानी असून मोहिम फत्ते कशी करावी या कलेंत पूर्ण निष्णात होता. त्यानें ठरविलें कीं यावेळेस कोठें तरी एकदम चाल करून हल्ला करणें व शैबानीचें लक्ष कंदाहाराकडून वळविणें हेंच आपणांस श्रेयस्कर आहे. परंतु हा हल्ला बदकशानावर करावा व तेथून समरकंदावर जातों अशी भीति दाखवावी किंवा हिंदुस्थानावर करावा यासंबंधीं त्याचें मन द्विधा झालें. अखेरीस हिंदुस्थानावरच स्वारी करण्याचा बेत त्यानें कायम केला. शीघ्र निश्चयाप्रमाणें शीघ्र कर्तृत्व ही अंगीं असल्यामुळें काबूल नदीच्या मार्गानें सिंधुनदाकडेस जाण्याकरितां तो तडक निघाला. तथापि तो जलालाबाद येथें मुक्कामास असतां शैबानीच्या हस्तगत कंदाहार झाल्याची खबर त्यास लागली. यामुळें प्रस्तुतच्या स्वारीचा उद्देश नाहींसा झाला, ह्मणून तो काबुलास परत आला.

पुढील सात वर्षांत पुष्कळ उलाढाली घडून आल्या; परंतु त्यांचें सविस्तर विवेचन करण्याची जरूरी नाहीं. या सात वर्षांत—१५०७ पासून १५१४ पर्यंत—बाबरानें उत्तरेकडे स्वारी करून फरघणा पुनरपि आपले हस्तगत करून घेतला, युझबेकांचा पाडाव केला, आणि बुखारा व समरकंद हीं शहरें ताब्यांत घेतलीं. परंतु युझबेक लोकांनीं फिरून चाल करून कुलमालिका एथें बाबराचा पराजय केला व त्यास हीं

दोन्हीं शहरें सोडून द्यावीं लागलीं. हीं शहरें पुनः हस्तगत करून घेण्याचा प्रयत्न करीत असतां बाबर हा घाजदेवान एथें पराभव पावला; व त्यास हिसार येथें परत यावें लागलें. तेथें आपलें दैव उघडण्याची अगदीं निराशा आहे असें थोडकेच दिवसांत त्याला दिसून आलें; ह्मणून तो काबुलास परत गेला. ही गोष्ट १५१४ च्या आरंभीं घडून आली.

यानंतर आणखी आठ वर्षांचा वृत्तांतही थोडक्यांतच सांगितला पाहिजे. या काळांत अफगणिस्थानांतील डोंगराळ प्रांतांतील आपल्या अनिवार प्रजेचें बाबरानें पारिपत्य केलें व स्वात हस्तगत करून घेतलें व तह करून कंदाहार ही परत मिळविलें. तें शहर व त्याचे खालीं मोडणारा प्रांत त्यानें ताब्यांत घेऊन आपल्या राज्यास जोडिला. हेलमंद नदीच्या मुखाकडील सपाट प्रदेशाचा यांत समावेश होत होता.

इकडे, झुलनचा वडील मुलगा शहाबेग, जो पूर्वी कंदाहारावर राज्य करीत होता त्यानें सिंध प्रांतावर स्वारी करून तो प्रदेश काबीज केला होता, व बक्कर हें शहर आपली राजधानी करून तो तेथें राज्य करीत होता. तो १५२४ या वर्षी मरण पावला. तैमुराच्या घराण्याचा पक्का पक्षपाती, नरसापुरचा सुभेदार, शहाहासन, यास ही बातमी समजतांच त्यानें बाबर हा त्या प्रांताचा राजा झाला ह्मणून द्वाही फिरविली व सर्व सिंध देशांत त्याच्या नांवानें खुतबा ( नवीन राजास चिरायुत्वादि असावें म्हणून मशीदींत होणारी प्रार्थना ) पढविला. या कृत्यास पुष्कळ अडचणी आल्या, परंतु अखेर शहाहासन यानें सर्व प्रांत जिंकिला व बाबर हा सार्वभौमराजा व त्याचे आपण मांडलिक या नात्यानें राज्यकारभार चालविला. अखेरीस, १५२९ या वर्षी त्यास मुलतान येथें स्वारी करण्यास जावें लागलें. त्यानें तेथील किल्ल्यावर चाल केली. व बरेच दिवस वेढा घालून बसल्यानंतर एक दिवशीं छापा घालून तो काबीज केला. मध्यंतरी हिंदुस्थानांत अति महत्वाच्या गोष्टी घडून आल्या होत्या. तारीख १९ एप्रील सन.

१५२६ ई० रोजीं पानिपतची लढाई झाली व तींत हिंदुस्थानदेश बाबराचे हस्तगत झाला. त्यानें या देशावर केलेल्या स्वारीचें वर्णन करण्यापूर्वीं त्या वेळीं विद्यमान असलेल्या राज्यांची हालहवाल कशी होती याचें संक्षिप्त वर्णन करणें अवश्य आहे. तें आपण पुढील भागांत करूं.

## भाग चवथा.

### बाबराची हिंदुस्थानावरील स्वारी.

॥ उद्यमेन हि सिद्ध्यंति कार्याणि न मनोरथैः ॥

॥ केल्यानें न मनोरथ उद्योगानेंच साधतीं कार्यें ॥

हिंदुस्थानच्या इतिहासातील पहिला भाग—ह्मणजे अगदीं प्राचीनकाळापासून तों अकराव्या शतकाच्या आरंभीं महमूद गिझनीनें स्वारी केली तेथपर्यंतचा—यांतील गोष्टींचा उल्लेख करण्याचा आमचा विचार नाहीं. या काळाची खुलासेवार माहिती फारच थोडी उपलब्ध आहे. इतुकें मात्र खचित आहे कीं, या काळीं, सिंधुनदापासून तों कन्याकुमारीचे भूशिरापर्यंतच्या प्रदेशांत निरनिराळ्या जातीचे लोक राहत होते, व त्यांची भाषा आणि आचार विचार एकमेकांहून अगदीं भिन्न होते, व तेथें ब्राह्मण, बुद्ध व जैन हे तीन मुख्य धर्म प्रसृत होते. निरनिराळ्या अनेक राज्यांत ज्या मधून मधून लढाया होत त्या बहुतेक धर्मसंबंधींच असत.

विद्यमान असलेल्या या स्थितींत पहिली गडबड झाली ती महमूद गिझनी यानें १००१ या वर्षीं हिंदुस्थानावर प्रथमतः स्वारी केली तिचे योगानें. परंतु, महमूद व त्याच्या गिझनी घराण्यांतील वंशजांनीं जरी दिल्ली, राजपुताना, व गुजराथ प्रांतांत अगदीं शेवटील टोंकापर्यंत शिरकाव केला होता; तरी त्यांची कायमची राज-सत्ता खरोखर पंजाबाचे

पलीकडे कधींच गेली नव्हती. सतलज नदीचे आग्नेयीस हिंदुराजांचेंच प्राबल्य होतें. इ. सन ११८६ सालीं गिझनी वंशाचें निर्मूलन घोरी वंशांतील एका राजानें केलें. या घोरी वंशाचा संस्थापक घूर एथील एक अफगाण होता. घूर हें हिरातच्या आग्नेयीस काबूलचे रस्त्यावर ६० कोसांवर आहे. पुढें याच प्रमाणें खिलजी अथवा घिलजी घराण्यांतील राजांनीं घुरींचा १२८८ सालीं पाडाव करून आपण गादी बळकाविली. या घराण्यांतील राजांनीं, दिल्ली व हल्लीं आपण ज्यास वायव्येकडील प्रांत ह्मणतों, त्या प्रदेशावर तेत्तीस वर्षें राज्य चालवून, मोठी कीर्ति संपादिली. त्यांनीं नर्मदेच्या पलीकडे व दक्षिणेंत स्वाऱ्या करून त्या प्रांतावर आपला पगडा बसविला. परंतु त्यांस लवकरच उतरती कळा लागली व इ० स० १३२१ सालीं त्यांस तघलख अथवा गुलाम घराण्यांतील एका राजानें पदच्युत केलें. तघलख घराण्यांतील राजांना राज्य जोडून सुव्यवस्थित करण्याची कला साधली नव्हती. ह्मणून, या घराण्यानें ९१ वर्षें राज्य केलें त्या अवकाशांत, पूर्वींच्या दिल्लीपतींच्या आधिपत्याखालीं जे प्रांत होते, ते हळूं हळूं स्वतंत्र झाले; व सन १३८८-८९ सालीं तैमूरनें केलेल्या स्वारीमुळें तर, या ऱ्हास होत चाललेल्या राज्याचा अगदींच बीमोड झाल्यासारखें झालें. त्यावेळीं गादीवर असलेल्या सुलतान महमदचे हातीं बारा वर्षेंपर्यंत हें राज्याधिपत्य तसेंच रेंगाळत राहिलें. परंतु त्यानंतर सर्व राजसत्ता सय्यद ह्मणून इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या घराण्याकडे गेली; तथापि त्यांनीं राजा ही संज्ञा धारण केली नव्हती. या घराण्यानें तेत्तीस वर्षेंपर्यंत उत्तर हिंदुस्थानांत नुसतें नांवाचें राज्य केलें. त्यांचे राज्यांत कांहींएक संगति नव्हती. शेवटीं, ही संधि साधून लोदी घराण्यांतील एका बलिष्ट अफगाण सरदारानें सर्व सत्ता आपल्या हस्तगत करून घेण्याची खटपट केली.

हिंदुस्थानांत यावेळीं विद्यमान असलेल्या मुसलमानी अंमलाची स्थिति अशी होती कीं, अनेक स्वतंत्र सरदार निरनिराळ्या प्रांतांवर

स्वतःच्या जोरावर मनास वाटेल त्याप्रमाणें राज्यकारभार चालवीत असत. सार्वभौम म्हणून कोणा ही एका राजाची त्यांवर सत्ता नव्हती. उदाहरणार्थ, इ० स० १४५० सालीं, दिल्ली व तिच्या सभोंवतील लहानशा प्रदेशावर सय्यद घराण्यांतील एक पुरुष राज्य करीत होता; व तेथून १४ मैलांच्या आंत मेवाट येथें अहमदखान नांवाचा सरदार स्वतंत्रपणें राज्य करीत होता. संभळ, ज्यास आपण सांप्रत रोहिलखंड ह्मणतों, व ज्याची सीमा दिल्लीचे सीमेशीं केवळ भिडून गेली होती तेथें दर्याखान लोदी यानें आपलें ठाणें वसविलें होतें. इसाखान तुर्क, जलेसर ह्मणजे हल्लींचा इटा जिल्हा येथें राजा असून, राजा प्रतापसिंग हल्लीं फरूकाबाद ह्मणतात तेथें होता. दाउदखान लोदीच्या सत्तेखालीं बियाना असे. लाहोर, दिपालपूर, सरहिंद, व दक्षिणेकडे पानिपतपर्यंतचा प्रदेश बेहलोल लोदीच्या ताब्यांत होता. आणि मुलतान, जोनपूर, बंगाल, माळवा आणि गुजराथ येथें निरनिराळे राजे स्वतंत्रपणें राज्य करीत होते.

सय्यद घराणें नाहींसें झाल्यावर, या बहुतेक प्रांतांत व पूर्वेस पश्चिमबिहारच्या अगदीं उत्तरेकडील प्रदेशांत, बेहलोल लोदी, जो इतिहासांत सुलतान बेहलोल या नांवानें प्रसिद्ध आहे, त्यानें आपली सत्ता स्वतंत्रपणें स्थापित केली ( १४५०–१४८८ ). त्याचा मुलगा व वारीस सुलतान शिकंदर लोदी, यानें बिहार सर करून बंगाल्यावर स्वारी केली; पण तेथील राजा अल्लाउद्दीन यास तो प्रांत परत देऊन त्यावर पुनः स्वारी न करण्याचें शिकंदर लोदीनें कबूल केलें. नंतर त्यानें मध्यहिंदुस्थानांतील बहुतेक भाग व्यापून टाकिला. आपल्या मरणसमयीं, सांप्रत पंजाब या नांवानें प्रसिद्ध असलेला प्रांत, जोनपूर समेत वायव्येकडील प्रांत, बहुतेक सारा मध्यहिंदुस्थान, व पश्चिम बिहार, इतका मुलूख त्यानें स्वतःच्या एक-छत्राखालीं आणिला होता. परंतु वास्तविक रीत्या हें एक-छत्र नांवाचें मात्र होतें. ज्या अफगाण अमीरांच्या स्वाधीन सुल-

तान लोदी यास आपल्या राज्यांतील निरनिराळे प्रदेश करावे लागले, ते आपलें सामंत्य कबूल करीत व लढाईचे प्रसंगीं बादशाहास मदत वगैरे देत हें खरें; परंतु दरएक सुभेदार आपआपल्या ताब्यांतील प्रांतांत स्वतंत्रपणें व आपल्या इच्छेनुरूप राज्यकारभार चालवी, व आंतील व्यवस्थेंत सार्वभौम राजास कोणतेही रीतीनें हात घालूं देत नसे.

या स्थितीचा परिणाम असा झाला कीं, जेव्हां सुलतान शिकंदर मरण पावला तेव्हां, यांपैकीं बहुतेक मोठमोठ्या सरदारांस ही नांवाची ताबेदारी देखील सहन होईना म्हणून त्यांनीं एकविचार करून असा निश्चय केला कीं मयत सुलतानाचा मुलगा इब्राहीम यास फक्त दिल्लीचें आधिपत्य देऊन बाकीचें सर्व राज्य आपसांत वांटून घ्यावें; फक्त जोनपूर हा प्रांत मात्र इब्राहिमाच्या धाकट्या भावास, दिल्लीचा मांडलिक, या नात्यानें द्यावा. इब्राहिमखान यानें प्रथमतः या व्यवस्थेस अनुमोदन दिलें; पण तें निरुपायास्तव दिलें असावेंसें दिसतें; कारण त्यास त्याचा नातलग खान जाहान लोदी यानें समजाच्या दोन गोष्टी सांगितल्या बरोबर, त्यानें आपली संमति माघारी घेतली, व आपला भाऊ जोनपुरास जाण्यास पूर्वींच निघाला होता त्यास परत बोलाविलें. परंतु तो येईना, तेव्हां उभयतः बंधूंत लढाई सुरू झाली; त्यांत इब्राहिम यशस्वी झाला. आपला भाऊ मरण पावल्यावर १५१८ सालीं इब्राहिमखान यानें आपल्या महत्वाकांक्षी सामंत सरदारांवर आपला अंमल पुनरपि बसविण्याची खटपट केली. त्यांनीं बंड केलें पण त्यांचा त्यानें मोड केला. जय मिळाल्यावर त्यानें उदारपण व शाहाणपण दाखविलें नाहीं यामुळें असंतोष वाढून पुनः बंडावा सुरू झाला. बहार, अयोध्या व जोनपूर एथील सुभेदार सशस्त्र होऊन लढाईस उभे राहिले; व पंजाबचे सुभेदार ही त्यांस येऊन मिळाले. पुढें झालेला संग्राम मोठ्या निकराचा झाला; व त्यांत आज या पक्षाची सरशी तर उद्यां दुसरे पक्षाची व्हावी. याप्रमाणें चालतां चालतां जेव्हां अगदीं आणीबाणीचा प्रसंग येऊन.

ठेपला, तेव्हां सुलतान इब्राहिमखान याचा चुलता अल्लाउद्दीन हा पळून बाबरच्या गोटांत गेला व आपणांस दिल्लीच्या तक्तावर बसवावें अशी त्याची विनवणी केली. बाबर या वेळेस, कंदाहार प्रांतांतील बंडावा शांत करण्यांत गुंतला होता. इतुक्यांतच इब्राहिमखानच्या सेनापतींनीं लाहोरचा सुभेदार दौलतखान यास अगदीं जेरीस आणिलें होतें, त्याचेकडून ही बाबरास मदतीसाठीं विनंति आली. मला कुमक केल्यास मी तुमचें अधिपत्य कबूल करीन असें ही त्याचें ह्मणणें होतें. ही मागणी अर्थातच फारच मोहक होती. बाबरनें ती तात्काळ मान्य केली व तो लागलींच लाहोरावर चाल करून निघाला.

महमूद गिझनीच्या स्वारीनंतर जीं पांचशेंवर्षें लोटलीं त्या अवकाशांतील हिंदुस्थानच्या अंतस्थ स्थितीचें वर्णन संक्षिप्त रीतीनें येथवर केलें. त्यावरून त्याच्या मागून जे राजे झाले त्यांच्या राज्याचीं मुळें खोलवर कां गेलीं नाहींत याचें कारण स्पष्टपणें ध्यानांत येण्याजोगें आहे. गिझनी, घोर, तघलख, सय्यद, किंवा लोदी, कोणतें ही घराणें घ्या; त्यांतील पुरुषांनीं ज्या लढाया मारल्या त्या केवळ आपली बाजू राखावी व आपला फायदा व्हावा याच हेतूनें. तक्तावर असलेल्या बादशहांच्या अमीर उमरावांनीं आपल्या खाविंदांचेंच अनुकरण चालविलें होतें. याप्रमाणें हिंदुस्थान देशांत कोठें बादशहाचें, कोठें त्याच्या मुख्य सरदारांचें, कोठें या सरदारांच्या अनुयायांचें, अशीं अनेक राज्यें व उपराज्यें असून केवळ झोटिंग पादशाही माजली होती. आपल्या स्वामीचें बलाबल व आवांका पाहून त्याचा हुकूम मान्य अगर अमान्य होत असे. नॉर्मन लोकांनीं इंग्लिश लोकांस जिंकिल्यानंतर थोड्याच दिवसांत इंग्लंडांत ज्याप्रमाणें पराजितांचें जिंकणारांशीं संमेलन झालें त्याप्रमाणें हिंदुस्थानांत कधींच घडून आलें नव्हतें. मुसलमान राजे रयतेस परकीय समजून जुलुमानें वागवीत व रयत हिंदूंच्या अंगीं प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें ते तो जुलुम निमूटपणें सहन करीत. येवढेंच

कायतें राज्याचें बीज होतें. तक्तावर असलेल्या राजाविषयीं सहानुभूतीनें अथवा निकट संगतीनें प्रजाजनांत अनुरक्ति उत्पन्न करण्याचा विचार कधीं कोणाच्या मनीं मानसीं देखील आला नाहीं. जिंकणारे लोक परकीय ह्मणून आले होते व ते शेवटपर्यंत परकीयच राहिले. ह्मणून त्यांची या देशावरची सत्ता केवळ वरवरची व अस्थिर अशी होती. प्रजाजनांच्या प्रीतिक्षेत्रांत त्यांच्या राज्यवृक्षाचीं मुळें मुळींच रुझलीं नव्हतीं; व तलवारीच्या जोराखेरीज त्यांची सत्ता संरक्षण करण्यास दुसरा मार्ग ही नव्हता. हे व यांच्या मागून मोंगल घराण्यापैकीं गादीवर आलेल्या अकबराच्या राजनीतींत मोठा फरक होता तो हाच.

इ० स० १५०५ यावर्षी, बाबर हिंदुस्थानांत लगबगीनें येऊन गेला, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. हें आगमन सोडून त्याची पहिली स्वारी १५१९ या सालीं झाली. याच वर्षीं दुसरी एक स्वारी त्यानें केली असें ह्मणतात; परंतु वास्तविकपणें पाहतां ही हिंदुस्थानावरची स्वारी नसून युसफझै लोकांवरील दौड होय असें जें फेरिश्ता इतिहासकार याचें मत आहे, तेंच खरें असावेंसें दिसतें. या दौडींत बाबर पेशावरपर्यंत चाल करून आला होता; परंतु त्यानें सिंधुनद ओलांडिला नाहीं. १५२० सालीं, त्यानें हिंदुस्थानावर त्याची तिसरी ह्मणून नावाजलेली स्वारी केली ह्मणून ह्मणतात ती मात्र हिंदुस्थानावरच होती हें निर्विवाद आहे. या स्वारींत, तो सिंधु उतरून सांप्रत रावळपिंडी या नांवानें प्रसिद्ध असलेल्या प्रांतावर चाल करून आला. पुढें तसाच जेहलमच्या पार जाऊन सियालकोटास दाखल झाला. परंतु त्या शहरास त्यानें हात लाविला नाहीं. तेथून तो सय्यदपुरावर चालून गेला व तें शहर त्यानें लुटलें. येथें असतांच काबुलावर हल्ला होण्याचा डौल दिसत आहे, अशी खबर आल्यामुळें तो एकदम निघून तिकडेस चालता झाला.

ही तिसरी मोहीम अशी निष्फळ झाल्यामुळें बाबरची पक्की खात्री झाली कीं हिंदुस्थानावरील स्वारींत हटकून जय येण्यास कंदाहार येथें

आपली सत्ता निर्बाध असून तेथील पाठबळ आपणांस पाहिजे. ह्मणून तो किल्ला व गिझनी आणि खोरासन यांच्यामधील मुलूख हस्तगत करण्यांत त्यानें पुढील दोन तीन वर्षें घालविलीं. ह्या प्रांतांत स्थिरस्थावर होऊन त्याची सत्ता मजबूतशा पायावर बसून फार वेळ झाला नाहीं तोंच अल्लाउद्दीन लोदी व लाहोरचा दौलतखान यांचे पूर्वीं सांगितल्याप्रमाणें निरोप पोंहोंचले. दौलतखानाचा निरोप येतांच हिंदुस्थानावर चवथी स्वारी करण्यास बाबर सिद्ध झाला. पुनः एकदां तो सिंधु, जेहलम व चिनाब ओलांडून लाहोरावर सरसावला; व त्या शहराच्या अलीकडे ९ कोसांवर तळ देऊन राहिला. तेथें लोदीघराण्यांतील अनुयायी सरदारांच्या सैन्याशीं बाबरचा सामना होऊन त्यानें त्यांचा पराभव केला, व त्याच्या सैनिकांनीं लाहोर लुटलें. नंतर तेथें त्यानें चारच दिवस मुक्काम केला. मग पुढें चाल करून जाऊन दिपालपुरावर हल्ला करून तें काबीज केलें. येथें दौलतखान व त्याचीं मुलें हीं बाबर यास येऊन मिळालीं; परंतु बाबरानें दिलेलें बक्षीस त्यांच्या मनांत भरलें नाहीं; व असंतुष्ट होऊन ते आपल्या नवीन स्वामीविरुद्ध फंद फितूर करूं लागले. हें त्यांचें कौटिल्य बाबर सरहिंदाकडे जात होता तेव्हां त्यास कळलें. तेथून तो दिल्लीवर जाणार होता; पण तो इरादा तितक्या पुरता महकूब करून काबुलास परत जाण्याचा त्यानें निश्चय केला. विश्वासू ह्मणून वाटले त्या सरदारांना पंजाब वांटून देऊन तो तिकडेस गेला.

बाबर सिंधुनद उतरून पलीकडे गेला नाहीं तोंच पंजाबांत पुनः बखेडा सूरू झाला. दिपालपूर ह्मणून लाहोरचे नैर्ऋत्येस ४० मैलांवर त्यावेळेस अति महत्वाचें असें एक शहर होतें. तें त्यानें अल्लाउद्दीन लोदी याचे स्वाधीन केलें होतें. तो या झगड्यांत जेरीस आला व निराश होऊन बाबर यास हिंदुस्थानावर पुनः स्वारी करण्यास घेऊन यावें अशा उमेदीनें काबुलास गेला. त्यानें आपला मनोदय त्यास कळविला परंतु बाबर यास त्याचें ह्मणणें त्याच क्षणीं कबूल करवेना, कारण

युझबेक लोक तेव्हेळीं बल्खला वेढा घालीत होते. तथापि, त्यानें अल्ला-उद्दीन यास सैन्याची मदत दिली, व पंजाबांत असलेल्या आपल्या सेनापतींना त्यास साहाय्य देण्याची आज्ञा केली. परंतु, या मोहिमेंत ह्या राजपुत्रास फिरून अपयश आलें व तो घाबरून दिल्लीहून पंजाबांत पळाला. या अवसरांत बाबर हिंदुस्थानावरील पांचव्या ह्मणजे त्याचे शेवटच्या मोहिमेची तयारी करीत होता.

या मोहिमेचा वृत्तांत आह्मांस थोडक्यांतच सांगितला पाहिजे. आपला मुलगा हुमायून यास बरोबर घेऊन खैबर खिंडींतून बाबर पेशावरांत उतरला. तेथें दोन दिवस मुक्काम करून तारीख १६ दिसेंबर रोजीं सिंधुनद ओलांडून तो झपाट्यानें सियाळकोटास गेला. तेथें पोहोंचल्यावर ( तारीख २९ दिसेंबर ) अल्लाउद्दीन पराभव पावून पळून गेल्याची बातमी त्यास समजली. तरी न डगमगतां तो दुसरे दिवशीं सकाळीं परसासोर येथें जाण्यास निघाला. हें ठिकाण सियाळकोट व रावी नदीवरील कलानार याच्यामध्यें आहे. तेथून तो कलानार येथें गेला. व त्यानें रावी नदी ओलांडिली. पुढें बिया नदीच्या पार जाऊन तो मिलवटच्या मजबूत किल्ल्यांत जाऊन थडकला. येथें त्याचा पूर्वींचा अनुयायी दौलतखान आश्रा करून राहिला होता. मिलवटचा किल्ला लवकरच हस्तगत झाला. पुढें त्यानें लिहिलें आहे त्याप्रमाणें 'निश्चयाच्या रिकाबींत पाय ठेवून व ईश्वरावरील भरंवसा हा लगाम हातांत घेऊन,' तो जालंधर-दुआबामधून सतलजवर गेला व रुपार येथें ती ओलांडून यमुनातीरीं सिरसावाच्या समोर दाखल झाला व तिच्या कांठानें दोन मजला वाट चालला. आणखी दोन मजला गेल्यावर दिल्लीच्या वायव्येस ५३ मैलांवर पानिपत येथें पोहोंचला. तेथें त्यानें मुक्काम करून आपल्या गोटाची मजबुती केली. ही गोष्ट तारीख १२ एप्रील १५२६ रोजीं घडली.

बाबरानें आपले तळाभोंवतीं खंदक खणविला होता. या ठिकाणीं

त्याचें सैन्य आठ दिवस राहिलें. नववे दिवशीं इब्राहिम लोदी बाबरावर मोठ्या सैन्यानिशीं चाल करून गेला. हें सैन्य एक लाखभर असावें असा बाबराचा अजमास आहे. सूर्य क्षितिजापासून भालाभर उंच चढला होता, तेव्हां युद्धास सुरवात झाली, तें मध्यान्हपर्यंत एक सारखें चालूंच होतें. दुपारीं शत्रूच्या सैन्याचा अगदीं पाडाव होऊन दाणादाण झाली; व जयश्रीनें निःशंकपणें बाबराच्या गळ्यांत माळ घातली. इब्राहिम लोदी शूरपणें लढत असतां रणांत पडला व हिंदुस्थान बाबरच्या हातांत आलें. त्यानें त्याच दिवशीं दिल्ली व आग्रा काबीज करण्याकरितां आपलें सैन्य रवाना केलें. हीं शहरें तारीख २४ माहे एप्रील व तारीख ४ माहे मे इसवी रोजीं, अनुक्रमें बाबराच्या हस्तगत झालीं.

बाबरानें आपले चरित्रांत आपण लहान सान युद्धें करतां करतां मोठे होऊन शेवटीं हिंदुस्थानासारखा मोठा, नामी, व भव्य देश कसा काबीज केला याचें वर्णन करून असें लिहिलें आहे कीं "हा दिग्विजय माझ्या पराक्रमानें प्राप्त झाला असें मी मानीत नाहीं व हा येवढा मोठा भाग्योदय माझ्या श्रमानें झाला असेंही मी समजत नाहीं; हें केवळ परमेश्वराच्या दयेचें व कृपेचें फळ होय." कवीनें गाइलेंच आहे कीं 'सुपुरुष विनयातें भाग्यकालीं धरीती.'

[stamp]

# भाग पांचवा.

## हिंदुस्थानांतील बाबराची सत्ता व स्थिति.

॥ विकार हेतौ सति विक्रियन्ते ॥ येषां न चेतांसि त एव धीराः ॥

॥ विकार हेतू असुनी विकार ॥ चित्ता न ज्यांचे जगिं तेच धीर ॥

हिंदुस्थानचे वायव्येकडील दोन्ही राजधान्यांचा स्वामी झाल्यावर बाबर यानें त्या देशाची वास्तविक स्थिति कशी आहे ती दूरदर्शी मुत्सद्याच्या दृष्टीनें अजमावली. आपण कायते उत्तर हिंदुस्थानचेच मालक

आहेत हें तात्काल त्याच्या लक्षांत आलें. अयोध्या, जोनपूर, आणि पश्चिम बिहार या प्रांतांतील लोकांनीं इब्राहिमाविरुद्ध बंड केलें होतें; व त्यांचा पाडाव करण्याकरितां त्या बादशहानें सैन्य पाठविलें होतें; तथापि, हे दोन्ही पक्ष एकत्र होऊन आपणावर उठतील असें बाबर यास पक्केपणीं दिसून आलें होतें. याशिवाय बंगाल, गुजराथ आणि माळवा हीं तीन राज्यें नसरतशाहा, शिकंदरशाहा, आणि सुलतानमहंमद यांचे अंमलाखालीं असून बलाढ्य व स्वतंत्र अशीं होतीं. माळव्याचा कांहीं भाग, ह्मणजे चंबळ आणि बनासच्या संगमावर असणारें रणथंबोर, कालीसिंधूच्या कांठचें सारंगपूर, व वेटांवा नदीच्या तीरीं असलेलें भिलसावचंदेरी, आणि चितूर येथील त्याकाळीं प्रसिद्ध असलेले बळकट किल्ले ज्यांत होते, तो मुलूख विख्यात संगराणा यानें जिंकून आपले काबीज केला होता. दक्षिणेंत ब्राह्मणीराज्यांची स्थापना झाली असून विजयानगरचा राजा स्वतंत्रपणें आपला अखत्यार गाजवीत होता. याशिवाय जे मुसलमानी सत्तेखालीं कधींहीं आले नव्हते असे आणखी पुष्कळ राय व राजे होते.

तथापि, या अनेक राजांची स्वतंत्रता ही कांहीं आपल्या दिग्विजयास सर्वांत मोठीशी अडचण नाहीं, हें बाबरानें तेव्हांच ओळखिलें. त्यास सर्वांत मुख्य ही अडचण दिसली कीं हिंदु प्रजा मागील मुसलमान राजांनीं राजी करून न घेतल्यामुळें ती त्यासही अगदीं प्रतिकूळ होती. अर्स्कीन साहेबानीं लिहिल्याप्रमाणें, उत्तर हिंदुस्थानांत प्राचीन हिंदुराज्यपद्धति अझूनही बहुतेक कायम होती; ह्मणजे गांवाची व परगण्याची वहिवाट व अंमल करण्याची रीत, एकंदर मुलुख अनेक लहान लहान संस्थानांत व छोटेखानी मामलतींत विभागण्याचा संप्रदाय, आणि राज्यक्रांतीच्या वेळीं मुख्य राजधानींत राहून सत्ता चालविणाऱ्या राजाची पर्वा न बाळगितां प्रजाजनांनीं आपल्या सन्निध असलेल्या अंमलदाराचीच आज्ञा मान्य करण्याची वहिवाट, या सर्व गोष्टी पूर्वीप्रमाणेंच प्रचलित होत्या. अशी

स्थिति असल्यामुळें हा काळपावेतों सर्वांत श्रेष्ठ अशा एकाच सार्वभौम राजाकडून हुकूम सुटून एकतंत्रानें चालणाऱ्या व्यवस्थित राज्यपद्धतीचा अनुभव लोकांस नव्हता; ह्मणून नवीन जय मिळालेला बाबर हा त्यांस परकीय शत्रूच वाटला व त्यास घालवून देण्यांत आपलें हितच आहे असें ही ते समजत होते.

शिवाय, बाबर याचें शील व स्वभाव अगदीं अपरिचित असल्यामुळें त्याविषयीं लोकांस सहजच दहशत वाटली; व तींत पदच्युत झालेल्या मुसलमानी राजघराण्यांच्या अनुयायांनीं चालविलेल्या कृष्णकारस्थानाची भर पडली. यांनीं लोकांना सांगावें कीं मोंगलांचा विजय ह्मणजे हिंदूचा नाश. हे मध्यएशियांतील रानटी लोक तुमच्या देवालयांचा सत्यानास करतील व तुमच्या बायकांची व मुलींची अब्रु घेण्यास कधींही मागें पुढें पाहाणार नाहींत, असें हिंदुलोकांच्या मनांत भरविण्याचा त्यांनीं सतत अतोनात प्रयत्न केला. यामुळें दयाळू व उदार अंतःकरणाचा बाबर स्वारी करीत जसा आग्र्याजवळ येऊं लागला तसतसें हिंदुलोक अगोदरच भयाभीत होऊन गेले होते ते आपल्यावर आतां खास जुलूम होणार त्यापेक्षां अरण्यवासांतील संकटें बरीं असें समजून शहर सोडून पळून गेले.

बाबराच्या अडचणींत जास्त अडचण ही उद्भवली कीं त्याच्या अनुयायांत असंतोष उत्पन्न झाला. त्याच्या सैन्यांत बहुतेक पूर्व अफगणिस्थानांतील उंच डोंगरावर राहणाऱ्या कडव्या लोकांचा भरणा होता. जोंवर लढाईची आशा होती तोंवर ते मोठ्या उल्हासानें आपल्या राजाबरोबर गेले; परंतु पानिपतच्या लढाईंत उत्तर हिंदुस्थान त्यांना मिळालें, तेव्हां लढाईचा संभव कमी झाला. पुढें दिल्लीहून आग्र्याचा कूच निर्जन व रखरखीत प्रदेशांतून करावा लागला. तशांत त्या वेळीं उन्हाळ्याचे दिवस होते व त्या सालचा, ह्मणजे १५२६ चा उन्हाळा ही नेहमीपेक्षां फारच प्रखर होता. ह्या एकंदर कारणांनीं त्याचे लोक

फार कुरकूर करूं लागले व आपल्या अफगणिस्थानांतील डोंगरांतील घरीं परत जाण्याविषयीं फारच उत्सुक झाले. हा असंतोष फक्त शिपायांतच नव्हता. मोठमोठे सरदार ही अशीच कुरकूर करूं लागले; व ती इतकी वाढली कीं अखेरीस ती बाबराचे कानापर्यंत जाऊन पोहोंचली.

बाबराची चित्तवृत्ति मिळालेल्या जयानें फारच प्रसन्न झालेली होती. आपण अतिशय मौल्यवान, अत्यंत सुपीक, व फारच सुंदर असा एशियाचा भाग काबीज केला आहे, या गोष्टीचा, तेथील प्रचंड उष्णता अथवा तेथील लोकांचा असंतोष या दोन्ही कारणांनीं त्यास विसर पडला नाहीं. नवीन संपादन केलेल्या देशाचा महिमा त्यानें स्वतः लिहिलेल्या अलौकिक चरित्रांत विस्तारपूर्वक वर्णिला आहे. या वर्णनास छापिलेलीं मोठमोठीं वीस पानें लागलीं आहेत. त्यानें लिहिलें आहे कीं "हा देश फारच छानदार आहे व आपल्या देशाशीं तुलना केली असतां हें अगदीं भिन्न असें नवीन जगच आहे." मिळविलेला जय कायमचा करणें हेंच आपलें आतां कर्तव्य, असें त्यास स्पष्ट दिसून आलें. इतउत्तर हिंदुस्थानचा बादशहा या मोठ्या पदवीपुढें काबूलचा राजा हा किताब त्यास तुच्छ वाटूं लागला. काबुलास परत जावें हा विचार आतां त्याचे मनांत देखील येईनासा झाला.

आपल्या सर्व अडचणी त्याच्या लक्षांत आल्या होत्या व त्यांच्या प्रतिकाराचे उपाय ही त्यानें योजून ठेविले होते. व्यवहारचातुर्यांत तो अतिशय दक्ष असल्यामुळें वास्तविकरीत्या जें सर्वांहून मोठें संकट, ह्मणजे सैन्यांतील असंतोष, तें निवारण करण्याच्या उद्योगास तो प्रथम लागला. त्यानें आपल्या सरदारांची व अमीरांची सभा भरवून त्या वेळच्या प्रत्यक्ष स्थितीचें चित्र त्यांच्यापुढें मांडिलें. तो ह्मणाला, "आपण येतांना मार्गांत किती संकटें भोगिलीं, आपणांस किती प्रयास पडले, रक्तस्रावाच्या किती लढाया माराव्या लागल्या, तेव्हां कोठें हे

अनेक विशाळ व श्रीमान् असे प्रदेश आपल्या हातीं लागले. ते टाकून आतां काबुलास परत जाणें हें मोठें लज्जास्पद आहे. तेव्हां जो कोणी माझा स्नेही ह्मणवितो त्यानें इतःपर मजपाशीं अशी गोष्ट काढूं ही नये. परंतु, तुमच्यापैकीं ज्या कोणास येथें राहवत नसेल किंवा परत जाण्याचा हेतु सोडवत नसेल, त्यानें खुशाल चालतें व्हावें " या भाषणानें त्याला पाहिजे होतें तें साधलें. पुढें बोलण्याचा प्रसंग जाऊन पुनः करणी करून दाखविण्याची वेळ आली. नवीन लढाया माराव्या लागल्या व नवीन जय मिळाले; तेव्हां सैन्यांतील असंतोष जाऊन उल्हास व आवेश पुनः जागृत झाला.

त्याचे निग्रहाचें फळ बाबरास आणखी दुसऱ्या एका तऱ्हेनें मिळालें. ह्या देशचे रहिवासी, ह्मणजे घरदार करून राहिलेले मुसलमान व हिंदु जमीनदार आणि व्यापारी, यांस बाबराचा या देशांत चिरस्थायी राहण्याचा हेतु आहे असें समजतांच, त्यांची भीति पळाली. त्याच्या उदार अंतःकरणाची व प्रौढ स्वभावाची लोकांस अनेक प्रत्यंतरें आल्यामुळें त्याविषयींचा त्यांचा ग्रह लागलींच बदलला. आणि त्याचे सैन्यास व त्याचे पक्षास दररोज नवीन नवीन लोक येऊन मिळूं लागले. खेडीं पुनः वसलीं व व्यापारी व उदमी लोकांनीं पुनः आपलीं दुकानें उघडलीं व उद्योग धंदे सुरू केले. बाबराचे गोटांत हरएक वस्तूची समृद्धि झाली. आणखी, थोडे दिवसांतच जोनपूर आणि अयोध्या ह्या प्रांतांतील बंडावा मोडण्यास इब्राहिम लोदीनें पाठविलेल्या सैन्यानें बाबराचें सार्वभौमत्व मान्य केलें. इतुक्या अवसरांत मोठ्या शहाणपणानें त्यानें आपलें सैन्य रोहिलखंडावर पाठवून त्याचा बराचसा भाग जिंकिला, यमुनानदीवरील रावेरी नावाचें महत्वाचें स्थळ काबीज केलें, आणि इटावा व दोलपूर यांस वेढा घातला. परंतु मध्यहिंदुस्थानांत संकटें मी ह्मणून उभीं राहिलीं. तीं अशा दिशेकडून आलीं कीं त्यांची उपेक्षा करितां येईना.

हीं संकटें चितूरचा राजा राणा संग याच्या पराक्रमानें उद्भवलीं होतीं. या महाप्रतापी महाराजानें ( महाराज या पदास कोणत्याही अर्थानें पाहिलें असतां तो पात्रच होता ) प्राचीन मुसलमान राजां-पासून आपल्या वडिलोपार्जित राज्यापैकीं बराचसा भाग हस्तगत करून घेतला होता हें मागेंच सांगितलें आहे. त्यानें आपला पराक्रम याहून ही अधिक गाजविला होता. बकराळ व चटोली या दोन्ही निक-राच्या लढायांत त्यानें इब्राहिम लोदीचा पराभव केला व याशिवाय १६ लढाया मारून निरनिराळ्या सरदारांचा पराभव केला होता. बाबर हिंदुस्थानांत येण्यापूर्वी, त्या काळचा प्रसिद्ध रणथंबोर नांवाचा किल्ला त्यानें काबीज केला होता. इतकें झालें तरी त्याची विजयपरंपरा सुरूच होती. इतुक्यांत रणथंबोरच्या पूर्वेस थोड्या अंतरावर असलेला कंदरचा मजबूत डोंगरी किल्ला या रणशूर रजपूत राजानें जिंकिला ही ताजी बातमी आली. यामुळें बाबराचे मनास अर्थातच अस्वस्थता उत्पन्न झाली.

पावसाळा संपण्याच्या सुमारास, ह्या व दुसऱ्या संकटांचा प्रतिकार कसा करावा याचा विचार करण्यास बाबरानें दरबार भरविला. या दर-बारांत असें ठरलें कीं बाबराचा वडील मुलगा हुमायून—या वेळीं त्याचें वय कायतें १८ वर्षांचेंच होतें—यानें पूर्वेकडे स्वारी करून दुआब, अयोध्या आणि जोनपूर हा मुलूख पूर्णपणें सर करावा, व बाबरानें आग्रा येथें राहून एकंदर कारभाराच्या व्यवस्थेवर देखरेख ठेवावी. घरा-जवळील शत्रूंचा बंदोबस्त झाल्यानंतर मग राणा संग याकडे वळावें असा विचार ठरला.

हुमायुनाची स्वारी अगदीं यशस्वी झाली. बिहारच्या सरहद्दीपर्यंतचा सर्व प्रांत त्यानें काबीज केला. तो परत आल्यावर, तारीख ६ माहे जानेवारी सन १५२७ रोजीं, बाबरानें बियाना व ढोलपूर जिंकलें व छापा घालून मोठ्या चातुर्यानें ग्वालेरचा किल्ला हस्तगत केला. इतक्यांत

मुलतान वश झाल्याची खबर आली. याप्रमाणें सिंधु नदापासून पश्चिम बिहारपर्यंत व काल्पी आणि ग्वालेरपासून तों हिमालयपर्यंतच्या प्रदेशाचें प्रभुत्व निष्कंटक रीतीनें प्राप्त झाल्यावर, चितूरचा प्रख्यात राजा, राणा संग याजकडे बाबरानें आपली दृष्टि फिरविली. या राजाच्या सैन्याशीं सामना करण्याकरितां तो तारीख ११ फेब्रुवारी रोजीं आग्र्याहून निघाला. इकडे इब्राहीम लोदीच्या पक्षाकडील मुसलमान लोकांची फौज संग राण्यास येऊन मिळाली. तीसह तो ही पुढें सरसावला व बिसावर एथें तळ देऊन राहिला. हें स्थळ बियानाहून १२ मैल व बियानाच्या रस्त्यानें आग्र्याहून ६२ मैल आहे. बाबर शिक्रीवर—हल्लींच्या फत्तेपूर शिक्रीवर—चाल करून गेला व त्यानें तेथें तळ दिला. यानंतर ज्या बऱ्याच लहानसान चकमकी उडाल्या त्यांत रजपुतांचीच सरशी झाली व बाबराच्या सैन्याचा अगदीं हिरमोड झाला. सबब आपल्या सैन्यापैकीं एका तुकडीस मेवात लुटण्यास पाठवून व आपला गोट होईल तितका मजबूत करून कांहीं वेळपावेतों बाबर स्वस्थ बसला.

गोटांत कोंडलेला, युद्धाचें स्वरूप बदलून गेल्यामुळें नाउमेद झालेला, व कांहीं करतां येईना ह्मणून अस्वस्थ झालेला बाबर आपल्या आयुष्यांतील गोष्टींची झडती घेऊं लागला. तेव्हां आपले कुराणांत दारू पिण्याची सक्त मनाई असून आपण त्या आज्ञेचें नित्य उल्लंघन करीत आहों ही गोष्ट त्याचे ध्यानांत आली व त्यानें पश्चात्तापपूर्वक व लीन अंतःकरणानें तो अपराध आपले पदरीं घेतला. “पश्चात्तापेन शुध्यति” या उक्तीप्रमाणें शुद्धांतःकरण होऊन तो प्रमाद नाहींसा करून टाकण्याचा त्यानें निश्चय केला. मदिरापान करण्याचे सोन्याचे प्याले व चांदीचीं पंचपात्रें आपल्या समोर तावडतोब आणवून त्यानें तीं मोडून विकलीं व आलेलें मोल गरीब अनाथांस वांटून दिलें. गोटांतील सर्व दारू जमीनीवर ओतून टाकिली. या त्याच्या कृतीचें अनुकरण त्याच्या तीनशें सरदारांनीं ही पण केलें.

अखेरीस आपण आहों ही स्थिति फार दिवस टिकणार नाहीं असें समजून, मार्च महिन्याच्या १२ वे तारखेस बाबर शत्रूकडे दोन मैल सरसावला. नंतर मुक्काम करून, पुनः दुसरे दिवशीं कूच केलें; व लढाईस योग्य अशी जागा स्वतः शोधून त्या ठिकाणीं त्यानें तळ दिला व संग्रामास योग्य अशा व्यवस्थेनें दळभार रचिला. तारीख १६ रोजीं रजपूत व त्यांच्या पक्षाकडील लोक पुढें सरसावले व लढाई जुंपली. या युद्धाची हकीगत आपल्या चरित्रांत बाबरानें फार मनोवेधक व निःसंशय सत्यास अनुसरून अशीच लिहिली आहे. येथें इतकें कळविणें पुरें कीं ह्या लढाईंत संग राण्यास मोठी जखम लागली व त्याच्या पक्षाकडील निवडक सरदार मारले गेले, आणि त्याच्या सैन्याचा पूर्ण मोड झाला. या वेळेस मिळालेला विजय इतका निर्णयात्मक होता कीं दुसरे दिवशीं सर्व राजपुताना बाबरचे हातांत आला. पुढें त्यानें एकदम बियानावर लगट केली व तेथून तो मेवातावर गेला; व तो सर्व मुलूख आपले आज्ञांकित केला. या विजयाचे परिणाम काबीज केलेल्या प्रांतांवरच झाले असें नाहीं, तर ते फार दूरवर पसरले. दुआबामधील ज्या शहरांनीं बंडावा केला होता त्यापैकीं कित्येकांनीं आपण होऊन बाबराचें अधिपत्य मान्य केलें व बाकीचीं शहरें पुनः त्याचे अंमलाखालीं आलीं. दुआबांत स्थिर-स्थावर झाल्यावर प्रथमतः मध्यहिंदुस्थानांतील हिंदु सरदारांवर बाबरानें शस्त्र उगारिलें. यावेळीं त्यांचा नायक चंदेरी येथील राजा होता. बाबर चंदेरीच्या किल्ल्याजवळ जाऊन पोहोंचला, इतक्यांत, पूर्वेकडे गेलेले आपले सरदार अपयश पावले व त्यांस लखनौहून कनोज येथें पळ काढावा लागला अशी बातमी त्यास कळली. त्या खबरीचें महत्व जरी त्यास दिसून आलें, तरी त्यामुळें काडीमात्र न डगमगतां त्यानें चंदेरीचा वेढा मोठ्या धीरानें कायम ठेविला; व थोडयाच दिवसांत तेथील किल्ला हल्ला करून घेतला. हा मुलुख आपल्या आधीनसा केल्यावर बाबरानें आपला मोर्चा पूर्वेकडे वळविला; व तो आपल्या पराजित झालेल्या सेनापतींना

कनोजपाशीं जाऊन मिळाला. तेथें त्यानें गंगेवर पूल केला, शत्रूंस, ह्मणजे बाकी राहिलेल्या लोदीच्या अनुयायांस पळावयाला लाविलें व लखनौ पुनः काबीज केलें, गोमती व गोग्रा ओलांडिल्या व निरुत्साह झालेल्या शत्रूंची फांकाफांक करून टाकिली. नंतर जीं राज्यकारभाराचीं सूत्रें तो प्रथम जुळवीत होता तीं जुळविण्याचें काम पुनः हातीं घेण्याकरितां तो आग्र्यास परत गेला.

परंतु त्यास फार वेळ स्वस्थ राहतां आलें नाहीं. जोनपूर येथें जुन्या मुसलमानांची जी एक फळी होती ती अद्यापि पूर्णपणें वश झाली नव्हती. जोनपूरच्या शेजारचे विहारचे श्रीमान राज्यावर अद्यापि स्वारीही झाली नव्हती. या दोन्ही प्रांतांतील मुसलमान सरदारांनीं बेत केला कीं, हीं संस्थानें मिळवून एक नवीन राज्य करावें व लोदी घराण्यांतील ज्या राजपुत्रानें संग राण्यास बाबरच्या विरुद्ध मदत केली होती त्यास तेथील राजा करावें. हा कट फारच गुप्त रीतीनें चालला होता. त्याचा सुगावा तारीख १ फेब्रुवारी १९२९ पर्यंत बाबर यास मुळींच लागला नाहीं. या वेळीं तो धोलापूर येथें होता. हें शहर त्याचे फार आवडीचें होतें; व यांत बागबगीचे करून व इतर साधनांनीं तें रमणीय व मनोहर करण्यांत आपल्या सरदारांसह तो या वेळीं निमग्न झाला होता. तथापि त्याच दिवशीं तो आग्र्यास परत गेला व जवळ सांपडलें तितकेंच सैन्य घेऊन दुसरे दिवशीं कूच करून आपला मुलगा अस्कारी याच्या सैन्यास डाकडकी येथें जाऊन मिळावें ह्मणून निघाला. डाकडकी हें खेडें त्या वेळेस अति प्रसिद्ध असलेल्या करा शहराजवळ गंगानदीच्या उजवे तीरीं आहे. येथें बाबर ता० २७ रोजीं पोहोंचला व त्यास अस्कारीची फौज नदीच्या पलीकडील कांठास दिसली. त्यानें शाहाजाद्यास एकदम असा हुकूम फरमाविला कीं नदीच्या उजव्या कांठानें मी जसा चालेन त्या धोरणानें तूं ही डाव्या कांठानें चाल. येथें आल्यावर बाबरास जी बातमी समजली ती असमाधानकारकच होती. मह-

मूद लोदीच्या निशाणाखालीं एक लाख सैन्य जमलें होतें. शिवाय, बाबराच्या स्वतःच्या सरदारांपैकीं शेरखान नांवाचा सरदार, ज्यास त्यानें मोठ्या लौकिकास चढविलें होतें, तो बंडवाल्यास जाऊन मिळाला होता. आपल्या फौजेसह त्यानें बनारस शहर घेतलें होतें; व त्या पवित्र नगरीपासून १३ कोसांवर चनारचे किल्ल्यास महमूद लोदी वेढा घालीत होता.

बाबर एकदम चाल करून पुढें गेला व त्यानें महमूद लोदी यास चनारचा वेढा उठवावयास लावून शेरखानास बनारसेहून गंगापार हांकून दिलें. नंतर त्यानें कर्मनाशा ओलांडिली; व गंगा, कर्मनाशा व बक्सार यांचे संगमावर चौसार व बक्सार ह्यांचे पलीकडे तळ दिला. तेथून निघून शत्रूंस मार्गे हटवीत हटवीत बाबर आरा येथें पोंचला. येथें त्यानें बिहारचें राज्य खालसा केलें, व याच ठिकाणीं त्यास बातमी लागली कीं महमूद लोदी थोड्याशा अनुयायांनिशीं बंगालच्या राजाच्या आश्रयास जाऊन राहिला आहे.

बंगालचा राजा नसरतशहा यानें महमूद लोदीच्या पुतणीशीं लग्न लाविलें होतें. त्याचा बाबराशीं असा करार झाला होता कीं उभयतां राजांनीं परस्परांच्या मुलुखांवर स्वारी करूं नये. परंतु हा करार मोडून त्यानें सारण प्रांत घेतला होता; व गोग्रा आणि गंगा यांच्या संगमापाशीं सहसा शत्रूस घेतां येणार नाहीं अशा जागीं सैन्यासह तळ देऊन तो बसला होता. हें सैन्य येथून हांकून द्यावें असा बाबरानें निश्चय केला. हा हेतु साधण्यास एकच मार्ग होता, हें त्याच्या लक्ष्यांत तेव्हांच आलें. तो कोणता तर मनगटाचा जोर. त्यानें आपल्या सैन्याच्या सहा तुकड्या केल्या. यापैकीं चार तुकड्या अस्कारीच्या ताब्यांत दिल्या. अस्कारी या वेळीं गंगेच्या डाव्या बाजूस होता. त्यास असा हुकूम होता कीं त्यानें गोग्रा नदी ओलांडावी व शत्रूंवर चालून जाऊन ते आपला तळ सोडतील अशी खटपट करावी व तसें झाल्यावर गोग्रा नदीच्या कांठानें त्यांचे जवळ जवळ असावें. बाकीच्या दोन टोळ्यांचे

अधिपत्य स्वत: घेऊन, बेत केला कीं प्रथम गंगा व नंतर गोग्रा उतरून शत्रूंवर हल्ला करावा, व त्यांस पूर्वीच्या तळाच्या जागीं येऊं ही देऊं नये. ही योजिलेली घटना तारीख ६ मे रोजीं पूर्णपणें सिद्धीस गेली. बंगालच्या सैन्याचा अगदीं पराभव झाला व ह्या एका जयानें शत्रु पूर्णपणें जेरीस आला. तेव्हां खालील अटींवर बंगालच्या राजाशीं तह करण्यांत आला ;–( १ ) हल्लीं आपण ज्यास पश्चिम बिहार ह्मणतों तो प्रांत बाबर यास द्यावा; ( २ ) उभयतां राजांनीं एकमेकांच्या शत्रूंस कुमक करूं नये, व ( ३ ) परस्परांनीं एकमेकांच्या मुलुखांस उपद्रव देऊं नये.

येथवर या शूर व प्रसिद्ध पुरुषानें जें आत्मवृत्त लिहिलें आहे त्याचाच मुख्यत्वें आधार धरून त्याच्या चरित्रांतील ठळक ठळक गोष्टींचें थोडक्यांत वर्णन झालें. राहिलेला भाग अल्पच आहे. बिहारमधील मोहीम फत्ते करून परत आल्यावर थोड्याच दिवसांत बाबराची प्रकृति क्षीण होत चालली. ही गोष्ट लपवितां येईना व त्याचा वडील मुलगा हुमायून बक्शान येथें सुभेदार होता त्यास ही बातमी समजली. त्या राजपुत्रानें तेथील कारभार आपला भाऊ हिंदाल याच्या स्वाधीन केला व आपण तावडतोब आग्र्यास येण्यास निघाला. तो तेथें १५३० च्या प्रारंभीं दाखल झाला. त्याचें स्वागत फार प्रेमपूर्वक झालें. हुमायून हा रसिक, विनोदी व रंगेल अशा स्वभावाचा असल्यामुळें त्यास पुष्कळ स्नेही झाले. सहा महिने झाले नाहींत तोंच हुमायून यास जबर दुखणें आलें. दुखण्याच्या ऐन भरांत, राजपुत्र आतां वांचत नाहीं अशी निराशा झाली असतां एक गोष्ट घडून आली तीवरून बाबराचें पुत्र-वात्सल्य व निरपेक्षता हीं निभ्रांतपणें दिसून येतात. या गोष्टीचें वर्णन बाबरानें लिहिलेल्या आत्मवृत्तास त्याचें भाषांतर करणाऱ्यांनीं पुरवणी दाखल जोडिलेल्या भागांत केलें आहे तें असें:–"औषधोपचारांचा जोर चालेनासा होऊन सर्व आशा खुंटली होती; व चतुर दरबारी बाद-

शहाशीं शहाजादाची अवस्था कठीण आहे असें बोलावयास लागले होते. तेव्हां, धार्मिकपणा व विद्वत्ता ह्यामुळें परम पूज्य मानिलेल्या अबुल्बाका नामक उमरावानें एके दिवशीं असें सांगितलें कीं, अशा प्रसंगीं आसन्न-मरण मनुष्याचे कोणी आप्तानें जर त्याचे जिवाबद्दल स्वतःस अत्यंत प्रिय अशी वस्तु अर्पण केली तर परमेश्वर कधीं कधीं तिचा स्वीकार करतो. हे शब्द ऐकून बाबर एकदम मोठ्यानें म्हणाला कीं जसा हुमायुनाचा जीव मला अतिशय प्यारा आहे तसाच त्याला ही माझा जीव प्रिय आहे. सबब मुलाच्या जिवाकरितां मी आपल्या जिवाचा बळी परमेश्वरास अत्यानंदानें अर्पण करितों व त्यास अशी प्रार्थना करितों कीं हे देवा कृपा करून तूं तो ग्रहण कर." तेव्हां "हें काय" म्हणून दरबारांतील मंडळींनीं बाबराचा अनेक प्रकारें निषेध केला पण तें सर्व व्यर्थ. त्यानें आपला निश्चय म्हणून सोडिला नाहीं. मरणोन्मुख झालेल्या आपल्या मुलाच्या बिछान्या भोंवतीं त्यानें तीन प्रदक्षिणा घातल्या ( असा विधि मुसलमान लोक बळी देण्याचे वेळीं करितात ) व नंतर, एकीकडे जाऊन अंतःकरणपूर्वक परमेश्वराची प्रार्थना केली. नंतर कांहीं वेळानें "मीं अर्पण केलें तें माझ्या मुलाला मिळालें, खचित मिळालें" असे त्याचे शब्द, मोठ्यानें म्हटलेले लोकांनीं ऐकिले. मुसलमान इतिहास-कार असें सांगतात कीं तत्क्षणींच हुमायुनाच्या प्रकृतीस आराम पडूं लागला व त्याच प्रमाणानें बाबराची शक्ति क्षीण होत चालली. इ. स. १५३० च्या अखेरपर्यंत बाबर अधिकाधिक आजारी होऊन मृत्यूशीं झगडत होता. शेवटीं तारीख २६ दिसेंबर रोजीं, त्याचा आत्मा इह-लोकाहून परमेश्वरापाशीं गेला. आग्र्याजवळील चारबाग नांवाच्या महालांत त्याचा अंत झाला. त्यावेळीं त्याचें वय ४९ वर्षांचें होतें. याच्या अंतकाळच्या इच्छेनुरूप त्याचें प्रेत काबूल येथें नेलें व तें तेथून एक मैलावर रमणीय स्थळीं पुरिलें.

ज्यांनीं दिग्विजय गाजवून देशच्या देश मिळविले अशा विख्यात व

पराक्रमी पुरुषांत बाबर ह्याची गणना उच्चपदींच होईल. त्याच्या एकंदर आयुष्यांतील पराक्रम हे त्याच्या नैसर्गिक अलौकिक गुणांचेंच फळ होतें. त्याची वडिलोपार्जित दौलत ह्मणजे मध्यएशियांत केवळ छायारूप असें एक लहानसें राज्य होतें. पण तोच बाबर, पूर्व पश्चिम कर्मनाशानदीपासून ऑक्ससनदीपर्यंतच्या व दक्षिणोत्तर नर्मदानदीपासून हिमालयपर्यंतच्या मुलुखांचा स्वामी बनला होता. त्याचा स्वभाव आनंदी होता. तो उदार, विश्वास ठेवणारा, व सदासर्वकाळ उमेद बाळगणारा असा असे. ज्यांच्यांशीं त्याचा संबंध घडे त्यांची प्रीति संपादन करण्याची हतोटी त्यास फारच उत्तम साधली होती. तो सृष्टींतील सौंदर्याचा उत्तम ग्राहक होता. त्यानें आपली नैसर्गिक अलौकिक बुद्धि परिश्रम करून इतकी वाढविली होती कीं त्याचें ज्ञान त्यावेळेस असाधारणच मानण्यासारखें होतें. तो प्रबल मनोवृत्तीचा होता व त्याची कल्पनाशक्ति ही फार विशाल होती. संग्राम, जयश्री, व वैभव यांची त्यास फार आवड असे; तथापि शांतीच्या समयींच्या कलाकुशलतेकडे त्याचें दुर्लक्ष नव्हतें. जिंकलेल्या लोकांचा समाचार घेणें हें बाबर आपलें पहिलें कर्तव्य मानी व त्यांची स्थिति सुधारण्याकरितां योग्य उपायांची योजना करी. बागबगीचे, शिल्पशास्त्र, व गायनकला ह्यांचा तो फार शोकी असे. त्याची कवित्वशक्ति ही सामान्य नव्हती. परंतु त्याच्या स्वभावांतील अत्यंत प्रशंसनीय गुण ह्मटला ह्मणजे, जो हैदर मिरझा यानें आपल्या तारीखी रशीदी नामक ग्रंथांत वर्णिला आहे तो. हैदर मिरझा यास बाबर याचे स्वभावाची व गुणांची पूर्ण ओळख होती. त्यानें लिहिलें आहे कीं त्याच्या सर्व गुणांत पहिले गुण दोन:—एक त्याची उदारता व दुसरा त्याची भूतदया. देश जिंकण्यापुरतीच जरी त्याची आयुर्मर्यादा होती व जिंकिलेल्या देशांत स्थिरस्थावर करण्यास जरी त्यास अवकाश मिळाला नाहीं तथापि जिंकण्याचें काम याहून पवित्र पुरुषाच्या हातीं क्वचितच आलें असेल.

बाबर यास चार मुलें होतीं. पैकीं पहिला, महमद हुमायून मिरझा, हा तारीख ९ एप्रील १५०८ रोजीं जन्मला व बापाच्या मागून गादीवर बसला. राहिले तिघे कामरान मिरझा, हिंदाल मिरझा, व अस्कारी मिरझा. मरणापूर्वीं त्यानें आपल्या अमात्य मंडळीची मुद्दाम सभा भरवून हुमायुनास आपल्या पश्चात होणारा बादशहा ह्या नात्यानें त्यांस भेटविलें होतें व चिरंजीवांस अंतकाळीं सदुपदेश ही केला होता. त्यांत पुढील गोष्टी मोठ्या महत्वाच्या ह्मणून सांगितल्या होत्या. पहिली, परमेश्वरासंबंधीं व मानवजातीसंबंधीं जो आपला कर्तव्यधर्म आहे तो मानोभावें पाळिला पाहिजे. दुसरी, इनसाफाची बजावणी फार नेकीनें व तत्परतेनें करावी. तिसरी, अपराध्यांस शिक्षा तर करावी पण ती करतांना जे मूर्ख व पश्चात्ताप झालेले असतील त्यांना दया व क्षमा दाखवावी व गरीब व अनाथ असतील त्यांस आश्रय द्यावा. या शिवाय, आपल्या बंधूंशीं स्नेहानें व ममतेनें वागण्याविषयीं त्यानें हुमायुनास विनवून सांगितलें.

हिंदुस्थानांत मोंगल राज्याचा पाया घालणाऱ्या मुख्य व अलौकिक वीराचा याप्रमाणें ऐन भर ज्वानींत शेवट झाला. वायव्येकडील प्रांत व मध्य हिंदुस्थानांतील कांहीं मुलूख काबीज करून त्यानें त्यांवर आपल्या घराण्याचा प्राचीन वहिवाटीचा हक्क संपादून ठेविला होता. याच्या अंगीं अलौकिक गुण होते खरे. परंतु, आजपर्यंत पृथक् असलेल्या राज्याचे भाग एकवटून जेणेंकरून त्यांचें सम्मीलन होईल अशी राज्यपद्धति हिंदुस्थानांतील जिंकलेल्या प्रदेशांत सुरू करण्यास त्यास अवकाश व संधि मिळाली नाहीं. तो महापुरुष होता खरा; परंतु नवीन कायदे करून व नवीन राज्यपद्धति प्रसृत करून जशी तोडण्याची तशी जोडण्याची कला त्याजपाशीं होती कीं नाहीं याबद्दल संशयच आहे. तशी कला त्याचे अंगीं असल्याचा कोठें प्रत्यय नाहीं. काबूल व हिंदुस्थान या दोन्ही ठिकाणीं त्यानें पूर्वीं होऊन गेलेल्या विजयी पुरुषांचीच राजनीति चालविली. या राज्यपद्धतीचें तत्व येवढेंच होतें

कीं जिंकिलेल्या प्रांतांचे तुकडे करून तेथील कारभार आपल्या अनुयायी सरदारांकडे सोंपवावा; त्यांनीं वाटेल त्या रीतीनें अंमल करावा; मात्र ते स्वतः खुद्द बादशहास जबाबदार असावयाचे. सबब, बाबराच्या अंतकाळीं त्याच्या राज्यांतील निरनिराळ्या प्रांतांचें बंधन होतें तें येवढेंच. आग्रा व लखनौ यांच्या राज्यपद्धतींत सारखें असें कांहींच नव्हतें; व हीच स्थिति दिल्ली व जोनपूर यांची होती. बादशाहींतील एका प्रांतांतील मालावर दुसऱ्या प्रांतांत निरनिराळ्या जबरदस्त जकाती असत, जणों काय हीं निराळीं स्वतंत्र राज्येंच. शिवाय, ह्या प्रत्येक प्रांतांत भिन्न भिन्न जातींचे लोक राहत होते व ते सर्व बाबरच्या अंमलाखालीं होते. येवढेंच कायतें त्यांचें देशबंधुत्व. ह्यामुळें आपल्या अंतकाळीं बाबरानें जो प्रांतसमूह हुमायुनास ठेविला त्यांत एकोप्याचें किंवा समायिकतेचें एकही बंधन नव्हतें. सारांश, त्याच्यापूर्वीं जीं मुसलमानी राजघराणीं ह्या देशांत होऊन गेलीं त्यांच्या राज्यवृक्षाचीं मुळें जशीं हिंदुस्थानांत खोल व लांबवर रुझलीं नव्हतीं तशींच बाबर ह्याचे मरणसमयीं मोंगल घराण्याचीं हीं पण नव्हतीं.

# भाग साहावा.

## हुमायून–व अकबर याचें बालपण.

॥ कस्यै कान्तं सुखमुपगतं दुःखमेकांततो वा ॥
॥ नीचै र्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमिण ॥

॥ कोणी अत्यंत सुखी; शीर्षीं अनिवार दुःख कोणाचे; ॥
॥ रथचक्रापरि फिरतें; खालीं वर जाइ दैव मनुजाचें ॥

हुमायून हा हिंमतदार, रंगेल, विनोदी, सुशिक्षित, उदार, स्नेहेच्छू व कोमल अंतःकरणाचा होता व त्याचा स्नेह फारच हृदयवेधक होता. आणि ह्यामुळेंच चिरस्थायी राज्य स्थापन करण्याची योग्यता बापापेक्षां त्याच्या अंगीं कमीच होती. त्याच्या अंगीं गुण होते त्या बरोबरच

संकटांत आणणारे अवगुणही पण होते. तो फारच चंचल, अविचारी, व अनिश्चियी असा असे. आपलें कर्तव्य कोणतें व तें केलेंच पाहिजे असा विचार त्याचे मनांत क्वचितच येई. त्याचें उदारपण कधीं कधीं इतकें वाढें कीं त्यास उधळेपणा हीच संज्ञा शोभे. त्याची आसक्ति अथवा प्रीति कधीं कधीं फारच वहावे. कोणत्याही महत्वाच्या विषयांत कांहीं काळपर्यंत अनन्यभावानें लक्ष घालण्याचें सामर्थ्यच त्याच्या अंगीं नव्हतें; व व्यापक कायदे कानू करण्यास लागणाऱ्या कुशाग्र बुद्धिमत्तेची त्यास अनुकूलता नव्हती व त्याच्या मनाचा कल ही तिकडे जात नसे. या कारणांमुळें बापानें पराक्रम करून जिंकिलेल्या प्रांतांचें सम्मीलन करून त्यांचें सुयंत्रित एक राष्ट्र बनविण्यास तो मुळींच योग्य नव्हता.

हुमायून गादीवर बसल्यानंतर जीं आठ वर्षे लोटलीं त्यांची तपशीलवार हकीकत नमूद करण्याचें प्रयोजन नाहीं. त्यानें राज्यशकट इतक्या अकुशळतेनें चालविला व आपल्या छत्राखालीं असणाऱ्या प्रजाजनांचा भरंवसा व आदर इतका थोडा संपादिला कीं, बाबर यास शरण आलेला शेरखानसूर ह्मणून सरदार होता, तो जेव्हां त्याजवर उठला व जेव्हां त्यानें १५४० सालीं मोठा जय मिळवून, हुमायुनास पदच्युत करून, दिल्लीचे तख्तावर शेरशाहा हा किताब धारण करून आरोहण केलें तेव्हां मोंगल राज्याची सारी इमारत एकदम ढासळून पडली. हुमायुनानें थोडेसे धाडसाचे प्रयत्न केले; पण शेवटीं १५४१ सालीं थोड्याशा लोकांनिशीं त्यास पळ काढावा लागला. तो सिंध प्रांतांत बक्कर नांवाच्या बेटासमोर रोही येथें जाऊन राहिला. याप्रमाणें बापानें कमावून ठेविलेल्या राज्याची चिरंजीवानें धूळधाण करून टाकिली.

सिंध देशांत आपला अंमल स्थापन करण्याच्या व्यर्थ खटपटींत हुमायुनानें एकंदर अडीच वर्षें गमाविलीं. येथें असतांनां जी एक विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट घडून आली ती ही कीं, तारीख १५ अक्टोबर सन १५४२ रोजीं त्यास एक पुत्ररत्न प्राप्त झालें व त्याचें नांव जलालु-

दीन महमद अकबर हें ठेविलें. ही हिंदुस्थानच्या इतिहासांत फारच महत्वाची गोष्ट कशी घडून आली याचें वृत्त आतां निरूपण करूं.

इ० स० १५४१ त हुमायुनाचें सैन्य बक्कर येथें वेढा घालण्यांत गुंतलें होतें व सेवान नांवाच्या श्रीमान प्रदेशावर स्वारी करून काबीज करण्याचें काम त्याचा सापत्न बंधु हिंदाल याजकडेस सोंपविलेलें होतें. हुमायुनाचें मन हिंदाल याच्या मसलतींविषयीं साशंक होऊन पाटर शहरीं त्याची व आपली गांठ व्हावी असा त्यानें योग घडवून आणिला. हें शहर सिंधु नदाच्या पश्चिमेस वीस मैलांवर आहे. तेथें हिंदाल आपल्या अमीर उमरावांसह पूर्ण बादशाही थाटाचें स्वागत करण्यास सर्व तयारी-निशीं सिद्ध असल्याचें हुमायुनाच्या दृष्टीस पडलें. आगत स्वागताचे उत्सव चालू असतां हिंदालच्या आईनें हुमायुनास मोठी थाटमाटाची मेजवानी केली, व त्याप्रसंगीं तिनें दरबारच्या एकूण एक स्त्रियांस निमंत्रण केलें होतें. त्यामध्यें हमिदा नांवाची एक अति लावण्यवती कन्यका हुमायुनाच्या दृष्टीस पडली. ती हिंदालचा गुरु एक अमीर होता त्याची मुलगी होती. हिच्या सौंदर्याला हुमायून इतका भुलून गेला कीं तिला मागणी घातली आहे किंवा नाहीं याजबद्दल त्याच ठिकाणीं त्यानें चौकशी केली. तेव्हां असें कळलें कीं तिची मागणी झाली आहे परंतु वाग्दानाचा विधि अद्याप झाला नाहीं. "असें आहे तर मी तिच्याशीं लग्न लावणार" असें हुमायून बोलला. या अकल्पित निश्चयाचा हिंदालनें निषेध केला व अशी धमकी दिली कीं आपण हा बेत तडीस नेल्यास मी आपल्या सेवेंत राहणार नाहीं. या गोष्टींत उभयतां बंधूंत कलह माजला व त्याचा अंत दोघांची जन्माची दुफळी होती असें वाटलें. परंतु, या विवाहसंबंधास हिंदालची आई अनुकूल असल्यामुळें तिनें गळ घालून मुलास राजी करून घेतलें. दुसरे दिवशीं हुमायून व हमिदा यांचें लग्न लागलें. तेव्हेळीं तीस चवदावें वर्ष नुकतेंच पुरें झालें होतें. पुढें थोड्याच दिवसांनीं तें आनंदी जोडपें बक्करचे समोर दिलेल्या तळांत जाऊन पोहोंचलें.

हुमायुनास काल प्रतिकूळ होता यामुळें त्याचे सर्व बेत फसले. इ० स० १५४२ च्या वसंत ऋतूंत जीव बचावण्याकरितां पळ काढून आपल्या अल्पवयस्क रमणीसह त्यास मारवाड्याच्या रूक्ष वाळवंटांत आश्रा घ्यावा लागला. आगस्ट महिन्यांत ते जैसलमेर येथें पोंहोंचले. परंतु तेथील राजानें त्यांस परत लाविलें. तेव्हां त्यांना फिरून मारवाडचें वाळवंट ओलांडून जावें लागलें; व वाटेंत पाणी न मिळाल्यामुळें त्यांचे फार हाल हाल झाले. त्यांनीं वाटेचे कष्ट मोठ्या हिंमतीनें सोशिले व नेटानें प्रवास करून तारीख २२ आगस्ट रोजीं ते त्या रणाच्या सरहद्दीवरील अमरकोटच्या किल्ल्यांत दाखल झाले. तेथील राण्यानें त्यांचें आदरपूर्वक आतिथ्य करून त्यांस ठेवून घेतलें. याच ठिकाणीं रविवार तारीख १५ आक्टोबर रोजीं हमिदा बेगम प्रसूत होऊन तिला अकबर झाला. यापूर्वीं चारच दिवस हुमायून अमरकोटाहून निघून जून प्रांतावर स्वारी करण्यास गेला होता. पुत्र झाल्याची आनंदाची खबर कळतांच ह्याच्या मुखांतून जे उद्गार निघाले ते नमूद करण्यालायक आहेत. त्याच्या समागमें असणाऱ्या एका अनुयायानें असें लिहून ठेविलें आहे कीं:—"बादशाहानें पुत्र दिल्याबद्दल ईश्वराची कृतज्ञतापूर्वक प्रार्थना केल्यावर लागलींच अमीरांच्या मुलाखती झाल्या व त्यांनीं त्याचें अभिनंदन केलें. मग, त्यानें "टेझकेरे अलवकियत" नामक पुस्तकांचा कर्ता इतिहासकार जोहर यास हाक मारून विचारलें कीं मीं तुमचे जवळ काय काय दिलें आहे. तो ह्मणाला:—खाविंदानीं मजजवळ २०० शाहारुखी सोन्याचीं नाणीं, एक चांदीचें कडें, व एक कस्तुरीची पिशवी इतक्या जिनसा दिल्या होत्या. त्यापैकीं पहिल्या दोन त्यांच्या मालकास परत दिल्या." यावर कस्तुरीची थैली घेऊन या, असा हुकूम फरमाविला गेला; ती आणिल्यावर एका चिनी ताटांत ती कस्तुरी ओतली व ती पुत्रोत्सवाचा बादशाही नजराणा ह्मणून आपल्या अमीरांना वांटून दिली. या गोष्टीचा

परिमल वाटलेल्या कस्तूरीप्रमाणें सर्व जगांत पसरला असें जें जोहरानें आपले इतिहासांत लिहून ठेविलें आहे, तें यथार्थच आहे.

पुत्र जन्मानें हुमायुनाचा भाग्योदय लागलींच झाला असें नाहीं. इ० स० १५४३ च्या जुलै महिन्यांत त्यास सिंधदेश सोडावा लागला. तेंव्हां बायको मूल व थोडेसे नौकर चाकर यांसह तो कंदाहारास जाण्याच्या इराद्यानें निघाला. तो शाल एथें पोहोंचला. इतक्यांत त्यास असें समजलें कीं आपला भाऊ अस्कारी मोठ्या सैन्यानिशीं जवळपास आहे, सबब आपणास तावडतोब पळ काढिला पाहिजे. तो व त्याची बायको या कामास तयार होतीं, परंतु मुलाचें काय करावें हें त्यांस सुचेना. मुलगा नुक्ताच वर्षाचा झाला होता, व त्या कठीण ऋतूंत घोडयावर घालून झपाट्याच्या मजला मारण्यास तो अगदींच अक्षम होता. या लहान अर्भकाशीं त्याचा चुलता लढणार नाहीं, अशी बहुतेक योग्य अशीच अटकळ करून त्यांनीं त्या मुलास दाई व दासीजन व डेरे व राहुट्या यांसह तेथेंच ठेवून जाण्याचा निश्चय केला. नंतर, त्या ठिकाणाहून त्यांनीं प्रयाण केलें व ते घोडे पिटाळीत इराणचे सरहद्दीवर सुखरूप जाऊन पोहोंचले. ते शालहून निघाले नाहींत तोंच अस्कारी मिरझा हा तेथें दाखल झाला. भाऊ हातीं न सापडतां पळून गेला ह्मणून अस्कारीचा हिरमोड झाला; परंतु तो कांहीं मिष्ट भाषणें बोलून कोणास समजूं दिला नाहीं; व त्या कोमल राजकुमाराला ममतेनें वागवून त्याला कंदाहारास,—जेथें तो सुभेदार होता तेथें,—घेऊन जाऊन आपल्या बायकोच्या ताब्यांत मोठी ठेव ह्मणून दिलें. व त्याच्या समागमें असलेल्या दायांसही त्याचे तैनातींत ठेविलें.

या बेगमनें एक वर्षभर ( १५४४ ) त्या राजपुत्राची जोपासना मोठ्या आस्थेनें केली; परंतु पुढील वर्षाच्या आरंभींच तो निराळ्या स्थितींत गेला. त्याच्या बापास इराणचा शाहा तमस्प यानें सैन्य दिलें त्यासह त्यानें अरण्यामधून तडक कंदाहाराकडे मोर्चा फिरवून पश्चिम

अफगणिस्थानावर स्वारी केली. ह्या मोहिमेनें कामरान यास अशी भीति पडली कीं हुमायून कदाचित् आपल्या मुलास घेऊन जाईल; सबब त्याची काबूल एथें रवानगी करून द्यावी असा त्यानें कंदाहारास सक्त हुकूम पाठविला. ज्या विश्वासू कामदारांकडे ही कामगिरी सोंपविली होती ते कंदाहार येथें दाखल झाल्यावर अस्कारी मिरझाच्या प्रधान मंडळींनीं कामरानाच्या हुकुमाची तामिली करावी किंवा नाहीं याचा विचार करण्याकरितां दरबार भरविलें. हुमायुनाचे ग्रह या वेळीं उच्च आहेत असें समजून बऱ्याच लोकांनीं अशी सल्ला दिली कीं त्याच्या मरातबेस योग्य अशा इतमामासह अकबराची त्याचे बापाकडे रवानगी करून द्यावी. दुसऱ्या कित्येकांचें मत असें पडलें कीं, शहाजादा अस्कारी आपला ज्येष्ठ बंधु जो हुमायून त्याच्याशीं अतिशय बेइमानानें वागला आहे, ह्मणून आतां त्यानें किती ही पश्चात्ताप दाखविला तरी हुमायुनापाशीं तो व्यर्थच जावयाचा; सबब, आपण कामरानाची मर्जी संपादन करणें हेंच श्रेयस्कर आहे. ही दुसरी सल्ला बहुमतानें पसंत पडली व नेहमींपेक्षां ते वर्षींचा—हिंवाळा अतिशय कडाक्याचा असतांही त्या कोमल राजपुत्राची व त्याची धाकटी बहीण बक्षीबानु बेगम हिची त्यांच्या दासदासीनिशीं काबुलास रवानगी झाली. मार्गांत बरेच जोखमीचे प्रसंग आले व बंदोबस्ताकरितां असलेल्या लोकांस अशी धास्ती वाटली कीं राजपुत्रास पळवून नेतात कीं काय कोण जाणे. अखेरीस ते काबुलास सुखरूप जाऊन पोहोंचले. कामरानानें आपला पुतण्या बाबरची आवडती बहीण खानझादा बेगम हिच्या स्वाधीन केला व तीस त्याचें संगोपन करण्यास सांगितलें. तिनें आपल्या जवळ असतांना त्या मुलाचा प्रतिपाळ फारच काळजीपुरस्कर केला व आरंभापासून त्याच्या संनिध असलेले दासदासी व नौकर चाकर त्याच्या तैनातींत तसेच कायम राहू दिले. दुर्दैवें करून ही जोपासना फार दिवस टिकली नाहीं. पुढील सप्टेंबर महिन्यांत (१५४५)

हुमायुनानें कंदाहार काबीज केलें; तेव्हां कामरान मोठ्या पेचांत सांपडला; व त्याची अगदीं गाळण झाली. त्याचा स्वभाव संशयी व मत्सरी असा होता व त्यास असें वाटत होतें कीं अकबर हा आपल्यापाशीं एक भारलेला ताईत आहे व त्याचे योगानें हुमायुनास अगदीं आपल्या मुठींत ठेवितां येईल. ह्मणून त्यास त्याचे आजीच्या ताब्यांतून काढून कुचकिलन नांवाच्या एका विश्वासू आश्रिताच्या जिमेस दिलें. त्यावेळीं राजकीय घडामोडी फारच झपाट्यानें होत असत. कंदाहार येथें आपल्या सत्तेचा पाया मजबूतपणें उभारून हुमायून सैन्यासह काबुलावर चाल करून गेला. तो नवेंबरच्या पहिल्या आठवड्यांत त्या शहरासमोर जाऊन दाखल झाला व १९ वे तारखेस तें त्यानें हस्तगत करून घेतलें. कामरान गिझनीस पळून गेला; परंतु या प्रसंगीं चिरवियुक्त मुलाची भेट झाल्यामुळें हुमायुनास परमाल्हाद वाटला. मुलाची आई हमिदाबेगम ही पुढीलवर्षाच्या वसंतकालपर्यंत तेथें दाखल झाली नाहीं; तथापि हुमायुनानें अकबरास कुचकिलनचे ताब्यांतून काढून त्याचा पूर्वीचा प्रतिपालक अटकाखान याची पुनः ह्या कामावर नेमणूक केली. राजपुत्राचा सांभाळ प्रथमतः याजकडेसच सोंपविला होता. याचें खरें नांव गझनीचा शमसुद्दीन महम्मद हें होतें. १५४० सालीं शेरशहाशीं झालेल्या लढाईत यानें हुमायुनचा जीव वांचविला होता.

ह्याप्रमाणें अकबरचे कांहीं दिवस मोठे ऐश्वर्यात व थाटांत गेले-परंतु, ही दोनप्रहरची सावली फार वेळ राहिली नाहीं. हिंवाळा आला तेव्हां हुमायुनानें त्या कडक थंडीचे दिवस, दरम्यान काबीज केलेल्या बदकशान प्रांतांतील कीलाजफर ह्या ठिकाणीं घालवावे असा निश्चय केला. तेथें जात असतां मार्गांत त्यास इतकें भयंकर दुखणें आलें कीं त्यांतून तो वांचेल असा संभव दिसला नाहीं. दोन महिने तो अगदीं अथंरुणास खिळून होता. पुढें ईशकृपेनें त्यास आराम पडला; व प्रकृति पूर्ववत झाली. परंतु या अवकाशांत त्याचे बरेचसे अमीर, उमराव

व सरदार लोक त्याच्या भावास जाऊन मिळाले होते, कारण हुमायुनाचा अंतकाळ आतां अगदीं समीप आला आहे अशी त्यांची खात्री झाली होती. आपल्या सासऱ्यानें पाठविलेलें सैन्य मदतीस घेऊन कामरानानें पुनः काबूल हस्तगत केलें होतें व अकबरही पुनः त्याचे हातीं आला होता. लागलींच अटकाखानाची उचलबांगडी झाली व त्याच्या जागीं कामरान यानें आपल्या नौकरांपैकीं एकाची योजना करून त्याजकडेस अकबराची जोपासना सोंपविली.

दुखण्यांतून उठून अंगांत ताकत येते न येते तोंच आपली राजधानी पुनः काबीज करण्याकरितां हुमायुनानें स्वारी केली. काबूलच्या तटा बाहेरील पुऱ्यांत कामरानाच्या सैन्यांतील अति प्रतापी शिपायांचे टोळीचा त्यानें विध्वंस केला; व आपली छावणी "कोआकाबेन" येथें स्थापिली. या ठिकाणाहून काबूलचा किल्ला व शहर अगदीं माऱ्यांत होतें ह्मणून हुमायुनानें तेथून तोफांचा भडिमार सुरू केला. थोड्याच दिवसांत या भडिमारानें इतका कहर उडवून दिला व इतकी नासाडी केली कीं तो थांबविण्याकरितां "तोफा बंद करा नाहींतर मी अकबरास भिंतीवर गोळ्यांचा ऐन मारा आहे तेथें आणून उभा करितों" असा निरोप कामरानानें हुमायुनाकडे पाठविला. हुमायुनानें तोफा बंद केल्या तथापि वेढा तसाच राहूं दिला. व तारीख २८ एप्रील १५४७ रोजीं विजयी होत्साता त्यानें शहरांत प्रवेश केला. कामरान अधले दिवशीं रात्रींच पळून गेला होता.

अकबरनाम्यांत अबूफझल ह्मणतो कीं कामरानानें ह्मणण्याप्रमाणें अकबर यास खरोखरच तोफांच्या माऱ्यांत आणून उभें केलें होतें. हैदर मिरझा, बदौनी व फेरिस्ता आणि इतर इतिहासकार ही असेंच वर्णन करतात. परंतु त्या प्रसंगीं हजर असलेला बयझिद ह्यानें त्या वेळच्या सर्व क्रूर कृतींचें साग्र वर्णन केलें आहे तथापि या गोष्टीचा त्यानें उल्लेख केला नाहीं. आणि जोहर यानें हुमायुनचें जें खासगी रीतीनें

चरित्र लिहिलें आहे त्यांत याविषयीं आह्मीं वर्णन केलें आहे तसेंच लिहिलें आहे.

कामरान बदकशानाकडे पळाला व हुमायून त्याचा पाठलाग करीत तिकडे गेला. परंतु पुढील हिंवाळ्यांत त्याचे कित्येक बलाढ्य सरदार फितूर होऊन कामरानास जाऊन मिळाले. हुमायुनानें अनेक वेळां स्वाऱ्या केल्या; व माघार ही खाल्ली. नंतर इ० स० १५४८ चे उन्हाळ्यांत उत्तरेकडील राज्यांचा पक्का बंदोबस्त करण्यासाठीं निकराचें एक युद्ध करावें असा त्यानें निश्चय केला. पुढील जून महिन्यांत अकबर व त्याची आई यांस समागमें घेऊन तो काबुलाहून स्वारी करण्यास निघाला. गुलवाहान येथें दाखल झाल्यावर त्यानें त्या मायलेकांस काबूल येथें पुनः परत पाठविलें व आपण जातीनें तालीकानावर हल्ला करून कामरानास शरण यावयास लाविलें. याप्रमाणें उत्तरेकडील मुलुखांत स्थिरस्थावर करून तो बादशहा—हुमायुनास अद्याप याच किताबानें हाक मारीत—काबुलास परत गेला.

बल्खवर हल्ला करण्याकरितां १५४९ च्या वसंत कालाच्या अखेरीस तो तेथून पुनः निघाला. ते वेळीं बल्ख हें पश्चिम कंदज प्रांतांत असे. परंतु युझबेक लोकांनीं ह्याचा पराभव करून त्यास परत लाविलें व तो काबुलास १५५० चा हिंवाळा घालविण्याकरितां पुनः परत आला. यानंतर एक फारच विलक्षण गोष्ट घडून आली. त्याचा भाऊ कामरान,—ज्यानें सहाय्य न केल्यामुळेंच मुख्यत्वेंकरून हुमायुनाची बल्खवरील मोहिम फसली,—त्यानें नंतर हुमायुनाविरुद्ध उघड उघड बंड केलें व आस्कवर मोहीम केली पण ती फसली व अति अनर्थकारक झाली. शेवटीं तोच कामरान हुमायुनास शरण आला. तेव्हां हुमायुनानें काबूलचें राज्य अकबराच्या स्वाधीन केलें—त्यावेळीं त्याचें वय कायतें ८ वर्षांचें होतें—व त्याच्या जवळ त्याचा गुरु महंमद कासीमखान बिरलास यास ठेविलें व आपण राजधानीहून कामरान एकदां आपले ताब्यांत घेण्या-

करितां निघाला. परंतु हुमायून हा निष्काळजी होता व त्यामुळें कामरानानें निराळाच व्यूह रचून ठेविला होता त्यास पूर्ण यश आलें. त्यानें किपच्या कच्चया खिंडीच्या वरच्या बाजूस हुमायुनावर एकदम हल्ला करून त्यास जीव घेऊन पळ काढावयास लाविलें. याप्रमाणें 'यःपलाय' करीत असतां त्यास भयंकर जखम लागली तरी तो तशाच स्थितींत नेटानें वाट काढीत काढीत सिरनपासच्या माथ्यावर कसातरी सुखरूप जाऊन पोहोंचला. येथें त्यास फारशी भीति नव्हती. या अवकाशांत कामरान यानें काबुलावर स्वारी करून तें हस्तगत करून घेतलें, तेव्हां तिसऱ्यांदां अकबर चुलत्याच्या तावडींत सांपडला व त्याचा कैदी बनला. ही हानि हुमायुनानें निमूटपणें सहन केली नाहीं. त्यानें आपलें सैन्य फिरून जमविलें व डोंगर ओलांडून काबुलावर स्वारी केली. तडजोड करण्याच्या बोलाचालींत कांहीं दिवस व्यर्थ गेले. शेवटीं एकदम चाल करून जाण्यास हुयायुनानें आपल्या सैन्यास हुकूम केला; त्या लढाईत हुमायून पूर्णपणें विजयी झाला व कामरान पळून गेला. हुमायुनास क्षणमात्र अशी मोठी भीति वाटली कीं न जाणो कामरान पळून जातांना आपल्या मुलास बरोबर घेऊन गेला असेल. परंतु, शहरांत प्रवेश करतां येण्यापूर्वींच पालक हासन आखता यासह अकबर बापाचे शिबिरांत येऊन पोहोंचला व हुमायून चिंतासागरांतून मुक्त झाला. दुसरे दिवशीं त्यानें शहरांत प्रवेश केला.

यावेळचा विजय निर्णायक व कायमचा असा होता. इनामांची वांटणी करीत असतां हुमायुनानें आपले मुलास वगळिलें नाहीं. चिरख नांवाचा प्रांत त्यानें अकबरास जाहगीर दिला, व सिस्थानाचा हाजी महमदखान यास त्याचा अमात्य नेमून त्याजकडेसच त्याचें शिक्षण सोंपाविलें. पुढील सालीं त्याच्या विपत्तीचीं कारणें एका मागून एक नष्ट झाली. कामराननें आणखी एकदां बंडावा केला खरा; परंतु त्याचा पिच्छा इतक्या निकरानें पुरविला कीं त्यास दातीं तृण धरावें लागलें.

नंतर ( आगष्ट १५५३ ) त्यास मक्केस हद्दपार केलें. चार वर्षानंतर तो तेथेंच मरण पावला. हुमायुनचा दुसरा भाऊ हिंदाल मिरझा अठरा महिन्यापूर्वीं कामरानाचा पाठलाग चालला असतां मारला गेला होता. राहिलेला भाऊ अस्कारी मिरझा. दगलबाजी ही त्याच्या हाडामासांतच खिळलेली होती. त्यास इ० स० १५५१ त मक्केस हद्दपार करून दिलें. तो तेथें सात वर्षे राहिला पण उपद्रव देण्याचें सामर्थ्यच त्याचे अंगीं राहिलें नव्हतें. याप्रमाणें भावांच्या त्रासांतून मुक्त झाल्यावर हुमायुनाच्या मनांत काश्मीर जिंकण्याचे विचार येऊं लागले. परंतु त्याचे अमीर उमराव, सरदार व सैनिक या मोहिमेस इतके प्रतिकूल होते कीं त्यास आपला बेत मोठ्या कष्टानें सोडून द्यावा लागला. तथापि तो सिंधुनद ओलांडून गेला व त्यांतच समाधान मानून राहिला. सिंधु व जेहलम यांच्या मधील प्रदेशांत तळ देऊन राहिला असतां पेशावर येथील किल्ला दुरस्त करण्याचा हुकूम त्यानें फरमाविला. ही दुरस्ती म्हणजे एक प्रकारें तो किल्ला प्रचंड प्रमाणावर पुनः बांधणेंच होतें. यावेळीं देखील हिंदुस्थानावर स्वारी करण्याचें त्याच्या मनांत घोळत होतें; आणि म्हणून डोंगरांतील वाट उतरून हिंदुस्थानांत आपलें सर्व सैन्य एके ठाण्यावर गोळा करितां येईल असें सुरक्षित स्थळ आपले ताब्याखालीं असावें अशी त्याची उत्कट इच्छा होती व ती तृप्त करण्यास तो फार आतुर झाला होता. म्हणून हें दुरस्तीचें काम इतक्या झपाट्यानें चालविलें होतें कीं साल अखेरीस किल्ला अगदीं तयार झाला. इकडे हिंदुस्थानांत पुढील हिंवाळ्यांत व वसंत कालाच्या आरंभीं असे कांहीं आणीबाणीचे प्रसंग येऊन गुदरले कीं त्या योगानें हुमायुनास आपलें मनोरथ सिद्धीस नेण्यास चांगली संधि मिळाली.

# भाग सातवा.

## हुमायुनाची हिंदुस्थानावरील स्वारी व त्याचा मृत्यु.

॥ कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें ॥
॥ तो क्षीण ही विधु महोन्नति घे क्रमानें ॥

शेरखानसूर यानें १५४० त हुमायुनाचा पराभव केला व मिळालेल्या जयश्रीनें पूर्वी बाबरानें संपादिलेला प्रांत आपल्या स्वाधीन करून घेतला व त्यांत आणखी भर ही घातली. तो प्रतापी पुरुष होता खरा; परंतु, राज्यांतील निरनिराळे भाग एकत्र जुळवून त्यांस एकराष्ट्रत्व देण्यास लागणारें बुद्धिवैभव त्याच्या अंगीं, त्यानें ज्याचा पराभव केला, त्या राजापेक्षां जास्त नव्हतें. त्याची राज्य-पद्धति पूर्वींच्या सारखीच निरनिराळ्या प्रांतांत स्वतंत्र छावण्या देऊन कारभार चालवावयाची होती. या प्रांतांचा परस्पर संबंध ही पूर्वींच्या सारखाच अत्यल्प असे. त्यानें इ० स० १५४५ त कलिंजरास वेढा घातला व तो प्रचंड किल्ला त्याच्या हस्तगत होतो इतक्यांत त्यास जखम लागून तो मरण पावला.

त्याचा दुसरा मुलगा सेलिमशाहा सूर, जो सुलतान इसलाम या नांवानें ही प्रसिद्ध आहे, तो बापाच्या मागून गादीवर बसला व त्यानें सात आठ वर्षें राज्य केलें. वडिलापासून परंपरेनें आलेल्या राज्य पद्धतींतील दोष त्याच्या नजरेस कांहीं अंशीं तरी आले असावेत. कारण, बादशाही अंमलाखालीं असलेल्या निरनिराळ्या प्रांतांवरील सरदारांनीं जीं नानाप्रकारचीं कृष्णकारस्थानें उपस्थित केलीं होतीं त्यांचा पाडाव करण्यांतच त्याच्या राजवस्त्याचे बहुतेक दिवस त्यास घालवावे लागले; तो मेला तेव्हां त्याचे मागें त्याचें एक लहानसें अर्भक गादीस वारस राहिलें, तेव्हां त्याचे सरदार पुनः बळावले. त्याचा प्रत्यक्ष परिणाम हा झाला.

कीं त्या बालकाचे नांवानें तीनच दिवस कारभार चालल्यावर तो बाल-राजा मारला गेला व त्याची गादी त्याच्या मामानें बळकाविली. त्यानें सुलतान महमदशहा आदेल या नांवानें आपली द्वाही फिरविली. हा राजा अक्षर शून्य, मन:पूतं आचरण करणारा, निर्दय, व पहिल्या प्रतीचा विषयलंपट असा होता. परंतु सुदैवेंकरून त्यास हेमू सारख्या मुत्सद्याची जोड मिळाली. हेमू हा हिंदू असून तो मूळचा मेवात प्रांतांतील रेवारीचा एक ल्हानसा दुकानदार होता. त्यानें आपली अलौकिक आक्रमशक्ति व बुद्धिवैभव इतकें दाखविलें कीं बादशहानें त्यास सर्व राज्यसूत्रें आपल्या एकट्याच्या हातीं आणूं दिलीं, परंतु, शेरशहाच्या राज्यांत सुरू झालेली दुफळी हेमूच्या आक्रमशक्तीस बंद करितां आली नाहीं: इब्राहिमखान यानें बियाना येथें बंड केलें व आग्रा आणि दिल्ली बळकावून सुलतान ह्मणून आपल्या नांवाची द्वाही फिरविली. सतलजच्या वायव्येकडील प्रांताचा सुभेदार अहमदखान यानें पंजाब काबीज करून शिकंदरशहा या नांवानें आपली द्वाही फिरविली. सुजाखान यानें माळव्याचें राज्य बळकाविलें. शिवाय, पूर्वेकडील प्रांतांवर दोन प्रतिस्पर्धी सरदार आपापले हक्क सांगूं लागले. नंतर ज्या झटापटी झाल्या त्यांत शिकंदरशाहा याची सरशी झाली. त्यानें आग्र्याहून २० मैलांवर फारा मुक्कामीं इब्राहिमखान याचा पराभव केला व दिल्लीवर जाऊन ती हस्तगत केली. नंतर तो जोनपूर व बिहार हीं फिरून काबीज करण्याकरितां मोहिमेची तयारी करीत होता. इतक्यांत काबुलाकडून आपणावर येणाऱ्या अरिष्टाची बातमी त्यास लागली.

यापुढें घडलेल्या झटापटी विशेष महत्वाच्या नाहींत; पण त्यांचे परिणाम मात्र फारच मोठे झाले. इ० स० १५५४ च्या नवेंबर महिन्यांत थोड्याशा सैन्यानिशीं हुमायून काबुलाहून निघाला व सिंधुनदाकडे चालला. मार्गांत त्याचें सैन्य वाढतच गेलें. या मोहिमेंत अकबर त्याच्या समागमें होता. सिंधुनद ओलांडिल्यावर हुमायून रावळपिंडीकडे वळला व

तेथून तो रावीनदीच्या पलीकडे कालानारवर सरसावला. येथें त्यानें आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एका टोळीवर आपला बलाढ्य सरदार बहिरामखान याची योजना करून त्यास जालंदर प्रांतावर पाठविलें व आपण स्वतः लाहोरावर चाल केली. तेथून त्यानें आपला विशेष प्रेमाचा सरदार अब्दुलमअली यास दिपालपूर काबीज करण्याकरितां रवाना केलें. दिपालपूर हें ते वेळीं मोठें नाक्याचें ठिकाण होतें, कारण तेथून मुलतान व दिल्ली यांच्यामधील सर्व प्रांत अगदीं अटोक्यांत ठेवितां येत होता.

यापुढील गोष्टींचा घाट फारच त्वरित जमून आला. बहिरामखान यानें शिकंदर शाहाचे सरदाराचा सतलज नदीच्या तीरीं मच्छिवाडा येथें पाडाव करून सरहिंदावर स्वारी केली. त्याचा समूळ नाश करण्याच्या उमेदीनें तेथें शिकंदरशाहा आपल्या प्रचंड सैन्यासह मोठ्या त्वेरेनें आला. इकडे बहिराम यानें भोंवतीं खंदक खणून आपली छावणी मजबूत केली व कुमक पाठवून द्यावी म्हणून हुमायुनास निरोप पाठविला. त्यानें त्यासाठीं अकबरास पाठविलें व आपणही थोडके दिवसांत त्याच्या मागोमाग चाल केली. हे दाखल होण्यापूर्वीच शिकंदरशाहा तेथें जाऊन पोहोंचला होता; परंतु एकदम हल्ला करावयास त्याचा धीर होईना. यामुळें त्याचा नाश झाला. हुमायुनानें दाखल होतांक्षणींच एकदम निकरावर प्रसंग आणिला. लढाई झाली त्यांत हुयायुनास पूर्ण जय मिळाला व तेणेंकरून वादाचा निकाल ही पण लागला. शिकंदरशाहा शिवालीक पहाडाकडे पळून गेला; व हुमायून विजयी सैन्यासह दिल्लीवर चाल करून गेला. तेथें तारीख २३ जुलै रोजीं आपलें ठाणें बसवून हुमायुनानें आपल्या सैन्यांतील एका टोळीस रोहिलखंड काबीज करण्याकरितां दवडलें व दुसरीस आग्रा ताब्यांत घेण्यासाठीं रवाना केलें. पंजाब हस्तगत करण्याकरितां अब्दुलमअली यास त्यानें पूर्वीच पाठवून दिलें होतें.

परंतु, हुमायुनाचीं संकटें अद्यापिही संपलीं नव्हतीं. महमदशहा आदेल याचा मुख्य कारभारी व पराक्रमी सरदार हेमू यानें, बंगालच्या तोतया राजानें वायव्य प्रांतांत स्वारी केली होती त्याचा यमुनेच्या कांठा-वर काल्पीजवळ पराभव करून दिल्लीवर स्वारी करण्याचा घाट घातला होता. शिकंदर शहाचा सरहिंद येथें बीमोड झाला होता, तोही पंजा-बांत चळवळीचीं चिन्हें दाखवूं लागला. ह्या अडचणींस न जुमानून हुमायुनानें दिल्लींतच राहण्याचा निश्चय केला. पंजाबांतील बंडावा मोडून स्थिरस्थावर करण्याकरितां त्यानें अकबरास, समागमें बैराम-खान यास अतालिक अथवा मंत्री ह्मणून देऊन रवाना केलें.

राजपुत्र अकबर यानें काय काय केलें हें आपण अगोदर पाहिलें पाहिजे. तो शहाजादा इ० स० १५५६ च्या जानेवारी महिन्याच्या आरंभीं सरहिंद येथें दाखल झाला. हुमायुनाच्या प्रीतींतला सरदार अबदुलमअली याच्या दिमाखाच्या व अरेरावीच्या वर्तनाला विटलेले बरेच सरदार राजपुत्र अकबर यास तेथें येऊन मिळाले. नंतर त्यानें फिलार येथें सतलज नदी ओलांडिली व कांग्रा प्रांतांतील सुलतानपुरावर चाल केली. तेथून तो शिकंदरशहाचा पाठलाग करीत हरियाना पावेतों गेला. तेथें पोहोंचल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं हुमायुनास भयंकर अपघात घडल्याची खबर येऊन पोहोंचली. या खेदजनक बातमीमुळें अकबर पुढें चाल करण्याचें तहकूब करून, कालानारकडे परत जाऊन जास्त बातमीची वाट पहावी अशा उद्देशानें निघाला. या शहराजवळ येत असतां हुमायुनाच्या हुकुमानें लिहिलेला खलिता जासुदानें त्याच्या हातीं दिला. त्यांत आपण लवकरच बरें होऊं अशी आशा दर्शविली होती. परंतु थोडया वेळानें दुसरा एक जासूद आला व त्यानें बादश-हाच्या मृत्यूची खबर आणिली. लागलींच अकबराच्या नांवाची द्वाही फिरविली गेली.

वय कायतें १३ वर्षें चार महिने, अशा अल्पवयस्क मुलास या

वेळचा प्रसंग मोठ्या कसोटीस लावणारा होता. यानें पंजाबांत तर आपलें ठाणें बसविलें होतें; व त्याच्या पदरच्या सरदारांनीं सरहिंद, दिल्ली, व कदाचित् आग्रा ही हस्तगत केलें होतें. हें खरें; तथापि अकबरास कळून आलें होतें कीं बंगाल प्रांताच्या आणखी एक तोतया राजाचा समरांगणांत पराभव करून द्विगुणित विजयोत्साहानें चढलेला हेमू हा उघडपणें महमदशाहा आदेलचा अंमल पुनः बसविण्यासाठीं, ५०,००० लोक व ५०० हत्ती येवढ्या सैन्यासह आग्र्यावर हल्ला करण्याकरितां निघाला आहे. पुढें थोडक्याच दिवसांनंतर अकबराच्या कानीं आणखी एका संकटाची खबर आली, ती ही कीं काबूल येथें आपल्या बापानें नियुक्त केलेल्या सुभेदारानें बंड केलें आहे.

हुमायून हा दिल्लीच्या राजवाड्यांतील पुस्तकालयावरच्या गच्चीला जाणाऱ्या जिन्याच्या वरच्या पायरीवरून पडल्या कारणानें त्याचा अंत झाला. तो त्यानंतर चार दिवस वांचला; पण त्या काळांत बहुतेक तो बेशुद्धच होता. तारीख २४ जानेवारी रोजीं सायंकाळीं त्याचें प्राणोत्क्रमण झालें. ते वेळीं त्याचें वय ४८ वर्षांचें होतें. राजधानींतील अमीर उमरावांत टारडीबेगखान हा श्रेष्ठ होता व तोच खुद्द दिल्लीचा सुभेदार होता. त्यानें लागलींच तेथचा सर्व कारभार आपल्या हातीं घेतला. त्यानें प्रथमतः खबरदारी ही केली कीं, युवराज अल्पवयी अकबर यास गादी मिळण्याची व्यवस्था पक्की लागेपर्यंत बादशाहाच्या मृत्यूची गोष्टच त्यानें गुप्त ठेविली व एकंदर घडलेल्या वृत्तांताची सविस्तर हकीकत अकबराकडे जासुदाबरोबर रवाना केली. मोठ्या करामतीचा व्यूह रचून त्यानें बादशहाच्या मृत्यूची खबर १७ दिवसपर्यंत बाहेर पडूं दिली नाहीं. नंतर तारीख १० फेब्रुवारी रोजीं आपल्या अमीरांसह तो मोठ्या मशीदींत गेला व बादशहाकरितां होत असलेला खुदबा त्यानें अकबराचे नांवानें पढविला. नंतर बादशाही वस्त्रें, शिरपेच, व जवाहीर हीं खाजगीकडील सरदार व गारदी

समागमें देऊन नवीन बादशहाकडे पंजाबांत त्याचें सदर ठाणें होतें तेथें रवाना केलीं. शिवाय, हुमायुनाचा भाऊ कामरान याचा मुलगा गादीवर हक्क सांगेल असा संभव होता त्यासही त्यांचे बरोबर दिलें. इतकें झाल्यावर तो हेमूची दिल्लीवर हल्ला करण्याची जी भीति उत्पन्न झाली होती ती निवारण करण्याच्या उद्योगास लागला.

---

# भाग आठवा.

## बापाची गादी मिळविण्याकरितां अकबरानें केलेलें युद्ध.

॥ विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः ॥
॥ प्रारब्ध मुत्तम जना न परित्यजन्ति ॥

॥ विघ्नें पुनः पुनरपी जरि आड येती ॥ आरंभिली कृति न सज्जन सोडिताती ॥

आपल्या सैन्याच्या अग्रभागीं कालानार शहरांत प्रवेश करीत असतां बापाच्या मरणाची खबर अकबर यास कळली हें पूर्वीच सांगितलें आहे. ते वेळीं काबूल येथें उद्भवलेल्या बंडाची बातमी त्यास समजली न्हती; आणि हेमू कदाचित् दिल्लीवर चाल करील ही गोष्ट त्याचा मंत्री बैरामखान याचे मनीं मानसीं ही आली न्हती. यामुळें, प्रथमतः थोडे दिवस त्यास असें वाटलें कीं ज्याचें पारिपत्य करण्याकरितां आपणास बापानें पंजाबांत पाठविलें होतें तो शिकंदरशहाच कायतो समरांगणांत उभा असा एक शत्रु आपणास आहे. त्यानें अद्यापि ही आपलें शस्त्र खालीं ठेविलें न्हतें. तो हळूहळू काश्मीरच्या बाजूला हटत चालला होता. ह्मणून पंजाब बिनधोक करून ठेवणें हें अगत्याचें आहे व तें साधण्याकरितां शिकंदरशहाचा पाठलाग केला पाहिजे असें या बालबादशहास व त्याचा मंत्री बैराम यास वाटलें. अशा विचारानें त्यांनीं कालानार येथून सैन्याचा तळ उठविला व शिकंदरशहावर जाऊन त्यास

पिटाळून लाविलें व तो शिवालिक पर्वतांच्या खालच्या ओळीस मानकोट किल्ल्यांत आश्रा धरून राहिला. हा किल्ला फार मजबूत होता; ह्मणून व हिंदुस्थानांत आणि काबुलांत अनिष्ट गोष्टी घडून आल्याची बातमी येऊन पोहोंचली होती त्यामुळें उभयतां सेनानायकांनीं त्या किल्ल्यास वेढा घालून नाकेबंदी करण्याकरितां पुरेसें सैन्य ठेवून तेवढ्यांतच समाधान मानिलें व ते जालंदराकडे परतले.

वेळ खरोखरच तशीच आणीबाणीची होती. काबुलांत बंडावा उद्भवला होता इतकेंच नव्हे तर हेमूचें सैन्य पदोपदीं वाढूं लागलें होतें, व एक देखील बार न काढतां आग्रा त्याचे हातीं येऊन, तेथील संरक्षणार्थ ठेविलेलें सैन्य हटत होतें त्याचा पाठलाग करीत तो दिल्लीकडे येत होता. ही बातमी समजल्यावर दुसरेच दिवशीं खबर आली कीं मोंगल सैन्याचा दिल्लीजवळ पाडाव करून हेमूनें त्या राजधानींत आपलें ठाणें बसविलें असून टारडींबेग अवशिष्ट राहिलेल्या सैन्यासह सरहिंदाकडे पळून गेला आहे.

पुष्कळांची सल्ला ह्मणजे नेहमीं शहाणपणाचीच असते असें नाहीं. हेमूनें मिळविलेल्या जयाची बातमी आली तेव्हां अकबरानें आपल्या शूर सरदारांची सभा भरविली व त्यांस सल्ला विचारिली. ते वेळीं, एक शिवायकरून बाकीच्या सर्वांनीं त्यास काबुलाकडे जाण्याचा आग्रह केला. ती डोंगरांतील राजधानी सहजगत्या काबीज करितां येईल अशी पुरी खात्री होती व हिंदुस्थानावर पुनः स्वारी करण्यास अनुकूल प्रसंग येईपर्यंत तेथें बादशहानें दम खाऊन राहावें असा त्यांचा अभिप्राय पडला. परंतु बैरामखान याचे मतास फारच मान. त्यास ही सल्ला मुळींच पसंत न पडून त्यानें आग्रहपूर्वक सुचविलें कीं सतलज ओलांडून तावडतोब चाल करून टारडीबेगच्या सैन्यास जाऊन मिळावें व तेथून सर्व सैन्यासह हेमूवर हल्ला करून तुटून पडावें. तो ह्मणाला "दिल्ली दोनदां हातीं आली व दोनदां हातची गेली; तेव्हां, हव्या त्या जोखमी

असोत, पण ती पुनः हस्तगत केलीच पाहिजे. खऱ्या महत्वाची राजधानी दिल्ली; काबूल नाहीं. ती स्वाधीन झाल्यावर काबूल सहज मिळवितां येईल." अकबराची मनोदेवता ही बैराम याच्या बुद्धिवादाशीं तंतोतंत जुळली; व सतलज उतरून एकदम चाल करून जाण्याचा हुकूम झाला.

मिळवावयाचें तर हिंदुस्थानदेशांतील सारें विस्तीर्ण राज्य; नाहीं तर काबूलचा लहान प्रांतच कायतो आपणांस राहणार, हें अकबर व बैराम यांस पूर्णपणें दिसून आलें होतें. कारण, दिल्ली येथें ठाणें बसविल्यावर पंजाब जिंकून तो प्रांत राज्यास जोडण्याची हेमू तयारी करीत आहे हें त्यांना त्यांच्या अनुयायांकडून कळलें होतें. तेव्हां प्रसंग असा होता कीं, जो अघाडी मारील, जो प्रथमतः चाल करून जाईल त्यासच बहुतेक यशप्राप्तीची आशा होती. दबा धरून मागसला तो एशिया खंडांत बहुतेक बुडालाच ह्मणून समजावयाचें. म्हणून, आक्टोबर महिन्यांत अकबर जालंदर येथून निघाला व सतलज ओलांडून सरहिंद येथें पोहोंचला. येथें दिल्लीच्या तटाखालीं हेमूनें पराभव केलेले अमीर उमराव व टारडीबेग हे त्यास येऊन मिळाले. ते दाखल झाल्यावर ज्या गोष्टी घडून आल्या त्यांच्यामुळें अतालिक बैरामखानाची शिरजोर स्वैरसत्ता अकबरास असह्य वाटण्यास आरंभ झाला. टारडीबेग हा तुर्की उमराव होता. हुमायुनाच्या आपल्या बंधुवर्गाबरोबर ज्या झटापटी झाल्या त्यांत प्रथमतः टारडीबेग हा कधीं कधीं हुमायुनाचा पक्ष स्वीकारी व कधीं कधीं त्याच्या भावांस जाऊन मिळे. परंतु अखेरीस त्यानें अकबराच्या बापाचाच पक्ष पत्करिला. हुमायुनाच्या मृत्यूनंतर कामरानाचा मुलगा दिल्लीस असतां रक्तपात होऊं न देतां अकबराची गादी कायम ठेविली हें त्याच्याच निःसीम राजनिष्ठेचें व चातुर्याचेंच फळ होतें. हेमूनें त्याचा पराभव केला तेव्हां दिल्ली सोडून देण्यांत त्यानें फार घाई केली, असा कित्येक सरदारांचा त्यावर आक्षेप

होता. ही गोष्ट खरी जरी असली तरी ती फक्त चूक होती. सेनानी व्यूहरचनेंत चुकला ह्मणून कांहीं तो गुन्हेगार होत नाहीं. शिवाय, मोठें सैन्य जमा करून त्यानें सरहिंद येथें बलवत्तर कुमक तरी अकबरास आणिली होती. परंतु बैरामखान व टारडीबेग यांच्यामध्यें पूर्वीपासूनच मत्सरभाव होता. महमुदीय धर्मांत शिया व सुन्नी असे दोन पंथ आहेत; पैकीं, बैरामखान हा शिया होता व टारडीबेग हा सुन्नी सांप्रदायाचा होता. या पंथभेदामुळें बैरामचे अंतःकरणांतील वैराग्नि अधिक भडकला. टारडीबेग सरहिंद येथें पोहोंचल्यावर त्यास आपल्या तंबूंत बैरामानें बोलावून मारेकऱ्यांच्या हातीं त्याचा वध करविला. या अघोर कृत्यानें अकबराची मर्जी फारच नाराज झाली. बैराम यास आपला माथा उजळ करितां आला नाहीं. सैन्यांत शिस्त राखण्याकरितां हाताखालील अमीर उमराव यांना आपल्या पायरीप्रमाणें ठेवणें हें अवश्य व त्यासाठीं असलें घोर कर्म करणें जरूर होतें, असेंच कायतें त्यानें आपल्या कृतीचें मंडन केलें असावें असें मानण्यास हरकत नाहीं.

इकडे, राजा हा किताब धारण करून हेमू दिल्ली येथें मोठ्या आनंदांत असून सैन्य जमविण्याच्या खटपटीस लागला होता. अकबर सरहिंद येथें दाखल झाल्याची खबर त्यास समजली तेव्हां त्यानें आपला तोफखाना दिल्लीचे उत्तरेस ५३ मैलांवर पानिपत शहर आहे तेथें तावडतोब रवाना केला व मागाहून घोडेस्वार व पायदळ यांच्या समागमें आपण जाण्याचा विचार केला. पण इकडे अकबर ही सरहिंदाहून त्याच ठिकाणाकडे येत होता; इतकेंच नाहीं, तर त्यानें दूरवर नजर देऊन अघाडीस आपला सरदार अल्लीकुली खान ई शैबानी यास १०,००० घोडेस्वारानिशीं अगोदरच तिकडे रवाना केलें होतें. हेमू व टारडीबेग यांच्यांत दिल्ली येथें जी लढाई झाली तींत हा सरदार होता व टारडीबेग यानें विनाकारण उतावळी करून पळ काढिला, असा याचाही मोठा

आक्षेप होता. अल्लीकुली खान ई शैबानी हा घोडा फेकीत पानिपत येथें पोहोंचला; व हेमूचा फक्त तोफखानाच कायतो तेथें आहे असें पाहून त्यानें त्यावर एकदम हल्ला करून सर्व तोफा हस्तगत करून घेतल्या. ही जी त्यानें अलौकिक युद्ध-चातुर्याची कडी केली त्याबद्दल त्यास खानझमान ही पदवी मिळाली. व याच नांवानें तो इतिहासांत प्रसिद्ध आहे. या दुर्दैवाच्या घाल्यानें हेमू अतिशयित खिन्न झाला; कारण त्यानें या तोफा तुर्कस्थानांतून आणिल्या होत्या व सैन्यांत त्यांना फार पूज्य गणीत. तथापि विलंब न लावितां तो पानिपताकडेस एकदम जाण्यास निघाला.

तारीख ५ नवेंबर १५५६ रोजीं सकाळीं अकबर व बैराम हे पानिपताच्या मैदानाकडे येत असतां हेमूचें सैन्य आपणाकडेसच येत आहे असें त्यांनीं पाहिलें. बरोबर तीस वर्षांपूर्वी आपला आजा बाबर यानें याच समरांगणावर लोदी घराण्याचा पाडाव करून हिंदुस्थानची बादशाही संपादन केली, हा विचार यावेळीं अकबराचे मनांत आल्यावांचून राहिला नसेल असें आह्मांस वाटतें. ज्या शूर घराण्यानें त्याच्या बापास हिंदुस्थानच्या हद्दपार केलें होतें त्याच्याच नातलगाचे सैन्याशीं आतां अकबराचा सामना व्हावयाचा होता. होणाऱ्या लढाईवर हिंदुस्थानच्या बादशाहीचा निकाल कायमचा व्हावयाचा होता हें त्यास ठाऊक होतें. अकबर भविष्यज्ञानी होता खरा; परंतु जें घराणें हिंदुस्थानांत दोनशें वर्षांहून अधिक कालपर्यंत राजसत्ता चालवील अशा घराण्याची दिल्लीच्या तक्तावर प्रथम स्थापना करण्यास ही लढाई साधनीभूत होईल असें भविष्य त्यास कळलें नसावें. तसेंच, उत्तरेकडून पुनः स्वारी होऊन पानिपत येथें पुनः एक निकराचा व निकाल लावणारा संग्राम होईल तेव्हां या घराण्याचा ऱ्हास होईल व अटलांटिक महासागरांतील एका बेटांत राहणाऱ्या परकीय लोकांचें आगमन होईल तेव्हांच त्याचा समूळ नाश होईल हें त्याच्या कल्पनेंत ही आलें नसेल.

हेमूनें आपल्या सैन्याचे तीन भाग केले होते. अग्रभागीं त्याचे

५०० हत्ती होते. प्रत्येकावर एक एक मोठा सरदार होता. आपल्या आवडत्या हत्तीवर स्वतः स्वार होऊन हेमू हा त्यांच्या अग्रभागीं होता. मोंगल सैन्याची डावीकडील तुकडी पुढें सरसावत होती तीवर त्यानें एकदम हल्ला करून तिची दाणादाण केली; परंतु या समयीं त्याच्या हाताखालील सरदारांनीं पायदळाची कुमक ऐन वेळेस न पोहोंचविल्या-मुळें तो मागें सरला व शत्रूच्या मधल्या तुकडीवर जाऊन पडला. ही तुकडी बैरामखानाचे हुकमतीखालीं होती. त्या धूर्त व चतुर सेना-पतीच्या लक्षांत अशा प्रकारें शत्रूकडून मारा होईल ही गोष्ट केव्हांच येऊन चुकली होती; ह्मणून त्यानें आपल्या तिरंदाज लोकांस हत्तींवर शरसंधानाचा वर्षाव करण्यास फरमाविलें होतें. ह्यांपैकीं एक बाण हेमूच्या डोळ्यांत शिरला व त्या योगानें तो हौद्यांत क्षणमात्र बेशुद्ध होऊन पडला. आपला सेनानायक पडला हें पाहून त्याचे सैन्याचें एकदम धैर्य खचलें. पुढें हल्ल्याचा जोर कमी कमी होत जाऊन थोडक्याच वेळांत तो अगदीं बंद झाला. बैरामाच्या वीरांनीं हल्ला थांबतांच चाल करून शत्रूंच्या सैन्याची दाणादाण करून टाकिली. हेमू ज्या हत्ती-वर होता त्यावरील महात मरण पावला आणि तो हत्ती स्वैरपणें फिरूं लागला. त्यानें सहजगतीच अरण्याची वाट धरली. हें बैरामचा दूरचा आप्त व अनुयायी शहाकूली मऱ्हाम इ बहारलू यानें पाहून त्या हत्तीचा पाठलाग केला. तेवेळीं हौद्यांत कोण आहे हें त्यास माहीत नव्हतें. त्यानें त्या हत्तीजवळ जाऊन त्याच्या मानेवरील दोरी पकडली तेव्हां त्यास समजलें कीं आपण ज्यास कैदी केलें तो घायाळ झालेला हेमू होय. त्यानें त्यास बैरामा-कडेस नेलें व बैराम त्यास राजपुत्र अकबराकडेस घेऊन गेला. त्यादिवशीं अकबरानें सर्व दिवसभर अपूर्व मर्दुमकी व युद्धकौशल्य प्रदर्शित केलें होतें, तथापि लढाईची सर्व व्यवस्था त्यानें आपल्या अतालिकाकडेसच सोंपविली होती. यापुढील प्रवेशाचें वर्णन तत्कालीन एका ग्रंथकारानें असें केलें आहे:—त्या घायाळ झालेल्या सेनानायकास आपल्या धन्यापुढें

करून बैराम म्हणाला "हा आपला पहिला संग्राम आहे. ह्या हरामखोर नास्तिकावर आपल्या तलवारीची परीक्षा पहा; हें आपलें कृत्य फार पुण्यकारक होईल." यावर अकबरानें उत्तर दिलें "तो आतां केवळ मृतवत् आहे, तेव्हां त्यावर अशा वेळीं मी प्रहार कसा करूं! त्याला शुद्धि व शक्ति असती तर त्यावर मीं आपलें शस्त्र कसास लाविलें असतें." याप्रमाणें अकबरानें इनकार केला तेव्हां बैरामानें त्या बंदिवान केलेल्या हेमूस आपल्या हातानें कापून टाकिलें.

शत्रूंस विसावा न देतां त्यांचा दिल्लीकडे पाठलाग करण्याकरितां बैरामानें घोडेस्वार ताबडतोब रवाना केले; व दुसरे दिवशीं, मुक्काम न करितां, ९३ मैलांची मजल मारून मोंगलांच्या सैन्यानें दिल्लींत प्रवेश केला. यापुढें हिंदुस्थानदेशांत अकबरास एक ही भय मानण्यासारखा प्रतिस्पर्धी राहिला नाहीं. तीस वर्षांपूर्वीं त्याच्या आजानें जें स्थान प्राप्त करून घेतलें होतें त्याच स्थानास अकबर आज पोहोंचला. त्याच्या बापानें व आजानें सोन्यासारखी आलेली संधि दवडविली. त्याप्रमाणेंच हा अल्पवयी राजपुत्र करितो कीं काय हें आतां पहावयाचें होतें. त्याच्यापुढें किती जिकीरीचें व महत्वाचें काम होतें याचें यथातथ्य स्वरूप स्पष्टपणें कळण्याकरितां अकबर गादीवर बसला ते वेळीं हिंदुस्थानची स्थिति कशी होती याची पूर्ण माहिती पाहिजे. ती आपण पुढील भागांत सादर करूं. व त्याचे पुढील भागांत बैरामखानाच्या शिक्षेनें या चौदा वर्षांच्या नृपतनयाचें कितपत हित होण्याजोगें होतें याचें विवेचन करूं.

# भाग नववा.

## सोळाव्या शतकाचे मध्यभागीं असलेली हिंदुस्थानची साधारण स्थिति.

॥ मनुप्रभृतिभि र्मान्यै र्भुक्ता यद्यपि राजभिः ॥
॥ तथा प्यनन्य-पूर्वेव तस्मि न्नासी द्वसुंधरा ॥

॥ मन्वादिक मान्यांनीं भूपालांनीं जरी हि भोगियली ॥
॥ या राजाशीं धरणी अभुक्त-पूर्वा-वधू तशी रमली ॥

**मों**गलांच्या पूर्वी होऊन गेलेल्या अफगाण राजांनीं सतलज नदीच्या दक्षिणेस जो मुलूख पादाक्रांत केला होता त्यास हिंदुस्थानचें राष्ट्र ही संज्ञा देतां येत नव्हती. त्यास दिल्लीचें राज्य हेंच नांव शोभत होतें. या राज्यांत, सन १८५७ पर्यंत ज्यास वायव्येकडील प्रांत ह्मणत, त्याचा समावेश होत असून हल्लींचा पश्चिम बिहार, मध्यप्रांतांतील कित्येक जिल्हे, व राजपुताना, हे प्रांतही त्यांत येत होते. पंजाब प्रांताची ही या राष्ट्रांत गणना केली पाहिजे. आतां, तघलख घराण्यांतील राजांनीं आपलें वर्चस्व बंगाल्यावर व बहुतेक दक्षिण हिंदुस्थानावर स्थापित केलें होतें खरें, पण तें अगदीं क्षणिक होतें. उत्तरेकडून या बादशाहीवर पहिलीच स्वारी झाल्याबरोबर दक्षिणेंतील हिंदु राजांनीं संधि साधली व हें विजातीय राजांचें न मानवणारें जूं झुगारून दिलें. तेव्हांपासून त्यांचें स्वातंत्र्य कायमच होतें. गंगेच्या मुखापासून तों गोदावरीच्या मुखापर्यंत अ[illegible] ळ व महत्वाचें राज्य होतें तें सदोदित स्वतंत्रच राहिलें. [illegible] स्वाऱ्या करणाऱ्यांचा अंमल बराच [illegible] व तेथील सरदारांनीं स्वतंत्र राज्यें [illegible]

[illegible] झाला तेव्हां हिंदुस्थानांतील अगदीं [illegible] फगाण वंशापैकीं एक मुसलमानी राजा

स्वतंत्रपणें राज्य करीत होता. हुमायुनानें या राज्यावर स्वारी करून आपली सत्ता बसवली होती खरी; परंतु त्यानें हिंदुस्थानांतून पळ काढल्यावर या राजानें आपली स्वतंत्रता पुनः स्थापित केली; व ती हा कालपर्यंत अबाधित राहिली होती. या राजानें आपल्या अगदीं शेजारच्या माळव्याच्या राजाशीं लढाई चालविली होती व तींत त्यास अनेक वेळां जय ही मिळाले. माळव्याचें राज्य ही—त्यांत हल्लीं आपण ज्यास मध्यहिंदुस्थान ह्मणतों त्याचा समावेश होत असे—अकबर गादीवर बसला ते वेळीं स्वतंत्र होतें. याप्रमाणें खानदेश व राजपुतान्यांतील संस्थानें ही स्वतंत्र होतीं. ह्या राजपुतान्यांतील संस्थानांची योग्यता विशेष होती. व त्यांबद्दल विशेष माहिती देणें युक्त आहे.

विख्यात राणा संग याचे पराक्रमाचा उल्लेख प्रसंगवशात् पहिल्या भागांत झालाच आहे. बाबरानें या राजाचा पराभव केल्यामुळें मेवाडच्या सत्तेस मोठा धक्का बसला; आणि शीरशहानें जेव्हां हुमायुनास हिंदुस्थानांतून हांकून लाविलें, तेव्हां तेथील राजांस दिल्लीच्या बादशहाचें प्रभुत्व मान्य करावें लागलें. परंतु शीरशहा मरणपावल्यानंतर जी धामधूम उडाली तींत त्यांनीं नष्ट झालेली स्वतंत्रता पुनः मिळविली; व अकबर राज्यारूढ झाला त्यावेळीं मेवाडचें राज्य राजपुतान्यांत प्रमुख व मान्य असें होतें. तेथील बाकीच्या संस्थानिकांपैकीं जयपुरचें राज्य बाबराचे वेळीं मोंगलांचें मांडलिक झालें होतें. त्या वेळचा राजा बहारमा यानें बाबरास सैन्याची कुमक केली होती; व शीरशहानें पराजय करण्यापूर्वीं हुमायुनानें त्यास अंबरचा राजा ही मोठी पदवी दिली होती. अकबर पानिपत येथें विजयी झाला तेव्हां बहारमाचा मुलगा भगवानदास हा गादीवर होता. यावेळीं जयपुरापेक्षां जोधपूरचें महात्म्य मोठें होतें. तेथील राजा मलेदवसिंग याच्या इतका शिरशाहाशीं रणांगणांत कोणीच टिकला नव्हता. परंतु, पराभव झालेला हुमायून इकडे तिकडे पळत सुटला तेव्हां या राजानें त्यास आश्रा दिला नव्हता. अकबर

दिल्लीच्या तक्तावर बसला त्यावेळीं हा राजा हयात असून स्वतंत्र व रजपूत राजांत सर्वांहून प्रबळ असा होता. जैसलमेर, बिकानेर व रणाच्या कांठावरील संस्थानें हीं ही स्वतंत्रच होतीं. राजपुतान्यांतील इतर लहान लहान संस्थानें तसेंच सिंध देश व मुलतान हीं देखील स्वतंत्रच होतीं. शिवाय, मेवात व भागळखंड यांवर परकीयांचा अंमल मुळींच नव्हता; परंतु ग्वालेर, ओरछा, चंदेरी, नरवार आणि पानेवो हीं संस्थानें आग्र्याच्या शेजारीं असल्यामुळें त्यांस वारंवार घस खावी लागे व तेथील मुसलमान राजांस त्यांवर आपला अंमल स्थापण्यास ज्या मानानें कमी अधिक फुरसत सांपडे त्या मानानें हीं संस्थानें ही त्यांचीं कमी अधीक मांडलिक बनत असत.

परंतु, ज्या प्रांतांत मुसलमानी राजसत्ता स्थापित झाली होती त्यांत देखील एकमेकांत संगति ह्मणून नव्हती. निरनिराळ्या प्रांतांवरील अधिकार ज्या निरनिराळ्या अमीर उमरावांच्या स्वाधीन होता ते अंतर्गत व्यवस्थेंत बहुतेक स्वतंत्र होते; दिल्लीच्या तक्तावर जो मुख्य राजा, सुलतान, किंवा बादशहा असे, त्यास ते आपला मुख्य समजत हें खरें; तथापि त्याची निष्कंटक सत्ता त्याचे खुद्द दरबारांतच. लढाईचे प्रसंगीं मुख्य सेनाधिपत्य त्याकडेसच असे. परंतु, आपल्या अमीर उमरावांच्या हाताखालील प्रांतांतील कारभारांत तो हात घालीत नसे. हे प्रांत आपआपल्या सुभेदारांच्या अमलाखालीं, नांवानें नाहीं, तरी वस्तुतः स्वतंत्र होते.

या मुसलमानी राज्यांतील हिंदु प्रजा, ह्मणजे त्यांतील सात-अष्टमांश प्रजा संतुष्ट स्थितींत असे असें बहुतेक इतिहासकारांचें मत आहे. आपल्या सत्तेखालील सर्व परधर्मी प्रजेवर मुसलमान राजे जिझिया नांवाचा कर प्रत्येक माणसावर बसवीत तो हिंदुप्रजेवरही बसविला होता खरा; परंतु त्यांस धर्मसंबंधीं आचरणांत पूर्ण स्वतंत्रता असे. राज्यकारभाराच्या प्रत्येक खात्यांत हिंदु लोकांचेंच प्रावल्य होतें. बहुतेक प्रांतांत

हिंदु-जातींपैकीं वरिष्ठ जातींतील लोकांनीं सुभेदारांच्या खालोखाल आपला अधिकार पिढ्यानपिढ्या कायम ठेविला होता, व लढाईच्या प्रसंगीं ते आपल्या ऐपतीच्या प्रमाणानें बादशाही सेनेस फौज-फाट्याची मदत करीत असत.

याप्रमाणें दरएक प्रांतांत सुभेदारास जरूर लागेल तेव्हां त्याच्या तैनातीस हजर अशी स्थानिक सेना असे. परंतु, याशिवाय, या स्थानिक सेनेहून अगदीं निराळें असें, कांहीं तरी नियमित बादशाही लष्कर प्रत्येक प्रांतांत बहुतेक असेच. या लष्कराचा तनखा बादशाही तिजोरींतून दिला जाई, व या सेनेच्या अधिपतीची निवडणूक हुजूराकडूनच होत असे. प्रांतिक सुभेदाराची सत्ता या अधिकाऱ्यावर बहुतेक चालत नसे, कारण तो प्रत्यक्ष बादशहालाच जबाबदार असे.

ज्या सिद्धांतांवर व तत्वांवर न्याय-पद्धति रचली होती त्यांकडेसच नजर दिली तर ती सर्वोत्कृष्ट असे. कारण, राज्य हें कायद्यावर अवलंबून असतें ह्या मुसलमानी तत्वास अनुसरूनच न्याय निवाडा होत असे. न्यायाचें काम काजी हे कायद्यास अनुसरून करीत. तो कायदा ह्मणजे कुराणाच्या आधारें पण देशाच्या चाली वहिवाटीप्रमाणें फेरफार करून केलेल्या निवाड्यांचा एक संग्रह होता. दिवाणीकडील हरएक प्रकारचीं, किंबहुना, ज्यांत राज्याच्या सुरक्षितपणाचा संबंध नाहीं अशीं सर्व कामें काजींकडेस सोंपविलीं असत. परंतु फौजदारीचें काम मात्र त्यांच्याकडे नसे. ह्या कामाकरितां बादशहा स्वतंत्र कामगारांची योजना करी. या कामगारांची काम करण्याची पद्धत व्यवहारदृष्ट्या अनियंत्रित अशी होती; व त्यांस बादशहानें नेमिल्यामुळें व त्याचें पाठबळही त्यांस असल्यामुळें ते कधींकधीं काजीच्या अधिकारांतही हात घालीत. यावेळीं प्रजाजनांत संतोष व समाधानवृत्ति साधारणतः चोहोंकडे नांदत होती; यावरून न्यायाचें काम एकंदरींत समाधानकारक अशा रीतीनें चालविलें जाई, असें अनुमान केल्यास चुकीचें होणार नाहीं. हिंदु-

स्थानांत येऊन राहिलेल्या प्राचीन परदेशस्थ मुसलमानी घराण्यांचें व हिंदु घराण्यांचें हिताहित कालांतरानें एकच बनून गेलें होतें; व शक्य असेल तितकी दाद आपणांस न्यायाधीशांकडूनच मिळेल अशी उभयतांची ही मनःप्रवृत्ति झाली होती. तेव्हां लढाया वारंवार होत असत; तरी देखील, पूर्वीचीं सरकारी दफ्तरें खरीं मानलीं तर, देशाची स्थिति निःसंशय फार भरभराटीचीच होती.

ज्या बादशहाच्या कारकीर्दीचें आपण निरूपण करणार आहों तीविषयीं विचार करितांना एक महत्वाची गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे; ती ही कीं, पूर्वीच्या अफगाण राजांनीं जी राज्यकारभाराची पद्धत घालून दिली होती तींत बाबर अगर हुमायून यांनीं विशेष ह्मणण्यासारखा फेरफार केला नव्हता. बाबर ह्यास तर ह्यापेक्षां ही अधिक अनियंत्रित राजसत्तेची बरीच संवय झाली होती. फरघणा, समरकंद, अथवा काबूल या ठिकाणचें राज्य करीत असतां बाबर स्वतःचें राजधानींत तर आपलें स्वामित्व चालवीच. परंतु या शिवाय त्याच्या हाताखालील सुभेदारांवरही त्याचा फार वचक असे. या सुभेदारांची व जहागीरदारांची सत्ता आपआपल्या प्रांतांत, जिल्ह्यांत, व जहागिरींत अनियंत्रित असे खरी; परंतु, बादशहाला वाटेल त्यावेळेस त्यांना दूर करण्याचा अधिकार असल्यामुळें त्यांना एक तर आपला कारभार नीतीनें व न्यायानें चालविणें भाग पडे, किंवा बादशहाच्या मर्जीचा रोंख आपलेविषयीं कसा आहे यावर नजर ठेवण्याकरितां आपल्या तर्फे दरबारांत वकील ठेवावा लागे.

तसेंच, लष्करांत बादशहाच्या खासगत तैनातींतल्या लोकांचीच भरती असे. त्यांत सरदार मंडळी व जहागीरदार यांच्या परिवारांची भर पडून शिवाय, काबीज केलेल्या प्रांतांतील लोकांचाही तींत समावेश होई.

बाबर व त्याचा मुलगा हुमायून या उभयतांची राज्यपद्धति अनियंत्रित व स्वैर-सत्तेची होती. प्रजेला विशेष हक्क नसून प्रजासत्तात्मक

संस्था तर केवळ अश्रुतपूर्व होत्या. एका राजानें केलेले कायदे कानू मागाहून येणाऱ्या राजाला रद्द करून टाकितां येत असत. सर्व कारभारांत मी करीन ती पूर्व दिशा या न्यायानें चोहोंकडे राजाचें व्यक्तिमहात्म्य नांदत असे. बादशहाच्या स्वैरेच्छेवर दाब कायतो एकच. तो कसला, तर बंड होऊन आपण पदच्युत होऊं या भीतीचा. गादीवर असलेला राजा जर कां हिंमतबाज व पराक्रमी असला तर बंड होऊन तें यशस्वी होण्याचा बहुतेक संभव नव्हता. पराक्रमी व न्यायी राजांस समजत असे कीं आपण निःपक्षपातानें न्याय दिला तर आपले विरुद्ध लोक सहसा उठावयाचे नाहींत.

स्वतःस परिचित असलेल्या उत्तरेकडील अफगाण प्रदेशांत वहिवाटींत असलेल्या राज्यपद्धतीहून हिंदुस्थानांतील जिंकिलेल्या प्रांतांतील राज्यपद्धति भिन्न नाहीं हें बाबर यास तेव्हांच समजून आलें. त्यांत फेरफार करण्याचा विचार त्याच्या मनांत आला असला तरी तो घडवून आणण्यास त्याला अवकाश मिळाला नाहीं. त्याच्यानंतर गादीवर आलेला त्याचा मुलगा हुमायून याचा तर असल्या गोष्टीकडे कल नसून त्यास तिकडे लक्ष देण्यास वेळही सांपडला नाहीं. आपल्या मरणापूर्वी थोडे दिवस जी राज्यव्यवस्था सुरू करण्याचें हुमायुनानें मनांत योजिलें होतें ती हिंदुस्थानांतील पूर्वींच्या राज्यपद्धतीपेक्षां चढत्या पायरीची किंवा विशेष माननीय तत्वांवर बसविलेली अशी नव्हती. एकंदर राष्ट्राचे मोठे सहा भाग करून त्यांची राजधानी अथवा सदरची जागा दिल्ली, आग्रा, कनोज, जोनपूर, मांडू, आणि लाहोर येथें स्थापित करावी असा त्याचा हेतु होता. या प्रत्येक ठिकाणीं प्रचंड लष्करी ठाणें बसवून त्यावर विश्वासू व खात्रीलायक अशा सेनापतींस नेमून त्यांकडे प्रांतांतील सर्व अधिकार सोंपविण्याचा त्याचा विचार होता. हीं लष्करें इतकीं बलाढ्य व प्रचंड राखावयाचीं होतीं कीं, कसलाही प्रसंग आला तरी त्या प्रांतास बाहेरील कुमकेची जरूर लागूं नये. एकंदर बादशाहींत एकराष्ट्रत्व व

सुसंगता ठेवावयाची ती बादशहानें समागमें १२००० सेना घेऊन प्रत्येक प्रांतांत आळीपाळीनें जाऊन तेथील स्थानिक सैन्याची व एकंदर कारभाराची तपासणी करून. ही व्यवस्था दोषांनीं पूर्णपणें भरली होती हें उघडच आहे. सेनापतीपेक्षां बादशहा जास्त काबील व दक्ष असला तरी देखील ही पद्धति वाईटच. परंतु बादशहा का कमकुवत व कमी कावेबाज असला तर एका वर्षांतच तिचा फन्ना उडावयाचा.

हुमायुनाच्या आकस्मिक मृत्यूमुळें वर निर्दिष्ट केलेली व्यवस्था जागच्या-जागींच राहिली. नंतर जो संग्रामास प्रारंभ झाला तो पानिपतच्या लढाईपर्यंत तसाच चालला. बरोबर तीस वर्षांपूर्वी, आजा बाबर यानें जें पद मिळविलें होतें, तेंच या लढाईच्या योगानें अकबरास प्राप्त झालें. पूर्वीं पानिपतनें बाबरास वायव्येकडील प्रांत, बिहार आणि मध्य हिंदुस्थान जिंकण्यास संधि दिली व ती त्यानें साधून घेतली होती. अशीच संधि पानिपतच्या दुसऱ्या लढाईनें अकबरास आणून दिली. या रणांत ज्याचा अकबरानें पराभव केला तो हेमूच कायतो त्याजबरोबर सामना करण्यास योग्य असा हिंदुस्थानांत एक योद्धा होता. तेव्हां त्यापुढें जें युद्ध जिंकण्याचें काम होतें तें सोपेंच होतें. परंतु मिळविलेलें राज्य चिरस्थायी करणें, काबीज केलेल्या निरनिराळ्या प्रांतांचें व जिंकिलेल्या निरनिराळ्या जातीच्या लोकांचें सम्मीलन व एकीकरण करणें, व बादशाही अंमल व स्वामित्व प्रांतोप्रांतीं व शहरोंशहरीं भेदून चोहोंकडील राज्यव्यवस्थेंत खिळून स्पष्ट रीतीनें दृष्टोत्पत्तीस येईल असें, पण परंपरागत चालत आलेल्या स्थानिक दंतकथा, चाली, व आचारविचार ह्यांचा नाश न होईल असें एक-छात्रत्व स्थापन करून वहिवाटींत आणणें,—ह्या गोष्टी साधण्याचे कामास अकबराच्या आजानें हातच लाविला नव्हता. त्याच्या बापाच्या मनांत या गोष्टी आल्या असत्या किंवा त्याला कोणी सांगितल्या असत्या तर त्यास त्या असंभवनीयच वाटल्या असत्या. तथापि, त्यांच्या राज्यव्यवस्थेंत अशा प्रकारचें एक-

छात्रत्व नव्हतें ह्मणूनच सन १५२६ सालीं पानिपतची लढाई होऊन एकच अपजय मिळाल्याबरोबर दुसरेच दिवशीं हुमायुनाचें सर्व विस्तृत राष्ट्र लयास गेलें. आणि असें घडणें साहजिकच होतें. त्या राज्यवृक्षाचीं पाळेंमुळें खोलवर रुझलीं नव्हतीं. तें फक्त फौजेच्या जयावर व तलवारीच्या जोरावर अवलंबून होतें. एकही अपजय झाला तरी तें टिकण्याचा संभव नव्हता. विपत्तिरूपवायूनें तो वृक्ष समूळ उपटावयाचाच. गिझनी, घोरची, खिलजी, व तघलख यांचीं राज्यें अगोदर होऊन गेलीं होतीं त्यांचेपेक्षां मोंगलांचे राज्यांत अणुरेणू इतकी देखील अधिक स्थिरता अद्यापि आली नव्हती. येवढें बस कीं बाबरानें स्थापिलेलें राज्य त्याच्यामागें हुमायुनाच्या कारकीर्दीत शीरशहाची स्वारी होतांच एकाच अपजयानें बोलतां बोलतां नष्ट झालें. हें कबूल केलें पाहिजे कीं, बाबर जर जास्त दिवस वांचला असता तर त्यानें शीरशहाचा पराभव करून त्यास मागें हांकून लाविलें असतें. परंतु, यावरून आमचें वरील विधानच सिद्ध होतें. बाबर हा महापराक्रमी योद्धा होता. त्याप्रमाणेंच शीरशहाही होता. हुमायून अव्यवस्थित बुद्धीचा, चंचल, व व्यवहारशून्य असा होता. युद्धकलेंत तर त्याची गती सुमाराचीच होती. ज्या शीरशहानें हुमायुनास जिंकिलें त्यास बाबरानें जेरीस आणिलें असतें हें संभवनीय आहे. तथापि यावरून सिद्ध हेंच होतें कीं, आजन्म जी राज्यपद्धति बाबराच्या आंगवळणीं पडली होती व जिचे योगें फरघणा व समरकंद हे एकवार त्यास मिळाले व एकवार त्याचे हातचे गेले व जिच्याच योगानें त्यास पुढें काबूल प्राप्त झालें व हिंदुस्थान हस्तगत करून घेतां आलें तीच, ह्मणजे लढाईच्या जोरावर राज्य मिळविण्याची व "बळी तो कान पिळी" ह्या न्यायाची पद्धति त्यानें हिंदुस्थानांत सुरू केली. 'ज्याच्या मणगटांत जोर त्यानें वागवावे राज्यदोर' अशी ही त्या वेळची राज्यपद्धति होती. फरघणा, समरकंद, काबूल, पंजाब व हिंदुस्थान यांपैकीं कोणत्याही ठिकाणीं

बाबरच्या राज्यवृक्षाचीं पाळेंमुळें खोल-वर रुझलीं नव्हतीं. वस्तुतः असें होणें शक्यच नव्हतें. कारण चिरस्थायी राज्याचीं मूलतत्वेंच त्या राज्यपद्धतींत नव्हतीं. तेव्हां त्यांची वाढ कोठून होणार?

आतां, इ०स० १५५६ च्या अखेरीस, कमाविलेलें व गमाविलेलें असें तें हिंदुस्थानचें राज्य पुनः एकदां कमाविलें जाऊन तें एका मुलाच्या हातीं आलें होतें. ह्या मुलाच्या वयास नुक्तींच १४ वर्षें पुरीं होऊन एकच महिना झाला होता; व तो विपत्तींत व संकटांत वाढला होता. पानिपतच्या लढाईनें हिंदुस्थानदेश त्यास प्राप्त झाला तेव्हां तो वयानें लहान होता तरी त्याच्या नजरेखालून बराच राज्यकारभार गेला होता. त्याचा बाप हुमायून हा त्याची नेहमीं सल्ला घेई. त्या काळचा अद्वितीय योद्धा बैरामखान याच्या हाताखालीं त्यास लष्करी विद्येचें शिक्षण प्रत्यक्ष समरांगणांत मिळालें होतें. पंजाब प्रांताचा राज्यकारभार तर त्यानें सहा महिन्यांवर स्वतः चालविला होता. पण आतां राज्यकारभार चालविणारा व जिंकणारा ह्या दोन्ही नात्यांनीं त्याची कसोटी लागावयाची होती. या दोन्ही बाबतींत त्यास आपल्या बापाचें उदाहरण व बैरामाचें शिक्षण हीं उपयोगीं येण्याचा संभव नव्हता. पानिपतचे लढाई पर्यंतच्या त्याच्या आयुष्यक्रमावरून, त्याचे अंगीं अंतःकरणाची दयार्द्रता व संकटसमयींची समयसूचकता ह्या गुणांचे अंकुर आहेत हें तर दिसून आलें होतें. शरण झालेल्या हेमूस ठार मारण्याचें त्यानें नाकारिलें हें आपण नुक्तेंच पाहिलें आहे. पण इतउत्तर जी कामगिरी त्याजकडे आली तिच्याकरितां यांहून दुसरे अनेक गुण हवे होते. आतां सदरहू कामास लागणाऱ्या या गुणांची त्यास कितपत अनुकूलता होती हें आपणास पुढें घडून आलेल्या गोष्टींवरून ताडितां येईल.

# भाग दहावा.

## बैरामचें अकबरास शिक्षण.

॥ वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे ॥
॥ नच खलु तयो र्ज्ञाने शक्तिं करो त्यपहंति वा ॥
॥ भवति च पुन र्भूया न्भेदः फलंप्रति तद्यथा ॥
॥ प्रभवति यथा बिंबोद्ग्राहे मणि र्न मृदां च यः ॥

॥ गुरू विद्या प्राज्ञा तशिच मतिमंदा हि वितरी ॥
॥ तयांची धीशक्ती अधिक अथवा न्यून न करी ॥
॥ घडे तच्छिक्षेचें फळ तयिं बहू भेद दिसतो ॥
॥ असे बिंबग्राहीं प्रबळ मणि मृल्लोष्ट नसतो ॥

प्रथम आपण अकबराच्या बाह्यस्वरूपाचें वर्णन करूं. त्याचा मुलगा जहानगीर बादशहा यानें लिहिलें आहे कीं त्याचा बांधा मध्यम, किंबहुना उंचच असा होता. त्याचा वर्ण गव्हासारखा असून साधारण काळ्यांतच जमा करण्यासारखा होता. त्याचे डोळे व भिवया काळ्याभोर होत्या. त्याचें शरीर दणगट व जोमदार होतें. त्याचें कपाळ विशाल होतें; छाती रुंद व बाहू लांब होते. त्याच्या नाकाच्या डाव्या बाजूवर लहान वाटाण्यायेवढा मांसल चामखीळ होता तो अति सुंदर दिसे. सामुद्रिकांचे मतें हा चामखीळ अपार संपत्ति व वाढतें वैभव ह्यांचा निदर्शक असून तो मोठें सौभाग्यलक्षण होता. अकबराचा आवाज फार मोठा व खणखणीत होता. त्याचें भाषण रसाळ व मनोहर असें होतें. त्याची वागणूक व रीतभात इतरांच्याहून भिन्न होती. त्याच्या चेहऱ्यावर ईश्वरी प्रौढी दिसे. ह्या वर्णनांतील मुख्य मुद्याच्या गोष्टी इतर इतिहासकारांच्या वर्णनाशीं जुळतात. एलफिस्टन साहेबानें अकबराचें वर्णन केलें आहे कीं, त्याचा बांधा मजबूत असून रूपानें तो फार देखणा होता. त्याचा चेहरा पाणीदार व मनोरम होता. त्याची वागणूक मोहक होती; व त्याचें शरीरसामर्थ्य अलौकिक होतें. त्याच्यानें मोठे कष्ट

सहन करवत. घोड्यावर बसणें, रपेट करणें, निशाण मारणें, शिकार करणें, व याशिवाय ज्यांत सामर्थ्य व कौशल्य लागतें अशा व्यायामांची त्यास फार आवड असे. तो मोठ्या छातीचा व धीराचा असे. त्याचें धैर्य प्रसंगीं कधींही डगमगलें नाहीं; उलट, अडचणीच्या व धोक्याच्या प्रसंगीं तें विशेषच चमके. लढाई करण्यास,—विशेषेंकरून राष्ट्राच्या हिताकरितां व प्रजेच्या कल्याणाकरितां ती अवश्य वाटे तेव्हां—तो एका पायावर तयार असे. तथापि त्यांत त्याला आनंद नसे. आपली सत्ता व आपला अधिकार प्रजाजनांच्या संतोषावर अवलंबून आहे असें त्याच्या मनानें घेतलें होतें. ह्मणून, जेणेंकरून त्यांचा संतोष वाढेल व सुख व शांतता वृद्धिंगत होऊन आपला अधिकार सुस्थिर होईल अशा उपायांची निरंतर योजना करणें ह्यांत लढाईपेक्षां त्यास कितीतरी अधिक आनंद वाटे. लढाई ह्मणजे एक न टाळतां येणारें अनिष्टच असें तो समजे. त्याच्या एकंदर कारकीर्दींत असें आढळून येईल कीं, त्यानें अशी एकही लढाई केली नाहीं कीं जी त्यास स्वतःच्या राज्यांतील मुलकी कामाची व्यवस्था संपूर्ण अवस्थेस आणून बिनधोक करण्यासाठीं अवश्य अशी वाटली नाहीं. त्याचा स्वभाव ममताळू होता. तो स्नेह्यांशीं अकृत्रिमपणानें वागे. आपल्याविषयीं इतरांच्या मनांत प्रेमभाव उत्पन्न करण्याची हातोटी त्यास चांगली साधली होती. रक्तस्रावाचा त्यास तिटकारा असे. न्यायपद्धतींत अनुकंपेचें संमेलन करण्याविषयीं त्याची इच्छा असे. अपराध्यांस दंड करतांनां सुद्धां तो दयाशीलता सोडीत नसे. तो मोठा क्षमाशील होता. वैराग्नि धुमसत ठेवून सूड उगवावा त्यापेक्षां क्षमा करून मन शांत ठेवावें हें बरें असें तो मानी. ‘वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि’ या उक्तीप्रमाणें त्याचें अंतःकरण जात्या उदार होतें, तथापि जरूरच पडे तेव्हां त्यास तें वज्रासारखें कठीण ही करतां येई. सर्व थोर मनाच्या लोकांप्रमाणें इतर जनांच्या संतोषांत व आनंदांत भर घालण्याची त्यास अतोनात हौस

असे. औदार्य हें एक त्याच्या नैसर्गिक प्रकृतीचाच भाग होऊन गेलेलें होतें. ज्यावर उपकार केला तो बेमान झाल्यास आपलें औदार्य अस्थानीं गेलें याबद्दल त्यानें खेद मानूं नये; उलट त्यास सुधारण्याविषयीं त्यानें यत्न करावा. लष्करी खात्यांतील कारभारापेक्षां मुलकीकडील राज्यव्यवस्थेची जात्या त्यास जास्त आवड असे; मोहिमेची योजना करण्यापेक्षां आपण बाहुबलानें उभारीत आहों ती राज्यरूपी इमारत लोकांच्या इच्छेनुसार रचली जावी अशाबद्दल बेत व मसलती करणें त्याला जास्त पसंत पडे. धर्म, राज्यव्यवस्था, न्यायपद्धति इत्यादि मनुष्यसमाज संबंधीचे जे जे विषय सर्व युगांत महत्वाचे ह्मणून गणिले आहेत त्या सर्वांचे संबंधीं अकबराचें मन खुलें व शुद्ध असून, त्यांत दुराग्रहांस जागा नव्हती. व त्यांसंबंधीं नवीन कोणी कांहीं सांगितलें तर तें ऐकण्यास तो सदा तत्पर असे. तो जन्मतः मुसलमान होता, व महमुदीय धर्मातच तो लहानाचा मोठा झाला होता. तरी बौद्ध, ब्राह्मण, पारशी व ख्रिस्ती या धर्मांच्या अनुयायांशीं तो मोकळ्या मनानें व बरोबरीच्या नात्यानें वागे. त्याच्यावर कित्येकांचा असा आक्षेप आहे कीं वृद्धापकाळीं त्याला विद्वज्जन आवडेनातसे झाले व त्यांस दरबारांतून त्यानें हांकूनही लाविलें. या विधानांत फारसें तथ्य आहे असें आह्मास वाटत नाहीं. ह्यापेक्षां, असें ह्मणणें अधिक रास्त होईल कीं, त्याचे दरबारांत येणाऱ्या विविध धर्मपंडितांच्या अविचारी कल्पना, दुराग्रह, व लहानपणापासून अंगीं खिळलेल्या समजुतींविषयींचे हट्टवाद ह्यांचा त्यास तिटकारा आला. खरोखर पाहिलें असतां, या पंडित लोकांतील अवगुण व दोष, ह्मणजे त्यांच्या ठायीं असलेली अपरिमित पुराणप्रियता, दुराग्रह, हट्टवाद व असमंजसपणा यांचा अकबरास कंटाळा येई व या दोषांचा अतिरेक झाला तेव्हां त्यांस दरबारांत येणें बंद केलें. एरव्हीं तो कसा होता हें वाचकांस ह्या ग्रंथाच्या शेवटल्या भागांत पूर्णपणें समजून येईल. येथवर केलेल्या वर्णनावरून या नृपकिशोराच्या अंगीं

अप्रगट आक्रमशक्ति केवढी होती व तींत गुणविशेष काय होता याचें दिग्दर्शन वाचकांस स्पष्टपणें झालें असेल. बैरामखानाच्या शिक्षणाखालीं तयार होऊन चौदावे वर्षी पानिपतची लढाई मारून कोठें मुक्काम न करितां तो एकदम दिल्लीवर चाल करून गेला, त्या वेळीं त्याच्या बुद्धिवैभवाची विशालता व स्वभावसामर्थ्य, व मानसिक शक्तीचें तेज सभोंवताली असणाऱ्या अमीर उमराव व सरदारांपैकीं थोड्यांच्याच ध्यानांत आलें असेल. पण निदान बैरामखान यास तरी अकबराचा स्वभाव व बुद्धि पुरी कळली नव्हती हें मात्र निःसंशय आहे. एरव्हीं सरहिंद येथें आपल्या तंबूंत टारडीबेग यास त्यानें दग्यानें मारिलें नसतें; किंवा त्या तरुण राजपुत्रास युद्धांत काबीज केलेल्या हेमूच्या रक्तानें आपल्या तलवारीस स्नान घालण्याविषयींची सल्ला दिली नसती. परंतु त्यांचा भ्रम लवकरच दूर झाला. हुमायुनाचा मुलगा ह्मणजे वाटेल तसा वागविला जाणारा मूल नव्हे तर आपला हुकूम मानावयाला लावणारा धनी आहे असें बैरामखान व दरबारांतील इतर अमीर उमराव आणि लष्करांतील सरदार यांस लवकरच समजून आलें.

अकबर एक महिनाभर दिल्लीस राहिला. हेमूच्या मोड झालेल्या सैन्याचा पाठलाग करण्याकरितां व त्यांच्याजवळ असलेला खज़ीना आणण्याकरितां त्यानें मेवातांत आपलें लष्कर रवाना केलें. या लहानशा मोहिमेंत त्याचा सरदार शरवान येथील पीरमहमदखान यानें मोठा विजय संपादिला. या वेळीं हा सरदार बैरामखानाचा अनुयायी होता. परंतु पुढें थोडक्याच दिवसांत त्यांच्यांत द्वेष माजला व बैरामखान हात धुऊन त्याच्या पाठीस लागला. नंतर अकबरानें आग्र्यावर स्वारी करून तो प्रांत पुनः हस्तगत करून घेतला.

परंतु, जोंवर पंजाब प्रांत निष्कंटक झाला नव्हता तोंवर सतलज नदीच्या दक्षिणेस त्यानें संपादिलेले प्रांत ही निर्भय नव्हते. आपणांस माहितच आहे कीं मोंगल घराण्याचा पक्का हाडवैरी शिकंदर सूर ह्यास अकबरानें जरी मानकोट पर्यंत मागें हटविलें होतें तरी त्याचा पुरता

पाडाव न करितां त्यास तसेंच सोडून द्यावें लागलें होतें. नंतर, पुढच्या वर्षी ( १५५७ ) मार्च महिन्यांत अकबरास असें वर्तमान समजलें कीं आपण पंजाबांत ठेविलेल्या सैन्यापैकीं अघाडीच्या फौजेंतील एका टोळीचा लाहोरापासून चाळीस मैलांवर ह्या शिकंदरानें पराभव केला. पंजाबाहून कांहीं सरदार मंडळी परत आली, त्यांनीं असें कळविलें कीं या वेळचा प्रसंग मोठ्या आणीबाणीचा आहे; कारण मानकोट येथील त्याचें ठाणें सुरक्षित व बळकट आहे तों पर्यंत शिकंदर शाहाचा इतर रणांगणीं पराभव झाला तरी त्यास मानकोटाहून बादशाही मुलुखास वारंवार त्रास देतां येईल. शिवाय, त्याचा जय होत गेल्यानें त्याच्या पक्षांतील लोकांस जोर व उत्साह ही आला आहे. सरदारांच्या बोलण्याचा झोंक अकबराचे लक्षांत आला व त्यांचें ह्मणणें खरें असेंही त्यानें कबूल केलें. आणि त्याच्या राज्याची सद्दी होऊन त्यास ज्या तत्वानें मजबुती आली तें तत्व, ह्मणजे "कोणतेंही काम करावयाचें तर तें अगदीं पुरतेंपणीं करावयाचें" ह्या तत्वानुसार ह्या प्रकरणाचा निकाल लावावा असा त्यानें निश्चय केला. तो नीट लाहोरावर चाल करून गेला. ती राजधानी सुरक्षित आहे असें पाहून त्यानें जालंदरावर स्वारी केली. येथेंच त्याचा शत्रु आपला तळ देऊन बसलेला होता. अकबर या ठिकाणीं पोहोंचतांच शिकंदरशहा शिवालिक नांवाच्या डोंगरांत परत गेला; व मानकोटच्या किल्ल्यांत जाऊन राहिला. तेथें अकबरानें त्यास वेढा घातला.

हा वेढा सहा महिने राहिला. किल्ल्यांतील दाणागोटा संपला व रखवालदारांतील पुष्कळ लोक निघून गेल्यामुळें बलहीन होऊन, आपला टिकाव लागत नाहीं असें पाहून शिकंदरशहानें आपल्या सरदारांस तहाचें बोलणें लावण्यास पाठविलें. अकबरानें त्याचें ह्मणणें मान्य केलें व असें ठरविलें कीं 'शिकंदरानें माघार घेऊन बंगाल्यांत परत जावें व आपण बादशहाशीं पुनः लढाई करणार नाहीं असें वचन द्यावें व त्यासाठीं आपला मुलगा ओलीस द्यावा. नंतर मानकोटचा किल्ला अकबरास

वश झाला; व अकबर तेथून लाहोरास परत गेला. तेथें तो चार महिने चवदा दिवस त्या प्रांताची व्यवस्था लावण्याकरितां राहिला व नंतर दिल्लीस परत गेला. मार्गांत जालंदर मुक्कामीं माजी बादशहा हुमायून याच्या एका लांबचे बहिणीचें नातें असणाऱ्या स्त्रीशीं बैरामखानाचें लग्न झालें. हा संबंध हुमायुनानेंच जुळविला होता व सर्व योजना तेव्हांच ठरली होती. शहाजादा अकबर यास असल्या गोष्टींत आपल्या वडिलांची इच्छा कायद्याप्रमाणें शिरसावंद्य असे. तारीख १९ मार्च १५५८ इ० रोजीं अकबरानें दिल्लींत पुनः प्रवेश केला. हा काल पावेतों खरोखर सर्व कारभार बादशहाचा मुख्य मंत्री व गुरु जो बैरामखान ह्याच्याच खुद्द हातीं होता. व पुढील दोन वर्षांत (१५५८–१५५९) हीच व्यवस्था कायम राहून सर्व राज्यसूत्रें बैरामखानाच्याच स्वाधीन राहिलीं. ज्या बलाढ्य योद्धयाच्या हाताखालीं आपलें सर्व शिक्षण झालें त्याचें वजन एकदम झुगारून देण्याचें काम त्या अल्पवयी कुमारास सोपें नव्हतें. आपल्या नांवावर अतालिक बैरामखान यानें केलेलीं अनेक कृत्यें अकबरास संमत नव्हतीं, तथापि त्याचें जूं काढून टाकण्या इतकी ताकत आपले अंगीं आली नाहीं असें अकबरास वाटत होतें हें संभवनीय आहे. परंतु, अकबरास प्रिय असे लोक बैरामखानानें निष्कारण वैर करून त्याजजवळून जुलमानें काढून घ्यावे असा क्रम बरेच दिवस चालल्यानें बादशहाचें मन आपल्या अतिस्वायत्त अतालिकावरून हळू हळू उडालें. वैषम्याची एकदां सुरवात झाल्यावर तें वाढतच गेलें. अकबराच्या स्वभावांत प्रतिवर्षीं जाज्वल्य व तेजोमय गुणराशी संवृद्ध होत आहेत व त्याच्या नैसर्गिक बुद्धिकौशल्यांत अनुभवाची व राज्यकारभारास लागणाऱ्या ज्ञानाची भर पडत आहे, या गोष्टी बैरामखानाचे नजरेंत आल्या नाहींत. ज्यास आपण कान धरून शिकविलें, ज्याचें सैन्य समरांगणांत नेऊन विजयी केलें, व ज्याचें राज्य आपण अनियंत्रितपणें चालवीत आहों तो आपला धनी अकबर अद्याप केवळ पोर आहे असें

बैरामखान यास अझूनही वाटत होतें. आजपर्यंत स्वैरपणें अंमल गाजविल्यामुळें अनिर्गलरीत्या वागणें त्यास अवश्य झालें होतें ह्मणून तो "मनः पूतं समाचरेत्" या न्यायानें आपल्या विलक्षण हेकेखोर स्वभावास अनुसरून स्वाभिमानानें सत्ता चालवीत होता.

राजा अल्पवयी असला ह्मणजे वाजवी रीतीनें त्यानें जी सत्ता व अधिकार चालवावयाचे ते दुसऱ्यानें चालविले असतां त्यापासून आपलें व गादीवर असलेल्या राजाचें फार मोठें नुकसान आहे असें मानणाऱ्या मंडळीचा त्याच्या भोंवतीं नेहमीं थवा असावयाचाच. त्या मंडळीची अशी प्रवृत्ति कां होते याचें कारण शोधीत बसण्याचें प्रयोजन नाहीं. येवढें मात्र खरें कीं, कोणत्या तरी कारणांवरून,—अनेक प्रसंगीं हीं कारणें आपस्वार्थी असतात, कदाकाळीं विशुद्ध व निरपेक्ष प्रकारचींही असतात,—या मंडळीला असें वाटतें कीं, जो खरोखर गादीचा मालक आहे तो अल्पवयी असला तरी सर्व सत्ता त्याचे हातीं असावी व राजकृपेचा प्रसाद त्याचेच हातून वाटला जावा. अशा प्रकारच्या लोकांचा थवा अकबराचे सभोंवतीं होता ही गोष्ट ही निर्विवाद आहे. यापैकीं कित्येकांना बैरामखान अगदीं अप्रिय झाला होता, कित्येकांचें बैरामखान यानें नुकसान केलें होतें, कित्येकांचा तो वैरी झाला होता, व कित्येकांस बादशहा स्वतंत्र झाला तरच आपला भाग्योदय होईल अशी उमेद होती. ह्या सर्व लोकांच्या डोळ्यांत बैरामखान खुपत होता व त्याची उचलबांगडी करण्यास ते अत्यंत उत्सुक होते. या संबंधानें झनान्यांतून ही भीड येऊन पडली; ती अशी. अकबराची एक दाई असे. या दाईनें त्यास आपल्या पायावर न्हाऊं धुऊं घालून लहानाचें मोठें केलें होतें व तो गादीवर बसला तेव्हां ही त्याचेच पाशीं होती. पुढें ती बादशाहाचे जनानखान्यावरील मुख्य अधिकारीण झाली. ती त्यास आग्रहपूर्वक ह्मणे कीं आतां आपण मोठे झालांत तेव्हां आपलें राज्यशकट स्वतः हांकावें अशी आतां वेळ येऊन पोहोंचली आहे.

अकबर ही असें करण्यास उत्सुकच होता. तो आतां अठरा वर्षांचा झाला होता. पानिपतची लढाई होऊन चार वर्षें लोटलीं होतीं, तितक्या अवकाशांत त्यानें आपले वडिलोपार्जित राज्य बऱ्याच अंशीं पुनः हस्तगत करून घेतलें होतें. त्याचें नैसर्गिक गुण-गांभीर्य या अवसरांत वृद्धिंगत होऊन प्रगल्भ दशेस येत चाललें होतें. परंतु, जरी अतालिक बैरामखान याच्या स्वैरवर्तनाचे व दुष्ट व क्रूर कृत्यांचे मासले अकबराच्या पदोपदीं नजरेस येत असत व ते त्याला अगदीं असंमत असत; तथापि ज्यानें आपल्यास बालपणापासून शिकविलें त्या गुरूविषयीं प्रत्येक उदारधीच्या अंतःकरणांत जी स्वभावजन्य पूज्यबुद्धि असते ती अकबराचे अंतःकरणांतही वसत होती. त्यास बैरामखानाच्या स्वभावाचा पूर्ण परिचय झालेला होता. सबब त्याच्याशीं विघाड करावयाचा तो कायमचा व परिपूर्ण असाच केला पाहिजे व त्यास कामावरून एकदां दूर केलें ह्मणजे त्यास पुनः अधिकार चालविण्याचें मनांतही येऊं नये अशी व्यवस्था करणें अवश्य आहे हें अकबर पूर्णपणें जाणून होता. बैरामाच्या हवालीं एक तर संपूर्ण सत्ता केली पाहिजे नाहींपेक्षां मुळींच सत्ता नसली पाहिजे, नाहीं तर अपाय व्हावयाचाच हें अकबरास पक्कें माहीत होतें.

इ० स० १५६० च्या प्रारंभीं अशा अनेक गोष्टी घडून आल्या कीं ज्यांमुळें राज्यवेत्र आपल्या हातीं ताबडतोब घेण्याचा अकबरानें पक्का निश्चय केला. हा कृतसंकल्प आपल्या अतालिकास विदित करण्याकरितां तो आग्र्याहून दिल्लीस जाण्यास निघाला. प्रतिस्पर्ध्यांच्या पेचांतून अथवा एखाद्या विशिष्ट सरदाराच्या तापांतून मोकळे होण्याचा एक उपाय बैरामखानानेंच अनेक वेळां दाखविला होता. तो उपाय ह्मणजे जंबिया किंवा तरवार. परंतु, असल्या उपायांचा अकबरासारख्या शुद्ध मनाच्या पुरुषास तिटकाराच असावयाचा. व त्या वेळच्या इतिहासावरून अशा प्रकारची योजना त्याला कोणी ही सुचविली होती असें दिसत

नाहीं. त्याच्या आईनें व दाईनें सुचविलेला मार्ग फार निर्मळ व अगदीं साधा होता. त्यांची सल्ला अशी होती कीं, अकबरानें बैरामखान यास मक्केच्या यात्रेस जाऊन देहाची सार्थकता करून घ्यावी असें सुचवावें; व ही सूचना त्यास अशा रीतीनें कळवावी कीं ती अननुलंध्य आज्ञा समजून त्यानें पाळावीच. बैरामखान यानेंही पुष्कळदां जाहीरपणें असें बोलून दाखविलें होतें कीं, राज्यकारभाराचें ओझें आपल्या डोक्यावरून काढून मालकाचे स्वाधीन निर्धास्तपणें करण्याचा सुदिन कधीं येईल, व देहाचें सार्थक करण्याकरितां तीर्थयात्रेला जाण्यास मी कधीं मोकळा होईन, असें मला झालें आहे. त्यानें शस्त्र घेऊन उठूं नये ह्मणून अकबरानें अतिशय खबरदारी करून ठेविली, व दिल्लींत दाखल झाल्यावर त्यानें एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यांत असें फर्माविलें कीं, आजपासून सर्व राज्यकारभार आम्हीं आपले हातीं घेतला आहे व इतउप्पर आमच्या खेरीज इतरांचे कोणाचेही हुकुम मान्य होऊं नयेत. अकबरानें बैरामखान यास आज्ञापत्र पाठविलें कीं "आपल्या प्रामाणिकपणावर व स्वामिभक्तीवर आमचा पूर्ण विश्वास असून आजपर्यंत सर्व राज्यकारभार आपल्या अंगावर टाकून ऐषआराम व चैन यांशिवाय दुसऱ्या गोष्टींकडे लक्ष दिलें नाहीं. इतउत्तर राजवेत्र आह्मीं आपल्या हातीं धारण करण्याचा निश्चय केला आहे. मक्केच्या यात्रेस फार दिवसांपासून जाण्याचा आपला मानस आहे, तरी तो आतां आपण परिपूर्ण करणें इष्ट आहे. आपल्या निर्वाहाकरितां हिंदुस्थानांतील कित्येक परगण्यांची जाहागीर आपल्या तैनातींत देण्यांत येईल व उत्पन्न होणारी जमाबंदीची रक्कम आपण नेमाल त्या मुखत्यारामार्फत आपलेकडे रवाना करण्यांत येईल." हें पत्र पोहोंचण्यापूर्वींच अकबरानें केलेला निश्चय बैरामखानाचे कानीं आला होता. ह्मणून आग्रा सोडून तो पश्चिम किनाऱ्याकडेस जाण्यास अगोदरच निघाला होता. त्याची तब्यत अर्थात गरम झाली व द्रोहभावानें त्याच्या बुद्धींत फरक पडला. कांहीं

तरी धिंगामस्ती करावी असा त्याचा निश्चयही दिसून आला; कारण, बियाना येथें पोहोंचल्यावर तेथें कांहीं असल बंडखोर सरदार कैदेंत होते त्यांस त्यानें बंदमुक्त केलें. याच ठिकाणीं त्यास अकबराचा निरोप पोहोंचला तेव्हां तो तेथून राजपुतान्यांत नगोराकडे गेला. समागमें, आप्तवर्गापैकीं कांहीं सरदार मंडळी व त्यांच्या पदरीं असलेले नौकरचाकर इतकेच कायते होते. नगोराहून ह्यांपैकीं एका सरदाराबरोबर आपण हुजूरची आज्ञा शिरसावंद्य केली ह्याचें दर्शक ह्मणून आपला झेंडा, नौबत, व अमीरीची इतर सर्व चिन्हें बादशहाकडे रवाना केलीं. इकडे, बैरामखान पंजाबांतील लोकांस फितूर देऊन आपल्या विरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त करील अशी अकबराची खात्री केली गेल्यामुळें, तो दळभार घेऊन तिकडे जाण्यास निघाला. ह्या स्वारींत रोहाटक जिल्ह्यांत झाझर येथें मुक्काम असतां, बैरामखान यानें परत केलेलीं अतालिकाचीं चिन्हें येऊन पोहोंचलीं. तीं त्यानें आपल्या एका सरदारास देऊन अनुग्रहीत केलें. हा सरदार पूर्वीं बैरामखानाच्या कृपेंतील होता, परंतु अलीकडे त्यावर त्याची मर्जी खपा झाली होती. अकबरानें हीं चिन्हें त्या सरदारास देऊन आपल्या जुन्या यजमानाचा पाठलाग करावा व त्याची मक्केस बोळवण करावी ही कामगिरी त्याजकडेस सोंपविली. यामुळें बैरामखानाचें माथें अगदींच फिरून गेलें. तो लागलींच बिकानेरवर परतला. तेथें स्वतःचा झनाना व मुलेंमाणसें आपल्या दत्तक पुत्राच्या स्वाधीन करून त्यानें उघडपणें बंडाचा झेंडा उभारला. परंतु, मोंगल बादशाहाविरुद्ध उठलेला बंडखोर व त्याचा विश्वासुक अतालिक यांत किती मोठें अंतर आहे हें त्यास अद्याप कळलें नव्हतें. तें आतां त्याच्या अनुभवास आलें. तो दिपालपूर येथें पोहोंचला तेव्हां, त्यास कळलें कीं आपला दत्तक मुलगा सोंपविलेली कामगिरी न बजावतां बादशाहासच जाऊन मिळाला, तथापि त्यानें जालंदरदुआबांतील प्रांतांत उठावणी करून आपलें बंड वाढविण्याचा निश्चय केला. त्या

सुप्रसिद्ध शहराकडे वळतो तों मार्गांत पंजाबच्या सरहद्दीवर तेथील सुभेदार अतजाखान सैन्यासह लढाई देण्यास तयार होता त्याची याची गांठ पडली. लढाई झाली तींत बैरामखानाचा पराभव झाला. तेव्हां त्यानें तिलवाऱ्याकडे पळ काढिला. हें ठिकाण लुधियानाच्या पश्चिमेस तीस मैलांवर सतलज नदीच्या कांठीं आहे. अकबर बैरामखानाच्या पाळतीवर होताच. त्यास ह्या लढाईची व पलायनाची बातमी लागतांच तो आपल्या अतालिक बैरामाचा पाठलाग करण्यास निघाला. अकबरानें त्याच्या नाकीं नव आणून त्यास त्राहि त्राहि करावयास लाविलें. तें इतकें कीं, शेवटीं बैरामखान त्यास पूर्ण शरण आला. त्यानें पूर्वीं बजाविलेल्या मोठमोठ्या कामगिऱ्या मनांत आणून अकबरानें त्याला क्षमा केली व समागमें विपुल संपत्ति व सामुग्री देऊन त्यास मक्केच्या मार्गास लावून दिलें. बैरामखान गुजराथेंत सुखरूप जाऊन पोहोंचला. तेथील सुभेदारानें त्याचा सत्कार उत्तम रीतीनें केला. तो हिंदुस्थान सोडण्याच्या तयारीस लागला असतां एका लोहाणी अफगाणानें पूर्वींचें कांहीं वैर स्मरून त्याचा दग्यानें प्राण घेतला. त्यानें त्याच्या पाठींत जंबिया खुपसला तो त्याच्या छातींतून बाहेर निघाला. त्यासरशीं "अल्ला हु अकबर" येवढें ह्मणून त्यानें प्राण सोडिला. इकडे, या अवकाशांत अकबर दिल्लींत परत येऊन पोहोंचला (नोवेंबर ता. ९ सन १५६०). थोडे दिवस तेथें राहून त्यानें विश्रांति घेतली. नंतर तो आग्र्यास गेला. नंतर, निरनिराळे प्रांत जिंकून त्यांच्यांत ऐक्यभाव व दृढभाव उत्पन्न करावा व त्या सर्वांस खऱ्या एकछत्राखालीं आणून त्यांचें एक संमीलित राष्ट्र बनवावें ह्मणून त्यानें जो कृतसंकल्प व निर्धार केला होता तो तडीस नेण्याच्या खटपटीस तो लागला. आजपर्यंत, "नाकापेक्षां मोतीं जड" या ह्मणीप्रमाणें शिरजोर होऊन बसलेल्या व आपण बादशहा आहों अशी घमेंड मारून सर्व राज्यकारभाराचीं सूत्रें आपल्याच हातीं वागविणाऱ्या अशा अतालिक बैरामाचें

राज्य चाललें होतें असें ह्मटलें पाहिजे. यापुढें, अकबर हा खरा राजा झाला व त्याच्या कारकीर्दीस खरोखर आज तारखेपासूनच सुरवात झाली. सर्व सत्ता बळकावून बसलेला अतालिक बैराम आतां राज्यांतून गेला, व इतउत्तर राज्याची भरभराट व देशांतील सुखसंपत्ति केवळ तक्तावर बसलेल्या बादशहाच्या बुद्धिसामर्थ्यावर अवलंबून राहिली.

# भाग अकरावा.

## अकबराच्या कारकीर्दीचा वृत्तांत.

**॥ न खरो नच भूयसा मृदुः ॥ पवमानः पृथिवी रुहानिव ॥**
**॥ स पुरस्कृत मध्यमक्रमो ॥ नमयामास नृपान नुद्धरन् ॥**

जो न प्रचंड मंद हि ऐसा वायू तरू जसा नमवी ॥
ठेवी पदीं परी तो इतर नृपां शरण यावया लावी ॥

**पा**निपतची लढाई होऊन पांच वर्षें लोटलीं. नंतर साहावे वर्षी ह्मणजे अकबर स्वतंत्रपणें राज्य करूं लागल्यापासून पहिलेच वर्षी, राज्याची स्थिति कशी होती, याचें थोडक्यांत दिग्‌दर्शन करूं या. पंजाब व सध्यां वायव्येकडील प्रांत ह्मणून प्रसिद्ध असलेला प्रदेश अकबराच्या अंमलाखालीं होता. यांत पश्चिमेस ग्वाल्हेर व अजमीर व पूर्वेस लखनौ, अयोध्या, अलाहाबाद व जोनपुरापर्यंतचा मुलूख येत होता. बनारस, चनार आणि बंगाल व विहार या प्रांतांत सूर अथवा अफगाण घराण्यांतील राजे राज्यकारभार चालवीत होते. सर्व दक्षिण हिंदुस्थान व पश्चिम हिंदुस्थानांतील बहुतेक भाग यांत अकबराचा अंमल अद्याप बसला नव्हता.

बैरामखानाचे हाताखालीं पांच वर्षें राज्यकला शिकत असतां, हिंदुस्थानांतील अनेक जातींच्या जनसमुदायांचें व संस्थानिक राजांचें ह्रदय आपल्याकडे कसें ओढून घ्यावें व स्वतःचें राज्य त्यांस आपलें

असेंच वाटावें ह्मणून कोणची व्यवस्था करावी इत्यादि राज्यविषयक प्रश्नांचा अकबरानें खोल विचार केलेला होता, हें निर्विवाद आहे. हें काम फार आयासाचें व बिकट होतें. मुसलमानी राजांचा अंमल हिंदुस्थानांत सुरू होऊन आज चारशें वर्षें होऊन गेलीं होतीं. परंतु, या अवकाशांत भरतखंडांतील अनेक जातींच्या लोकांतील परस्परांचे संबंध सांधून सर्व प्रजाजनांचें हिताहित एकच करण्याचा प्रयत्न एकाही राजानें केला नव्हता. प्रत्येक बादशहा गादीवर येई तो "वळी तो कान पिळी" याच तत्वास अनुसरून. अधिक बलाढ्य व प्रबळ शत्रु उपस्थित होतांच राज्यकर्त्या घराण्याचा अंत व्हावयाचाच. ह्मणून, ही मुसलमानी राजघराणीं व राज्य करीत असलेलें घराणें हीं सर्व क्षण-भंगुर आहेत, असा जनसमुदायांचा ठाम ग्रह होऊन बसला होता. इतकेंच नव्हे, तर या योगानें देशांत चोहोंकडे बंगाल्यापासून तों गुजराथे-पर्यंत तोतया राजांची रांगच रांग लागून गेली होती. मागें जीं अनेक राजघराणीं होऊन गेलीं त्यांचे हे वंशज होते. यापैकीं प्रत्येकास असें वाटत होतें कीं मोगलांचें सार्वभौमत्व हें शाळू दिवसाप्रमाणें दोन दिवस चालावयाचें. दैवाचें पारडें फिरलें ह्मणजे हें ही लयास जाणार; व आपल्यापैकीं एकास किंवा दुसरा कोणी स्वारी करणारा येऊन त्यास हें राज्य मिळावयाचें. हुमायुनाचा पाडाव बोलतां बोलतां झाला व त्यास हुसकून देण्यास तिळमात्र आयास पडले नाहींत, या गोष्टीचें स्मरण लोकांस होतेंच. त्यामुळें मोंगलांचें घराणें ही स्वल्पायुच असा-वयाचें, हा ग्रह दृढच झाला होता. कनोज येथें पराभव होतांच हुमायुनानें हिंदुस्थानांतून यःपलाय्य केलें, तेव्हां मोंगलांचें सार्वभौमत्व भरतखंडांत सतत तेरा वर्षें चाललें होतें तरी त्याचा कोठें मागमूस देखील शिल्लक राहिला नव्हता व त्या राजवृक्षाचें एकही मूळ देशांत रुझलें नव्हतें.

या सर्व गोष्टी अकबरानें मनांत पूर्णपणें ओळखून ठेविल्या होत्या. संस्थानिकांस व जनसमुदायांस पूर्वींच्या अस्थिरतेचा विसर कसा पाडावा;

कोणचे जय मिळवून राज्याचें एकीकरण करावें; नवीन प्रांत जिंकीत असतां राज्यपद्धतीचीं कोणतीं तत्वें सुरू करावीं, कीं जीं रावापासून तों रंकापर्यंत सर्वांस सारखींच संमत होतील व ज्यांमुळें त्यांचे ठायीं आपल्या विषयीं पितृवात्सल्य व प्रेम उत्पन्न होईल, व ते आपणास त्यांचे अनिष्ट निवारणार्थ अवश्य भूति ह्मणून लेखतील; व प्रजाजनांचे प्राचीन अधिकार व हक्क हा कायम ठेवील व राज्य कारभारांत शिया, सुन्नी, हिंदू, मुसलमान इत्यादि जातिभेद व धर्मभेद मनांत न बाळगितां केवळ गुणांचेंच चीज करील व सर्वांवर सारखाच अंमल चालवून समदृष्टीनें व एकाच काव्यानें लहान मोठ्यांस न्याय देईल, अशी प्रजाजनांची खात्री कशी करावी; ह्या गोष्टी त्याचे मनांत रात्रंदिवस घोळत होत्या. त्याचे विचार जसजसे परिपक्व झाले तसतशीं हीं राज्यशास्त्राचीं तत्वें त्याच्या मनांत खिळत गेलीं. कित्येक हट्टवादी मुसलमान ग्रंथकारांचा त्याजवर असा आरोप आहे—हा आरोप त्याच्या हयातींत देखील त्याजवर असे—कीं तो आपल्या अंगीं ईश्वरी कर्तृत्व व ईश्वरी गुण आहेत असा वृथाभिमान बाळगीत होता. एके अर्थीं हा आरोप कांहींसा खरा होता. कारण, ज्या कालीं व ज्या देशांत "बळी तो कान पिळी" अथवा बळ ह्याचा पर्यायवाचक शब्द हक्क अशी स्थिति होती, त्या वेळीं व त्याच देशांत, लोकांत एकी, सहनशीलता, न्याय, दया, व समसमान हक्क ह्यांचें साम्राज्य अंमलांत आणण्याकरितां परमेश्वरानें मुद्दाम पाठविलेला दूत किंवा प्रतिनिधी आपण आहों असेंच तो स्वतःस लेखीत असे.

त्याचा पहिला बेत सर्व हिंदुस्थान एका छत्राखालीं आणावें व हें काम होतां होईल तों जनसमुदायांची संमति व अनुकूलता संपादन करूनच साधावें असा होता. त्याच्या राज्यकारस्थानाचें हें धोरण पूर्णपणें ध्यानांत येण्याकरितां त्याचें विवेचन दोन दिशेनें केलें पाहिजे; एक तर, त्यानें रणांगणीं कोणते पराक्रम केले यांचा व दुसरें, त्यांवर

समदृष्टीनें राज्य करण्यासाठीं कोणच्या तत्वांवर राज्यपद्धति सुरू केली याचें वर्णन केलें पाहिजे. तेव्हां, प्रथम त्या वेळच्या हिंदुस्थानांतील विविध राजेरजवाड्यांस एकछत्राखालीं आणण्याकरितां जी त्यानें प्रयत्न परंपरा आरंभिली तिचें निरूपण आपण या भागांत करूं व पुढील प्रकरणांत त्याच्या राज्यव्यवस्थेचें नैतिकदृष्ट्या काय स्वरूप होतें याचा विचार करूं.

अकबरानें हिंदुस्थानांत केलेल्या मोहिमींचें सविस्तर वर्णन केलें असतां या सारख्या पुस्तकांत कंटाळवाणें होईल. यास्तव त्यांतील मुख्य मुख्य गोष्टी सांगितल्या असतां चालेल. गादीवर बसल्यापासून सहावे वर्षीं व राजसूत्रें स्वतः आपल्या हातीं धारण केलीं त्याचें पहिले वर्षीं त्यानें माळवा प्रांत आपल्या राज्यास पुनः जोडिला. याच वर्षींच्या अखेरचे मोसमांत, चनाटा, व कर्मनाशाचे पूर्वेकडील प्रांताच्या अफगाण राजानें जोनपुरावर स्वारी केली, व तिचा मोड अकबराच्या सरदारांनीं केला व त्यास माघारा हटविलें. इकडे स्वतः अकबर कालपीचे मार्गानें तेथें जाऊन यमुना उतरून करापर्यंत जाऊन ठेपला. हें ठिकाण अलाहाबादच्या नजीक गंगानदीच्या उजवेकडे आहे. येथें याला ज्या सरदारांनीं जोनपुराचा बचाव केला होता ते येऊन मिळाले; व मग तेथून तो आग्र्यास परत गेला. साल अखेरच्या सुमारास मरटा शहरास अकबरानें वेढा घातला. हें शहर जोधपूर संस्थानांत असून जोधपूर शहराचे ईशान्येस ७६ मैलांवर आहे. ते वेळीं ह्याची मोठी भरभराट व माहात्म्य असे. अकबर त्या वेळीं अजमीर येथें होता, व तेथूनच त्यानें ही मोहीम चालविली होती; मात्र तिची प्रत्यक्ष देखरेख व व्यवस्था त्यानें आपल्या सरदारांकडे सोंपविली होती. किल्ल्यांतील रजपूत शिपायांनीं तटाचा बचाव मोठ्या हिंमतीनें व शिताफीनें केला; परंतु पुढील सालीं वसंतऋतूंत त्यांनीं तो, आपली मालमत्ता व धनदौलत किल्ल्यांत टाकून देऊन घोडे व हत्यारें

घेऊन आपणांस सुखरूप बाहेर जाऊं द्यावें अशा शर्तीवर अकबराचे स्वाधीन केला.

मरठाचा किल्ला हस्तगत झाला तेच वर्षी ( १५६२ ) माळव्यांतील अकबराच्या सरदारांनीं पश्चिमेकडेस स्वारी करून बिजागड व तापी नदीच्या कांठचें ब्हाणपूर हीं दोन शहरें राज्यास जोडलीं. परंतु हा लाभ भावीअनर्थसूचक झाला. कारण, या दोन्ही शहराच्या पराभूत झालेल्या सुभेदारांनीं माळव्यांतून हांकून लाविलेल्या अफगाण राजाशीं व पिढ्यानपिढ्या त्यांचे अंमलाखालीं असलेल्या जमीनदार लोकांशीं एकजूट करून बादशाही सैन्यावर निकराचा हल्ला केला. हें सैन्य ब्हाणपूर येथें मिळालेल्या प्रचंड लुटीच्या ओझ्यानें लादून गेल्यामुळें त्याचा समूळ पराभव झाला; व माळवा क्षणमात्र हातचा गेला. परंतु मोंगल सरदारांना नव्या फौजेची भक्कम कुमक मिळून तें वर्ष पुरें होण्याच्या पूर्वीच त्यांनीं तो प्रांत पुनः काबीज केला. माळव्यांतील माजी अफगाण राजा बराच वेळ इकडे तिकडे भ्रमण करून अखेरीस " असो सांपडतों तुझ्या करामाजीं " असें ह्मणून, ते वेळचा एक इतिहासकार म्हणतो त्याप्रमाणें, जणूं काय दैवकटाक्षापासून रक्षण करण्याकरितांच, अकबरास शरण गेला. तेव्हां अकबरानें प्रथमतः एक हजार फौज त्याचे हाताखालीं दिली; व पुढें लवकरच दोन हजार सैन्याचे अधिपत्याची त्यास मनसब दिली. या नवीन बादशहाच्या चाकरींतच देहावसान होईपर्यंत तो राहिला. या गोष्टीवरून शत्रूंना वश करून घेण्याचें तत्व अकबरास पूर्णपणें अवगत असून त्याप्रमाणें तो नेहमीं वागत असे, हें वाचकांचे लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. हें तत्व कोणतें ह्मणाल तर पराजित केलेल्या शत्रूंस निराश व हताश न होऊं देतां त्यांच्या योग्यतेनुरूप त्यांची मानमान्यता ठेवावी व त्यांची लायकी पाहून त्यांना हुद्याच्या व हुकमतीच्या जागा द्याव्या. त्याचा हेतु दुफळ्या मोडून सर्वांचें सम्मीलन करण्याचा होता; ह्मणून पराजित

झालेल्या शत्रूंशीं त्याचें वर्तन सदैव उदारशीलतेचें असे. त्याचें बळ व सामर्थ्य तो आपल्याचकडे वळवून घेई व होतां होईल तों त्यांस आपले शत्रु राहूं देत नसे. जे प्रथमतः त्यास विरोध करण्यास उद्युक्त होत, त्यांना तो असें वाटावयास लावी कीं ह्यानें आपणास जिंकिलें किंवा आपण त्यास वश झालों, तरी त्या योगानें आपली मानहानि न होतां उलट अखेरीस आपली बढती व उन्नतिच होईल. राजपुतान्यांतील निरनिराळ्या राजांशीं जें त्यानें वर्तन ठेविलें त्याचें विवेचन करूं तेव्हां ह्या तत्वाचा व तदनुसार केलेल्या कृतीपासून काय गोड परिणाम झाला याचा विशेष परिस्फोट होईल.

अकबरच्या राज्याच्या आठवे वर्षाचे आरंभीं स्वच्छ आकाशांत काळा ढग येतो तशी एक मोठी खेदाची गोष्ट घडून आली. ज्या दाईच्या दुधावर तो लहानाचा मोठा झाला, व जिनें त्याची बाळपणीं जोपासना केली त्या धात्रीवर त्याचें केवढें प्रेम होतें, व तिजवर केवढी भक्ति होती, हें मागेंच निर्दिष्ट केलें आहे. बैरामखानाचे बाबतींत अकबरानें जें आचरण केलें तें बहुतेकअंशीं या धात्रीच्याच सल्लामसलतीनें व धोरणानें केलें होतें. राजमंदिरांत तिची तरतूद मोठ्या थाटमाटाची व ऐषआरामाची ठेविली होती, व तिच्या मुलांची फारच सुरेख व उत्तम तऱ्हेची योजना अकबरानें करून दिली होती. परंतु त्यांपैकीं वडील मुलाचे मनांत त्याच्या मतें आपल्या बरोबरीचे किंबहुना आपल्याहून ज्यांची योग्यता कांकणभर कमीच असे लोक आपल्यापेक्षां मोठ्या पदवीस चढले, याबद्दल मत्सरबुद्धीचा विशेष प्रादुर्भाव होऊन, व कदाचित इतर हेवेखोर मंडळींनीं भर दिली ह्मणून, त्यानें बादशहाचा मुख्य वजीर दरबारांत बसला असतां त्याचा दग्यानें खून केला; व नंतर आपण व आपलें कुटुंब बादशहाचे विशेष कृपेंतील आहोंत अशा घमंडीवर तो राजमहालाच्या दरवाज्यांत जाऊन उभा राहिला. परंतु, अशा मनुष्यास व अशा कृत्यास अकबराचेपाशीं क्षमा मुळींच नसे.

त्यानें त्यास देहांत शासन देवविलें व त्याचे प्रेताचा कडेलोट करविला. त्यास उठावणी देणारी मंडळी आपलें कारस्थान उघडकीस येईल या भीतीनें घाबरून यमुना पार पळून गेली, तथापि त्यांस पकडून त्यांना आग्र्यास आणिलें व अखेरीस त्यांस माफी देण्यांत आली. राजाची दाई व मुख्य अपराध्याची आई आपल्या मुलाच्या दुर्वर्तनामुळें शोकाकुल होऊन पुढें चाळीस दिवसांनीं मरण पावली.

यापूर्वीं कांहीं दिवसांपासून पंजाबांतील एका भागाची स्थिति अकबरास चिंता उत्पन्न करणारी अशी झाली होती. तेथील गखार नांवाच्या रहिवाशांनीं, त्यांच्या प्रांतांत बंदोबस्त व व्यवस्था करण्याकरितां अकबरानें फरमाविलेले हुकूम धाब्यावर बसविले. हे लोक फार उर्मट व बंडखोर असून त्यांच्या नायकांनीं मोंगलांचा अंमल मनापासून कधींच ग्रहण केला नव्हता व अकबरानें नेमिलेला सुभेदार त्यांनीं मान्य केला नाहीं. हे गखार लोक सांप्रत त्यांचे वंशज राहतात तेथें, ह्मणजे हल्लींच्या रावळपिंडी जिल्ह्याच्या ईशान्येस जो प्रांत आहे तेथें राहत असत. तेथें आपल्या हुकुमाची अंमलबारी होण्याकरितां अकबरानें सैन्याची रवानगी केली. व त्या सैन्यानें कांहीं जोराच्या चकमकींत यश संपादून, त्या प्रांतांत पुनः सुव्यवस्था स्थापित केली.

गखारांचा मुख्य सरदार कैद केला गेला व तो नजर कैदेंत असतांनांच मरण पावला. काबुलांत अनेक बंडावे उद्भवले होते त्यांचाही अकबरानें मोड करविला.. नंतर अबुलमआलि या नांवाचा हुमायुनाच्या अस्सल प्रीतींतील एक सरदार होता त्यानें अकबराविरुद्ध कट केला होता तो त्यानें मोठ्या शिताफीनें मोडून टाकिला. त्याचें प्रस्थ त्यानें अनेक वेळां मोडून टाकिलें होतें, पण आतां तो गर्वानें फारच फुगून मक्केच्या यात्रेहून परत येत होता. त्यानें एका असंतुष्ट अमीराशीं मसलत करून नारनुलानजीक बादशाही फौजेच्या एका तुकडीवर हल्ला करून ती कापून

काढली. अकबरानें त्याचा पाठलाग करण्याकरितां आपलें सैन्य रवाना केलें. तेव्हां अबुलमआलि याचें धैर्य गळालें व तो पळ काढून काबुलास गेला. तेथून त्यानें अकबरास पश्चात्तापपूर्वक पत्रें लिहिलीं. अखेरीस पुढील सालाच्या आरंभीं त्यास बकशान येथें कैद केलें व फांशीं दिलें.

अलाहाबादेच्या पूर्वेकडील प्रांतांत मोंगलबादशाहीची सत्ता स्थापित करण्याचे विचार बरेच दिवसांपासून अकबराच्या मनांत घोळत होते; परंतु ते त्यानें इ० स० १५६४ च्या वसंतऋतूपर्यंत अंमलांत आणिले नव्हते. ते वेळीं चनारचा किल्ला हें पूर्वेकडील मोठें नाक्याचें ठिकाण ह्मणून समजला जाई व तो अडेल घराण्यापैकीं एका गुलामाच्या स्वाधीन होता. त्याला अकबराच्या एका सरदारानें दम दिल्यामुळें तो किल्ला आपल्या चरणीं अर्पण करीत आहे, असें त्यानें बादशहास विनंतिपत्र लिहिलें. अकबरानें आपल्या अमीरांपैकीं दोघांस, किल्ला स्वाधीन करून घेण्यासाठीं रवाना केलें; व तो किल्ला त्यांनीं आपले हस्तगत करून घेतला. यामुळें, नरसिंगपूर महालाकडे रस्ता खुला झाला. या महालाचा राज्यकारभार एका राणीकडे होता. तिचा दरबार चौरागडचे किल्ल्यांत भरत असे. मोंगल सरदारांनीं या राणीवर हल्ला करून लढाईत तिचा पराभव केला, व नरसिंगपूर आणि ज्यास सांप्रत आपण हुशंगाबाद जिल्हा ह्मणतों त्यांतील कांहीं भाग बादशाही राज्यास जोडिले. त्याच वर्षींच्या उन्हाळ्यांत अकबर शिकारीच्या मिषानें मध्यहिंदुस्थानांत चालून गेला. पण ते वर्षीं पावसाळा लौकर सुरू झाल्यामुळें त्याचे बेत फसले. व वाटेंत पुरानें दोन्ही थडी भरलेले नदी नाले मोठ्या कष्टानें ओलांडून त्यानें नखारची वाट धरली. त्या काळीं हें शहर मोठ्या भरभराटीचें होतें व त्याचा विस्तार दहा कोसांचा होता अशी त्याची ख्याती होती. या शहराचे आसपास कांहीं दिवस शिकार करून अकबर माळव्याकडे वळला. रावा व सारंगपूर ह्या शहरांवरून

कूच करून तो मोहोच्या नैऋत्येस तेरा कोसांवर मांडू नांवाचें विख्यात शहर होतें तिकडे वळला. येथील सुभेदारीवर एका युझबेक अमीराची अकबरानें नेमणूक केली होती. आपल्यावर नाखूश होण्यास बादशहास कारणें आहेत, असें तो जाणून होता. ह्मणून, व बादशहानें अश्वासनपर पाठविलेले निरोप भरंवसा ठेवण्यासारखे नाहींत असें वाटल्यामुळें, अकबर येऊन पोहोंचला अशी खबर समजतांच तो शहर सोडून आपल्या अनुयायांसह लढाईस उभा राहिला. तेव्हां अकबरानें त्याची पाठ पुरविण्यासाठीं आपलें सैन्य रवाना केलें; त्यांनीं त्याचा गुजराथच्या सरहद्दी पर्यंत पिच्छा पुरवून त्याचे घोडे, हत्ती व जनानखाना हीं आपले काबीज केलीं.

मांडू येथें अकबराचें स्वागत व आदर आतिथ्य फारच संतोषकारक झालें. बादशहाला मुजरा करण्याकरितां आसपासच्या प्रांतांतून जमीनदार लोकांचे थवेचे थवे आले; व दूरच्या खानदेशच्या राजानें अकबराचे भेटीकरितां आपला वकील धाडिला. या वकीलाची भेट अकबरानें आदरपूर्वक घेतली. या ठिकाणीं त्या वेळच्या रीतिरिवाजाचा एक विशेष ह्मणून पुढील गोष्ट सांगितल्यास चालेल. जेव्हां निरोप देण्याकरितां अकबरानें त्या वकीलाची मुलाखत घेतली तेव्हां त्याच्या मालकाच्या नांवानें लिहिलेला एक फरमाना त्याचे हातीं दिला; त्यांत असा हुकूम फरमाविला होता कीं, आपल्या मुलींपैकीं बादशहाच्या महालास अनुरूप अशी एक मुलगी मांडू येथें रवाना करून द्यावी. त्या वेळच्या एका इतिहासकारानें लिहिलें आहे कीं "खानदेशचा नबाब मुबारकशहा यास हा अनुग्रहाचा संदेश पोहोंचला, तेव्हां त्याला परमानंद झाला व त्यानें आपल्या एका मुलीस योग्यतेनुरूप इतमाम व परिवार देऊन ताबडतोब बादशहाकडे रवाना केलें, व आपल्या हातून ही चाकरी घेतल्याबद्दल मोठें कृतकृत्य मानिलें." पुढें थोडे दिवस मांडू येथें राहून अकबर उज्जयिनी, सारंगपूर, सिप्री, नरवार, आणि ग्वाल्हेर या

मार्गानें आग्र्यास परत गेला. पुढील हिंवाळा त्यानें ग्वाल्हेर प्रांतांत बहुतेक शिकार खेळण्यांतच घालविला.

आग्र्यास जीं कांहीं पहाण्याजोगीं स्थळें आहेत त्यांपैकीं तेथील लाल दगडांनीं बांधलेला किल्ला पाहून पश्चिमेकडून ह्मणजे यूरोप खंडांतून येणाऱ्या प्रवाशांपैकीं आश्चर्यानें व कौतुकानें चकित झाले नसतील असे फारच थोडे. अकबर गादीवर बसला ते वेळीं आग्र्यास कायतो विटाचा एक लहानसा किल्ला होता. तो दिसण्यांत विद्रूप असून बेमरम्मत झालेला होता. तो मोडून त्याचे जागीं बादशहाच्या वैभवास अनुरूप असा जंगी किल्ला बांधण्याचा निश्चय अकबरानें कित्येक दिवसांपूर्वी करून ठेविला होता. इ० सन १५६५ त वसंतऋतूच्या अखेरीस या किल्ल्याच्या इमारतीचा नमूना कायम करून त्याप्रमाणें हुकूम दिला. या कामाची देखरेख कासीमखान नांवाच्या एका विख्यात सरदाराकडे सोंपविली होती. हा सरदार तीन हजार फौजेचा अधिपति होता. या किल्ल्याचे कामावर मजुरदार सतत एक सारिखे आठ वर्षेपर्यंत खपत होते. व त्यास एकंदर ३५ लाख रुपये खर्च लागला. या किल्ल्याचा एकंदर पाया पाणी लागेपर्यंत खोल खणिला आहे व तो लाल दगडांनीं बांधिला आहे. या दगडांची जुळणी फारच उत्तम तऱ्हेनें केलेली आहे व त्यांस लोखंडाच्या कड्यांनीं ही पण सांधून टाकिलें आहे.

हें वर्ष पुरें होण्यापूर्वी एक गोष्ट घडून आली कीं जीमुळें निकडीच्या आकस्मिक प्रसंगीं आपल्या निश्चयाचें बळ व कर्तृत्व दाखविण्याचा अकबराला प्रसंग आला. बादशहाची स्वारी मांडू येथें गेली, तेव्हां तेथील युझबेक सुभेदार भीतीनें घाबरून पळाला व बंडास उद्युक्त झाला व नंतर अकबरानें पाठलाग करून त्याचें पारिपत्य केलें याचें निरूपण पूर्वींच केलें आहे. या बंडखोर सरदारास अकबरानें विशेष कडक रीतीनें वागविलें नव्हतें. तथापि आपल्या जातीच्या

लोकांवर बादशहाची नाराजी झाली आहे, असा दरबारांतील व लष्करांतील युझबेक अमीरांच्या मनाचा ग्रह होऊन बसला; व यांतील दोन चार अमीरांनीं मसलत करून अकबराची खोड जिरविण्याचा निश्चय केला. हें बंड पावसाळ्याच्या तोंडास जोनपूर येथें तेथील सुभेदाराच्या मदतीनें उभारलें गेलें. अकबरास ही खबर पोहोंचली तेव्हां नरवार येथें तो हत्तींची शिकार करीत होता.

त्यानें जोनपूर येथील आपल्या इमानी कामगारांस मदत करण्याकरितां रणशूर योध्यांस देतां आलें तितकें सैन्य देऊन तावडतोब रवाना केलें, व त्यांच्या मागोमाग जाण्याकरितां आपणही सैन्य जमा करूं लागला. सुमारें दहा दिवसांनीं तो तेथून निघाला व कनोज येथें दाखल झाला. या ठिकाणीं बंडखोरांपैकीं एक पुढारी अकबरास शरण आला. त्यास त्यानें अभय दिलें व पर्जन्य पडल्यामुळें गंगा नदी दोन्ही थडी भरून चालली होती, तीस उतार पडण्याची वाट पहात तो दहा दिवस तेथें राहिला. नंतर बंडखोरांचा मुख्य नायक लखनौकडे गेला अशी बातमी लागतांच तो थोड्याशा पण निवडक सैन्यानिशीं त्याच्या पाठोपाठ निघाला; व एकसारखी चोवीस तास वाट चालून दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्यानें तें शहर गांठलें. हा जवळ येतांच बंडखोरांनीं पळ काढिला; तो इतक्या झपाट्यानें कीं लांबचा टप्पा मारून अगदीं थकून गेलेला अकबर व त्याचा परिवार ह्यांच्यानें त्यांचा पाठलाग करवेना. इतक्यांत बंडखोरांच्या नायकानें मोठ्या जलदीनें जोनपुराकडे माघार घेतली व तेथें आपल्या सोबत्यांस मिळून त्यांसह तो तेथून निघाला, तो छपराचे पश्चिमेस वीस कोसांवर नरहाणच्या उतारानें गोग्रा नदी ओलांडून तेथें तळ देऊन राहिला. येथून बंगालच्या राजास कुमक मागण्याकरितां त्यानें आपले मुखत्यार रवाना केले.

इतक्यांत रक्तस्राव न होतां सामानें या बंडाच्या शेवट लागावा अशी उत्कट इच्छा असलेला एक बादशहाचा सरदार सैन्यासह त्यांचे

पुढें उभा ठाकला; व दुसरा एक निश्चयाचा व जाज्वल्य स्वभावाचा सरदार राजपुतान्यांतून उत्तरेकडे त्यांचेवर चाल करून येत होता. पहिल्या ह्मणजे सात्विक नायकानें तहाचें बोलणें चालणें सुरूं करून बहुतेक कलह विझविला होता. पण इतक्यांत राजपुतान्यांतील सरदार त्या ठिकाणीं येऊन पोहोंचला, व हें तहाचें बोलणें ह्मणजे केवळ थोतांड आहे असें प्रतिपादून त्यानें लढाईचा आग्रह धरिला. नंतर युद्ध झालें, त्यांत बादशाही सैन्याचा पराजय झाला, व त्यांनीं पळ काढिला आणि दुसरे दिवशीं ते शरगड येथें पुनः जमा झाले.

ही लढाई होण्यापूर्वींच अकबरानें तहाचीं कलमें मंजूर केलीं होतीं. बंडखोरांनीं आपल्या सैन्याचा पराभव केला, ही बातमी समजली असतांही त्यानें आपलें वचन माघारें घेतलें नाहीं. तो ह्मणाला त्यांस क्षमा केली ती केली. ह्मणून त्यानें आपल्या अमीरांना दरबारांत परत येण्यास सांगितलें. नंतर तो चनाराकडे वळला. उद्देश, तेथील किल्ल्याच्या मजबुतीकरितां तजवीज करावयाची होती, दुसरें, मिरझापूर जंगलांत हत्तीची शिकार मारावयाची होती, आणि तिसरें, या युझबेक बंडखोर लोकांस निःशस्त्र न करितां क्षमा केली होती; तेव्हां ते पुढें कसे काय वागतात हें पहावयाचें होतें. या शेवटच्या गोष्टी संबंधानें अनुभव एकवारच घेण्याजोगा होता; कारण विजयामुळें स्फुरण पावलेल्या त्या बंडखोरांचे नायकांनीं पुनः उचल घेतली. तथापि, अकबरानें आपल्या सैन्याची हिकमतीनें व करामतीनें योजना करून त्यांस अशा रीतीनें चोहोंकडून घेरलें कीं ते निरुपाय होऊन शरण आले. नंतर त्यांस क्षमा करून पुनः मर्जींत घेतलें. याच वर्षी बादशाही सेनापतींनीं बिहार प्रांतांतील रोटास नांवाचा किल्ला काबीज केला; व ओरिसाच्या राजाकडे शिष्टाईकरितां जे दिल्लीच्या दरबारांतून वकील गेले होते ते मूल्यवान व अपार नजराणे घेऊन परत आले.

इ० सन १५६६ च्या वसंत ऋतूंत अकबर बादशहा आग्र्यास परत

आला. तत्कालीन इतिहासकार असें सांगतात कीं, या शांततेच्या समयीं अकबरास सायंकाळीं चौगन नांवाचा खेळ खेळण्यांत उल्हास वाटे. चौगन ह्मणजे सांप्रतचा पोलो नांवाचा खेळ; हा हिंदुस्थानांतून यूरोपखंडांत गेला. सांप्रत ज्याप्रमाणें सर्व देशांत हा खेळ खेळतात, त्याप्रमाणेंच अकबरही दिवसाउजेडी तो खेळत असे. परंतु अंधाऱ्या रात्रींही—कारण इकडे पुष्कळदां रात्र तेव्हांच पडते—हा खेळ खेळतां यावा अशी त्यानें युक्ति काढिली. पळसाचें लांकूड हलकें असून फार वेळ जळतें. त्यानें ह्या लांकडांचे चेंडू करवून ते पेटवून त्यांनीं खेळावें. ह्या खेळांत अकबराची फारच चलाखी असे, अशी त्या वेळीं ख्याती होती.

या मौजेंत व आरामांत अकबर अगदीं निमग्न असतां लाहोरांत व काबुलांत बंडाचा उद्भव होऊन बंडवाल्यांची सरशी झाली, अशी खबर येऊन धडकली. तेव्हां मोठी लगबग करून सालअखेरीस तो सतलज्ज-नदीचे दिशेनें निघाला, व दहा दिवसांत दिल्लीस येऊन पोहों-चला. तेथून त्याची स्वारी सरहिंदाकडे वळली, आणि पुढें मोठ्या उल्हासानें तो लाहोरास गेला. तेथून त्यानें आपले सेनापति बंड-खोरांस सिंधुनदाचे पार पिटाळून लावण्यास रवाना केले; व ही कामगिरी बजावून ते परत आले त्याच वेळीं काबुलांतील बंडावा शांत झाल्याची खबर आली; पण उलट ताप असा झाला कीं, बादशहाची स्वारी लांब वायव्येकडे गेली आहे, असें पाहून जोनपूर येथील बंडवाल्यांनीं पुनः उचल खाल्ली. यावरून हें उघड होतें, कीं भरतखंडांत चिरस्थायी राज्याची स्थापना कशी करावी, हें जें महत्वाचें कोडें तें सोडविण्याचें यश हा कालपावेतों, ह्मणजे इ० सन १५६६ च्या अखेरपर्यंत, अकबरास प्राप्त करून घेतां आलें नव्हतें. पानिपतची लढाई झाली, तेव्हांपासून मोजलें असतां, अकबराच्या राजवट्याचें अकरावें वर्ष आतां संपत आलें होतें; तथापि त्यानें आपल्या राज्यद्रुमाचीं मुळें भरतभूमींत इतकीं थोडीं रुज-

विलीं होतीं कीं, कर्मधर्मसंयोगानें जर त्यावर एखादा जिवावरचा अपघात गुदरला असता, तर त्याचेनंतर राज्यपद कोणास मिळावें याचा निर्णय पुनः तरवारीच्या धारेनेंच ठरविण्याची पाळी येऊन ठेपली असती. इ० सन १५६७ च्या प्रारंभीं अकबर लाहोरासच होता. तेथें तो शिकारींत व दुसऱ्या अशाच प्रकारच्या चैनींत गर्क होता. या आरामांतून तो जागा होण्यास कारण झालें कीं, ज्या युझबेक अमीरांना त्यानें दयार्द्र बुद्धीनें क्षमा केली होती, ते कृतोपकार न स्मरतां बादशहाची स्वारी फार दूर गेली आहे, अशी संधि पाहून वर सांगितल्याप्रमाणें पुनः बंडास उद्युक्त झाले. नंतर, तारीख २२ मार्च रोजीं लाहोर सोडून बादशाहा आग्र्यास परत जाण्यास निघाला. मार्गांत, सरहिंद प्रांतांत ठाणेश्वर येथें सन्यासी व जोगी ह्यांच्यांमध्यें मोठी मारहाण झाली ती पाहून त्याला एक मोठी मौज वाटली. तेथील प्रसिद्ध देवस्थानांत भक्तिमान् यात्रिकरू मौल्यवान् जवाहीर व नानाप्रकारचे सोन्याचांदीचे दागिने व वस्त्रप्रावरणें अर्पण करीत त्यांवर हक्क कोणाचा या विषयीं या उभय पंथांच्या लोकांत कलह माजून हातघाईवर प्रसंग आला. असो. अकबर दिल्लीस दाखल झाला तेव्हां आपल्या राज्याच्या अस्थैर्यतेचें दुसरें एक उदाहरण त्याचे नजरेस आलें. तेथील राजकीय कैद्यांपैकीं एक रखवालदारांच्या डोळ्यांत धूळ टाकून पळून गेला होता. तेव्हां आतां बादशहाची मर्जी आपल्यावर खफा होईल, या भीतीनें तुरुंगावरील मुख्य अधिकारी शहरांतून पळून गेला व त्यानें बंड उभारलें.

तो आग्र्यास पोहोंचला तेव्हां देखील वरील बातमीपेक्षां अधिक अश्वासनपर बातमी त्याचे कानीं आली नाहीं. कनोज सभोंवतील प्रांतांत बंडावा उद्भवला होता आणि आपल्या जवळील पुष्कळ अमीर भरंवसा ठेवण्याजोगे नाहींत, असें अकबरास स्पष्टपणें कळून चुकलें होतें. या ऐन बाणीच्या प्रसंगीं तो रायबरेली जिल्ह्यांत भोजपुरास गेला व तेथून पुढें रायबरेलीस रवाना झाला. तेथें त्यास अशी बातमी

लागली कीं, बंडखोर लोक काल्पीस जाण्याच्या इराद्यानें गंगानदी उतरून गेले आहेत. पर्जन्याची अतिशय झड लागल्यामुळें चोहोंकडे जलमय झालें होतें. परंतु अकबर लढाई करण्यास अगदीं उत्सुक झाला होता. सबब सैन्याचा मुख्यभाग कराकडे रवाना करून आपण स्वतः निवडक सैन्यानिशीं मोठ्या त्वरेनें प्रतापगड आणि अलाहाबाद ह्यांचे दरम्यान माणिकपुराकडे वळला. तेथें हत्तीवर बसून अकबरानें गंगानदी ओलांडिली व झपाट्यानें चालून जाऊन माणिकपूर येथें बंडखोरांस गांठलें, व त्यांचा समूळ पराभव केला. बंडखोरांचे पुढारी लढाईत किंवा लढाईनंतर मारले गेले. समरांगणांतून निघून अकबर अलाहाबादेस गेला. त्यावेळीं ही नगरी प्रयाग या नांवानें विश्रुत होती. तेथून तो बनारस व जोनपूर येथें गेला, व या प्रांतांत सुव्यवस्था स्थापित करून आग्र्यास परतला.

पूर्वेकडील प्रांत आतां निर्भय आहे, असें समजून अकबरानें आपलें लक्ष राजपुतान्याकडे वळविलें. पश्चिम हिंदुस्थानच्या या विस्तीर्ण प्रदेशांतील राजांपैकीं सर्वांत पुरातन घराण्यांतील मेवाडचा राणा उदेसिंग हा होता. त्याचा स्वभाव मोठा विलक्षण होता. तो निश्चयी किंवा जोमदार नव्हता पण मोठा दुराग्रही असे. त्याचें मोठ्या हिंमतीचें ठिकाण ह्मणजे चितोरचा विख्यात किल्ला. हा इ० सन १३०३ या सालीं अल्लाउद्दीन खिलजी यानें काबीज केला होता, हें खरें; तथापि तो अभेद्य आहे अशी पुनः लवकरच त्याची ख्याति झाली. हा किल्ला बनास नांवाच्या नदीच्या कांठीं एका उंच चतुष्कोण टेंकडीवर आहे. व याच्या बाहेरील तटाची भिंत टेंकडीच्या आकाराचीच बांधलेली आहे. याच्या संरक्षणाकरितां सात हजार शूर रजपूत शिपाई ठेविले होते. त्यांच्यावरील सेनापति मोठा स्वामिभक्त व बाण्याचा सरदार होता. किल्ल्यांत अन्नसामुग्री व पाणी यांचा विपुल पुरवठा असल्यामुळें शत्रूंचा वेढा दीर्घकालपर्यंत पडला तरी तो सर्व प्रकारें टिकाव धरण्याजोगा होता.

खुद्द अकबर सैन्यानिशीं किल्ल्याच्या तटापुढें तळ देऊन बसला. आणि त्यानें आपल्या सैन्याची दुसरी एक टोळी आसपासचा प्रांत काबीज करण्याकरितां पाठविली; कारण राण्यानें निराश होऊन जंगलांत पळ काढिलेला होता. इकडे अकबरानें जितक्या कडाक्यानें व निकरानें किल्ल्यावर गर्दी करावी तितक्याच शौर्यानें व आग्रहानें आंतील रजपूत वीरांनीं त्याचें रक्षण करावें. अकबराची असल्या कडव्या वीरांशीं यापूर्वीं कधीं गांठ पडली नव्हती. जसजसा या शूर वीरांचा निग्रह वाढत चालला, तसतसा अकबराचा अहंकार व दृढनिश्चय ही अधिकाधिक झाला. शेवटीं, तटास खिंड पाडून प्रवेश करतां येण्यासारखा आहे, अशी बातमी लागली; व अकबरानें लागलींच मार्च महिन्यांत रात्रीं हल्ला करण्याचा हुकूम दिला. त्यानें आपणास उभें राहण्यासाठीं एक माळा तयार करविला; व त्यावर उभें राहून किल्ला सर करण्याच्या कामावर नजर ठेवून तो सैनिकांस हुकूम देई. या ठिकाणीं हातांत बंदूक घेऊन अकबर बसला असतां आपल्या सैनिकांस मनःपूर्वक स्वागत देण्याच्या तयारीनें रणधीर रजपूत योद्ध्यांच्या झुंडीच्या झुंडी तटांतील खिंडीपाशीं त्यांच्या कार्यक्षम सेनानीच्या हाताखालीं जमा होत आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्याचा माळा व तटांतील खिंड यांत सरळ रेषेनें फार अंतर नव्हतें; कारण त्यांच्या दरम्यान नदीच कायती आडवी होती.

मशालीच्या उजेडानें अकबरानें रजपुतांच्या सेनापतीस सहज ओळखिलें; व तो गोळीच्या टप्प्यांत आहे असें पाहून अकबरानें त्यावर नेम धरून बंदूक झाडली; त्याबरोबर तो रणशूर सरदार विव्हल होऊन पडला. उभय पक्षांकडील सैनिक सामना करण्याकरितां एकमेकांवर चाल करून जात होते; इतक्यांत ही भाग्याची गोळी सुटली, व तिच्या योगानें रजपूत इतके निराश झाले कीं ऐन आणीबाणीच्या वेळीं त्यांचें धैर्य खचलें व लढाईचा जोम गेला. पुढें ते सांवरले, हें खरें;

पण वेळ गेली ती गेली. त्यांनीं मागाहून पुष्कळ पराक्रम केला, पण तो निष्फळ झाला. दुसरे दिवशीं प्रभातसमयीं चितूरच्या किल्ल्यावर सूर्य-प्रभेबरोबर अकबराचें निशाण झळकूं लागलें. चितूरास वेढा घालण्या-पूर्वीं अकबरानें हिंदुस्थानांतील पहिला मुसलमान साधु चिजिस्थानचा मैनुउद्दीन चिस्ति यास नवस केला होता. तेव्हां जय मिळाल्यावर उतराई होऊन नवस फेडण्याकरितां तो अजमीरच्या टेंकडीवर त्याच्या कबरेच्या दर्शनास पायीं चालत गेला. बाळपणापासून खिळलेल्या धर्म-समजुती अद्याप त्याचे आंगीं होत्याच. त्यानें अजमीर येथें दहा दिवस मुक्काम केला; व नंतर मेवातच्या मार्गानें तो आग्र्यास परत गेला. या वर्षाचा वसंतकाल व वर्षाकाल अकबरानें आग्र्यांतच घालविला. पुढें जयपूर संस्थानांतील रणथंबोर नांवाचा बलाढ्य किल्ला काबीज कर-ण्याचा त्यानें विचार केला. परंतु, या कामगिरीवर पाठविलेलें सैन्य कूच करीत असतां, गुजराथेंत दंगे उद्भवले, व तिकडूनच मध्य हिंदुस्था-नावर स्वारी आली. तेव्हां हें अरिष्ट निवारण करण्याकरितां त्या सैन्याची या कार्याकडेस योजना करावी लागली. नंतर अकबरानें दुसरें सैन्य जमा करून रणथंबोरच्या किल्ल्यावर चाल करून जाण्याचा निश्चय केला. ही स्वारी १५६९ च्या प्रारंभीं झाली. किल्ला जेरीस येऊन हस्तगत होतांच अकबर आग्र्यास परत जाण्यास निघाला. मार्गांत त्यानें मैनुउद्दीन चिस्तीच्या कबरेचें पुनः दर्शन घेण्याकरितां एक आठवडाभर अजमीरास मुक्काम केला.

या वर्षीं त्यानें फत्तेपूरशिक्री या नांवाचें शहर वसविलें. सांप्रत या नगरीची शोभा व वैभव नष्ट झालें आहे तथापि तिचीं अवशिष्ट राहिलेलीं गत वैभवाचीं चिन्हें अशीं चित्तस्थंबक आहेत कीं तीं पाहून प्रवाशांची चित्तवृत्ति आश्चर्यानें विस्मित झाल्याशिवाय राहत नाहीं. ही नगरी कशी निर्माण झाली याची हकीकत तबाकतनाम्यांत दिली आहे. ती अशी:—अकबरास आवळीं जावळीं अशीं दोन मुलें होतीं; परंतु तीं

दोघेंही लवकरच मरण पावलीं. नंतर आग्र्याच्या नैर्ऋत्येस १२ कोसांवर शिक्री येथें शेख सलीम चिश्ति नांवाचा एक अवलिया राहत असे. त्यानें अकबरास असा आशीर्वाद दिला कीं "तुला दीर्घायू पुत्र होईल व तो तुझ्यामागें गादीवर बसेल." हा आशीर्वाद खरा होईल अशी पूर्ण आशा धरून रणथंबोराहून परत आल्यावर अकबर या अवलियाचे भेटीकरितां अनेक वेळां गेला. व कधींकधीं तर तेथें त्यानें दहा दहा, वीस वीस दिवसांचे मुक्काम केले. अखेरीस तेथें एका उंचवट्याच्या माथ्यावर त्यानें एक राजवाडा बांधिला. याच्या सन्निध त्या अवलियानें एका भव्य व सुंदर मशीदीचे कामास सुरवात करून त्याच्या पलीकडे एका नवीन फकीर-खान्याचें काम लाविलें. पुढें, 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें दरबारांतील अनेक अमीरउमरावांनींही आपआपले महाल त्या ठिकाणीं बांधण्यास प्रारंभ केला.

राजवाड्याचें काम चाललें असतां अकबराच्या जनानखान्यांतील एक राणी गरोदर राहिली; तेव्हां त्यानें तिला त्या अवलियाच्या आश्रमांत नेऊन ठेविलें. कांहीं दिवस लोटल्यावर त्यानें गुजराथ जिंकिली; तेव्हां या आवडत्या नगरीच्या नांवास 'फत्तेपूर' हें पद जोडिलें. तेव्हांपासून हें शहर इतिहासांत फत्तेपूर-शिक्री या संयुक्त अभिधानानें विख्यात आहे. शिक्री येथें राहण्यास पाठविलेल्या राणीस सालअखेरच्या सुमारास त्या अवलियाच्या आश्रमांत पुत्ररत्न झालें. हा मुलगा जहानगीर बादशाहा या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे, तथापि त्याचें खरें नांव त्या अवलियाच्या नांवावरून दिलेलें सेलिम हें होय. त्याची आई जोधपुराच्या रजपूत राजाची कन्या होती. या आनंददायक दिवसाच्या स्मरणार्थ ह्मणून, अकबरानें फत्तेपूर-शिक्री ही एक कायमची राजधानी केली. त्या शहराचे सभोंवतीं दगडी परिकोट बांधिला. व त्यांत अनेक प्रकारच्या सुंदर व भव्य इमारती उभारिल्या. नंतर तो आणखी एकदां अजमीरच्या टेंकडीवरील

कबरेच्या दर्शनास पायीं गेला; व तेथील यात्रा करून तो दिल्लीस गेला.

पुढील वर्षाचे प्रारंभीं अकबर राजपुतान्यांत चालून गेला; व त्यानें जोधपूर संस्थानांतील नागोर शहरीं मुक्काम केला. तेथें त्या वेळीं सर्वांत बलिष्ट अशा रजपूत संस्थानच्या ह्मणजे जोधपूरच्या राजाच्या मुलानें अकबराचें प्रभुत्व मान्य केलें. तसेंच बिकानेरचा राजा व मुलगा ह्यांनींही आपलें सामंत्य कबूल केलें. या दुसऱ्या राजाची स्वामिभक्ती पाहून झालेली प्रसन्नता अकबरानें त्याच्या मुलीचें पाणिग्रहण करून व्यक्त केली. त्यानें कांहीं दिवस नागोर येथें त्या वेळीं जंगलीं गर्धभें असत, त्यांच्या शिकारीच्या करमणुकींत घालविले. नंतर तो पंजाब प्रांतांत दिपालपूर येथें गेला व तेथें त्यानें एक मोठा भव्य दरबार भरविला. नवीन वर्ष लागतें न लागतें इतक्यांत तो लाहोरास गेला. तो पंजाबांत स्थिर स्थावर करून पुढील वर्ष गुजराथ काबीज करण्यांत घालविण्याच्या उद्देशानें फत्तेपूर शिक्री येथें परत आला.

अकबराच्या वेळीं गुजराथची सीमा फार विस्तीर्ण होती, व त्यांत सांप्रतच्या सुरत, भडोच, खेरा, व अहमदाबाद या जिल्ह्यांचा समावेश होत असून हल्लींचें गाईकवाडी राज्य ही त्यांत येत असे. या शिवाय, सांप्रतचा महिकांठा व रेवाकांठा या प्रदेशांखालीं मोडणारा प्रांत, पंचमहाल, सधनपूर, पालनपूर, बलीसना, खंबायत, खंडिया आणि काठेवाडचें द्वीपकल्प हींही त्यांत येत असत. ह्या प्रांतसमुच्चयांचा बऱ्याच दिवसापासून कोणी खरा व हक्काचा असा शासनकर्ता प्रभु नव्हता. या प्रदेशाचे अनेक विभाग केलेले होते व त्या प्रत्येकावर लोक समुदायास परकीय अशा मुसलमान अमीरांचा अंमल असे. आणि ह्मणून हा प्रांत वर्षोंगणती आपआपसांतील लढायांनीं केवळ संत्रस्त झालेला होता. प्रत्येक सरदाराची खटपट इतरांवर स्वामित्व संपादण्याची; व त्यासाठीं तो रयतेस पिळून काढी. कधींकधीं शेजारचा

संस्थानिक कमजोर व लेंचापेंचा असल्याची खबर समजली असतां, हे संस्थानिक भरीस पडून संगनमत करून त्या दुर्बळावर हंगामी स्वाऱ्या चालवीत. या एकंदर गोष्टींचा असा परिणाम झाला कीं, गुजराथ हें दंग्याधोप्याचें व धामधुमीचें मोठें आगर व उत्पत्तिस्थान होऊन बसलें. प्रजेवर नेहमीं जुलूम होत असे, व त्यांच्यावरील राजे सतत दुसऱ्याचें नुकसान करून आपलें हित साधण्यांत तत्पर असत. या बेबंद स्थितीचे परिणाम खुद्द अकबराच्या अनुभवास पुष्कळ दिवसांपूर्वी येऊन चुकले होते, व तिचें निर्मूलन करण्याचा त्यानें आतां निश्चय केला.

अकबराच्या कारकीर्दींत जे मोठमोठे युद्धपराक्रम गाजले, त्या सर्वांत गुजराथची मोहीम अति विख्यात आहे. या स्वारीच्या योजनेंत किंवा प्रवर्तनेंत कोणत्याही प्रकारची चुकी होऊं नये, याविषयीं त्यानें पक्की खबरदारी घेतली होती. हिंदुस्थानांतील बऱ्याच भागाचें अधिपत्य अकबराकडे आल्यापासून आपआपले अमीर उमराव व संस्थानिक आपल्याशीं इमानें इतबारें वागतील, अशी खात्री त्यास याच वेळेस प्रथमतः वाटली. तो इ० सन १५७२ चे सेप्टेंबर महिन्यांत सैन्य घेऊन फत्तेपूर शिक्रीहून निघाला. जयपूरच्या दक्षिणेस ९ कोस संगमनेर आहे त्याचे मार्गानें वाट चालून तो अक्टोबर महिन्याचे मध्यभागीं अजमीर येथें दाखल झाला. या ठिकाणीं त्यानें दोन मुक्काम करून तेथील अवलियाच्या कबरेचें दर्शन घेतलें. नंतर, मार्ग टेहळण्याकरितां त्यानें १०००० घोडेस्वार अघाडीस रवाना करून मागाहून स्वतः सर्व दळभारासमेत जोधपुराच्या ईशान्येस ७५ मैलांवर नागोर येथें गेला. तेथें दाखल झाल्यावर बादशहास पुत्ररत्न झाल्याची खबर एका जासुदानें आणिली. हा मुलगा शहाजादा दानियल या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे. या ठिकाणीं त्यानें १४ दिवस मुक्काम करून सैन्याकरितां सामानसुमान व दाणागोटा यांची तरतूद लाविली. नंतर जो चाल करून निघाला तो नोवेंबर महिन्यांत सरस्वतीच्या तीरीं

पट्टणास जाऊन पोहोंचला, व दिसेंबर लागतांच अहमदाबाद येथें दाखल झाला. पट्टणहून अहमदाबादेस जात असतां मार्गांत नांवानें गुजराथचा सार्वभौम राजा असें ह्मणविणारा एक संस्थानिक त्यास शरण आला. अहमदाबाद हें ते वेळीं गुजराथेंत पहिल्या प्रतीचें शहर होतें. तेथें अकबर हा पश्चिम हिंदुस्थानचा बादशहा ह्मणून द्वाही फिरविली गेली.

इतकें झालें तरी अद्याप पुष्कळ सरदारांशीं प्रसंग करावयाचा राहिलाच होता. अर्थातच ते आपली सत्ता सोडण्यास नाखूष होते. यांच्यामध्यें भडोच, बडोदें, आणि सुरत येथील संस्थानिक मुख्य होते. ह्मणून अहमदाबादच्या हाताखालील प्रांताची सुव्यवस्था लागतांच बादशहा संबायतेस जाण्यास निघाला तेथें तो पांच दिवसांत पोहोंचला. इतिहासकार ह्मणतात कीं त्यानें समुद्र कसा असतो, तो प्रथमतः येथें पाहिला. तेथें आठवडाभर मुक्काम केल्यावर दोन मजलांनीं तो बडोद्यास गेला. तेथें त्यानें एकंदर प्रांतांच्या कारभाराची व्यवस्था पुरी केली. अहमदाबाद ही त्या इलाख्याची राजधानी ठरविली; व आपल्या समागमें आग्र्याहून आलेल्या सरदारांपैकीं एकाची तेथील सुभेदारीवर नेमणूक केली. येथून ही त्यानें भडोच व सुरत कावीज करण्याकरितां सैन्याची रवानगी केली. इतक्यांत अशी बातमी आली कीं, भडोच येथील सुभेदारानें तेथें असणाऱ्या मोंगलांच्या पक्षांतील मुख्य सरदारास मारून आंत देशांत पळ काढिला, व तो बडोद्यावरून सुमारें सात कोसांच्या अंतरानें निघून गेला. तेव्हां अकबरानें जवळ होतें तें सैन्य घेऊन त्याचे पाठोपाठ दौड केली. दुसरे दिवशीं रात्रीं एका लहान नदीच्या पलीकडे शत्रूंनीं सारस मुक्कामीं तळ दिला होता, तेथें तो दाखल झाला.

यावेळीं अकबराबरोबर कायते ४० घोडेस्वार होते. नदीला उतार होता ह्मणून सैन्याची कुमक येऊन पोहोंचेपर्यंत त्यानें आपले जवळचे लोक किती आहेत तें लपवून ठेवण्याचा प्रयत्न चालविला. ही कुमक-

सरासरी साठ स्वारांची टोळी—रात्रीं येऊन पोहोंचली. नंतर आपल्या सैन्यांत शंभर सैनिकांची भरती आहे असें पाहून अकबरानें ह्यांना घेऊन आपल्यापेक्षां दसपट मोठ्या सैन्यावर हल्ला करण्याकरितां ती नदी ओलांडिली. बंडखोरांचा मुख्य सेनापति गांवांत राहून हल्लयाची वाट न पाहतां आपल्या मोठ्या सैन्यास चांगली संधि सांपडावी, या हेतूनें उघड्या मैदानांत जाण्यास निघाला. इतक्यांत अकबरानें दौड करून शहर काबीज केलें; नंतर मोठ्या सपाट्यानें शत्रूंचा पाठलाग सुरू केला. परंतु हा प्रदेश अनेक अरुंद वाटांनीं अडून गेला होता व ह्यांच्या दोन्ही बाजूंस निवडुंगाचें दाट कुंपण होतें. यामुळें अकबराच्या घोडेस्वारांना हटावें लागलें व शेवटीं ते उभे राहिले ते अशा ठिकाणीं कीं फक्त तिघांनाच कायतें दंडाला दंड असें उभे राहून लढतां येई. बादशहा आपल्या लोकांच्या अग्रभागीं होता, व दोन्ही बाजूस जयपूरचा प्रतापशाली राजा राणा भगवानदास, ज्याच्या बहिणीचें अकबरानें पाणिग्रहण केलें होतें, तो व त्याचा पुतण्या व पुढें गादीचा मालक राणा मानसिंग हे उभयतां त्याचे पार्श्ववर्ती होते. राणा मानसिंग हा त्या काळच्या अति प्रसिद्ध योध्यांपैकीं एक होता. या त्रिवर्गांवर अति दुर्घट प्रसंग येऊन गुदरला; कारण यांच्यावर एकदम हल्ला करण्याकरितां शत्रूकडील मंडळींनीं भयंकर खटपट चालविली होती. परंतु जीं निवडुंगाचीं कुंपणें सैन्याची योजना करण्यास विरोधकारीं झालीं होतीं, तींच आतां शत्रूस अभेद्य असा तट बनून राहिलीं. इतक्यांत, राणा भगवानदास यानें शत्रूकडील एका प्रबल व अग्रणी सैनिकास आपल्या भाल्यानें चीत केलें व पुतण्या मानसिंग व अकबर या उभयतांनीं प्रतिपक्षाकडील आणखी दोन योध्यांचा निकाल लाविला; तेव्हां शत्रूंच्या सैन्यांत एकदम क्षणिक गोंधळ व हाहाकार उडून गेला. ती संधि पाहून हे त्रिवर्ग वीर मोठ्या त्वेषानें त्यांवर चाल करून पुढें गेले. व आपल्या बादशहाचें जीवित धोक्यांत आहे, असें पाहून

अलौकिक पराक्रम करण्यास प्रवृत्त झालेल्या आपल्या लोकांच्या अचाट शौर्याच्या सहाय्यानें त्यांनीं शत्रूस पळ काढावयास लाविलें. आपला पक्ष बुडता आहे असें बंडखोरांचे अनुयायांस समजून चुकल्यानें त्यांनीं अकबराच्या शिपायांप्रमाणें धैर्य व निग्रह मुळींच दाखविला नाहीं. त्यांनीं रणांगणास व त्याबरोबर हिंमत व पराक्रम यांसही रामराम ठोकिला. ज्याला जशी संधि मिळाली त्याप्रमाणें त्यानें यःपलाय केलें. शेवटीं आपलें सैन्य पळून गेल्यामुळें खुद्द बंडास उद्युक्त झालेल्या पुढाऱ्यानें राजपुतान्यांत सिरोहीकडे, साधेल त्या करामती करून, पळ काढला.

या अवकाशांत भडोच मोंगलांच्या हस्तगत झालें, तेव्हां सुरत कायतें एकटें काबीज करण्याचें राहिलें. ह्मणून, आतां वर्णन केलेल्या मोहिमेहून परत आल्यावर अकबर हा, पुढें त्याच्या मुलाच्या व नातवाच्या अमदानींत इंग्रजी व्यापाऱ्यांना फार उत्तम तऱ्हेनें माहित झालेल्या ह्या शहरावर, स्वतः चालून गेला. त्या काळीं विदित असलेल्या तट भंग करण्याच्या साधनांना सुरतेचा किल्ला अभेद्य होता. पण, अकबरानें नेटानें वेढ्याचा जोर केला व धीमेपणानें तो एक महिना सतरा दिवस चालू ठेविला. नंतर आंतील सैन्य सर्व सामुग्री संपून गेल्यावर वश झालें. तेथें अकबर गुजराथ प्रांतांतील राज्यव्यवस्था मार्गाला लावण्यास पुरे इतके दिवस राहून आग्र्यास परत जाण्यास निघाला; व सरासरी नऊ महिने ह्या मोहिमेकरितां बाहेर राहून तारीख ४ जून सन १५७३ रोजीं आग्र्यास दाखल झाला.

सुरतेस वेढा घालून किल्ला काबीज करण्याच्या उद्योगांत अकबर गुंतला असतां जो मुख्य बंडखोर सारस येथें पराभव पावून सिरोही येथें पळून गेला होता, तो उपद्रव देण्याच्या इराद्यानें हालचाल करूं लागला. दुसरा एक असंतुष्ट व बलाढ्य अमीर त्यास जाऊन मिळाल्यानें तो पाठणावर चाल करून गेला. ह्या शहराजवळ त्याचा व बादशाही सैन्याचा सामना झाला. त्यांत मोंगल सैन्याची बहु-

तेक पिच्छेहाट झाली होती. पण इतक्यांत बंडखोरांचे स्वार लुटीकरितां चोहोंकडे फांकले. ही संधि पाहून मोंगलांचें सैन्य पुनः सावरून एकत्र झालें व त्यांनीं शत्रूंच्या मुख्य भागावर तुटून पडून पराभव होणार होता त्या ऐवजीं जयश्री संपादिली. सुरतेचा वेढा चालला असतांनांच ही पराक्रमाची वार्ता अकबराच्या कानीं आली. इतकें झालें तरी मुख्य बंडवाल्याची खुमखुम जिरली नव्हती. आपल्याकडून होईल तितका मोंगलांना उपद्रव करण्याचा कृतनिश्चय करून त्यानें राजपुतान्यांतून पंजाबचा मार्ग धरिला. रस्त्यांत दोन तीनदां त्याचा पराभव झाला. परंतु त्यांतून तो एकसारखा जीव बचावून सुटून गेला, व रस्त्यांत सोनपतपानिपत व कर्नाल हीं शहरें त्यानें लुटलीं. पंजाबांत बादशाही सैन्याची व त्याची गांठ पडली, तेव्हां तो पराभव पावला आणि आश्चर्य उत्पन्न करणारीं कांहीं धाडस कृत्यें केल्यावर मुलतानजवळ एका धीवराच्या टोळीचे हातून तो घायाळ झाला, कैद केला गेला, व शेवटीं झालेल्या जखमेनें मरण पावला. त्याच्या मरणानें मोंगलांच्या हृदयांतील एक मोठेंच शल्य निघालें. कारण तो मोठ्या कर्तबगारीचा पुरुष होता. येथें येवढें सांगण्यास हरकत नाहीं कीं याच वर्षीं मोंगल स्वारांनीं जालंदर दुआबांतील काम्रा नांवाचा बलाढ्य किल्ला सर करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांस यश आलें नाहीं. या किल्ल्यास वेढा घातला होता व अकबराच्या सैन्यानें आंतील फौजेस त्राहि त्राहि केलें होतें; इतक्यांत ज्याचा मुलतानाजवळ झालेला मृत्यु वर सांगितला, त्या साहसी पुरुषाच्या स्वारीमुळें हा वेढा सोडून त्या सैन्यास तिकडेस परत जावें लागलें. हा किल्ला अकबराचे मुलाच्या कारकीर्दीपर्यंत मोंगलांचे हातीं लागला नाहीं.

अकबर गुजराथेंतून परत जाण्यास निघाला, तेव्हां आपण हा प्रदेश पूर्णपणें जिंकिला आहे, व आपण केलेल्या तेथील व्यवस्थेच्या योगानें प्रजाजनांचा भरंवसा व प्रीति आपण जोडिली आहे, अशी

त्याची समजूत झाली होती. परंतु, ज्यांनीं एकदां राज्यसुख अनुभवून अधिकार गाजविला आहे अशा पुरुषांस सत्तेची आवड किती असते, हें त्यानें पुरेंसें लक्षांत आणिलें नव्हतें. अकबर आग्र्यास पोहोंचून फार दिवस झाले नाहींत तोंच गुजराथेंतील पदभ्रष्ट झालेल्या संस्थानिकांनीं फौजफांटा गोळ करून लोकांस ताप देण्यास प्रारंभ केला. तेव्हां अकबरानें या उद्भवलेल्या अरिष्टाचा अंकुर लहान आहे तोंच तात्रडतोब खुडून टाकण्याचा निश्चय करून ह्या कामाकरितां पश्चिम हिंदुस्थानावर दुसऱ्या मोहिमेची तयारी केली. प्रथम दळभार अघाडीस रवाना केला व मागाहून आपण स्वतः सेप्टेंबर महिन्यांत एके दिवशीं रविवारीं सकाळीं एका चपळ सांडणीवर स्वार होऊन सैनिकांस मिळण्याकरितां मोठ्या त्वरेनें निघाला. त्यानें लगाम न आखडितां सत्तर मैलांची मजल मारून अजमीर व जयपूर यांच्या दरम्यान बहुतेक मध्यभागीं असलेल्या तोडा नामक गांवीं मुक्काम केला. तिसरे दिवशीं सकाळीं तो अजमीरास दाखल झाला. तेथें मामुलीप्रमाणें त्यानें आपल्या गुरूच्या कबरस्थानाची पूजा वगैरे केली. नंतर सायंकाळीं अश्वारूढ होऊन पुनः प्रवास सुरू केला. तो दीसाच्या वाटेवर पाली येथें आपल्या सैन्यास जाऊन मिळाला; नंतर त्याच्या सरदारांनीं जमा केलेले घोडेस्वार पाटणाजवळ त्यास मिळाले. या ठिकाणीं पुढें चाल करण्याकरितां ते बादशहाची वाट पाहात बसले होते.

अकबराचें सैन्य बंडखोर संस्थानिकांनीं जमविलेल्या सैन्यापेक्षां लहान होतें; परंतु तें शेलके योद्ध्यांचें होतें. त्यानें या प्रसंगीं केलेली त्वरा फार उपयोगी पडली. तो येऊन दाखल झाला तरी देखील अकबर आग्र्याहून निघाल्याची बातमी बंडखोरांस कळली नव्हती. अकबर आग्र्याहून गुजराथेंत नऊ दिवसांत दाखल होऊन बंडखोरांवर दत्त ह्मणून आला, त्या वेळीं ते अहमदाबादेनजीक आपल्या डेऱ्यांत बहुतेक घोरत पडले होते.

ते वेळीं हिंदुस्थानांत ही पण धर्मयुद्धाचा प्रसार असून त्याची चहा होती हें "तबक तई अकबारी" नामक ग्रंथ रचणाऱ्या इतिहासकारानें या प्रसंगीं घडलेली पुढील गोष्ट नमूद केली आहे तीवरून सिद्ध होतें. "शत्रु बेसावध असतां त्यावर हत्यार उगारणें हें नामर्दीचें काम आहे. सबब ते जागे होईपर्यंत आपण थांबावें, अशी साऱ्या बादशाही सैन्याची मनोवृत्ति झाली;" तेव्हां करणेवाल्यास करणा वाजविण्याचा हुकूम झाला. इकडे बंडवाल्यांच्या प्रमुख संस्थानिकाच्या हेरांनीं चवदा दिवसांपूर्वीं बादशहा आग्र्यास होता, अशी खबर दिली होती, ह्मणून आपल्या समोरील रिसाला बादशाही सैन्याचा नव्हे, कारण त्याबरोबर हत्ती नाहींत, अशी अजून आपली खात्री असल्याचें त्यानें बोलून दाखविलें. तथापि तो लढाईच्या तयारीस लागला. अकबरानें आपली धर्मयुद्धप्रीति अद्यापिही कायम ठेवून शत्रु तयार होईपर्यंत वाट पाहिली. ते सज्ज होतांच बादशाही सैन्य सपाट्यानें नदींत उतरलें. ती ओलांडिल्यावर पलीकडील तीरावर सैन्याची रचना करून अकबर एखाद्या भयंकर वाघासारखा शत्रूवर तुटून पडला. दुसऱ्या एका टोळीनें त्याचवेळीं शत्रूवर आडवे बाजूनें हल्ला केला. हा दुहेरी मारा बंडखोरांस अनिवार्य होऊन त्यांचा पूर्णपणें पराभव झाला; त्यांचा नायक जखम लागून घायाळ झाला व त्याला कैद करून नेलें.

नंतर एका तासानें बंडखोरांची दुसरी एक पांच हजार लोकांची टोळी समरांगणीं आली त्यांचाही बादशाही फौजेनें निकाल लाविला व त्यांचा पुढारी मारला गेला. लढाईंत, व पाठलाग झाला त्यांत, बंडखोरांचे सुमारें २००० लोक खर्चीं पडले. अकबर पुढें अहमदाबादेकडे वळला. तेथें तो पांच दिवस राहिला. हे दिवस त्यानें आपल्या लष्करांतील कामगिरी बजाविलेल्या वीरांस इनामें वांटण्यांत व काबीज केलेला प्रांत कायमचा सुरक्षित करण्यांत घालविले. नंतर तो खेडा जिल्ह्यांतील महमुदाबाद येथें व तेथून सिरोहीस गेला.

सिरोहीहून तो थेट अजमीरास जाऊन पोहोंचला. तेथें त्यानें आपल्या परमपूज्य व विख्यात गुरूच्या कबरेचें दर्शन घेतलें. अजमीराहून पुनः निघून अहोरात्र वाट चालून जयपुराजवळ सुमारें चवदा मैलांवर एक खेडें आहे, तेथें त्यानें राजा तोडरमल ह्याची गांठ घेऊन त्याच्या सल्लयानें गुजराथेंत धारा बसविण्यासंबंधानें व्यवस्था करण्याकरितां मुद्दाम मुक्काम केला. राजा तोडरमल हा अकबराच्या दरबारांत जे कांहीं काबील व दक्ष दरकदार होते, त्यांतला एक असून तो पुढें बादशाहाचा मुख्य दिवाण झाला. येथून अकबराची स्वारी फत्तेपुर-शिक्रीस गेली. याप्रमाणें ही ४३ दिवसांची मोहीम संपवून त्यानें मोठ्या जयोत्सवानें त्या राजधानींत प्रवेश केला.

सर्व हिंदुस्थान आपल्या एकछत्राखालीं आणण्याचा अकबरानें केलेला निश्चय आतां बहुतेक तडीस गेला होता. राज्यपदारूढ होऊन अठरा वर्षांच्या आंत वायव्येकडील प्रांत, मध्य हिंदुस्थान, पंजाब, काबूल व पश्चिम हिंदुस्थान इतक्या प्रदेशांत त्याचा अंमल बसला होता. पूर्वेस त्याची सत्ता कर्मनाशेच्या तटापर्यंत फैलाविली होती. या नदीच्या पलीकडे बंगाल व बिहारचें स्वतंत्र राज्य होतें. त्यापासून मोंगलबादशाहीस कांहीं प्रसंगोपात अपायाची भीति होती; तेव्हां कांहीं अकल्पित अडचण न आल्यास आपल्या राज्याचें एकोणिसावें वर्ष बंगाल व त्याच्या खालील प्रदेश जिंकण्याचे कामीं लावण्याचा अकबरानें पुरतेपणीं निश्चय केला. तथापि, या मोहिमेस निघण्यापूर्वीं आपल्या गुरुवर्याच्या कबरेचें दर्शन घेण्याकरितां त्यानें अजमीरची आणखी एकदां यात्रा केली.

अकबराच्या सैन्याच्या मोहिमी व त्यांचे विजय ह्याविषयींचा उल्लेख या भागांत बराच झाला आहे. परंतु, ह्या मोहिमी कोणत्या तत्वांवर केल्या जात त्याचें निरूपण अद्याप केलें नाहीं. लढाईचा खर्च लढाईतून भागविणारे योद्धे आजपर्यंत पुष्कळ होऊन गेले, व सांप्रत हयात असणाऱ्या पुरुषांच्या स्मरणांतही असे योद्धे असतील. मोंगलांचे

राज्यास उतरती कळा लागल्यावर खोरासानी व अफगाण योद्धयांनीं ज्या स्वाऱ्या केल्या त्या याच तत्वावर झाल्या. परंतु अकबराचा मार्ग निराळा होता. लढाई त्यास जास्त आवडत नसे. तो युद्ध करी, तें फक्त आपण उभारीत आहों ती इमारत कच्ची व डळमळीत राहूं दिल्यास तिला शत्रूंच्या स्वारीरूप पहिल्याच वादळानें ढांसळून जाण्याची पाळी येईल, ह्मणून ती दृढ व पक्की करण्यास अवश्य असें वाटे तेव्हांच करी. ह्मणून, आपल्या किंवा आपल्या सैन्याच्या मोहिमीं-पासून जमीनीच्या मालकांस किंवा वहितदारांस नुकसान किंवा इजा न होऊं देण्याविषयीं तो फारच काळजी घेई. हें तत्व अमलांत आणण्याकरितां त्यानें असा हुकूम फरमाविला होता कीं, सैन्याचा तळ देण्याकरितां जागा मुकरर ठरली ह्मणजे, आसपासचीं शेतें वगैरे राख-ण्यासाठीं मुद्दाम कांहीं अधिकाऱ्यांची योजना करावी; व सैन्याचा तळ उठला ह्मणजे तळाची जागा तपासून जें कांहीं नुकसान झालें असेल तें अजमासून सरकारी वसूलांत मुजरा करण्यासाठीं पंच नेमावे. तबा-कतइ अकबरीच्या इतिहासकारानें असें नमूद केलें आहे कीं, ही पद्धति त्याच्या प्रत्येक मोहिमेंत कायद्याप्रमाणें पाळली जात असे. शिवाय, रयतेचें व शेतकऱ्यांचें झालेलें नुकसान ताबडतोब आकारून भरून देण्यास भरपाई करतां यावी व जमाबंदी वसूल करणाऱ्या अधिका-ऱ्यांच्या कामांत बिलकूल व्यत्यय येऊं नये ह्मणून, बादशाहा ह्या पंचांच्या स्वाधीन कधींकधीं रोख पैशाचे तोडेही करून ठेवी. ही व्यवस्था मोंगलानंतरच वस्तुतः राजपदारूढ झालेल्या पाश्चिमात्य लोकांच्या व्यवस्थेप्रमाणेंच बहुतेक होती. या व्यवस्थेच्या योगानें ज्या प्रदे-शांतून सैन्यास कूच करणें अवश्य होई तेथील लोकांस लढाईची धास्ती व भीति वाटेनाशी झाली.

आपल्या गुरुमहाराजाच्या कबरेचें दर्शन घेण्यास्तव अकबर अज-मीरास बारा दिवस जाऊन राहिला आहे, तितक्या अवकाशांत बंगाल

15

व बिहार या प्रतांची या समयीं कशी काय स्थिति होती याचें थोड-क्यांत आपण निरीक्षण करूं या.

वायव्येकडील प्रांतांत मोंगलबादशाही पुनः स्थापित झाली, ते समयीं बंगाल व बिहार येथील संयुक्त राज्यावर एक अफगाण राजा राज्य करीत होता. त्यानें कांहीं वेळानें अकबराचें सार्वभौमत्व मान्य केलें; परंतु ही मान्यता केवळ कागदावरचीच होती; व पुढेंही ती तशीच राहिली. त्यानें कधीं करभार दिला नव्हता व अंकित ह्मणून तो कधीं बादशहाचे भेटीस आला नव्हता. अकबराची गुजराथेंतील दुसरी मोहीम चालली असतां हा राजा मरण पावला. त्याच्या दरबा-रांतील कांहीं थोड्या पण बलाढ्य सरदारांनीं त्याचा मुलगा व प्रत्यक्ष वारस यास तावडतोब ठार करून, त्याचा धाकटा भाऊ दाऊदखान यास गादीवर बसविलें. दाऊदखान यास ख्यालीखुशालीशिवाय कसलीच दरकार नसे. असा राजा सिंहासनारूढ झाल्यामुळें, लोदी घराण्यांतील एक बलाढ्य अमीर बंडावा करण्यास उद्युक्त झाला. या अमीरानें आपलें निशाण बिहार प्रांतांतील शहाबाद जिल्ह्यांतील रोहटासगडाच्या किल्ल्यांत उभारलें व आपण स्वतंत्र राजा अशी द्वाही फिरविली. पुढें यांच्यांत कसातरी तह झाला. पण दाऊदखानानें ह्या तहाचा व त्या लोदी अमीरानें ठेविलेल्या विश्वासाचा दुरुपयोग करून संधि साधून त्या अमीरास पकडवून त्याचा वध करविला. बिहार प्रांतांतील अव्यवस्थित व्यवहार अकबराच्या ध्यानांत होता. सबब त्यानें जोनपूर येथील आपल्या सुभेदारास त्यावर नजर ठेवण्यास ताकीद करून प्रसंगानुरूप वागण्याची परवानगी दिली होती. दाऊदखानानें केलेल्या विश्वास-घाताची खबर ह्या सुभेदाराच्या कानीं पडतांच त्यानें कर्मनाशा नदी ओलांडिली; व मोंगल सैन्याशीं खुल्या समरांगणांत सामना करण्यास छाती नसल्यामुळें दाउदखान तटबंदीनें मजबूत केलल्या पाटणा शहरीं वा धरून बसला होता त्यावर स्वारी केली. अकबर गुजराथेच्या

मोहिमेहून परत आल्यावर थोडे दिवसांनंतर बंगालची स्थिति अशा प्रकारची झाली होती. ही मोहीम प्रत्यक्ष आपल्या हुकमतीखालीं चालावी अशी अकबराची इच्छा होऊन त्यानें आपल्या सरदारास असा हुकूम फरमाविला कीं, मी दाखल होईपावेतों लढाईसंबंधीं हालचाल तहकूब ठेवावी. नंतर तो नुक्तीच वर सांगितलेली अजमीरची यात्रा लौकर आटपून लगबगीनें सैन्यासह जलमार्गानें अलाहाबादेस गेला. तेथें मुक्काम न करितां तो तसाच पुढें जलमार्गानें प्रवास करून बनारस येथें दाखल झाला. तेथें तो त्रिरात्र राहिला. नंतर पुनः नौकारोहण करून गंगा आणि गोमतीच्या संगमावर जाऊन पोहोंचला. तेथून आपल्या नायबाकडून खबर कळेपर्यंत जलमार्गानें वर जोनपुराकडे जाण्याचा त्यानें निश्चय केला.

याप्रमाणें अकबर मार्गक्रमण करीत असतां त्याच्या नायबाकडून विनंतिपत्र दाखल झालें कीं, आपण होईल तितक्या त्वरेनें शत्रूवर चाल करण्यास निघून यावें. तेव्हां शहाजाद्यांना व समागमें असलेल्या बेगमांना परिवारासह जोनपुराला घेऊन जाण्याची नावाड्यांस ताकीद देऊन अकबर तत्क्षणीं मार्गें फिरला; व आपले सैनिक होते त्या ठिकाणीं जाऊन पोहोंचला. त्यांना नावा दृष्टीआड होऊं न देतां नदीतटानें कूच करण्याचा हुकूम देऊन तो चौसा शहरावर उतरला. ह्याच शहरीं शेरखान यानें अकबराच्या बापाचा पराभव केल्याचें वाचकांस आठवत असेलच. या ठिकाणीं अशी बातमी येऊन पोहोंचली कीं, शत्रूंनीं पाटणा शहराबाहेर पडून छापा घातला व वेढा घालणाऱ्या सैनिकांची पुष्कळ नासधूस केली. तेव्हां अकबर जलमार्गानेंच मोठ्या नेटानें पुढें चालला व सातवे दिवशीं आपल्या सैन्यास जाऊन मिळाला.

दुसरे दिवशीं त्यानें लढाईविषयीं विचार करण्यासाठीं आपल्या सरदारांचा दरबार भरविला. त्यांत त्यानें आपलें असें मत प्रदर्शित केलें कीं, पाटणाच्या किल्ल्यावर चाल करून जाण्यापूर्वी पाटणाचे समोर गंगा

व गंडक या नद्यांच्या संगमावर असलेलें हाजीपूर शहर काबीज करणें श्रेयस्कर आहे. हें मत ग्राह्य झालें व त्याप्रमाणें दुसरे दिवशीं हाजीपूर हस्तगत केलें गेलें. या विजयामुळें दाऊदखानाची पांचावर धारण बसली. व वेढा देणाऱ्या शत्रूंनीं प्रगट केलेल्या बाहुवीर्यानें घाबरून जाऊन त्यानें त्याच दिवशीं रात्रीं पाटणांतून पोबारा केला. तो पुण-पुण नदीच्या मार्गानें ती गंगेस मिळते त्याचेजवळ फटवा शहरीं गेला. दुसरे दिवशीं प्रभातकाळीं जयोत्सवानें पाटणा शहरांत अकबरानें प्रवेश केला. परंतु दाऊदखानास पकडावा अशी त्याची उत्कट इच्छा होती ह्मणून तो तेथें कायतो चारच तास राहिला. नंतर आपल्या सैन्याचें अधिपत्य आपल्या नायबाकडे सोंपवून तो शत्रूचा पाठलाग करण्याकरितां निवडक घोडेस्वारानिशीं निघाला. त्यानें घोड्यावरूनच पुणपुण नदी पोहून जाऊन दाऊदखानाच्या अनुयायांस त्वरित गाठिलें; व एकामागून एक असे २९९ हत्ती काबीज करीत करीत दर्यापूर शहर गांठिलें. तेथें मुक्काम करून आपल्या लष्करांतील दोन विश्वासू सरदारांना त्यानें पाठलाग पुढें चालू ठेवण्यास फरमाविलें. त्यानीं तो सात कोसपर्यंत नेटानें चालविला. परंतु, दाऊदखान त्यांना झुकांडी देऊन दुसरीकडे निघून गेला हें स्पष्टपणें कळून आलें ह्मणून ते परत आले.

पाटणा येथें मिळालेल्या जयानें बिहार प्रांत अकबराचे हस्तगत झाला. नंतर, त्या प्रांतांतील राज्यव्यवस्थेची योजना करण्याकरितां त्यानें दर्यापुरास सहा दिवस मुक्काम केला. व ही मोहीम ज्या विजयी सरदारानें योजिली व यशस्वी केली त्यास त्यानें त्या प्रांताचा सुभेदार नेमून त्याजकडे पुढील व्यवस्था सोंपविली व आपण जोन-पुरास परत गेला. तेथें त्या प्रांताच्या राज्यकारभाराची चांगली पद्धति बसविण्याचे कामास लागून त्यानें ३३ दिवस मुक्काम केला. ह्या पद्धत्य-नुरूप जोनपूर, बनारस, चनार आणि जवळपासचे दुसरे महाल त्यान खास बादशाही जमाबंदीखालीं आणिले. व कर्मनाशेच्या

दक्षिणेस नवीन काबीज केलेल्या प्रदेशाची व्यवस्था व जमाबंदी एका निराळ्या सुभेदाराकडे सोंपविली.

अशी व्यवस्था लाविल्यावर अकबर आग्र्यास जाण्याकरितां कानपुराकडे गेला. या ठिकाणीं त्यानें चार दिवस मुक्काम केला. या अवधींत, बंगाल्यांतील सेनापति मोंघीर, भागलपूर, गढी आणि तांडापासून गंगेच्या पैलतिरीं गौडपर्यंत सर्व ठाणीं एकामागून एक काबीज करून आणखी पुढें चाल करून जाण्याच्या तयारींत असल्याचें वर्तमान येऊन पोहोंचलें. गौड हीं हिंदु राजांच्या अमदानींत बंगालची जुनी व विख्यात राजधानी होती. ह्या सरदारानें आपला निश्चय मोठ्या उत्साहानें तडीस नेला. त्यानें दाऊदखानाचा पिच्छा केवळ हात धुवून पाठीस लागून पुरविला; व बाझूरा मुक्कामीं त्याचा पराभव करून शेवटीं कटक येथें त्यास शरण यावयास लाविलें. हा राजा वश झाल्यानें बंगालचा विजय पुरा कायम झाला असें मानितां येईल.

कानपूर येथें ही सुवार्ता कानीं पडतांच अकबर यास परमावधीचा आनंद व अभिमान वाटला. बंगालच्या मोहिमेची खरोखर अखेर झाली असें मानून तो झपाट्यानें दिल्लीस गेला. तेथें त्यानें कांहीं दिवस शिकार खेळण्यांत घालविले व नंतर तो आणखी एकदां अजमीरच्या यात्रेस वाटेंत शिकार करीत करीत गेला. नारनूल मुक्कामीं पंजाब व गुजराथचे सुभेदार यांच्या भेटी झाल्या. आपला अंमल प्रजाजनांस प्रिय होऊन आपल्या राज्यद्रुमाचीं मुळें त्यांच्या अंतःकरणांत रुझत चाललीं आहेत असें सुभेदारांच्या मुखानें ऐकून त्यास फार समाधान वाटलें. या सुभेदारांशीं चार हितगुजाच्या गोष्टी झाल्यावर तो झपाट्यानें अजमीरास गेला व त्यानें आपल्या गुरूच्या कबरेचें दर्शन घेतलें. जोधपूरच्या जंगलांत एका लहानशा मांडलिकानें बंडावा मांडिला होता, त्याचा बीमोड करवून नंतर फत्तेपूर-शिक्री येथील आपल्या आवडत्या राजमहालास तो परत आला.

अकबरानें जे अनेक प्रवास केले त्यांत त्याचे नजरेस असें आलें कीं, आपण हिंडलेल्या प्रांतांतील बरीच जमीन नाकीर्द पडलेली आहे. ह्याचें कारण ती जमीन सुपीक नाहीं किंवा तेथील लोक आळशी आहेत असें ह्मणतां येत नव्हतें. या गोष्टीची बारीक चौकशी करून पाहतां त्याला असें दिसून आलें कीं हा दोष खरोखर राज्यपद्धतीचा आहे. जमीनीवरील धारा इतका जबर बसविलेला होता कीं तिची लागवड करण्यास गरीब लोकांचा मगदूर होईना. ह्या संबंधानें त्यास असें वाटलें कीं, पहिल्या वर्षाचा शेतकीचा फायदा सरकारानें व खातेदारानें वांटून घ्यावा अशी कांहीं तोड काढितां आल्यास ही जमीन लागवडींत येईल. नंतर या एकंदर विषयाची चौकशी करून त्यानें असें ठरविलें कीं, प्रांतांतील कित्येक परगण्याची पाहणी करावी, व ज्या भागांत सर्व जमीनीची लागवड झाल्यास एक कोटी टांक ह्मणजे ५०,००० रुपये काळीचें उत्पन्न होईल इतकी जमीन आहे अशा भागांचे महाल करावेत, व त्यांचा कारभार एका इमानदार व हुशार कामदाराकडे सोंपवून त्यास करोडी हा हुद्दा द्यावा. जामदारखान्यांतील फडनवीस व पोतनीस ह्यांनीं या अधिकाऱ्यांशीं या संबंधानें ठराव करून त्यांना आपआपल्या महालावर पाठवून द्यावें असें ठरविलें. तेथें त्यांनीं दक्षता दाखवून व लक्ष पुरवून पडीत जमीन तीन वर्षांत वहितींत आणावी आणि वसूल होईल तो सारा सरकारांत रवाना करावा अशी व्यवस्था झाली. ही पद्धति अंमलांत आणिली गेली व तीपासून होतील असे वाटत होते ते सर्व फायदे झाल्याचें अनुभवास आलें.

याप्रमाणें अकबरबादशहाच्या राजवट्याचें अकरावें वर्ष त्याच्या नूतन बादशाहीस एक शिवाय बाकी सर्व गोष्टींत विभवशाली झालें. या वर्षी वायव्येकडील प्रांत व मध्य व पश्चिम हिंदुस्थान ह्यांस बंगाल व बिहार प्रांत जोडला गेला. हुमायुनाच्या पुत्राची सत्ता वस्तुतः विंध्याचलाच्या उत्तरेस सर्वत्र मान्य झाली होती. या आबादानीस एक गोष्ट

अपवादमूलक घडली ह्मणून ह्मटलें ती ही कीं पश्चिम हिंदुस्थानांत घोर दुष्काळ व रोगाची साथ उद्भवली; व या योगानें त्या प्रांतांत मोठा भयंकर कहर उडाला. धान्याची विलक्षण महर्गता झाली. चारा नसल्यामुळें घोडे व गाईस झाडाच्या साली खाव्या लागल्या. हा दुष्काळ व त्याबरोबरची रोगाची साथ एकसारखी सहा महिने चालू होती.

पुढील सालीं, ह्मणजे इ० स० १५७५ या वर्षाचे आरंभीं अकबरानें दाऊदखानाचा पाठलाग करून ओरिसा प्रांत काबीज केला. मुघलमारी व जलेश्वर यांच्या दरम्यान भजूरा येथें या अफगाण राजाचा पराभव कसा झाला व त्याचा पाठलाग होऊन कटकच्या किल्ल्यास वेढा घातला असतां तो कसा शरण आला, याचें विवेचन पूर्वींच केलें आहे. त्याच्याशीं जो तह झाला त्यांत असें ठरलें होतें कीं, या राजानें अकबर बादशहाच्या वतीनें व नांवानें ओरिसा प्रांतांत राज्यकारभार चालवावा. परंतु, दाऊदखान हा वचन दिल्याप्रमाणें आपले इमानास जागला नाहीं. अनुकूल अशी पहिली संधि सांपडतांच त्यानें बंड केलें. पुढें दोन वर्षांनीं एका मोठ्या लढाईंत मोंगल सरदारांनीं त्याचा पराभव केला. तेव्हां त्यास कैद करून त्याच्या राजद्रोहाबद्दल शिक्षा ह्मणून त्याचा शिरच्छेद रणभूमीवरच केला गेला. इतकें झालें तरी कांहीं वेळपावेतों बंगाल व ओरिसा या प्रांतांवरील बादशाही कारभाऱ्यांना मोठ्या सावधगिरीनें व शिताबीनेंच वागावें लागलें.

या सालीं ज्या अनेक विशेष गोष्टी घडल्या, त्यांत बादशहानें फत्तेपूर शिक्री एथें इबातखाना अथवा शारदामंदिर या नांवाची एक भव्य व रमणीय इमारत बांधिली, ही एक होय. हें स्थान विद्वान्, प्रज्ञावान् व गुणवान् अशा महाजनांच्या भेटीकरितां मुद्दाम तयार करविलें होतें. या मंदिरांत चार दिशेस चार मोठाले दिवाणखाने काढिले होते. पश्चिमेकडील दिवाणखाना सैयद अथवा पेगमबर महमद याचे अनुयायांकरितां योजिला होता. दक्षिणेकडील दिवाणखाना अध्ययन

करून ज्ञान संपादन केलेल्या पंडितांकरितां ठेविला होता. विवेक व शहाणपण यामुळें आणि ईश्वरी साक्षात्कार होत असल्यानें वंदनीय झालेल्या महात्म्यांकरितां उत्तरेकडील दिवाणखाना मुकरर केला होता. व पूर्वेकडील दिवाणखाना वर निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही एका वर्गाशीं समानशील असतील अशा अमीर उमरावांसाठीं राखून ठेविला होता. हें मंदिर पूर्ण झाल्यावर बादशहानें तेथें दर शुक्रवारीं व इतर पुण्य दिवशीं रात्रीं जाण्याचा परिपाठ ठेविला. एका दिवाणखान्यांतून दुसऱ्या दिवाणखान्यांत, ह्याप्रमाणें जाऊन तेथील धर्मनिष्ठ पंडित व महात्मे ह्यांच्या समागमांत व त्यांशीं संभाषण करण्यांत तो ह्या रात्री घालवी. अशा प्रसंगीं या दिवाणखान्यांतील मंडळींनीं बादशहाच्या आदरसत्कारास व औदार्यास आपणापैकीं जो विशेष योग्य असेल त्यास सन्मानार्थ पुढें करावें असा बहुतेक सांप्रदाय असे. ह्या भेटीच्या वेळीं अकबर त्यांची संभावना करी. व या मंदिरांतून कोणी रिक्तहस्त परत आला असें कधींच घडलें नाहीं. हें मंदिर या वर्षाचे अखेरीस तयार झालें होतें.

पुढील साल ( १५७६ ) अगदीं रिकामें गेलें; परंतु त्याच्या पुढील ह्मणजे इ० स० १५७७ हें साल पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणें दाऊदखानानें ओरिसा प्रांतांत केलेल्या बंडाव्यामुळें ध्यानांत ठेवण्याजोगें झालें. ही मोहीम मोठ्या धामधुमीची व गडबडीची झाली; परंतु दाऊदखान व त्याचा चुलता समरांगणांत मरण पावल्यामुळें तिची फत्ते झाली.

याच वर्षी राजपुतान्याकडूनही एक पेंच आला. या प्रदेशांतील संस्थानिकांपैकीं एकटा मेवाडचा राजा राणा उदेसिंग यानें मात्र, आपल्या नात्यांतील मुलींला अकबरानें मागणी घातली असतां, देण्याचें नाकारून त्याच्याशीं शरीरसंबंध करण्याचें नाकारिलें होतें. आपण देवकुलांत जन्मलों आहोंत तेव्हां यवनाशीं संबंध करणें तो अत्यंत नीच समजत असे. स्वतःचें पद स्थिर करण्याचा प्रयत्न करीत असतां

असा शरीरसंबंध करणें त्यानें धिक्कारिलें होतें. पुढें, आपलें ज्याच्याशीं हाडवैर असा जोधपूरचा राजा अकबराचे मनाप्रमाणें वागला ह्मणून बादशहानें त्यास चार मोठ्या वसुलाचे महाल दिले व तो सधन झाला, ही गोष्ट डोळ्यासमोर घडली असतांही, त्यानें ही शरीरसंबंधाची गोष्ट मान्यं केली नाहीं. अकबराच्या सत्तेस न जुमानून त्यानें आपला निश्चय कायम ठेवला. हा राणा इ० स० १५६८ सालीं आपल्या राजधानीस मुकला व राजपिपलाच्या जंगलांत पळून गेला; आणि सुमारें चार वर्षांनंतर इ० स० १५७२ या वर्षीं मरण पावला.

त्याचा मुलगा राणा प्रतापसिंग ह्याच्यांत त्याचे बापाचा संपूर्ण दुराग्रह व त्याचा आजा प्रसिद्ध राणा संग याच्याठायीं असलेले कित्येक अलौकिक गुणही उतरले होते. या राजपुत्राची स्थिति फार कष्टाची होती. राजधानी नाहीं; पैशाचें व इतर साधनांचें बळ नाहीं; व त्याचे इष्टमित्र व जातभाई ह्यांना, त्यानें मुसलमानांशीं शरीरसंबंध करण्याचें नाकारिलें हें जरी पसंत होतें, तरी ते आपल्या राण्यावर आलेल्या आपत्तीमुळें भग्नोत्साह झालेले होते; अशा अडचणींतही राणा प्रतापसिंग यानें आपली गादी अरावली डोंगरांत कोंवलमीर येथें स्थापन करून बादशहाशीं पुनः संग्राम करण्याकरितां रजपुतांस सिद्ध करण्याची मोठ्या जारीनें खटपट सुरू केली. अकबर अजमीरास दरसालच्या यात्रेस गेला असतां त्याचे कानीं ह्या मसलतीबद्दलची थोडी बहुत खबर पोहोंचली; तेव्हां त्यानें आपला अति विश्वासू, जातीचा रजपूत, व ज्याला गुजराथेंत अकबराच्या बाजूला लढतांनां आपण पाहिलें आहे, तो सेनानायक-जैपूरचा राणा मानसिंग-यास ५००० घोडेस्वारांसमेत शत्रूवर एकदम चाल करण्याकरितां रवाना केलें. दोन्ही पक्षाकडील सैन्याची हुलडी घाट अथवा गोगंडा एथें १५७६ चे दिसेंबरांत गांठ पडली. लढाई झाली तींत राणा प्रतापसिंग याचा अगदीं बीमोड झाला व त्यानें अरावली डोंगरांत पळ काढिला. तेव्हां त्याचा सर्व

आधार नाहींसा करून त्यास जेरीस आणावें अशा इराद्यानें अकबरानें आपल्या सैन्याची एक टोळी डोंगरांत दवडिली व तीस हुकूम केला कीं राण्याचा पाठलाग करीत असतां त्याचा प्रांत उध्वस्त करून टाकावा. अकबर जातीनें मेवाडांत गेला व त्यानें तेथील राज्यकारभाराची शिस्त लावून दिली. नंतर तो माळव्याकडे निघाला. त्यानें पश्चिमेकडील सरहद्दीवर तळ देऊन बऱ्हाणपुराच्या अंमलाखालीं मोडणाऱ्या प्रदेशाचा कारभार व्यवस्थेशीर करून दिला. व गुजराथेंतील व्यवस्थेंत बरीचशी सुधारणा केली. या गोष्टींत १५७७ व ७८ हीं वर्षें गेलीं. हें झाल्यावर तो पंजाबाकडे जाण्यास निघाला.

बादशहा पंजाबचा मार्ग आक्रमीत असतां एक गोष्ट घडून आली, ती सांप्रत हिंदुस्थानावर साम्राज्य करणाऱ्या लोकांस नमूद करण्यासारखी वाटेल. तो दिल्लीस पोहोंचला आणि त्या शहरापलीकडे एक मजल गेला, तेव्हां कोणीएक हाजी युरोपांत गेला होता त्यानें " तेथून आणिलेला उत्तम फरमाशी माल व कपडा बादशहास दाखविण्यास आणिला." यासंबंधी वर दिलेल्या अवतरणापेक्षां इतिहासकार जास्त माहिती देत नाहीं. तेव्हां हा माल व हें कापड युरोपांतील कोणत्या भागांतून आलें व तें पाहून बादशहाचा काय ग्रह झाला याची आपणांस कल्पनाच केली पाहिजे. अकबर पंजाबांत फार थोडा वेळ राहून दिल्लीस परत आला. नंतर तो अजमीराची वारी करण्याकरितां गेला. तेथें एकच रात्र राहून लागलींच घोड्यावर स्वार होऊन समागमें कायते नऊ असामी घेऊन दररोज शंभर मैलांची मजल मारीत तो तिसरे दिवशीं संध्याकाळीं फत्तेपूर शिक्री येथें दाखल झाला.

पुढील वर्ष, ह्मणजे १५८० हें साल मोठें महत्वाचें ह्मणावयाचें. कारण त्या वर्षी मोंगलांचें राज्य भरभराटीच्या शिखरास जाऊन पोहोंचलें. बंगाल प्रांतांत शांतता होती इतकेंच नाहीं तर बादशाही खजीन्यांत तेथून पैशाची भर होत होती. मेवाडच्या राण्याचा पाठलाग

अद्यापिही सुरूच होता. परंतु याशिवाय दुसऱ्या कोणत्याही हिंदुस्थानाच्या भागांत शस्त्रप्रहारांचा ध्वनि ऐकूं येत नव्हता.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांवर बरोबरीचे राजे सत्ता चालवीत होते, अशा वेळीं एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत जाणाऱ्या मालावर बसविलेल्या जकाती योग्य होत्या; परंतु ते प्रांत आतां एकछत्राखालीं आल्यामुळें, त्यांची प्रवृत्ति फक्त पूर्वींचा बेबनाव शाश्वत ठेवण्याची होणार, ही गोष्ट अकबराच्या ध्यानांत, प्रवास करीत असतां, येऊन चुकली होती. ह्मणून १५८१ सालच्या प्रारंभीं त्यानें ह्या सर्व जकाती, ज्यांस टमघा ह्मणत, त्या बंद केल्या. ह्या हुकुमा बरोबरच जिझिया नांवाचा कर रद्द केल्याचें फरमाविलें. हा कर हिंदुस्थानावर सत्ता चालविणाऱ्या पूर्वींच्या अफगाण राजांनीं, महमुदीय पंथाचे नसतील अशा सर्व प्रजाजनांवर दर माणशीं बसविला होता. विचार-स्वातंत्र्याची सर्वांस मुभा असावी व आपल्या प्रजेपैकीं प्रत्येकानें आपापल्या संप्रदायानुरूप व मतानुरूप ईश्वरोपासना करावी अशी अकबर बादशहाची उदार बुद्धि होती. हें तत्व त्यानें अखेरपर्यंत कायम राखिलें. बंगाल प्रांतांत कित्येक असंतोषी अमीर उमरावांनीं बंडावा केला हीच या सालाची राजकीय दृष्टीनें अति महत्वाची गोष्ट. परंतु या मंडळींत जूट नव्हती, सबब त्यांचा पराभव होऊन त्यांची दाणादाण केली गेली.

पुढील, ह्मणजे १५८२ सालीं अकबराचा भाऊ महमद हकीम मिरझा यानें काबुलाहून हिंदुस्थानावर स्वारी केली. तिची पिछेहाट करण्याकरितां अकबर सैन्यासह पंजाबावर चाल करून गेला. तो पानिपतास दाखल होण्यापूर्वींच त्याचा बंडखोर भाऊ लाहोराच्या अगदीं जवळ येऊन पोहोंचला होता. अकबर चालून येत आहे अशी खबर महमद हकीम मिरझा यास समजतांच आपली मोहीम फसणार अशी त्याची खात्री झाली; व त्यानें लाहोरापासूनच माघार घेतली, आणि काबूलचा रस्ता सुधारला. त्याच्या मागोमाग सरहिंद, कालानार, व

रोटास या मार्गानें जाऊन सांप्रत कटक आहे त्या स्थळीं अकबरानें सिंधुनद ओलांडिला. या समयीं तेथें एक किल्ला बांधण्याचा त्यानें हुकूम केला.

अकबर पेशावरापर्यंत चाल करून गेला. तेथून त्यानें काबूल काबीज करण्याकरितां आपल्या सैन्यांतून एक टोळी पुढें दवडिली व तिचें सेनाधिपत्य आपला मुलगा शहाजादा मुराद याजकडे सोंपविलें. शहाजादा मुराद हा तरुण, उंच, व सडपातळ असा असून त्याचा वर्ण काळवट असा होता. त्याला दारू पिण्याचें व्यसन जबर लागलें होतें. व तिच्या पायींच त्याचा व त्याचा भाऊ शहाजादा दानियल याचा अंत झाला. त्यानें झपाट्यानें मजला मारून आपल्या चुलत्याच्या सैन्यास खुद्द काबूल येथें गांठिलें व त्याचा अगदीं पराभव केला. शहाजाद्यास कुमक करण्याकरितां अकबर त्याच्या मागून सैन्यासह गेला व त्याचे नंतर तीनच दिवसांनीं काबुलास दाखल झाला. तेथें तो तीन आठवडे राहिला. त्यानें आपल्या भावाचे अपराध पोटांत घातले व काबुलाचा राज्यकारभार पुनः त्यास दिला. नंतर खैबर घाटानें तो लाहोरास परत गेला. व पंजाब प्रांतांतील राज्यकारभार सुव्यवस्थित करून मग दिल्लीवरून फत्तेपूर शिक्री येथें रवाना झाला. इतिहासकारानें असें लिहिलें आहे कीं ' या प्रसंगीं अकबर बरेच दिवस फत्तेपूर शिक्री येथें राहिला व त्यानें आपला काळ न्याय इनसाफ करण्यांत, दानधर्म देण्यांत, व इतर सार्वजनिक कामांची व्यवस्था लावण्यांत घालविला.

पुढच्या सालीं तो सर्व वर्षभर तेथेंच राहिला असें दिसतें. बंगाल्यांतील बंडावा अजून ही धुमसत होता. परंतु या प्रांतांत कारभारावर फार काबील सरदार नियुक्त केलेले होते. ते सर्व कची हकीकत बादशहास हमेशा कळवीत आणि तोही नेहमीं त्यांना आपले हुकूम पाठवीत असे. हा बंडावा कांहीं मोठासा नव्हता; परंतु त्याच्यापासून त्रास होई व वसूल करण्याचे कामांत बरीच अडचण येई.

इ० स० १५८४ च्या प्रारंभीं अकबर फत्तेपूर शिक्रीसच होता. या सालच्या घडून आलेल्या प्रमुख गोष्टी ह्मटल्या ह्मणजेः–बंगाल्यांतील दंगाधोपा मोडून तेथें केलेली स्वस्थता; गुजराथेंतील बंडाचा उद्भव व बीमोड, अशीरगड व बऱ्हाणपूर येथील सुभेदारांनीं केलेला दंगा; दक्षिणेंत उत्पन्न झालेल्या धामधुमी व त्या वेळीं काबुलावर अंमल चालविणारा अकबराचा बंधु ह्याचा मृत्यु. हीं बंडें मोडलीं गेलीं व काबुलावर एका नवीन सुभेदाराची रवानगी झाली. साल अखेरीस बादशाहींत पुनः चोहोंकडे आबादानी झाली.

बादशहाच्या अति करारी व पक्कया दोस्तांपैकीं जयपुराचा राजा राणा भगवानदास हा होता. त्यानें फक्त स्वतःच समरांगणांत मोठमोठ्या पराक्रमांचीं कामें केलीं असें नाहीं; तर त्याचा पुतण्या मानसिंग यानेंही अकबराच्या सैन्यांत पहिल्या प्रतीचें अधिपत्य मिळविलें होतें. सांप्रत हा राजपुत्र पंजाबचा सुभेदार होता. याच घराण्यांतून अकबर बादशहानें या वेळीं युवराज सलीम, जो पुढें जहानगीर बादशहा झाला, त्याच्याकरितां एक वधू पसंत केली. हा लग्नसमारंभ फत्तेपूर शिक्री येथें मोठ्या थाटामाटाचा व महोत्सवाचा झाला. अकबराच्या राजवट्यापर्यंत महमुदीय पंथांतील राजाशीं सोयरीक करण्याच्या कल्पनेचा रजपूत राजे मोठ्या तिरस्कारानें अव्हेर करीत. परंतु राष्ट्रांत एकी करणें, व धर्मभेदामुळें व जातिभेदामुळें मनुष्यांत फरक पडत नाहीं, हें मूळतत्त्व व्यवहारांत आणणें ही तर अकबराची मोठी इच्छा होती. परंतु या बाबतींत लोकांचें व त्यांत विशेषेंकरून रजपुतांचे होऊन बसलेले अनेक ग्रह त्याला जिंकावे लागले. व अखेरपर्यंत मेवाडचा राजा राणा उदेसिंग याचा दुराग्रह त्यास काढून टाकितां आला नाहीं.

बाकीच्यांनीं इतका हट्ट धरला नाहीं. अकबर हा हिंदुस्थानांत हाकालपर्यंत अश्रुतपूर्व अशीं तत्वें स्थापीत आहे हें त्यांनीं पूर्णपणें ओळखिलें. त्याच्या दृष्टीनें गुण ह्मणजे गुण, मग तो हिंदुराजांत

असो वा युझबेक मुसलमानांत असो. गुणी मनुष्याची जात व धर्म हीं त्यास मोठ्या अधिकारांच्या जागीं नेमणूक होण्याच्या व मान्यतेला चढण्याच्या आड तो येऊं देत नसे. ह्मणून आपापल्या वंशपरंपरागत आलेल्या राज्यांत स्वतंत्रपणें सत्ता चालविली असतां आपणांस जी मान्यता प्राप्त झाली असती त्यापेक्षां फार जास्त व दूरवर पसरलेली अशी या मुसलमानी बादशाहींत मान्यता आपण भोगीत आहों असें राणा भगवानदास, मानसिंग, राजा तोडरमल इत्यादि पुरुषांस कळून आलें. ते बादशाही प्रांतावर अंमल चालवीत व बादशाही सैन्यावर सेनापत्य करीत, व बादशहाच्या अगदीं गुप्त सल्लामसलतींत त्यांचा प्रवेश असे. प्राचीन दुराग्रह व कलह समूळ नाहींसे करावेत व आपल्या चक्रवर्तित्वास अनुकूळ होणाऱ्या संस्थानिकांच्या वास्तविक सत्तेस कमीपणा न येऊं देतां आजपर्यंतचे त्यांमधील भेदाभेद मोडून सर्व राष्ट्राचें एक जीवित्व करावें व कोणाच्या वैभवास व इभ्रतीस धक्का बसूं न देतां आपलें सार्वभौमत्व स्थापावें हा अकबराचा मुख्य उद्देश होता.

हा हेतु साधण्याकरितां अकबरानें ज्या उपायांची योजना केली त्यांपैकीं एक आपण स्वतः व आपल्या घराण्यांतील इतर पुरुषांनीं एतद्देशीय राजांच्या मुलींशीं विवाह संबंध करावा हा होता. बरोबरीचें नातें स्थापित करणारें लग्नसंबंधासारखें दुसरें साधन नाहीं हें त्यास पूर्णपणें ठाऊक होतें. गादीस वारस असलेल्या शहाजाद्याशीं किंवा केव्हां केव्हां तर खुद्द तक्तावर विराजमान असलेल्या बादशहाशीं सोयरे संबंध असणें ह्मणजे आपली सत्ता व मानमरातब निर्धोक करणें होय, हें रजपूत राजांना कळून आल्याशिवाय राहिलेंच नसावें. अकबराच्या राजवट्यापूर्वीं हिंदुस्थान देशाची स्थिति कोणत्या प्रकारची होती, मागील पांच शतकांत मुसलमान राजांनीं मिळविलेले विजय देशांत सुसंबंध न स्थापितां तंटा व बखेडा आणण्यास कसे कारणीभूत झाले,

आणि हा बादशहा अल्पवयस्क, अनुभव नसलेला आणि कसोटीस न लागलेला असा असतां गादीवर येऊन त्यानें जो जो प्रांत जिंकिला त्या त्या प्रांतांत सुव्यवस्था व सुरळीत कारभार आणि न्याय व धर्मस्वातंत्र्य हीं स्थापित केलीं, किंबहुना या तत्वांचा प्रसार करावा याच उद्देशानें त्यानें देश मिळविले, जातिभेदामुळें किंवा धर्मभेदामुळें त्यानें मनुष्यांत ह्मणून कधीं फरक कसा तो मानिला नाहीं, या गोष्टींचा विचार मनांत येऊन, ईश्वरी अवतारावर साहजिक विश्वास ठेवणाऱ्या या रजपूतांस अकबराचे आंगीं कांहीतरी अमानुष व परमकृपावंत ईश्वरी अंशाचे गुण असावेत असें खचित वाटलें असावें.

त्यानें दिलेलें धर्मस्वातंत्र्य इतकें अनिर्बंध असे, त्यानें ठेविलेला विश्वास इतका दृढ असे, आणि त्यानें अंमलांत आणलेलीं तत्वें इतकीं व्यापक व उदार बुद्धीचीं होतीं कीं हे लोक आपले जातिमूलक, धर्ममूलक, व परिस्थितिमूलक दुराग्रह विसरले; व त्याच्या मोहास वश झाले. हिंदु नाहींत ते सर्व अपवित्र व अमंगल असा त्यांचा फार दिवसांचा ग्रह होता. पण नवीन राज्यपद्धतीचा पाया ह्मणजे सर्वांचें संमीलन, हें तत्व त्यांनीं मान्य केल्यावर त्यास प्रतिकूळ असलेला हा ग्रह मोबदला ह्मणून सोडून देण्यास जेव्हां अकबरानें त्यांस सांगितलें, तेव्हां एक खेरीज करून त्या सर्वांनीं तें ह्मणणें कबूल केलें. संमीलनाचें जें मोठें तत्व त्यास अपवाद खपावयाचा नाहीं, व अनार्यांशीं लग्नव्यवहार निषिद्ध ह्मणून सांगणारा आपल्या संकुचित धर्मपंथांतील जो एक भाग त्याचा त्याग करून वागलें असतां आपल्या देशास शांतता आणि वैभव व स्वतःस मान व प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या राज्यपद्धतीस अधिकच बळकटी आल्यावांचून राहणार नाहीं, हें त्यांच्या पूर्णपणें ध्यानांत आलें.

अकबर गादीवर बसल्याला तीस वर्षें लोटलीं. एकतिसाव्या वर्षास प्रारंभ झाला, तेव्हां त्याचा बंधु मरण पावला व युझबेक लोकांनीं सर-

हद्दीवरील बदकशान प्रांत व्यापून टाकून काबुलावर स्वारी करण्याची दहशत घातली आहे अशी खबर येऊन पोहोंचली. हा प्रसंग मोठ्या धोक्याचा आहे व या समयास आपण तेथें जातीनें गेल्यावांचून गत्यंतर नाहीं असें त्यास वाटलें. त्याप्रमाणें नोवेंबरमध्यें सैन्यासह तो पंजाबाला जाण्यास निघाला. दिसेंबर अखेर तो सतलज नदीपर्यंत जाऊन पोहोंचला व तेथून नीट रावळपिंडीस चालून गेला. काबूलचे प्रकरणाचा झोंक आपल्या हितास अनूकूल होण्याजोगा आहे असें या ठिकाणीं त्यास समजल्यावरून आपल्या नवीन बांधलेल्या अटकेच्या किल्ल्याकडे त्यानें मोर्चा फिरविला. या ठिकाणाहून राणा भगवानदासाचे बरोबर सैन्याची एक टोळी देऊन त्यास काश्मीर जिंकण्याकरितां रवाना केलें, दुसरी एक टोळी बलूची लोकांचें शासन करण्याकरितां पाठविली व तिसरी टोळी स्वातवर स्वारी करण्याकरितां दवडिली. यांपैकीं शेवटच्या मोहिमेवर मोठा कहर गुदरला. युसफझै लोकांनीं मोंगल सैनिकांनीं केलेला पहिला हल्ला हटवून लाविला इतकेंच नाहीं तर मागाहून अकबरानें आपला अत्यंत प्रीतींतला सरदार-राजाबिरबल–ह्याच्या समागमें पाठविलेली कुमक हल्ला करणारांना येऊन मिळाल्यावर देखील मोंगलांस त्यांनीं हांकून लाविलें. त्या युद्धांत बादशहाचे ८००० लोक नाश पावले; त्यांत राजा बिरबलही होता. हा बिरबल एक ब्राह्मण सरदार होता. तो कवि असून गंधर्वविद्येंत निपुण होता. त्याचें शील व दातृत्व हीं प्रख्यात होतीं. त्याच्या नकला, लहान लहान पद्यें व विनोदपर चुटके हिंदुस्थानांत अद्याप सर्वतोमुखीं आहेत. येथें मोंगलाचा जसा भयंकर पराभव झाला तसा पूर्वीं कधींच झाला नव्हता. या पराजयानें गेलेली कीर्ति पुनः मिळविण्यासाठीं बादशहानें आपला प्रमुख सेनाध्यक्ष राजा तोडर मल यास जयपूरचा राजा राणा मानसिंग बरोबर देऊन रवाना केलें. उभयतां सेनापतींनीं मोठ्या सावधगिरीनें डावपेंच चालविले. ते पुढें सरसावत,

ते तटबंदी करून मोठ्या काळजीनें. अखेरीस त्यांनीं खैबर खिंडींत युसफझै लोकांचा पराभव करून त्यांस अगदीं जेरीस आणिलें.

इकडे काश्मीरांत पाठविलेल्या मोहिमेची अवस्था बहुतेक याच्या सारखीच झाली होती. या स्वारीवरील सेनापति शुलिया नांवाच्या खिंडींत दाखल झाले व तेथें त्यांस समजून आलें कीं त्या प्रांतावर सत्ता चालविणाऱ्या मुसलमान सुभेदारानें त्यांची नाकेबंदी केली आहे. कित्येक दिवस ते अन्न सामुग्रीची वाट पहात बसले. पण इतक्यांत पर्जन्य व बर्फ पडण्यास सुरवात झाली. नंतर पुढें सरसावण्यास निघण्यापूर्वींच युझफझै लोकांनीं मोंगल सैन्याचा पाडाव केल्याची बातमी येऊन थडकली. तिच्या योगानें जी कांहीं थोडी बहुत हिंमत उरली होती तीही खचली. ह्मणून त्यांनीं घाई करून काश्मीरच्या राजानें अकबराचे नांवाचें सामंत व्हावें या अटीवर त्याच्याशीं तह केला. नंतर ते बादशहाकडे परत गेले. या मोहिमेंतील सरदारांनीं साहस मुळींच दाखविलें नाहीं. अकबरानें त्यांचें स्वागत केलें नाहीं व त्यांना दरबारांत येण्याची मनाई केली. परंतु त्याचे चित्तवृत्तींत दीर्घद्वेषास स्थानच नव्हतें. त्यानें त्यांस लवकरच क्षमा केली.

या तिन्ही स्वाऱ्यांपैकीं बलूची लोकांवर पाठविलेली मोहीम मात्र लवकरच विजयी झाली. हे नेटदार योद्धे प्रतिरोध न करितां मोंगल बादशहास वश झाले. राजा तोडरमल व मानसिंग यांच्या प्रयत्नांनीं खैबर खिंड खुली होतांच, अकबरानें यापैकीं दुसऱ्या राजास, ह्मणजे जैपूरच्या राजाचा पुतण्या व वारस यास काबुलांत सुभेदार नेमिलें; व बरोबर पुरेसें सैन्य देऊन त्याची तिकडेस रवानगी केली. इकडे युसफझै लोकांच्या प्रदेशांत राजा मानसिंगाचे जागीं व पेशावरास दुसरे लढाऊ लोक पाठवून तो प्रांत बळकट केला; व अकबर स्वतः लाहोरास परत गेला. येथून त्यानें काश्मीरावर दुसरी मोहीम रवाना केली. हें सैन्य तेथील सीमेजवळ पोहोंचतें इतक्यांत, ह्मणजे १५८७ च्या

ग्रीष्म ऋतूंत श्रीनगर येथें सत्ता चालविणाऱ्या राजाविरुद्ध तेथील रहिवाशांनीं बंड केलें. या योगानें बादशाही सैन्यास या प्रांतांत रिघाव करण्यास व तो काबीज करण्यास बिलकूल अडचण पडली नाहीं. तो सहजच मोंगल बादशाहीस जोडला गेला. हा प्रदेश अकबराच्या वारसांच्या राजवट्यांत ग्रीष्म ऋतूंत हिंदुस्थानांतील मोंगल बादशहांचें निवासस्थान झालें. खैबर खिंडीच्या तोंडाशीं जमरुड येथें दाखल होण्याकरितां राजा मानसिंग यास डोंगरांतील रहिवाशांशीं आणखी एक लढाई करून जिंकावी लागली. अखेरीस तो काबुलास जाऊन पोहोंचला. आणि तेथें त्यानें स्थायिक अशी राज्यव्यवस्था स्थापिली. परंतु रजपूत राजाचा अंमल आह्मांला पसंत नाहीं असें काबुली लोकांनीं व इतर जातींतील प्रमुख पुरुषांनीं अकबराकडे गाऱ्हाणें केलें; त्यावरून बादशहानें राजा मानसिंग यास सारख्याच हुद्यावर बदलून बंगाल्यांत पाठविलें. त्या प्रांतांत विशेषतः या प्रसंगीं अशाच कर्तबगारीच्या कडव्या अंमलदाराची अवश्यकता होती. त्याचे जागीं काबुलांत एका मुसलमान सुभेदाराची योजना केली आणि आपण काबूल पाहण्यास लवकरच येऊं असें अकबरानें ह्याच वेळेस जाहीर केलें.

अकबरानें प्रथमतः इ० स० १५८८ त सिंध प्रांत आपलासा केला. नंतर पुढच्या वर्षीं वसंतांत तो काश्मीरास जाण्यास निघाला. भीमबार येथें दाखल झाल्यावर त्यानें आपल्या जनानखान्यांतील बेगमांना शहाजादा मुराद याच्या समेत त्या ठिकाणीं ठेविलें व आपण घोड्यावर स्वारी करून ताबडतोब श्रीनगरास कूच केलें. पावसाळा लागेपर्यंत जवळपासचीं स्थळें पाहत तो तेथेंच राहिला. पावसाळ्याच्या तोंडाशीं त्यानें आपला जनानखाना रोटास येथें पाठविला. पुढें काबुलास जात असतां मार्गांत तो त्यास अटक येथें येऊन मिळाला. मार्गांतील डोंगरांवरील लोकांनीं प्रतिबंध करण्याचें सोडून दिल्यामुळें काबूल शहरास जाण्याचे सर्व मार्ग खुले होते, ह्मणून त्यानें अटक येथें सिंधुनद ओलांडिला.

तेव्हां तेथून काबूलचा प्रवास त्यास सुलभ झाला. बागबगीचे व इतर मनोरंजक स्थळें पाहत तो तेथें दोन महिने राहिला. "त्याचा सहवास थोरापासून तों गरीबापर्यंत सर्वांस हितावह झाला;" तो काबुलांत असतांनांच राजा तोडरमल मरण पावल्याची बातमी त्यास समजली. ही गोष्ट तारीख १० नोवेंबर सन १५८९ इ० रोजीं घडली. त्याच दिवशीं बादशहाचा आणखी एक विश्वासू हिंदु स्नेही—जयपूरचा राजा राणा भगवानदास—परलोकवासी झाला. अकबरानें नंतर काबूल, गुजराथ आणि जोनपूर येथील राज्यकारभाराची नवीन व्यवस्था केली व मग तो हिंदुस्थानाकडे परतला.

पूर्वी निर्दिष्ट केल्याप्रमाणें बंगाल्यांतील राज्यकारभाराची अकबरानें व्यवस्था लाविली होती. इ० स० १५९० सालाच्या प्रारंभीं राजधानीकडे परत येत असतां तो लाहोरास दाखल झाला. येथें तो मुक्कामास असतां गुजराथेंत नवीन नेमलेला सुभेदार—त्याच्या आवडत्या दाईचा मुलगा—हा काठेवाड व कच्छ प्रांतांत उद्भवलेल्या रणांत गुंतला आहे अशी खबर त्यास समजली. या रणाचा परिणाम अखेरीस असा झाला कीं बादशाही राष्ट्रास हे दोन्हीही प्रांत जोडिले गेले व पश्चिम हिंदुस्थानांत ज्या अफगाण वंशांतील राजानें दंगेधोपे चेतविले होते त्यानें आत्महत्या केली. लाहोर येथें असतां बादशहानें सिंध प्रांतांत पूर्ण स्वस्थता करण्याची संधि साधिली; कारण या प्रदेशांतील गोष्टी अनिष्टकारक होऊं लागल्या होत्या. हा प्रांत पूर्णपणें जिंकण्यास प्रथमतः अटकळ केली होती त्यापेक्षां जास्त अडचण पडली. हा इष्ट हेतु साधण्यास मोठमोठ्या सैन्यांची कुमक आणावी लागली, व निग्रह व सावधगिरी ही बरीच दाखवावी लागली. ही मोहीम एकसारखी दोन वर्षें चालू होती. आणि तितक्यांतच काश्मीरांत बंड उद्भवलें.

या दोन वर्षांत बादशहानें लाहोर हें सदरचें ठाणें केलें, सिंध

प्रांतांत विजय मिळेल अशी त्यानें अगोदरच अटकळ बांधिली होती. आपलें बहुतेक सैन्य भीमबाराकडे रवाना करून देऊन तो स्वतः चिनाब नदीचे कांठीं शिकार करीत होता. तेव्हां सिंध प्रांतांत संपूर्ण विजय मिळाला अशी बातमी येऊन पोहोंचतांच तो आपल्या मुख्य सैन्यास मिळण्याकरितां निघाला. मार्गांत त्यास अशी खबर समजली कीं, दारुण विरोध असतांही बिनीच्या सैन्यानें एका खिंडींत रिघाव केला. या गोष्टीनें लढाईचा निकाल लाविला. कारण, बंडखोर शिपायांस आपल्या पुढाऱ्याचा राग येऊन त्यांनीं रात्रौ त्याजवर हल्ला केला, त्यास ठार मारिलें, व त्याचें शीर कापून तें अकबराकडे पाठविलें. या पुरुषाबरोबर विरोधही नाहींसा झाला. तेव्हां अकबर घोड्यावरून श्रीनगरास चालता झाला. तेथें आठ दिवस राहून त्यानें त्या प्रांताचा बंदोबस्त केला. नंतर बरमुला खिंडीच्या मार्गानें तो रोटास येथें गेला व तेथून लाहोराकडे वळला. येथें असतां बंगाल्याचा सुभेदार राणा मानसिंग यानें ओरिसा प्रांत निखालस खालसा करून बादशाही मुलुखास जोडल्याची खबर अकबरास समजली. या राण्यानें ओरिसा प्रांतांत काबीज केलेले १२० हत्ती बादशहास नजर ह्मणून पाठवून दिले होते.

पुढील स्वारी विंध्याचलाच्या दक्षिणेकडील प्रांत जो दक्षिण देश या नांवानें प्रख्यात आहे, तो बादशाही अंमलाखालीं आणण्याच्या योजनेस प्रारंभ झाला. हा उद्योग ८ वर्षें चालू राहिला एकंदरींत ह्या उद्योगास यशच आलें. दौलताबाद, खेरवा, नाशीक, अशीरगड व अहमदनगर हीं बलाढ्य ठिकाणें पुष्कळ दिवस वेढा सोसून शेवटीं बादशाही सैन्यास वश झालीं. व अहमदनगराखालीं मोडणारा प्रांत इ० स० १६३७ पर्यंत जरी पूर्णपणें काबीज झाला नाहीं तथापि या वेळीं अकबरानें जो रवाब बसविला त्याचे योगानें मोंगलास प्राप्त झालेलें वर्चस्व निदान एक शतकपर्यंत तरी कायम राहिलें.

या दक्षिण हिंदुस्थानांतील मोहिमेंत तीन लक्षांत ठेवण्या जोग्या

गोष्टी घडून आल्याः—पहिली गोष्ट ही कीं या मुलुखांत विजय संपादण्याकरितां हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतून स्वतंत्रपणें मदत करण्यासाठीं जे सेनापति पाठविले त्यांच्यांत मोठेच कलह उत्पन्न झाले, ते इतके कीं, त्यांच्या शमनार्थ बादशहास आग्र्याहून प्रथमतः आपला जिवलग मित्र अबुलफझल यास पाठविणें भाग पडलें व मागाहून खुद्द त्यालाही तिकडे जावें लागलें. दुसरी, बादशहाचा मुलगा शहाजादा मुराद याचा जालना येथें अतोनात दारू पिण्यानें घडून आलेला मृत्यु. तिसरी, अबुलफझल आग्र्यास परत आल्यावर शहाजादा सलीम यानें मारेकऱ्याहातीं त्याचा केलेला वध. हा शहाजादा अकबराच्या बाकी राहिलेल्या मुलांत सर्वांत वडील असून गादीचा वारस होता.

चवदा वर्षें अकबर आपला दरबार लाहोरांतच भरवीत होता. परंतु दक्षिण हिंदुस्थानांत घडून आलेल्या नवीन गोष्टींमुळें त्यास १५९८ त तिकडेस जाणें भाग पडलें. त्यानें अहमदनगर व अशीरगड शत्रूंना आपल्या स्वाधीन करावयास लाविलें, शहाजादा दानियल यास खानदेश व वऱ्हाड प्रांतांचा सुभेदार नेमिलें, व अहमदनगराखालीं मोडणारा प्रांत पूर्णपणें काबीज करण्यास अबुलफझल याची नेमणूक केली. नंतर इ० स० १६०१ या वर्षी वसंतांत बादशहा परत आग्र्यास गेला.

ज्या गोष्टीमुळें अकबराला आग्र्यास जावें लागलें त्या मनाला फार क्लेश देणाऱ्या होत्या. बादशहास शहाजादा सलीमविषयीं बालपणापासूनच फार चिंता वाटत होती. बालपण जाऊन तो मोठा झाला तरी देखील ही चिंता यत्किंचित् कमी झाली नाहीं. सलीम जो पुढें जहानगीर बादशहा या नांवानें प्रसिद्ध झाला तो जात्या क्रूर स्वभावाचा होता व आपल्या मनोविकारांवर त्याला यत्किंत् सुद्धां दाब ठेवितां येत नव्हता. तो अबुलफझल याचा द्वेष करी, याचें आंतील खरें कारण असें होतें कीं बादशहाजवळ अबुलफझलचें जें वजन होतें त्याबद्दल शहाजाद्यास मत्सर वाटे. परंतु बाहेर सांगे तें कारण हें कीं हटवादी मुसलमानांचीं

जीं धर्मसंबंधी कोतीं मतें अकबरानें झुगारून दिलीं, तीं मुख्यत्वेंकरून ह्याच्याच उपदेशानें. अबुलफझल यास दक्षिण हिंदुस्थानांत पाठविलें आहे तेव्हां आतां मुलाचा क्रोधाग्नि शांत होईल अशी कांहीं वेळ अकबरास आशा वाटली होती; व तो स्वतः तिकडे जाण्यास निघाला, तेव्हां त्यानें सलीम यास आपल्या मागें राज्यकारभार चालविण्यास नेमिलें, आणि अजमीरचा सुभेदार हा किताब देऊन मेवाडच्या राण्याशीं पुनः उद्भवलेला संग्राम शेवटास लावण्याचें काम त्याजकडेस सोंपविलें, शिवाय शहाजाद्याचा कल पाहून विवाह संबंधानें त्याचा नातलग, राणा मानसिंग यास त्याचे मदतीकरितां रवाना केलें.

राणा मानसिंग व शहाजादा सलीम हे उभयतां मेवाडावर चाल करून निघाले इतक्यांत बंगाल्यांत बंडावा उद्भवल्याची बातमी येऊन पोहोंचली. राणा मानसिंग हा बंगाल्याचा सुभेदार असल्यामुळें या बंडाव्याचें निर्मूलन करण्याकरितां त्यास ताबडतोब तिकडे जाणें प्राप्त झालें. इकडे जवळ कोणी सलाहकार नसल्यामुळें सलीमच्या बुद्धींत विपर्यास आला. त्याचे हुकुमांत प्रचंड सैन्य होतें; तेव्हां बादशहा दक्षिणेंत गेला आहे, ही संधि साधून आपण गादी बळकवावी असें धाडसी कृत्य करण्याचा त्यानें निश्चय केला. ह्मणून मेवाडची स्वारी सोडून देऊन तो त्वरेनें सैन्यासह आग्र्यावर चाल करून गेला. तेथें किल्लेदारानें इमानास जागून किल्ल्याचीं दारें बंद केलीं. तेव्हां तो लगबगीनें अलाहाबादेस गेला; व तेथील किल्ला काबीज करून त्यानें बिहार व अयोध्या हे प्रांत सर केले व राजा हा किताब धारण केला.

ह्याच फितूरामुळें अकबर लगबगीनें दक्षिणेंतून निघाला. शाहाजाद्याचा स्वभाव पहिल्या पासून स्वच्छंदी व निरंकुश; तेव्हां झालेलें कृत्य क्षणिक मनोविकारांच्या प्रबलतेमुळें झालें असावें असें मानून अकबरानें त्यास शासन न करितां सामोपचारानें वळवावें असा निश्चय केला व एक पत्र लिहून आश्वासन दिलें कीं, जर तूं पुनः राजनिष्ठ झालास तर तुज-

वरील प्रेम कायम राहील, परंतु हट्ट करून आज्ञाभंग करण्याचें सोडून न दिलेंस तर मात्र भयंकर परिणाम होतील. हें पत्र शहाजादा सलीम ह्याचे हातीं पोहोंचलें तेव्हां अकबर थोड्या पण बादशाहींत नावजलेल्या निवडक अशा योद्धयांच्या सैन्यासह आग्र्या जवळ जवळ येत होता. सलीमचे डोळे आतां उघडले. आपलें या वेळीं कांहीं चालणार नाहीं; उलट दुराग्रहास पेटल्यास कदाचित् गादीसही मुकूं असें त्याला पक्कें समजून आलें. आणि ह्मणून त्यानें पत्राचा जबाब अगदीं नम्रतेचा दिला. परंतु त्याचे बोलण्यांत व करण्यांत मेळ नव्हता. पुढें कांहीं दिवसांनीं त्यास खबर लागली कीं बादशाही सैन्याचा बहुतेक भाग अद्याप दक्षिणेंतच आहे, तेव्हां तो इटावा येथें गेला, व मार्गांत ठिकठिकाणीं स्वार गोळा करूं लागला. त्याचा विचार असा होता कीं मोठा भव्य दळभार घेऊन नंतर मग ऐटीनें वडिलापाशीं जावें. परंतु अकबर असल्या काव्यानें फसला नाहीं. त्यानें आपले पुत्रास असा हुकूम फरमाविला कीं तूं एकतर थोड्याशा शिपायांनिशीं आग्र्यास ये नाहींपेक्षां अलहाबादेस परत जा.

शहाजादा सलीम यानें दुसरा मार्ग स्वीकारिला. त्या वेळेस त्यास बंगाला व ओरिसा हे प्रांत जहागीर देण्याचें अभिवचन ही दिलें होतें असें ह्मणतात. निदान त्यास हे प्रांत मिळाले खरे. हा अत्यंत नरमाईचा मार्ग स्वीकारण्याची प्रवृत्ति अकबरास कशामुळें झाली, आपलेपाशीं पुत्राचे मानानें दळभार कमी आहे असें दिसल्यामुळें, कीं स्वपुत्राशीं युद्ध करणें बरें न वाटल्यामुळें, कीं केवळ पुत्रवात्सल्यामुळें,—ह्याचा निर्णय आज मितीस करणें कठीण आहे. कदाचित् ह्या तीन्ही गोष्टींचा परिणाम होऊन त्यानें हा मार्ग स्वीकारला असेल. इतकें मात्र खरें कीं ह्या मार्गांत जरा कमकुवतपणाची झांक होती. आणि शेवटीं बंडखोर पुत्राकरितां आपण जी हार घेतली तिचा परिणाम ठीक झाला नाहीं असें बादशाहाला लवकरच दिसून आलें. सलीमचा द्वेषभाव कधींही तृप्त होणारा नव्हता व मनांत घेतलेलें तो कधीं विसरत नसे. तेव्हां अबुलफझल हा दक्षिणे-

तून फक्त थोड्याशा परिवारानिशीं परत येत आहे अशी संधि पाहून सलीमनें ओरछा येथील राजाचे मार्फत त्यास वाटेंत गांठून ठार मारविलें.

आपल्या मित्राचा खून झाल्यामुळें अकबराचे मनास मोठाच धक्का बसला. या अघोर कृत्यांत आपल्या मुलाचें अंग होतें हें त्यास सुदैवेंकरून अखेरपर्यंत कळलें नाहीं. या कृत्याबद्दल फक्त ओरछाचाच राजा गुन्हेगार आहे असें समजून त्याचें पारिपत्य करण्याकरितां बादशहानें आपली फौज त्यावर रवाना केली. तो गुन्हेगार राजा जंगलांत पळून गेला, व अकबर जिवंत होता तोपर्यंत–बादशहाचे मरणानंतर त्यास लपून राहणें जरूरच नव्हतें,–लपून राहून सैन्याच्या हातीं ह्मणून सांपडला नाहीं. इकडे बापलेकांचा समेट झाला; व बादशहानें आपल्या वडील मुलास आणखी एकदां मेवाडांतील दंगे नाहींसे करण्याकरितां रवाना केलें. हे दंगेधोपे ह्मणजे राणा प्रतापसिंग यानें मोंगलांच्या आधीन होण्याचें एकसारखें नाकारिलें, त्यामुळें झालेले. इ० स० १५७६ त हुलडीघाट येथें पराभव झाल्यावर त्या राण्यानें जंगलांत पळ काढिला. तेव्हां बादशाही सैन्य त्याच्या पाठीवर होतेंच. दैव एकसारखें इतकें हात धुऊन पाठीस लागलेलें होतें कीं शेवटीं एकसारखी अपजयाचीच माळ लागली तेव्हां आपल्या कुटुंबासह व आपणावर विश्वास ठेवणाऱ्या मित्रांसह मेवाडचा त्याग करून सिंधुनदाकांठीं दुसरें एखादें राज्य स्थापावें असा त्यानें निश्चय केला. याप्रमाणें तो निघाला होता; इतक्यांत त्याच्या प्रधानाच्या निरुपम स्वामिभक्तीनें मोंगलांशीं पुनः संग्राम चालूं ठेवण्याचीं साधनें त्यास मिळालीं. तेव्हां आणखी एकदां स्वारी करून नशीबाची परीक्षा पाहण्याचा त्यानें निश्चय केला. त्यानें विजयपरंपरेमुळें बेसावध झालेल्या शत्रूवर एकदम उलटून त्यांचे पिछाडीचा भाग हाणून पाडिला; व इ० स० १५८६ त चितूर आणि मंडलगड हे दोन किल्ले खेरीजकरून बाकीचा सर्व मेवाड प्रांत त्यानें परत आपल्या हस्तगत करून घेतला. तेव्हां चितूरचा संबंध तुटल्यामुळें त्यानें उदेपूर येथें नवीन

राजधानी स्थापिली. या राजधानीवरूनच पुढें त्याचे संस्थानास उदेपूर हें नांव प्राप्त झालें. इ० स० १५९७ त तो मरण पावला. त्या वेळपर्यंत त्यानें हार ह्मणून खाल्ली नाहीं. मागून त्याचा मुलगा आम्राराणा गादीवर बसला तो सांप्रत—ह्मणजे आपली हकीकत ज्या काळाला येऊन पोहोंचली आहे त्या काळीं—मोंगल सैन्यांनीं मेवाडांत चालविलेल्या एकंदर प्रयत्नांस दाद देत नव्हता.

शहाजादा सलीम यास ही सोन्यासारखी संधि मिळाली होती. स्वाधीन केलेल्या सैन्याचा जर त्यानें हिंमतीनें व जोमानें उपयोग केला असता तर, मेवाड प्रांत पूर्णपणें सर करण्यास पुरे इतकें बल त्याजपाशीं होतें. परंतु असल्या गोष्टींची त्यास इतकी थोडी अभिरुचि होती कीं अकबरानें त्यास शेवटीं परत बोलावून घेतलें व पूर्वीं अलाहाबादचा कारभार जवळ जवळ स्वतंत्र राजाधिकार देऊन त्याजकडे सोंपाविला होता, तिकडे त्यास पुनः पाठविलें. तेथें तो आपल्या स्वभावास रुचणाऱ्या अशा बाहेरख्यालींत व जास्त वाईट अशा दुर्व्यसनांत गर्क राहिला. आपल्या कर्तव्याविषयींचा, लैकिकाविषयींचा व त्याचप्रमाणें आपल्या विश्वासू नौकर चाकरांच्या जीविताविषयींचा त्याचा बेपर्वाईपणा शेवटीं इतका वाढला कीं, समक्ष गेल्यानें कांहीं उपयोग होईल अशा आशेनें अकबर स्वतः अलाहाबादेस जाण्यास निघाला. परंतु तो कायतो दोन मजला वाट चालून गेला इतक्यांत आपली आई अत्यावस्थ आहे अशी खबर आल्यामुळें त्यास परत जाणें भाग पडलें. तथापि आपणास ताळ्यावर आणण्याकरितां बादशहा आग्र्याहून निघाला येवढ्या गोष्टीनेंच शहाजादा सलीम याचे विचारांनीं व कृतींनीं उलट घेतली. बापाचें येणें आपले इकडे होत नाहीं त्या अर्थीं थोड्याशा परिवारानिशीं आपणच त्याच्या दरबारीं जावें असा त्यानें निश्चय केला. तेथें जाऊन सलीम बादशहास शरण गेला, परंतु त्यानें आपला वर्तनक्रम मात्र कांहीं सुधारला नाहीं. त्याचा वडील मुलगा शहाजादा खुस्रू याजबरोबर ही त्याचीं भांडणें होऊन दरबारांत एक आणखी उपहासास कारण झालें.

वस्तुतः बादशहास मुलांपासून सुख नव्हतें. त्याचीं पहिलीं दोन मुलें आवळींजावळीं होतीं तीं बाळपणींच वारलीं. तिसरा मुलगा, ज्याला चुकीनें पहिला असें ह्मणतात, तो शहाजादा सलीम. चवथा मुलगा मुराद. याचा अंत कसा झाला हें पूर्वींच सांगितलें आहे. पांचवा दानियल, हा उंच, दिसण्यांत सुरेख, सुदृढ बांध्याचा, घोडयाचा व हत्तीचा शोकी, व हिंदुस्थानी काव्यें रचण्यांत चतुर असा असे. परंतु मुरादासारखेंच याकाही दारूचें दुर्व्यसन लागलें होतें; व त्याच व्यसनामुळें या सुमारास त्याचा अंत झाला. या मृत्यूमुळें अकबराच्या मनास मोठा धक्का बसला. कारण या व्यसनातिशयापासून आपल्या मुलास निवृत्त करण्याची त्यानें पराकाष्ठा केली होती; व शहाजाद्याकडून मी आतां हीं व्यसनें सोडून देतों असें अभिवचनही त्यानें घेतलें होतें. राजवाडयांत बादशहाचे अनेक नातू होते. त्या सर्वांत शहाजादा खुरामाहा बादशहाचा जीव कीं प्राण होता. हाच पुढें जहानगीर बादशहानंतर शहाजहान या नांवानें बादशहा होऊन गादीवर बसला.

शहाजादा दानियल याच्या मृत्यूनें व ज्या कारणानें तो मृत्यू आला त्यानें बादशहास फार दुःख झालें असावें; या वेळीं तो आजारी होता त्याचे दुखण्याचा परिणाम एकच होणार हें लवकरच उघड दिसूं लागलें. बादशहाचे जवळील अमीर उमराव व सरदार ह्यांच्या मनांत एकदम गादीच्या वारसाविषयींचा विचार उत्पन्न झाला. बादशहाचे मुलांपैकीं शहाजादा सलीम हाच कायतो जिवंत होता. परंतु आग्र्यांत, अलाहाबादेंत व इतर ठिकाणीं त्याचें जें वर्तन नजरेस आलें, त्या योगानें दरबारी मंडळीचें मन त्याचे विरुद्ध झालें होतें. त्याचा मुलगा शहाजादा खुस्रू हा विमल कीर्तीचा पुरुष आहे असें त्यांनीं ओळखून ठेविलें होतें. शिवाय शहाजादा खुस्रू याची आई जोधपूरच्या घराण्यांतील असल्यामुळें त्याचें व राणा मानसिंग यांचें अगदीं जवळचें नातें होतें, आणि हा कार्यक्षम राणा राज्यांतील एक कर्ता पुरुष होता. दुसरें, खुस्रूनें, अकब-

राज्या आवडत्या दाईचा मुलगा असल्यामुळें प्रायः ज्याचें राजघराण्याशीं नातें होतें व जो बादशहाचे सैन्यांतील अति मोठा दरकदार होता त्या मुसलमान सरदाराच्या मुलीशीं लग्न लाविलें होतें. तेव्हां या दोन्ही सरदारांनीं संगनमत केलें व ते शहाजादा सलीम यास वगळून खुस्रू यास तक्तावर बसविण्याच्या खटपटीस लागले. हा हेतु साधण्याकरितां या उभयतां सरदारांनीं अकबर आग्र्याच्या किल्ल्यांतील राजवाड्यांत आजारी पडला होता त्या किल्ल्यावर आपल्या सैन्याचा पहारा ठेविला. कर्म-धर्म संयोगानें अकबराचा एव्हांच अंत झाला असता तर आपसांत मोठी लढाई माजली असती; कारण सलीम आपला हक्क निमुटपणें सोडणार नव्हता. परंतु हा कट सलीमला कळून आल्याबरोबर त्याला आपल्या जीविताविषयीं भीति वाटून तो आग्र्याहून निघाला व थोड्या अंतरावर जाऊन राहिला. हें दुखणें आपलें शेवटचें आहे असें अकबरास पूर्ण-पणें अवगत होतें. तेव्हां अशा प्रसंगीं शहाजादा सलीम संनिध नाहीं असें पाहून त्याच्या मनाला मोठा विषाद वाटला. शिवाय, कायदेशीर-पणाची त्यास अत्यंत आवड असल्यामुळें त्यानें आपले अमीर उमराव आपल्या सभोंवती बोलाविले; व त्यांच्यासमोर शहाजादा सलीम हा माझ्या मागें गादीचा योग्य वारसदार आहे असें त्यांस कळविलें व खुस्रू यास बंगालची सुभेदारी देऊन त्याची तरतूद केली जावी अशी आपली आशा त्यानें प्रगट केली.

अकबराचें वजन या समयीं जेवढें दृष्टीस पडलें तसें पूर्वीं कधींही दिसलें नव्हतें. आपली आज्ञा भंग करणाऱ्या व कृतघ्न अशा मुला-विरुद्ध बादशहाचा एक रागाचा शब्द त्याला गादीला मुकविण्यास बस होता. तसेंच दुसऱ्या पक्षीं त्यास अनुकूळ असे उद्गार निघाल्या-मुळेंच केवळ, अति बलाढ्य अमीर उमरावांस बादशाहाची शेवटची इच्छा पुरी करावीसें वाटलें. कच्च्या मनाचे आणि डळमळीत असे जे होते त्यांची ही तिकडेसच प्रवृत्ति कायम झाली. सैन्यांतील अति मोठा

सरदार, शाहजादा खुस्रू याचा प्रत्यक्ष सासरा, ज्यानें नुक्तेंच थोड्या दिवसापूर्वी खुस्रूचा पक्ष सबळ करण्याकरितां राणा मानसिंग याच्याशीं राजकारण सुरू केलें होतें, त्याला देखील बादशहाचें वजन अपरिहार्य झालें. त्यानें खाजगी रीतीनें शहाजादा सलीम याजकडेस जासूद पाठवून आपल्या अनुकूलतेविषयीं खातरी दिली. या आणीबाणीच्या विशेष प्रसंगीं सर्वांहून भारदस्त असलेला जो राणा मानसिंग त्यानें देखील आपण एकटेच राहिलों असें पाहून सलीम यानें लाविलेलें बोलणें मान्य केलें व त्याची बाजू धरण्याचें अभिवचन दिलें. याप्रमाणें आपणास आतां गादी मिळण्यास आडकांठी राहिली नाहीं अशी खात्री झाल्यावर, शहाजादा सलीम राजवाड्यांत गेला. तेथें मरणोन्मुख झालेल्या अकबरानें त्याची गांठ ममतापूर्वक घेतली. या भेटींत ज्या गोष्टी घडल्या त्या शहाजाद्यानें वर्णन केल्यावरूनच माहीत झाल्या आहेत.

प्रथम ममतेचे कुशल प्रश्न झाल्यावर अकबरानें सर्व अमीर उमराव व सरदार माझे समक्ष बोलवावे अशी शहाजाद्यास आज्ञा केली; कारण, तो ह्मणाला " जे आज वर्षोगणती माझ्या श्रमांचे व कष्टांचे विभागी झाले व ज्यांनीं मजबरोबर वैभव अनुभविलें त्यांच्यांत व तुझ्यांत कोणत्याही प्रकारचा बेबनाव राहावा हें माझ्याच्यानें साहवत नाहीं." नंतर जेव्हां हे अमीर उमराव व सरदार आले व त्यांनीं बादशहास मुजरा केला तेव्हां तो त्या सर्वांस ह्मणून दोन शब्द बोलला. नंतर त्यानें एकामागून एक असे प्रत्येक सरदाराकडे न्याहाळून पाहिलें व तुमच्यापैकीं कोणाचें माझे हातून बरें वाईट झालें असल्यास मला क्षमा करा असें त्यांना विनंतिपूर्वक सांगितलें. तेव्हां शहाजादा सलीम यानें बादशहाच्या पायावर साष्टांग नमस्कार घातला व डोळ्यास पाणी आणिलें. अकबरानें खूण करतांच परिवारांनीं मुलाच्या कमरेस बादशहाची खास तरवार बांधिली व दरबाराचा शिरपेंच व पोषाख त्यास घातला. हें झाल्यावर राजवाड्यांतील

स्त्रीवर्ग त्याच्या हवालीं केला. माझ्या पुरातन मित्रांस व सोबत्यांस ममतेनें व आदरानें वागवावें ह्मणून शहाजाद्यास आग्रहपूर्वक सांगितलें व मग आपलें डोकें लववून त्यानें प्राण सोडिला. ही गोष्ट तारीख १९ माहे अक्टोबर सन १६०९ इ० रोजीं घडली. तेव्हां त्याच्या वयास ६३ वर्षें पुरीं होऊन एक दिवस जास्त झाला होता; असो.

ह्याप्रमाणें मोंगल बादशाहीचा खरा संस्थापक शांत मनानें परलोकवासी झाला. अकबर आपल्या आजापेक्षां व बापापेक्षां जास्त दैवशाली, जास्त दूरदर्शी व जास्त कल्पक होता. व तसेंच असेंहि ह्मणतां येईल कीं, त्याला कर्तृत्व दाखविण्याचे अधिक प्रसंगही मिळाले. कोणाची तरी सार्वभौम सत्ता कबूल केल्याशिवाय निर्भयता, खरें स्वातंत्र्य, व आपल्या धर्माप्रमाणें आणि परंपरायत रीतीप्रमाणें वागण्याची मुभा, हीं अनुपम सुखें प्राप्त होणार नाहींत, असें हिंदुस्थानांतील नानाविध जातींच्या प्रत्ययास आणून खात्री करून देण्यास पुरे, इतका काल पावेतों तो ईश्वर कृपेनें जगला. जातीसंबंधानें दुराग्रह ह्मणून कसा तो त्यास ठाऊक नव्हता. तो सर्व जातीचे प्रजेस मानमरातब व रोजगार धंदा देई; मग ते युझबेक असोत, अफगाणी असोत, हिंदू असोत, पारशी असोत, वा ख्रिस्ती असोत; मात्र ते प्रामाणीक, बुद्धिमान व नेकीचे असले ह्मणजे झालें. या निरनिराळ्या जातींना कळून आलें कीं, ह्यानें ४९ वर्षें राज्यशकट चालविला त्या अवकाशांत हिंदुस्थानांत परकीयांच्या स्वारीपासून काडीमात्र उपद्रव झाला नाहीं. देशांतील एकंदर शत्रु त्यानें, कांहीं संग्राम करून व कांहीं सामोपचारानें, असे आपल्या अंकित करून टाकिले; व त्याला दुसरा मार्ग ह्मणजे सामोपचारच जास्त पसंत होता. त्याच्या पश्चात महमद अमीन यानें लिहिलेल्या इतिहासांत ह्मटलें आहे कीं 'हिंदुस्थानच्या चारी ही दिशांवर त्याचा अंमल न्यायी व दृढ अशा प्रकारचा होता. हरएक तऱ्हेचे व हरएक दर्ज्याचे सर्व लोक त्याच्या दरबारांत असत. चोहोंकडे व सर्व जातींत व वर्गांत

एकंदर सर्व शांतता असल्यामुळें प्रत्येक वर्णाचे लोक सुरक्षितपणें नांदत होते. अकबर बादशाही या तऱ्हेची होती. मनुष्य ह्या नात्यानें अकबर कसा होता हें आतां पाहणें राहिलें आहे. तें पुढील भागांत पाहूं.

# भाग १२ वा.

## देशांतील राज्यकारभार व आईन ए अकबरी.

॥ प्रजानां विनयाधानाद्रक्षणाद्भरणादपि ॥
॥ स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः ॥

॥ संरक्षिलें प्रजेला शिकवुनियां उन्नतीस ही नेलें ॥
॥ नच जन्मदात पितरां, नृपतिकडे तरिपितृत्व परि आलें ॥

"राज्यकारभाराचीं जीं तीन राजकीय, सामाजिक, व धर्मविषयक अंगें आहेत त्यांत फार किंवा थोडें यश संपादणें, व प्रजाजनांच्या इच्छा पूर्ण करणें या गोष्टी, राजा आपल्या काळाचा विनियोग जसा करितो त्यावर अवलंबून असतात," असें आईन ए अकबरी रचणाऱ्या इतिहासकारानें लिहिलें आहे.

ही कसोटी लावून पाहिलें असतां, अकबरास, बादशहा या नात्यानें व साधारण मनुष्य या नात्यानें जें यश प्राप्त झालें त्याचा कार्यकारण-संबंध तर्कशास्त्राचे सिद्धांतांस अनुसरून लावितां येतो. तो पद्धतशीर होता, इतकेंच नाहीं तर त्याचे पद्धतींत सदासर्वदा ही उत्कट इच्छा दिसून येत होती कीं, प्रजाजनांच्या अंतःकरणांत जिचा पाया बांधिला आहे व जी राज्य करणाऱ्या व्यक्ति-विशेषावर अवलंबून राहणार नाहीं, अशी राज्यरूपी इमारत उभारण्याचा आपल्या जन्माचा जो मोठा हेतु त्यास साधक कोणतें व वस्तुतः रास्त कोणतें ह्याचें नित्य मनन करावें व त्याप्रमाणें वागावें. हा हेतु साधण्याकरितां त्यानें जे उपाय योजिले त्यांचें खुलासेवार सविस्तर विवरण करण्यापूर्वी त्याचें मनच स्वभावतः

कसें होतें व मनुष्यजातीच्या धर्मविषयक गोष्टींचा त्यावर काय परिणाम झाला होता याचा आपण प्रथम विचार करूं. कारण, ही गोष्ट एकदां समजली ह्मणजे त्याच्या राजनीतीचा पायाच मिळाला असें होईल. याहून अधिक महत्वाचें कोणचेंही कोडें आपणांस सोडविणें नको. त्या काळचा मोठा प्रश्न हा होता कीं, संख्येनें थोडे व आपणांखेरीज इतर धर्मांतील सर्व लोकांस सतत नरकवासच भोगला पाहिजे असें समजणारे जे विजयी मुसलमान लोक, त्यांच्या अधिपतींला, हिंदुप्रजाजनांनीं अशक्य ह्मणूनच ह्मटलें असतें इतके पूर्ण रीतीनें आपले दुराग्रह सोडून द्यावे, अशी त्यांची प्रीती व विश्वास मिळवितां येईल कीं नाहीं? हें महत्कृत्य साधावयाचें तें केवळ अकबराच्या मनावर, स्वभावावर, आणि परधर्मीय लोकांचे विचार मोकळेपणानें स्वीकारण्याचे व न्याय्य रीतीनें समजण्याचे शक्तीवर अवलंबून होतें. या बाबतींत उदात्त व उदार अशा राजनीतीच्या वृद्धीस खरोखर प्रतिकूळ असा त्या वेळचा काळ होता.

मुसलमानलोक हे नुसते देश जिंकिणारे होते असें नाहीं; तर ते तरवारीच्या बळानें आपल्या धर्माचा विस्तार करणारेही होते. या काळाच्या इतिहासकारांपैकीं बदोनी या नांवाच्या इतिहासकाराच्या लेखांतील प्रत्येक पानांत हिंदूधर्माविषयीं व त्या धर्माच्या लोकांविषयीं, पेगमबराच्या निस्सीम अभिमान्यांना जो तिरस्कार वाटत होता तो स्पष्ट दिसून येतो. हा तिरस्कार फक्त हिंदूधर्माविषयींच होता असें नाहीं. महमुदीयपंथाव्यतिरिक्त इतर ईश्वरोपासनेच्या सर्व धर्मांविषयीं त्यांस सारखाच तिटकारा असे.

अशा पंथांत अकबराचा जन्म झाला, परंतु जन्मतःच त्याची बुद्धि विचक्षण व कोणतीही गोष्ट गृहीत ह्मणून न घेणारी अशी होती, हे ब्रह्मधर्मानुयायी ( हिंदु ) आहेत ह्मणून यांना सदैव नरकवास घडणार, अशी ज्या राजासंबंधानें त्याच्या दरबारांतील मंडळीच्या मनाची समजूत

होती, ते पुरुष स्वामिभक्ति, एकनिष्ठा, औदार्य इत्यादि सद्गुणगणांनीं संपन्न आहेत, असें तो ल्हान असून शिकत होता त्या काळीं त्याचे नजरेस अनेकदां आलें. त्याचे लक्षांत आणखी असेंही आलें कीं आपल्या प्रजेंत मुख्य भरणा ह्मणजे हिंदूंचा, त्यांत अशा प्रकारचे उदारशील व सद्गुणमंडित पुरुष पुष्कळ आहेत. याशिवाय, त्याच्या ध्यानांत आणखी असेंही आलें कीं ह्यांपैकीं अनेक लोक अति प्रामाणिक व राजनिष्ठ असून राजाचा धर्म स्वीकारिला असतां आपणास व्यवहारदृष्ट्या मोठें हितकर होईल असें उघडपणें दिसत असतांही, तो न अंगिकारितां "स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः" या भगवद्वचनास स्मरून आपल्याच धर्मास चिकटून राहिले. मी जेता आहे, मी राज्यसत्ता चालविणारा आहे, आणि माझा जन्म महमुदीय पंथांत झाला आहे, तेव्हां तोच पंथ मनुष्यमात्रांनीं खरा मानिला पाहिजे, ही कल्पना ग्रहण करणें, अगदीं प्रारंभापासून त्याच्या विचारशील बुद्धीस प्रशस्त वाटत नसे. हळू हळू हे विचार पुढील शब्दांनीं व्यक्त झाले "जर मलाच धर्ममार्गाची वाट सांपडली नाहीं तर ती इतरांस दाखविण्याचा अधिकार मजकडे आहे, असा तोरा मी तरी कां मिरवावा?" पुढें जसजशीं इतर संप्रदायाचीं व धर्ममार्गाचीं मतें त्यास अवगत होऊं लागलीं, तसतशीं स्वधर्माच्या बाबतींत त्याच्या ज्या खऱ्या शंका होत्या त्या सुदृढ झाल्या. धर्माभिमानाचा—मग तो कोणत्याही पंथाचा असो—हटवाद व अनुदारपणा प्रत्यहीं त्याच्या नजरेस पडूं लागला, तेव्हां तर सर्वत्रांस धर्मस्वातंत्र्याची मुभा असलीच पाहिजे, असें त्याचें मत जास्त जास्त दृढ होऊं लागलें.

अकबराच्या धर्मसंबंधी विचारांत झालेला हा जो फरक तो एकदम झाला असें नाहीं. इतिहासकार बदौनी, जो दुराग्रही मुसलमान होता ह्मणून, त्याचे मतें बादशहाच्या झालेल्या धर्मभ्रष्टतेविषयीं ज्यास फार खेद वाटत असे, त्यानें या बाबतींत लिहिलें आहे कीं:—"अगदीं बालपणापासून तों तरुणपणापर्यंत व तरुणपणापासून तों वार्धक्यापर्यंत

बादशहाचीं कितीतरी धर्मसंबंधी अनेक तऱ्हेचीं विचारांतरें झालीं, आणि तो बहुतेक सर्व प्रकारच्या धर्माचारांतून व नानापंथांतून गेला, व आपल्या आंगीं असलेल्या क्षीरनीर निवडण्याच्या विशेष चातुर्यानें व त्याचप्रमाणें महमुदीय धर्माच्या प्रत्येक तत्वास असंमत अशा शोधक बुद्धीनें, निरनिराळ्या ग्रंथांत सांपडणाऱ्या हरएक धर्मरहस्याचा त्यानें संग्रह केला." अशा प्रकारें त्याच्या हृदयरूपीं आरशांत अनेक धर्मांच्या मूलतत्वांपासून उत्पन्न झालेलें नवीनच एक धर्मविचारांचें प्रतिबिंब उमटलें गेलें; व मनावर अनेक प्रकारचे संस्कार घडत गेल्यामुळें त्याच्या मनावर दगडावरील वळणाप्रमाणें असा ग्रह पक्का होत गेला कीं, प्रत्येक धर्मांत सूज्ञ असे लोक असतात, व प्रत्येक देशांत दुराग्रह सोडून संथपणें विचार करणारे, व ईश्वरी अनुग्रह झालेले, असे अवतारी पुरुष सांपडतात. तेव्हां तो अशी कोटी लढवूं लागला कीं, जर कांहीं तरी सत्यज्ञान चोहोंकडे आढळून येतें, तर तें एक—धर्मांतर्गतच कां असावें? किंवा तें ज्याची प्रवृत्ति होण्यास पुरीं सहस्र वर्षेंही झालीं नाहींत व ह्मणून जो इतरांशीं तोलतां आधुनिक आहे, अशा फक्त पेगमबराच्याच धर्मांत कां असावें? आणि एका पंथानें प्रतिपादिलेला सिद्धांत दुसऱ्या पंथानें असत्य ह्मणूनच कां मानावा? त्याचप्रमाणें ज्यास कोणत्याही प्रकारच्या श्रेष्ठत्वाचा अनुग्रह झालेला नाहीं, अशा पंथानें वरिष्ठपणाचा तोरा तरी कां मिळवावा?

हाच बदौनी आणखी असें ह्मणतो कीं, अकबर बादशहा ब्राह्मण व सन्याशी यांजबरोबर धर्म विषयांवर उहापोह व वादविवाद करी; व त्यांच्यापासून झालेल्या संस्कारामुळें आत्म्याच्या पुनर्जन्माचा सिद्धांत त्यानें ग्रहण केला. तथापि, अकबराच्या धर्मसंबंधीं विचारास जी दिशा मिळाली तीस फैझी व अबुलफझल हेच मुख्यत्वें कारणीभूत झाले, या विषयीं तिलप्राय शंका नाहीं. हे दोघे भाऊ अकबर बादशहाप्रमाणेंच पेगमबराचे धर्मांत जन्म होऊन त्यांतच लहानाचे मोठे झाले होते. या उभयतां विख्यात व वजनदार पुरुषांचा थोडासा वृत्तांत देणें अवश्य आहे. यांचा

बाप आरब असून शेख होता. त्याचें नांव शेख मुबारक हें होतें. त्याचे पूर्वज राजपुतान्यांत नागोर शहरीं घरदार करून सुखवस्तू राहिले होते. शेखमुबारक यानें आपल्या पूर्वजांच्या धर्मशास्त्राचें अध्ययन इतकें आस्थापूर्वक केलें कीं, धर्मशास्त्रांतील प्रत्येक छाया व उपछाया त्याला पूर्णपणें अवगत झाली. तो बुद्धीचा विचक्षण असून त्याची कल्पनाशक्ति व्यापक होती; व ज्ञानाचा जसजसा संस्कार होत गेला, तसतसे त्याचे विचार उन्नत व प्रगल्भ झाले. अशा थोर पुरुषानें आपल्या मुलांना जें शिक्षण दिलें, त्याचा संस्कार त्यांचे मनावर, त्यांची धारणाशक्ति व ग्रहणशक्ती विशेष असल्यामुळें, इतका उत्तम झाला कीं ते कोणत्याही समाजांत तेज पडण्यासारखेच झाले. वडील मुलगा शेख फैझी हा, शेख मुबारक आग्र्याच्या जवळ जाऊन राहिला होता, तेथें इ० स० १५४७ या वर्षी जन्मला. यावरून तो अकबरापेक्षां पांच वर्षांनें लहान होता, असें दिसून येतें. अकबर बादशहानें वायव्येकडील प्रांत पुनः जिंकिल्यानंतर लवकरच, शेखफैझी यानें वैद्यकीच्या व ग्रंथरचनेच्या साध्या व शांतपणाच्या व्यवसायास आरंभ केला. तेव्हां त्याचें वय सुमारें पंचवीस वर्षांचें होतें. थोड्याच वेळानें तो कवि ह्मणून प्रख्यातीस चढला. तो जात्या उदारशील होता व वैद्यकीच्या धंद्यांत त्यास मिळकतही खूप असे. यामुळें त्याला परोपकारांचीं कृत्यें करावीसें वाटलें, व त्यानें गोरगरिबांस औषधपाणी फुकट देण्याची वहिवाट घातली.

धर्माच्या बाबतींत त्यानें आपल्या बापाचाच कित्ता गिरविला; ह्मणजे त्याची प्रवृत्ति त्यावेळीं आपल्या जनांस मान्य अशा शिया पंथाकडे होती. असें सांगतात कीं, एके प्रसंगीं शेखफैझी यानें थोडीशी जमीन मिळण्याकरितां एका काजीकडे अर्ज केला असतां, अर्जदार शिया आहे ह्मणून त्या सुन्नी कामगारानें तो नामंजूर केला; इतकेंच नाहीं, तर भर कचेरींतून त्याची अवहेलना व मानहानि करून त्यास हांकून लाविलें. काजी ह्मणजे निःपक्षपाती असा त्या वेळचा समज असे हें लक्षांत ठेवावें. पुढें

शेख फैझीच्या अलौकिक गुणांची कीर्ति चोहोंकडे पसरली होती, ती ऐकून अकबरानें त्यास चितूरला वेढा घालून त्याचें गोट होतें तेथें येण्याविषयीं निमंत्रण पाठविलें. शेख फैझीचे शत्रु, जे जुन्या अथवा सुन्नी पंथाच्या मुसलमानांत जास्त होते. त्यांना ही बातमी समजली तेव्हां बादशहा याचें आतां खास पारिपत्य करणार, व येवढ्याच करितां त्यानें हें निकडीचें पाचारण केलें असावें, असें मानून त्यांनीं आग्र्याच्या सुभेदारास सुचविलें कीं, न जाणो कदाचित् फैझी पळून जाईल, सबब त्यावर चांगलें ध्यान ठेवावें; परंतु पळ काढून सुटका करून घेण्याची कल्पना फैझीच्या मनीं मानसींही नव्हती. त्यास कैद्याप्रमाणेंच अकबराचे गोटांत नेऊन पोहोंचविलें. पण दरबारीं बादशहानें त्याचें स्वागत बहुमानानें केलें व त्याच्या बहुविधज्ञानानें बादशहाची चित्तवृत्ति इतकी तल्लीन होऊन गेली कीं, त्यानें थोडक्याच दिवसांत त्यास आपल्या दरबारांत नेमणूक करून दिली; व शहाजाद्यांचें ह्मणजे आपल्या मुलांचें उच्च प्रतीचें शिक्षण देण्याचें काम त्याजकडेस सोंपविलें. प्रसंगविशेषीं बादशहा त्यास परराज्यसंबंधीं वकीलीवरही पाठवी.

शेख फैझीस फुरसत विपुल असे व तो तिचा विनियोग काव्यरचनेकडे करी. त्याचे तेहतीसावे वर्षीं राजकवीच्या जागीं त्याची नेमणूक झाली. पुढें सात वर्षांनीं तो मरण पावला. अखेरपर्यंत बादशहाची मर्जी त्यावर असे. त्याचा समागम बादशहास अत्यंत सुखदायक वाटत असे; व त्याच्या संभाषणानें तर तो आनंदसागरांत निमग्न होई. त्यानें एकशेंएक पुस्तकें लिहिलीं असें ह्मणतात. त्याचा पुस्तकाचा भरणा फार नामी होता व त्यांत निवडक असे ४३०० हस्तलिखित ग्रंथ होते. त्यांची बादशहानें आपल्या पुस्तकसंग्रहांत भर घातली.

शेख फैझीवर बादशहाची अत्यंत कृपा होती हें खरें पण त्याचा भाऊ शेख अबुलफझल—आईन ए अकबरीचा कर्ता यावर तर त्याहूनही जास्त मर्जी होती. हा आग्र्याजवळ तारीख १४ जानेवारी सन १५५१

रोजीं जन्मला. भावाप्रमाणें त्यालाही बापानें दिलेल्या उदार व विविध शिक्षणाचा लाभ मिळाला होता. आपल्या बापाची विशाल बुद्धि, विचाराटवींत स्वैरपणें फिरूं लागल्यामुळें ज्या मताकडे त्याचा कल झाला त्यामताबद्दल त्याला घातलेला बहिष्कार, व बहिष्काराहूनही अधिक दुःखें सहन करावीं लागलीं, ही गोष्ट त्याच्या लक्ष्यांत आल्याशिवाय राहिली नाहीं; व त्याबद्दल तो मनांतल्या मनांत चडफडत होता. याचा परिणाम हा झाला कीं, त्या मुलाचे मनावर धर्मस्वातंत्र्याचा ठसा उमटला. शिवाय विपत्तीमुळें ज्ञानार्जनाचे कामीं त्यानें मोठ्या जोरानें अश्रांत मेहनत केली व त्याच्या वयास पुरी पंधरा वर्षें लोटलीं नाहींत तोंच त्यानें तर्कज्ञान व इतिहासकथादि अनेक शास्त्रांत व त्यांच्या निरनिराळ्या शाखा व उपांगें यांत पारंगतता मिळविली व विशी उलटण्यापूर्वींच त्यानें शिक्षकाच्या धंद्यास सुरुवात केली.

येवढ्या लहानशा वयांत त्याच्या अध्ययनाचा विस्तार केवढा जबर होता याविषयीं प्रोफेसर ब्लॉकमन, आईन ए अकबरीचा भाषांतरकार, ह्यानें एक मोठी मौजेची गोष्ट सांगितली आहे; ती अशीः—“ एके प्रसंगीं इकफहानी या नांवाच्या विख्यात ग्रंथकाराचा एक अपूर्व हस्तलिखित ग्रंथ त्याचे हातीं पडला. परंतु दुर्दैवेंकरून हा ग्रंथ अग्निमुखीं पडल्यामुळें त्यांतील प्रत्येक पानाचा अर्धा भाग अगदीं वरपासून तों थेट खालपर्यंत पूर्णपणें जळून गेलेला अथवा वाचावयास दुर्बोध असा झालेला होता. अबुलफझल यानें असल्या दुर्लभ ग्रंथाचा उद्धार करण्याचा निश्चय केला. त्यानें त्या पुस्तकाचा जळालेला भाग कापून काढून त्या ठिकाणीं प्रत्येक पानास नवीन कागद जोडिला; व मग नष्ट झालेली एकूनएक ओळ पुनः जुळविण्यास सुरवात केली. तें पुस्तक विचारपूर्वक अनेकवार वाचून शेवटीं त्या कार्यांत त्यानें यश मिळविलें. पुढें कांहीं दिवसांनीं कर्मधर्मसंयोगानें त्याच ग्रंथाची दुसरी एक सबंध प्रत सांपडली. तेव्हां या मूळ प्रतीशीं अबुलफझलनें रचलेल्या प्रतीचा मुकाबला पाहतां त्यांत

अनेक स्थळीं नवीन शब्दरचना व कित्येक स्थळीं तर नवीन प्रमाणें दाखल केलेलीं आढळलीं खरें. तथापि एकंदरींत ह्या नवीन जुळलेल्या भागाचें मुळाशीं इतकें विलक्षण साम्य दिसून आलें कीं, येवढ्या मोठ्या कठिण ग्रंथकाराची विचारसरणी व भाषापद्धति अबुलफझल यास पुरी अशी साधितां आली, याबद्दल त्याचे इष्टमित्रास फारच कौतुक व आश्चर्य वाटलें. ”

निसर्गतःच अबुलफझल याची विद्याभ्यासाकडे निस्सीम प्रवृत्ति असल्यामुळें बादशाही दरबारांत येण्याकरितां अकबरानें त्यास निमंत्रण पाठविलें असतांही, कांहीं दिवसपर्यंत त्यानें तें मान्य केलें नाहीं. परंतु त्याचा वडील भाऊ फैझी व बादशहा यांच्यांत जो वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें स्नेहसंबंध जडला होता, त्या योगानें ज्या विशेष मैत्रीविषयीं अकबर अगदीं उत्सुक झाला होता त्या मैत्रीचा मार्ग सुगम झाला; व इ० स० १५७४ च्या प्रारंभीं, फैझीचा भाऊ ह्मणून अबुलफझल यास जेव्हां बादशहास भेटविलें, तेव्हां त्याचें स्वागत व मानमान्यता अकबरानें इतक्या उत्तम तऱ्हेनें केली कीं, “निस्पृहस्य तृणं जगत्” या ह्मणीप्रमाणें कोणाची पर्वा न बाळगतां उदात्त रीतीनें एकांतवासीं राहण्याचा जो त्यानें निश्चय केला होता, त्याजविषयीं पुनः विचार करून त्यानें तो सोडला. या वेळीं त्याच्या वयाचीं नुक्तीच काय तीं तेवीस वर्षें उलटलीं होतीं. परंतु या अवकाशांत आपल्या जन्मभूमींत जितकें ह्मणून ज्ञानभांडार होतें, तें सर्व त्यानें आपलेसें करून टाकिलें होतें. त्यानें स्वतःच लिहून ठेविलें आहे कीं:—“माझ्या मनास शांति ह्मणून ठाऊक नव्हती. माझें अंतःकरण मंगोलियांतील परमहंस पुरुषाकडे व लेबेनॉन पर्वतावरील साधूंकडे वेधून गेलेलें होतें. तिबेटांतील लामा व पोर्चुगाल देशांतील धर्माधिकारी पाद्री यांच्या समागमाची उत्कट इच्छा मला झाली होती; व पारशी लोकांच्या दस्तुरांच्या व झेंदावेस्ता शास्त्रांत पारंगत झालेल्या विद्वानांच्या समागमांत मोठ्या आनंदानें काळ घालवावा

असें वाटे. मला आपल्या देशांतील विद्वानांचा केवळ कंटाळा आला होता."

या वेळेपासून अबुलफझल हा बादशाही दरबारांत आला. व त्याच्यांत व अकबरांत, परस्परांविषयीं सन्मानबुद्धि व परस्पर सहानुभूति ह्यांपासून निर्माण होणारा जो स्नेह या इहलोकीय जीवित्वाचें एक आल्हादस्थान आहे, तो जूळून वाढला. बादशहा हा एक आपणास अतियोग्य शिष्य मिळाला, असें अबुलफझल यास आढळून आलें. मृगयेच्या चैनींत, राज्यभाराच्या चिंतेंत, व लढाईचे परिश्रमांत अकबराला आपला संमाननीय मित्र व त्याचें मत खंडन करण्याचा प्रयत्न करणारे हटवादी मुसलमान कायदेपंडित व धर्मशास्त्रज्ञ ह्यांच्यामध्यें जे वादविवाद चालत ते ऐकण्यांत जें सुख व आल्हाद वाटे त्याच्या पुढें इतर सर्व करमणुकी तुच्छ वाटत. हे वादविवाद ह्मणजे त्याच्या राजवटयांतील एक मोठी घडामोड होती. ह्यांचा विशेष खुलासेवार उल्लेख केल्याशिवाय अकबराचा स्वभाव चांगलासा समजणें दुरापस्त आहे. धर्मस्वातंत्र्य व राज्यकारभारांत समदृष्टि हीं दोन तत्वें, कीं जीं प्रचारांत आल्यामुळें हिंदुस्थानचे इतिहासांत एक महत्वाचें मन्वंतर सुरू झालें, तीं अकबराचे मनानें एकाएकीं ग्रहण केलीं असें नाहीं. त्याच्या राजवट्याचीं पाहिलीं वीस वर्षें तर त्यास आपली सत्ता राखण्याकरितां विजय संपादण्यांतच घालवावीं लागलीं. बंगाल, बिहार, ओरिसा व गुजराथ व खानदेश समेत पश्चिम हिंदुस्थान या प्रदेशांतील पूर्वी पदच्युत झालेल्या राजघराण्यांचे वंशज संधि मिळण्याची वाट पहात असतां, बादशहानें स्वस्थ राहणें, ह्मणजे त्यांस स्वतःवर स्वारी करण्यास निमंत्रण देण्यासारखें होतें; तेव्हां त्यांस पुढें सरसावणें भाग पडलें. मागील अनुभवावरूनच व प्रतिदिनीं त्याच्या नजरेस ज्या गोष्टी पडत त्यावरून असें सिद्ध होतें कीं, हिंदुस्थानांतील प्रजाजनांस शांततेची सुखसमृद्धि पाहिजे असल्यास, या देशभर फक्त एकच सार्वभौम राजसत्ता असणें अवश्य आहे.

या वीस वर्षांच्या अवधींत लढाईचें काम बंद असतां अकबरास अनेक प्रसंगीं फुरसत सांपडे. तींत ज्या लोकांस आपण जिंकीत जात आहों त्यांच्या अनुकूलतेच्या पायावर राज्यपद्धतीची सुदृढ अशी इमारत कशी रचितां येईल या प्रश्नाचा उहापोह तो आपल्या सन्निध असणाऱ्या मुत्सद्यांशीं करी. त्याच्या मनाची खात्री झाली होती कीं जुन्या पद्ध-तींचा काळ जाऊन त्या आतां निरुपयोगी झाल्या आहेत; आणि भरत-खंडांतील रहिवाशी ह्मणजे पृथ्वीतलावरील सर्व लोकांपेक्षां अधिक कोंवळ्या मनाचे व सहज वळणाऱ्या हृदयाचे खरे रसिक आहेत व मनुष्य-मात्राच्या अंतःकरणास वेधून टाकणाऱ्या अशा अतिदृढ बंधनाच्या योगानें त्यांची वाडवडिलांच्या परंपरागत लोककथांविषयीं प्रेमासक्ति फार जबर आहे; तेव्हां त्यांच्या मनोवृत्ति, लोककथा, तृष्णा व महत्वाकांक्षा यांचा कांहीं एक विचार न करितां केवळ सैन्याच्या बळावर जागजागीं गोट देऊन हिंदुस्थानदेश स्वाधीन ठेवणें, हें असंभवनीय आहे.

या वरील पद्धतीचा चारशें वर्षांचा अनुभव पाहतां असें दिसून आलें कीं, ती सुरू करणाराच्याच किंवा निदान त्याच्या मागून येणाराच्या कारकीर्दींत लौकरच ढांसळे. असें असतांही, अकबराच्या पूर्वीं जे अनेक बादशहा होऊन गेले, त्यांपैकीं एकानें देखील दुसरी एखादी पद्धति सुरू करण्याचा प्रयत्न केला नाहीं. त्याचा प्रख्यात आजा बाबर याच्या मनांत याबद्दल कांहीं नवीन प्रकार सुरू करणें अवश्य आहे अशी किंचि-तशी कल्पना आली होती; परंतु या गोष्टीस हात घालण्यास अवश्य इतका अवकाश त्यास सांपडलाच नाहीं. कारण, आपला स्वतःचा टिकाव धरण्याकरितां स्वाऱ्या करून जय मिळवीतच त्यास राहणें भाग पडलें. त्याचा बाप हुमायून याचे आंगीं हें कोडें सोडविण्याची योग्यता इतर अफगाण बादशहापेक्षांही थोडीच होती. याहून बलाढ्य व काबील अशा योद्ध्यांशीं गांठ पडतांच त्याचा पाडाव झाला; आणि तेव्हां त्याची निराधार व पायाशून्य अशी राजपद्धति लागलींच नष्ट झाली, व तिचा

मागमूसही उरला नाहीं. या गोष्टी डोळ्यासमोर उभ्या राहिल्यामुळें हिंदुस्थानांत चिरस्थायी राज्यपद्धति स्थापण्याची अवश्यकता अकबराच्या मनांत बिंबून गेली. जेते व जित यांत आदर वाढवून जातिभेद धर्मभेद व परंपरागत कथाभेद ह्यांच्या संबंधानें सर्वांस स्वातंत्र्य देऊन उभयतांच्या हिताहितांची सांगड घालून अशी इमारत उभारली पाहिजे कीं एक कमान पडली तर बाकीचे एकंदर दगड खालीं कोसळावयाचेच, हें सर्वत्रांस अगदीं स्पष्टपणें कळलें पाहिजे, हें अकबर यास हळू हळू समजून आलें; ह्मणून, वर लिहिल्याप्रमाणें, त्यानें आपल्या राजवट्याचीं पहिलीं वीस वर्षें जिंकिलेल्या लोकांची राजनिष्ठा व त्यांचा आपलेवर भरंवसा वाढेल अशा हृदय वेधणाऱ्या कोणच्या राजनीतीचा स्वीकार करावा याविषयीं आपल्या दरबारांतील राजपुरुषांशीं व विद्वान पंडितांशीं उहापोह करण्यांत घालविलीं.

अबुलफझलशीं परिचय होण्याचे पूर्वीं यासंबंधानें अकबराची बहुतेक निराशाच झाली होती व त्यानें याविषयींचा विचारही बहुतेक सोडला होता. कारण, त्यास शहाणपणाची सल्लामसलत न मिळतां केवळ हटवाद व अ-सहिष्णुता वाढेल अशाप्रकारच्या उपदेशाचीच गांठ पडत गेली. त्याच्या बाळपणच्या अमात्यांपासून तर त्यास यत्किंचितूही मदत मिळण्याची आशा नव्हती. या मुसलमान लोकांच्या कलहांचा व धर्मभेदामुळें आपआपसांत देखील एकमेकांचा छल करणाऱ्या त्यांच्या प्रवृत्तीचा त्याला आगदीं वीट आला होता. अबुलफझलच्या शिक्षेखालीं भिन्नमतांविषयींचीं उदार सहिष्णुता त्यास कळून येण्यापूर्वींच त्यानें असा सिद्धांत ठरविला होता कीं, कोणतीहि चिरस्थायी राज्यपद्धति स्थापन करण्याच्या पूर्वीं, जें दुराग्रही मुसलमान धर्माभिमान्यांचें आपल्या स्वतःच्या राज्यांत प्रस्थ माजलें होतें, तें आधीं तोडलें पाहिजे. यासंबंधानें प्रोफेसर ब्लॉकमन यानीं असें लिहिलें आहे कीं, "हिंदूप्रजेच्या योग्यतेविषयीं अनुकूळ असा ग्रह अकबराच्या मनांत ठसल्यामुळें, फत्तेपूर शिक्री येथें संध्याका-

ळच्या समयीं एकांत ठिकाणीं त्याचा एक बसण्याचा दगड होता त्यावर बसून विचार करून त्यानें शेवटीं आपल्या राष्ट्रांतील सर्व प्रजाजनांचा एक कटानें व समदृष्टीनें प्रतिपाळ करण्याचा निश्चय केला. परंतु दरबारांतील मौलवी व पंडितजन यांच्या समजुती विलक्षण पराकाष्टेच्या असल्याकारणानें ते लोक सामोपचाराऐवजीं छल करण्यासच त्याचें मन वळवीत. तेव्हां न जाणो कदाचित् आपलाच समज चुकीचा असेल, असें वाटून राजा या नात्यानें प्रत्येक गोष्टीची विचक्षणा करणें हें आपलें कर्तव्य आहे याबुद्धीनें त्यानें वादविवाद करण्याची संस्था सुरू केली." हे वादविवाद प्रत्येक गुरुवारीं इबादतखान्यांत नियमानें होत असत. ही इबादतखान्याची इमारत याच कामाकरितां फत्तेपूर शिक्री येथें मुद्दाम तयार करविली होती हें मागें सांगण्यांत आलेंच आहे.

या वादविवादांत कित्येक दिवसपर्यंत अबुलफझलनें फारसा भाग घेतला नाहीं. निरनिराळ्या पंथांच्या महमुदीय पंडित व मौलवी लोकांस एकमेकांचा कोटिक्रम उत्तरें देऊन मोडून काढण्यास मात्र तो प्रोत्साहन देई. या निरनिराळ्या पंथांतील नायकांचें हिंदु ज्ञातींचा व इतर पाखांडी जनांचा छलवाद करण्यापुरतें जरी एकमत असे, तथापि ते एक-मेकांवरही नास्तिकपणाचा आरोप करण्यास मागें पुढें पाहत नसत. ह्या त्यांच्या हटवादीपणाचा व अनुदारपणाचा अकबरास तिटकारा आला. पैगंबराच्या धर्मांत ऐक्य असावें त्याऐवजीं त्यांत द्वैतभावाचेंच बाहुल्य आहे, असें त्यास आढळून आलें. शिवाय, त्यांपैकीं कित्येक स्वपंथा-भिमानी तर दरबारांतील हुद्देदार असूनही ऐकमेकांशीं उर्मटपणाचें वर्तन करीत, यामुळें तर अकबरास त्यांचा जास्तच वीट आला व एकेप्रसंगीं तर त्यानें या लोकांना ताकीत दिली कीं, यापुढें जर कोणी कोणाची अशी आगळीक करील तर त्यास दरबारांतून चालतें व्हावें लागेल. अखेरीस, नेहमीं स्मरणांत ठेवावा अशा एका गुरुवारीं संध्याकाळाच्या वेळेस अबु-लफझल यानें या विषयाचा कांहींतरी सोक्षमोक्ष एकदांचा व्हावा असा

प्रसंग आणिला. त्यानें ह्या बाबतींत उत्पन्न होणारा विरोध लक्षांत आणून वादाकरितां ह्मणून जो विषय काढला तो हा कीं, राजा हा केवळ प्रजाजनांच्या व्यवहारांतील ऐहिक विषयांसंबंधींच नायक आहे इतकेंच नव्हे तर धर्मसंबंधी पारलौकिक गोष्टींतही तो त्यांचा गुरु आहे असें मान्य केलें जावें.

या मताच्या योगानें "मूले कुठारः" या उक्तीप्रमाणें पेगमबराच्या धर्मांतील आदितत्वावरच प्रहार झाला; कारण त्या आदितत्वांप्रमाणें कुराण हा सर्वांत श्रेष्ठ कायदा व त्यावर कोणत्याही पौरुषेय नियमांची सत्ता नाहीं. अबुलफझल यानें हा विषय पुढें आणिला, त्यांतील मुख्य खुबी अशी होती कीं, या पूर्वी झालेल्या वादविवादांत मुसलमान विद्वान् पुरुषांचें कुराणांतील निरनिराळ्या वचनांच्या अर्थाविषयींच फक्त नव्हे तर खुद्द पेगमबर जो महमद त्याच्या नीतिविषयीं ही, मतवैचित्र्य दिसून आलेलें होतें; तेव्हां मग त्याचें शासन सर्वदा सर्वांसच वंद्य कसें व्हावें? अबुलफझलच्या या सुचनेपासून उठलेलें वादळ भयंकर होतें. महमुदीय धर्माच्या मूलतत्वांचें जें मर्म त्यावरच या सुचनेच्या योगानें मोठाच घाला पडला, असें ज्यांनीं ओळखिलें नाहीं, असा त्या इबादतखान्यांत एक ही मौलवी अगर पंडित नव्हता. दुसरे जे कोणी विमल दृष्टीचे व शांत विचाराचे पुरुष होते, त्यांचे लक्ष्यांत असें येऊन चुकलें कीं, पूर्वीच्या वादविवादांत केलेल्या विधानांच्या योगानें आपल्या "उत्तम धर्माचे व विशुद्ध नीतिशास्त्राचे जबरदस्त परिकोट" ही जमीनदोस्त होऊन गेले आहेत.

परंतु जिचा अकबराच्या सत्तेशीं निकट संबंध अशा सूचनेस त्यांच्यानें प्रतिरोध कसा व्हावा? ह्या अडचणींत त्यांनीं एक ठराव केला; त्याला त्यांनीं तडजोड असें जरी नांव दिलें तरी, वास्तविकपणें, त्यांनीं या सूचनेस अनुमोदनच दिलें ह्मणून ह्मणावयाचें. ज्यास ब्लॉकमन साहेबांनीं महमुदीय धर्माच्या इतिहासांत सर्वांत अत्यंत आश्चर्यकारक असें खरोखर

ह्मटलें आहे असा एक लेख त्यांनीं तयार केला व त्यांत कबूल केलें कीं, बादशहा हा न्यायी शास्ता आहे आणि ह्मणून त्याला "मुजताहीद" ह्मणजे पेगमबराच्या धर्मसंबंधी विषयांत निःप्रमादी अधिकारी असा किताब दिला. या कबुलीमुळें अबुलफझल यानें योजिलेला हेतु खरोखर साधला गेला; कारण या कबुलीप्रमाणें या न्यायी राजाची बुद्धि हीच सर्व धार्मिक व इतर नियमांचें मूल स्थान असें ठरलें व धर्माचें बाबतींत अकबराचें शासन आह्माला शिरसा वंद्य आहे असें सर्व मौलवी व पंडित मंडळींनीं मान्य केलें.

अबुलफझल यानें आपल्या अकबरनाम्यांत असें लिहिलें आहे कीं, "या लेखाची फलप्राप्ति फार उत्तम प्रकारची झाली. (१) बादशहाचें दरबार हें सर्व धर्मपंथांतील विद्वान व ज्ञानी पुरुषांचें एकत्र जमण्याचें स्थान झालें; प्रत्येक धर्मसांप्रदायांतील उत्तम तत्वें मान्य होऊं लागलीं व त्यांच्यांतील दोषांमुळें त्यांच्या चांगुलपणाकडे डोळेझांक होऊं दिली जात नसे. (२) पूर्ण धर्मस्वातंत्र्य किंवा मुसलमानांचा सर्व धर्माच्या लोकांशीं स्नेहभाव स्थापित झाला. (३) बादशहाचे हे असे सुनिर्मळ व निरपेक्ष हेतु पाहून त्याच्या भोंवतीं कुटिल बुद्धीचे व दुष्ट स्वभावाचे जे लोक होते ते लज्जित होऊन मानहीन झाले. इतर धर्माच्या लोकांचा छळ करण्यास प्रवृत्त असणाऱ्या महमुदीय पक्षांच्या दोघा नायकांनीं या लेखावर सही मोठ्या नाखुषीनें केली; पण सही केली खरी. दुसऱ्या पक्षीं, अबुलफझलच्या बापानें, ह्मणजे ज्यानें पेगमबराच्या धर्मांतील सर्व भानगडी व त्याच्या निरनिराळ्या सांप्रदायांतील मूलवचनें अवगत करून घेतलीं होतीं, त्यानें या लेखावर मोठ्या उल्हासानें सही केली. इतकेंच नाहीं तर, जास्त असें ही लिहून ठेविलें कीं अशी सुधारणेची प्रवृत्ति प्रचारांत कधीं येईल व पुढें पाऊल कधीं पडेल याची आज कित्येक वर्षें मी मोठ्या उत्सुकतेनें वाट पहात होतों.

या लेखावर सही झाल्यापासून अकबराच्या चरितास नवीन मनु

आला असें ह्मटलें पाहिजे. एकदांचा तो स्वतंत्र झाला. धर्म आणि विचार यांच्या स्वातंत्र्याविषयींच्या कल्पना त्याला अमलांत आणणें आतां शक्य झालें. आतां त्याला आपल्या दरबारांत हिंदु, पारशी, व ख्रिस्तीधर्माचे लोक जमवितां येऊं लागले. फार दिवसांपासून चिंतिलेली योजना, कीं एतद्देशीय राजांच्या व आग्रा एथील सार्वभौम बादशहाच्या हिताहितांचे एकीकरण करावें, ही देखील अमलांत आणण्याचा आतां प्रयत्न सुलभ झाला. वास्तविकपणें पाहिलें असतां, हा लेख अकबराच्या राजवट्यांतील इंग्रजी मॅग्नाचार्टा सारखी मोठी सनद झाली. ( इंग्लिश लोकांस सांप्रत जे राजकीय हक्क मिळाले आहेत व त्यांस जी स्वतंत्रता प्राप्त झाली आहे तिचा उगम मॅग्नाचार्टा नामक मोठी सनद जॉन राजाच्या वेळीं त्यांनीं १२३९ सालीं मोठ्या श्रमानें मिळविली, तिजपासून झाला आहे. )

हा लेख कसा मिळाला, याविषयींचें विवरण सविस्तर केलें आहे त्याबद्दल वाचक क्षमा करितील अशी उमेद आहे; कारण इतउत्तर जे कायदेकानू झाले व जी राजनीति अंमलांत आली, तिची सर्व किल्ली या लेखांत सांपडते. त्याच्या योगानेंच मुसलमान धर्मातील संकुचित निर्बंधापासून बादशहा विमुक्त झाला. ह्या लेखामुळें अबुलफझल मोठ्या भाग्योदयास चढला. त्यामुळें त्याला अकबराचा आमरण स्नेह जोडितां आला. इकडे सर्व दुराग्रही मुसलमान मंडळींचा द्वेषानल या लेखामुळें अबुलफझलवर भडकला व त्यामुळें मागील भागांत वर्णिल्याप्रमाणें एका मारेकऱ्याच्या हातून त्याचा खून झाला. नवीन मिळालेल्या अधिकाराचा अकबरानें प्रथमतः जो अनेक तऱ्हेनें उपयोग केला, त्यांत दिवाणी व फौजदारी अधिकाऱ्यांत व त्यांच्या कामांत सुधारणा केली, ही एक विशेष गोष्ट होय. या पूर्वी त्याचे राज्यांतील सर न्यायाधीश एक दुराग्रही सुन्नी होता. तो आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून शिया पंथांतील लोकांचा व मुसलमान ज्यांस पाखांडी ह्मणून मानीत त्यांचा

छलवाद करीत असे. अबुलफझलचा भाऊ फैझी यास त्यानें गांजिलें होतें. या न्यायाधिशास बादशहानें सर्व वरकरणी आदरच करून मक्केस लावून दिलें. आणखी एक मोठा अधिकारी असाच दुराग्रही होता. त्याची ही अशीच उचलबांगडी झाली. व न्याय करितांना धर्मसंबंधी भेदाकडे अगदीं दुर्लक्ष्य केलें पाहिजे आणि सर्व मनुष्यांना, मग ते सुन्नी असोत वा शिया असोत, मुसलमान असोत किंवा हिंदु असोत, सारखेंच लेखीलें पाहिजे. सारांश, दिवाणी अथवा फौजदारी न्यायाधिकाऱ्यांनीं इनसाफाच्या कामांत जाति अथवा धर्म यांकडे बिलकुल लक्ष देऊं नये असा नियम बादशहानें सर्व अधिकाऱ्यांस घालून दिला.

या पुढें शेख फैझी व अबुलफझल हे दोघे बंधु राष्ट्राचें पुनरुज्जीवन व दृढीकरण करण्याचें कामांत बादशहाचे परम विश्वासू असे मंत्री झाले. त्यानें या दोघांनाही लश्करी खात्यांत हुद्दे दिले. कारण दरबारांत त्यांना वजन व प्रतिष्ठा मिळण्यास व ती कायम राहण्यास हाच मार्ग उत्तम होता. अकबरानें ज्या अनेक मोहिमा केल्या, त्यांत हे दोघे बंधु त्याच्या समागमें असत. जमीनीवरील सारा व इतर कर यांची पद्धति सुधारणाच्या कामीं ते अनेक सूचना करीत व तसेंच बादशहानें काढिलेल्या विचारांस पाठवळ देण्यास व त्यास सल्लामसलत देण्यास ते नेहमीं सादर असत.

या सुमारास कालमहात्म्यानुरूप, व त्याच्या अंमलाखालील प्रजाजनांच्या मतांस रुचेल आणि बहुजनसमुदायास मान्य होईल असा धर्मग्रंथ तयार करून प्रसिद्ध करण्याच्या खटपटींत अकबर होता. या ग्रंथास त्यानें "दीनी इलाही" अथवा ईश्वरीधर्म असें नांव दिलें. या ग्रंथाचें मुख्य स्वरूप ईश्वर एकच आहे व अकबर हा त्याचा भूलोकावरील खालीफा ह्मणजे प्रतिनिधि आहे असें आहे. इसलामी प्रार्थनापद्धति त्यानें मोडून टाकिली. कारण, ती अगदीं संकुचित व अव्यापक

अशी होती. तिच्या ऐवजीं अंतरंगीं पारशी धर्माच्या नमुन्यावर, व बाह्य स्वरूपानें हिंदूंच्या रीतिरिवाजास अनुसरून अधिक व्यापक अशी प्रार्थना सुरू केली. बादशहानें सरकारी कागदोपत्रीं व त्याप्रमाणेंच आपल्या सणावारासंबंधानें जो नवीन शक चालू केला तो निवळ पारशी लोकांचा होता. या नवीन आचारविचारास मुसलमान लोकांनीं उघड-पणें प्रतिरोध केला नाहीं. परंतु धर्मसंबंधी प्रकरणांत त्यांच्या मतें बादशहाचा मुख्य सलाहगार जो अबुलफझल त्याजविषयींचा द्वेषानल मात्र त्यांच्यांतील दुराग्रही व सुलभकोपी पुरुषांत कमी झाला नाहीं. या शिवाय, हिंदूराजांच्या नेमणूका लष्करांत मोठमोठ्या हुकमतीच्य व दरबारांत मान्यतेच्या व वजनदारीच्या जागीं होत, ह्याबद्दल तर ही मंडळी अतीशयच मत्सर दाखवी. हे पुरुष, ह्मणजे राणा भगवानदास, मान-सिंग, तोडरमल, व बिरबल इत्यादि, यांचे अंगीं अलौकिक बुद्धिसामर्थ्य होतें, ही गोष्ट या लोकांच्या दृष्टीनें लक्षांत घेण्यासारखीच नव्हती. ते हिंदू; व केवळ हिंदू ह्मणूनच, मुसलमान इतिहासकारास त्यांच्या नांवांचा उल्लेख करण्याचा प्रसंग येई तेव्हां त्यांच्या धर्माविषयीं व त्यांच्या मतें परलोकीं त्यांस जी अधोगति मिळणार तीबद्दल तिरस्कार दाखविल्या-खेरीज राहवतच नसे.

या वेळीं पोर्चुगीज लोक गोव्यांत वसाहत करून राहिले होते. त्यांच्या धर्माविषयीं खुलासेवार माहिती करून घेण्याची अकबराचे चौकस बुद्धीस इच्छा होऊन त्यानें बायबलमधील दुसऱ्या भागाची शुद्धप्रत मिळवून त्याचें फारशींत भाषांतर करावें ह्मणून शेख फैझी यास आज्ञा केली. जेसुईट नामक ख्रिस्तीपंथांतील पाद्री रोडोलफो आकानिव्हा या नांवाच्या धर्माधि-काऱ्याचें मन वळवून त्याला आग्र्यास भेटीकरितां बादशहानें आणविलें.

इबादतखान्यांत धर्म या विषयावर जो एक लोकोत्तर वादविवाद झाला तो याच प्रसंगीं. यांत मुसलमान मौलवी व मुलाणे, ब्राह्मण, जती व बुद्धांचे गुरु, निरीश्वरवादी हिंदू, ख्रिस्ती, यहुदी व पारशी धर्म-

गुरु या सर्वांनीं पाळीपाळीनें भाषण केलें. या प्रसंगाचा वृत्तांत अबुल-फझल यानें वर्णिला आहे तो येणेंप्रमाणें:—'प्रत्येकानें आपआपल्या प्रतिज्ञा व कोटिक्रम निर्भयपणें प्रतिपादन केले. आणि त्यांचे वादविवाद व खंडनमंडनें फार वेळ व मोठ्या कडाक्याचीं अशीं चाललीं. प्रत्येक पंथानें स्वाभिमानानें व अहंकारबुद्धीनें प्रतिपक्ष्यांच्या वचनांवर व कोटिक्रमावर हल्ला करून त्यांचें खंडन करण्यांत होईल तितकी पराकाष्ठा केली. एके दिवशीं रात्रीं, रोडोलफो नामक सर्व ख्रिस्ती पंडितांत शहाणा व चतुर असा वाखाणलेला पाद्री तेथें येऊन इबादतखान्यास नवीन तेज आलें. त्याच्यावर अनेक दुराग्रही व विलक्षण कांक्षेखोर पंडितांनीं आपल्या शास्त्रवचनांचा भडिमार करून हल्ला केला, व परि-षदेस तिचा शांत विचार व न्यायबुद्धि प्रदर्शित करण्याचा प्रसंग आला. विवादकांनीं आपलीं पुरातन ठरीव वचनें पुढें आणिलीं. परंतु निःपक्ष-पातानें खरा विचार करून सत्य शोधून काढण्याचा प्रयत्न कोणीही केला नाहीं. यामुळें त्यांच्या शास्त्रवचनांचें खंडन पाद्री यास सहजच करतां आलें व त्यांस लज्जेनें अधोवदन करण्याचा समय आला. तेव्हां बायबलांत परस्पर विरुद्ध गोष्टी आहेत ह्मणून त्यावर त्यांनीं हल्ला केला. परंतु त्यांना आपलें ह्मणणें सिद्ध करून दाखवितां येईना, त्या प्रसंगीं त्या ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यानें, अगदीं शांतपणें व स्वतःच्या धर्मावर पूर्ण श्रद्धा धरून त्यांच्या कोटिक्रमास प्रत्युत्तरें दिलीं; व नंतर तो ह्मणाला कीं:—"आमच्या पवित्र शास्त्राविषयीं या मंडळीचें जर असें मत आहे, आणि फक्त कुराण हेंच कायतें ईश्वरप्रणीत असा जंर यांचा समज आहे, तर मग अग्नि सिद्ध करा; मी आमचा धर्मग्रंथ हातीं घेऊन प्रज्वलित झालेला अग्नींत प्रवेश करितों व या विद्वान मौलवींनींही आपलें पवित्र कुराण हातांत घेऊन त्यांत प्रवेश करावा, ह्मणजे मग अग्निशुद्धीनें खरा कोण हें तात्काल दृष्टोत्पत्तीस येईल." ह्या प्रतिज्ञेपुढें ती कुटिल व हलकी विवादी मंडळी मागें हटली. व "शेषं कोपेन पूरयेत्" या

न्यायानें फक्त रागानें शिव्या द्यावयास कागले. हा दुराग्रह व विनयशून्यपणा पाहून निःपक्षपाती बादशहाच्या मनास दुःख झालें; तेव्हां त्यानें मोठ्या शहाणपणाचे व विद्वत्तादर्शक असे पुढील उद्गार काढिले—"अंतरंगीं भाव असल्या शिवाय केवळ बाह्यात्कारी धर्माच्या आवाचा व कुराणांतील कोरड्या वचनोक्तीच्या उच्चारण्याचा कांहीं एक उपयोग नाहीं. मीं आजपर्यंत सत्तेच्या दराऱ्यानें अनेक हिंदूंस बलात्कारानें माझ्या पूर्वजांचा मुसलमानी धर्म स्वीकारण्यास काविलें; परंतु, अहंकाररूपीं काळ्या ढगांनीं आणि मताभिमानरूपी धुक्यांनीं तुह्मांला अगदीं गुरफाटून टाकिलें आहे, व प्रमाणरूपी दीपांशिवाय एक ही पाऊल पुढें टाकितां यावयाचें नाहीं, अशी आतां सत्याच्या प्रकाशानें माझें अंतःकरण उज्वलित झाल्यामुळें माझी खात्री झाली आहे. निर्मल विचारांनीं जो मार्ग आपण पत्करितों, तोच कायतो हितावह होण्याजोगा आहे. एरव्हीं दिवसांतून पांचदां निमाज पढणें, सुंता करणें, अथवा बादशहाच्या सत्तेला भिऊन त्याला साष्टांग नमस्कार घालणें इत्यादि गोष्टी परमेश्वराच्या समोर निरर्थक आहेत. ह्मटलें आहे कीं:—

**प्रभुचें आज्ञावंदन साष्टांगें ही न होतसे नमनें ।**
**सत्याचरण करावें घडत नसे तें कपाळमोक्षानें ॥**

या वादविवादाविषयीं व ख्रिस्तीधर्माधिकाऱ्यानें सुचविलेल्या अग्निशुद्धीच्या कसोटीविषयीं आपणास कांहींही वाटो पण ह्या वादविवादांत एक आनंदकारक गोष्ट दिसून येते. ती ही कीं, इबादतखान्यांत वादविवादाच्या संबंधानें पूर्ण स्वातंत्र्य होतें. याशिवाय अकबराच्या मनाची नैसर्गिक प्रवृत्ति कशी होती हें ही या गोष्टीवरून व्यक्त होतें. खरें हें कीं, त्यानें सिद्धासिद्ध विचाराच्या योगानें सर्व विशिष्ट मतवादांपासून व धर्मपंथांपासून स्वतःस मुक्त करून घेतलें होतें व ह्या मतवादाच्या व धर्मपंथाच्या ऐवजीं तो सर्व शक्तिमान जगत्कर्ता परमेश्वर यास मात्र मानी, व त्या प्रभूचे जे कल्याणप्रदसंकल्प, कीं धर्मस्वातंत्र्य, न्याय,

समता व इतरांच्या जीवितास धोका बसणार नाहीं असें मात्र आचार-स्वातंत्र्य सर्वांस असावें, ते सिद्धीस नेण्यासाठीं आपण स्वतः त्याचा या धरातळावर मुख्याधिकारी व प्रतिनिधि आहों असें तो समजे. मुसलमान लोकांवर त्याची नजर विशेष करडी होती; कारण इतरजनांचा छलवाद करण्याकडे राज्यकरणाऱ्या लोकांच्या धर्माभिमान्यांची प्रवृत्ति सदोदित विशेष जागृत असते हें त्यास अवगत होतें. तथापि तो सर्वत्रांचें ह्मणणें लक्षपूर्वक ऐकत असे. परमेश्वराचे ठायीं वास करणारे प्रशस्त, उदार, दूरसंचारी, व सर्वव्यापी असे जे गुण त्यांचा प्रत्येक धर्मगुरूंनीं विपर्यास केला आहे हें प्रत्येक धर्माचें घातक स्वरूप ध्यानांत आणून, त्यानें या सर्व धर्मगुरूंस एकीकडे ठेवून अखिल जगताचा जो ईश्वर त्यालाच फक्त शरण जाण्याचा निश्चय केला.

अकबर झोरोआस्ट्रियन म्हणजे पारसिक पंथानुयायी झाला होता असें ह्मणतात. कारण, त्यांचा देव जो सूर्य त्यामध्यें परमेश्वराच्या विद्यमानतेचें चिन्ह आहे असें तो मानीत असे आणि पारसिक पंथांतील साधेपणा पाहून, तो त्या धर्मास आगदीं भुलून गेला होता, याविषयीं बिलकुल शंका नाहीं. त्यानें स्वतः काढिलेल्या धर्मपद्धतींत धर्माधिकारी मुळींच नव्हते. सर्व शक्तिमान परमेश्वराच्या सृष्टींत आपण त्याचे प्रतिनिधि आहोंत ह्या दृष्टीनें धर्म हा इतरांच्या छलवादास साधन न होतां सर्वत्रांचे एकीकरणास सहाय्यभूत व्हावा या हेतूनें त्यानें प्रत्येक धर्मांतील सार शोधून तें एकवटून एक निराळा धर्मपंथ काढिला. त्याच्या राज्यनीतीचें धोरण जसें तत्कालीन जनसमुदायांना कळण्याजोगें नव्हतें, त्याच प्रमाणें त्याच्या धर्मविषयक पद्धतीची व्यापकता ही सामान्य जनांच्या समजुतीच्या आटोक्या बाहेर होती. सर्व दुनियेचें मत आपणासारखें करावयाचें ह्मणजे रामराजा मागून दुसरा रामराजाच अवतीर्ण व्हावयास पाहिजे होता. ही गोष्ट "न भूतो न भविष्यति" अशा प्रकारची होती. तेव्हां अखेरीस परिणाम असा झाला कीं,

अकबरानें उभारलेली राज्यपद्धति त्याच्या मरणानंतर हळू हळू आपल्या संकुचित अशा पूर्वपदास जाऊन मिळाली आणि त्याची धर्मपद्धति तर त्याच्या बरोबरच नष्ट झाली. अकबराच्या मागून दोन मुसलमानच पण धर्माविषयीं बेफिकीर अशा बादशहा नंतर अन्य धर्माच्या लोकांच्या छळवादाचें पुनः एकदां प्राबल्य माजलें, व त्याच्या योगानें त्या श्रेष्ठ व चतुर अकबर बादशहानें ज्या कांहीं कल्याणाच्या ह्मणून गोष्टी करून ठेविल्या होत्या त्या सर्व नाहींशा झाल्या; व त्या घराण्यांतील राज्यपद्धतीचें जें जिव्हाळ्याचें तत्व त्यास कीड लागून, न्याय, समता, व सर्वत्र आचार व विचार ह्यांच्या स्वातंत्र्याची देणगी हीं जीं अकबराचे राजवट्याचीं अभंग तत्वें, त्यांचें पुनरुज्जीवन करणाऱ्या अशा दुसऱ्या एका राष्ट्राचा अंमल स्थापित होण्याचा मार्ग खुला झाला.

वरील निरूपणांत, जेणेंकडून इतरांच्या जीवितास धोका बसणार नाहीं, अशा प्रकारचें आचार व विचार ह्यांचें स्वातंत्र्य अकबरानें आपल्या प्रजाजनांस दिलें असल्याचा आह्मी उल्लेख केला आहे. याचें ढळढळीत उदाहरण हें आहे कीं, त्यानें हिंदु लोकांतील सती जाण्याची दुष्ट चाल मोडण्याचा प्रयत्न केला. पतीसह स्त्रीनें आपणास दहन करून घेण्याचा विधि ह्मणजे सती जाणें व जी स्त्री याप्रमाणें सहगमन करिते तिचें नांव सती, ह्या गोष्टी वाचकांस अवगतच आहेत. ही चाल इतकी पुरातन व रूढ होऊन गेली होती कीं, उच्च जातींतील कुलीन स्त्रियांनीं सती न जाणे ह्मणजे आपल्या विमल आचरणास आपल्याच हातानें काळिमा लावण्या सारखें होऊन गेलें होतें. पुष्कळ स्त्रिया मोठ्या आनंदानें व उल्हासानें सहगमन करीत. तथापि जिवाचा लोभ अनिवार असल्यामुळें अनेक प्रसंगीं विधवाजन आपल्या सदाचरणाची खात्री असतांही केवळ काल्पनिक समजाकरितांच आपला बळी देण्यास पराङ्मुख होत, व कधीं कधीं पतीच्या चितेवर आपला देह दहन करून घेण्याचें नाकारीत. अशा प्रसंगीं सती न गेल्यास परलोकीं भोगाव्या लागणाऱ्या यातनेची भीति

घालून, व सहगमन केलें असतां आपल्या कुलाचा लौकिक वाढेल, वगैरे बोधांची योजना करून धर्माधिकारी अनेक वेळां त्यांचें मन वळवीत व त्यांस सहगमन करण्यास प्रवृत्त करीत.

अशा प्रकारचीं कृत्यें अकबराच्या दयार्द्र व कोमल अंतःकरणास तिटकारा आणणारीं होतीं. तेव्हां या चालीचा बीमोड करण्याकरितां त्यानें होती नव्हती तितकी पराकाष्टा केली. राजस्थानांत या चालीचें प्राबल्य फारच होतें. परंतु अकबराचा रजपूत राजांशीं असा संबंध होता कीं, सहगमन करण्याची ज्या गतभर्तृकेची मनापासून इच्छा असे तीस ही प्रतिरोध करण्यापुरतें त्यांच्या धर्मसंस्कारांच्या व पुरातन व संमानित अशा चालींच्या आड त्याच्यानें जाववलें नाहीं. त्याला असें वाटलें कीं, ही चाल बंद करण्याचा हुकूम सोडण्यापूर्वी राजस्थानांतील राजवाड्यांच्या अंतर्यामीं ही, आपण ज्या उदार तत्वांची स्थापना करणार तीं पोहोंचून भिनून जाण्यास कांहीं काळ जाऊं दिला पाहिजे. तथापि गतभर्तृकेनें सहगमन करण्याची यत्किंचित् ही नाखुशी दाखविली असतां, तिला बळी देण्याची मनाई आहे, असा त्यानें हुकूम फरमाविला. या संबंधीं नुसते कागदीं कायदे करून अकबर स्वस्थ राहिला असें नाहीं. एके प्रसंगीं, अकबर अजमीरांत असतां त्याचा विश्वासूक प्रतिनिधि राजा जैमल, अंबरचा राणा राजा बिहारीमल याचा पुतण्या, बंगाल्यांत तेथील अमीर उमरावांशीं बोलणें चालविण्यास गेला होता तो चौसा येथें मरण पावल्याची बातमी येऊन पोंहोंचली. जैमल हा अकबराच्या अगदीं खास मर्जीतील होता. कारण राजस्थानांतील जे राजे अकबराची भेट घेण्याकरितां आले होते, त्यांत पहिल्यानदां हा आला, व तेव्हांपासून पुढें, त्यानें मोठ्या इमानानें व राजनिष्ठतेनें नोकरी बजाविली होती. जोधपूरचा राजा राणा उदेसिंग याच्या मुलीशीं त्यानें लग्न केलें होतें. ही राजकन्या फार दृढनिश्चयी होती. तिचा भर्ता मरण पावल्याची खबर अंबरास येऊन पोहोंचली, तेव्हां सहगमन करण्याचें तिनें स्पष्ट-

पणें नाकारिलें. बादशहाचे हुकुमाप्रमाणें तिला आपले विचारानुरूप वागण्याचा पूर्ण हक्क होता. त्यास अनुसरून त्या साध्वीनें सती जाण्याचें नाकारिलें. तेव्हां लागलींच जिकडे तिकडे 'अब्रह्मण्यं, अब्रह्मण्यं' ह्मणून कल्होळ उठला, त्यांत तिचा प्रत्यक्ष मुलगा राणा उदेसिंग हा पुढारी होता. हा कल्होळ शेवटीं इतका माजला कीं त्या साध्वीस बलात्कारानें उचलून पतीच्या चितेवर नेऊन ठेवण्याचा तेथील मंडळींनीं निश्चय केला. सुदैवें करून अकबरास ही बातमी समजली व त्यानें हा बलात्कार निवारण्याचा निश्चय केला. त्यानें या कामीं नियोजिलेले अधिकारी अगदीं ऐन वेळीं येऊन दाखल झाले. त्यांमध्यें खुद्द जैमलचा चुलता होता. ते पोहोंचले त्या वेळीं चिता देखील पेटलेली होती. जैमलच्या चुलत्यानें चाल करून उदेसिंगास पकडलें, तेथें जमलेल्या लोकांस हाकून लाविलें, व त्या बिचाऱ्या राणीचा जीव वांचविला.

विद्वान् व उदार अंतःकरणाचे मित्र शेख फैझी व अबुलफझल यांवर अकबराची अत्यंत भक्ति होती खरी. तथापि जे जे ह्मणून विद्येविषयीं खरी अभिरुचि दाखवीत, व ज्ञानार्जनाची खरी लालसा प्रकट करीत, त्या सर्वांना तो आश्रय देई. ढोंग व दंभ यांचा त्यास तिटकारा असे. आपल्या दरबारांतील विद्वान् मौलवींच्या कृतींत व वचनांत हे दुर्गुण पूर्णपणें वसत आहेत, असें त्यास लवकरच कळलें. त्यांचें गुह्य कळल्यावर अकबरास त्यांचा वीट आला, व त्यांचें दंभ बाहेर काढण्यास होते नव्हते ते प्रयत्न करण्याचा त्यानें निश्चय केला.

प्रोफेसर ब्लॉकमन—आईन ए अकबरीचें इंग्लिश भाषांतरकार—यांनीं असें लिहिलें आहे कीं, "गर्व व अहंकार यांस अकबराजवळ क्षमा ह्मणून नसे; व सर्व अहंकारांमध्यें मिथ्या विद्वत्तेच्या अहंकाराचा तो अतिशय तिरस्कार करी." ह्मणून त्याच्या ह्या वर्तनानें दुखावलेले लोक अकबर विद्वत्तेचा व विद्वान लोकांचा अव्हेर करितो अशी हाकाटी करीत. वस्तुतः, त्यानें

असें कांहींच केलें नाहीं. इतकेंच नाहीं तर, खऱ्या विद्येचा त्याच्या सारखा उदार पुरस्कर्ता या भरतखंडांत आजपर्यंत दुसरा कोणी झाला नाहीं. या बाबतींत सांप्रतच्या राज्यकर्त्यांनीं त्याचा कित्ता गिरविल्यास फायदा होण्याजोगा आहे. त्या काळीं, जे अनेक विद्वान् व शोधक बुद्धीचे लोक होऊन गेले, त्यांत खानईअझम मिरझा नांवाचा अकबराचे एका आवडत्या धात्रीचा मुलगा होता. इतिहास शास्त्रांत पारंगत झालेला याचे सारखा दुसरा ते वेळेस नव्हता. पुष्कळ दिवसपावेतों आपल्या पुरातन परंपरागत पंथास चिकटून राहून अकबरानें नवीन सुरू केलेल्या धर्ममार्गाचा त्यानें उपहास मांडला होता. फैझी व अबुल-फझल यांची तर त्यानें थट्टा करावी आणि दांभिक व ढोंगी या अर्थाची त्यास निंदासूचक नांवें ठेवावी. परंतु पुढें कांहीं काळानें तो मक्केच्या यात्रेस गेला तेव्हां तेथील इमाम मंडळींनीं दानधर्म करविण्याच्या मिषानें त्यास इतकें बुचाडून टाकिलें कीं, पेगमबराच्या धर्माविषयीं त्याची भक्ति न कळतां हळू हळू अगदीं कमी झाली. नंतर यात्रा उरकून आग्र्यास परत आल्यावर, तो दिवाणी इलाही अथवा अकबरानें नवीन सुरू केलेल्या ईश्वरीपंथाचा अनुयायी झाला. कविता रचण्याची हातोटी त्यास चांगली साधली होती. त्याची बुद्धिमत्ता व भाषणपटुत्व हीं अलौकिक होतीं. त्यानें रचिलेले अनेक चुटके होते त्यांपैकीं एक आजमितीपर्यंत लोकांत प्रसृत आहे. तो असा "मनुष्याला चार बायका असाव्यात. एक इराण देशची, घरांत कोणी बोलण्याचालण्यास हवी ह्मणून; दुसरी, घरांतील काबाडकष्ट करण्याकरितां पाहिजे ती खोरासन प्रदेशांतील; तिसरी, मुलेंबाळें संभाळण्याला हिंदु जातीची, व या तिघींस ही धाक बसावा या करितां हमेश कोरडा चालविण्याला कोणी तरी हवी, म्हणून चवथी तुर्कस्थानची."

अकबराचा पुरातन अतालिक किंवा गुरु बैरामखान याचा मुलगा मिरझा अबदुरहीम हा सर्वांत अति रणशूर योद्धा असून फारच दिलदार

पुरुष होता. अकबराच्या राज्यांत दीर्घकालपर्यंत खानखानानचा ह्मणजे अमीरांच्या अमीरांचा, अर्थात् मुख्य सेनाधिपतीचा अधिकार त्याजकडे होता. त्याची विद्वत्ता त्याच्या रणधीरते इतकीच मोठी होती. तुर्की भाषेंत लिहिलेल्या, व्यवहारज्ञानाचा संग्रह ह्मणून ज्याचें अबुल फझल यानें यथायोग्य वर्णन केलें आहे, त्या बाबरच्या चरित्राचें भाषांतर त्यानें त्या वेळीं दरबारांत चालू असलेल्या इराणी भाषेंत करून, तो ग्रंथ अकबरास नजर केला. बाकीच्या ग्रंथकारांत खालीं लिहिलेले इतिहासकार सुप्रसिद्ध आहेत—(१) इतिहासकार निजाम उद्दीन अहमद; यानें तबाक तई अकबारी अथवा अकबराच्या बादशाहीचें दप्तर या नांवाचा इतिहास लिहिला आहे. (२) तारीखीई आलफी अथवा पेगमबर पंथाचा सहस्रसांवत्सरिक इतिहास याचे कर्ते, व (३) या सर्वांहून विश्रुत असा जुन्या पंथाचा इतिहासकार अबुल कादर बदौनी, ज्यानें तारिख ई बदौनी अथवा बदौनीकृत इतिहास या नांवाची बखर लिहिली व काश्मीरचा इतिहास शोधून प्रकाशित केला.

बदौनी हा मोठा अलौकिक पुरुष होऊन गेला. तो अकबरापेक्षां दोन वर्षांनीं वडील होता. त्यानें अगदीं बाळपणापासून तत्कालीन अति प्रसिद्ध व धर्मशीळ पुरुषांजवळ, निरनिराळ्या शास्त्रांचें अध्ययन केलें होतें. गायन कलेंत, इतिहासांत, व ज्योतिष्शास्त्रांत त्यानें अलौकिक प्राविण्य संपादिलें होतें. त्याचा कंठ मधुर होता, ह्मणून अकबरानें त्याला आपल्या दरबारचा दर शुक्रवारीं काम करणारा इमाम नेमिलें. दरबारांत शेख मुबारिक व त्याचीं मुलें फैजी आणि अबुलफझल यांच्या समागमांत बदौनीनें चाळीस वर्षें घालविलीं. परंतु इतक्या अवधींत त्यांच्यांत खरा स्नेहभाव ह्मणून उत्पन्न झाला नाहीं; कारण बदौनी हा जुन्या पंथाचा मुसलमान होता, व तो त्यांना नेहमीं पाखांडी समजत असे. अकबराच्या सांगण्यावरून त्यानें रामायणाचें व त्याचप्रमाणें महाभारतांतील कांहीं भागांचें, संस्कृतांतून फारशींत भाषांतर केलें. त्याचा

वर सांगितलेला ऐतिहासिक ग्रंथ तारीख ई बदौनी हा मुनतरखब्रत उलत वारिख अथवा प्रतिवार्षिक वृत्तांतांतील वेंचे या नांवानें कांहींसा जास्त विश्रुत आहे. या ग्रंथांत अकबराचीं धर्मसंबंधी मतें कशीं होतीं, याचें सविस्तर वर्णन असून त्याच्या बादशाहींत जे जे प्रख्यात पुरुष होऊन गेले त्यांची चटकदार चरित्रें दिलीं आहेत; व यामुळेंच त्या ग्रंथास विशेष मातबरी आलेली आहे.

अकबर बादशहाच्या मरणापूर्वीं सुमारें अकरा वर्षें, बदौनी मरण पावला. व त्याचा मोठा ऐतिहासिक ग्रंथ जाहानगीर बादशहा गादीवर बसल्या नंतर कित्येक दिवसपर्यंत प्रगट झाला नव्हता. कारण, त्यानें तो मोठ्या खबरदारीनें गुप्त ठेविला होता. अकबरानें सुरू केलेले नवीन सांप्रदाय ज्यांना नापसंत होते अशा दुराग्रही मुसलमानांना हा ग्रंथ फारच प्रिय झाला. आणि पुढें, हे चालू केलेले सांप्रदाय जसजसे हळूहळू नाहींसे होत चालले व विचार स्वातंत्र्याचा नाश होऊन परधर्मीयांचा छळवाद करण्याची पुनः प्रवृत्ति सुरू झाली, तसतसा हा ग्रंथ अधिकाधिक लोकप्रिय झाला.

अकबर बादशहाच्या वेळच्या इतिहासादि साहित्यविद्या-वैभवांत ज्यांनीं आपल्या बुद्धीनें, उद्योगानें, व विद्वत्तेनें भर घातली, अशा कित्येक पुरुषांची माहिती येथें नमूद करणें फारसें जरूर नाहीं. अजरामर होऊन बसलेल्या आईन-ए-अकबारींत या एकंदर लहान मोठ्या पुरुषांची संपूर्ण यादी दिलेली आहे. तथापि खुद्द बादशहानें अनेक कलांस व विद्यांस प्रोत्साहन कोणत्या प्रकारें दिलें, याविषयीं दोन शब्द लिहिणें युक्त आहे. आपल्या राष्ट्राबाहेरून संपादिलेल्या, व हिंदु ग्रंथांचा, व त्यांच्यापैकीं पुष्कळांचें फारशींत भाषांतरें करवून त्यांचा आपल्या पुस्तकाल्यांत संग्रह करण्याकडे अकबराचें फार लक्ष होतें असें दिसतें. या पुस्तकालयाचे कित्येक भाग केलेले असत असें आईन-ए-अकबरीच्या कर्त्यानें ह्मटलें आहे. “कांहीं पुस्तकें अंतःपुरांत ठेविलीं आहेत व कांहीं त्याच्या बाहेर ठेविलीं आहेत.

पुस्तकाच्या मातबरीप्रमाणें व ग्रंथांत विवरण केलेल्या शास्त्राच्या योग्यतेनुरूप पुस्तकालयाच्या प्रत्येक भागाचे प्रतिविभाग केलेले आहेत. गद्यग्रंथ, काव्यें, हिंदी, पर्शियन, ग्रीक, काश्मिरी व अरबी ग्रंथ गिरनिराळे ठेवले आहेत, व त्यांची पहाणी याच क्रमानें होत असते. अनुभविक लोक दररोज नवीन नवीन पुस्तकें आणितात, व तीं हुजूरांस वाचून दाखवितात. हुजूर प्रत्येक पुस्तक अथपासून इतिपर्यंत लक्षपूर्वक श्रवण करितात. वाचून दाखविणारे लोक ज्या पानावर दररोज थांबतात, त्या ठिकाणीं हुजूर लेखणीनें निशाणी करितात; व त्यांनीं जितकीं पृष्ठें वाचिलीं असतील, त्या मानानें त्यांस रोख मोहरा व रुपये देऊन त्यांची संभावना करितात. हुजूरच्या दरबारांत प्रसिद्ध ग्रंथांपैकीं ज्यांचें वाचन झालें नाहीं असे नामांकित ग्रंथ फारच थोडे असतील. दुसरें, सर्व निःपक्षपाती ज्ञाननिष्ट पुरुषांचे अग्रणी असे जे हुजूर त्यांस अपरिचित अशा गतकालीन ऐतिहासिक गोष्टी किंवा शास्त्रांतर्गत कौतुकें अथवा तत्वज्ञानांतील चित्त वेधणारीं प्रकरणें, हीं क्वचितच असतील" याप्रमाणें अकबरच्या ग्रंथाभिरुचीचें वर्णन करून आईनईकारानें त्याला विशेष प्रिय असलेल्या ग्रंथांची लांबच लांब यादी दिली आहे. यापैकीं, कित्येक ग्रंथांचा मागील पृष्ठांत उल्लेख करण्यांत आला आहे.

विद्या व विद्यासंपन्न जन यांजपासून या राजवट्याच्या वृत्तांतावर झालेल्या परिणामांचें वर्णन आतां पुरेसें झालें आहेसें वाटतें. विशेषतः, फैझी व अबुलफझल या उभयतां बंधूंचें वजन त्यांच्या हयातींत एकसारखें कायम राहिलें, इतकेंच नाहीं, तर अबुलफझलचें वजन त्याच्या मरणानंतर ही कित्येक दिवस कायमच होतें. त्यानें अकबराला केलेल्या उपदेशांनीं त्याच्या नैसर्गिक वृत्तीस दृढता आणिली. या बंधुद्वयांना जीं तत्वें प्रिय होतीं तींच अकबराच्या स्वभावास प्रिय अशीं होतीं. तीं तत्वें येणें प्रमाणें:—( १ ) धर्मासंबंधींचें स्वातंत्र्य पूर्णपणें राहूं देणें; ( २ ) जाति आणि धर्म व सांप्रदाय हे लक्षांत न आणितां सर्वत्रांस सारखा न्याय

देणें; ( ३ ) देशांतील रहिवाशां वरील करांचा वगैरे बोजा हलका करणें; ( ४ ) राष्ट्रांतील सर्व वर्गांच्या लोकांच्या हिताहितांचें एकीकरण करणें, ह्मणजे आपल्या प्राचीन वंशाचा अभिमान बाळगून स्वारी करणाऱ्या मुसलमानांस परकीय व कुलहीन मानणारे रजपूत राजे; जेते या नात्यानें आपण देशाचे मालक आहोंत व येथील रहिवाशी आपले दास होण्यास मात्र लायक आहेत, असें मानण्यास नेहमीं तयार असलेले युझबेक व मोंगल अमीर उमराव; एतद्देशीय रहिवाशांतच मोडके जात असे आज चारशें वर्षें हिंदुस्थानांत घरदार करून राहिलेले जुने अफगाण लोक; व चांगल्या वर्तणूकीच्या व ममतेच्या योगानें नेहमीं राजी राहणारे देशांतील मूळचे रहिवाशी; या सर्वांचें एकीकरण करणें.

या निरनिराळ्या वर्गांतील लोकांपैकीं एका वर्गास मात्र अनुकूल करून घेणें अगदीं दुरापास्त होतें. हा वर्ग ह्मणजे ज्यांच्या वाडवडिलांनीं हिंदुस्थानांत कित्येक दिवस राज्य चालविलें, व जे स्वतःहि राज्य करण्याची उमेद बाळगीत अशा पुरातन मुसलमानी राजघराण्यांतील वंशजांचा. हे लोक बंगाल, बिहार, व ओरिसा या प्रांतांत व पश्चिम हिंदुस्थानांतील अनेक भागांत अद्याप पावेतों आपली सत्ता चालवून मोठमोठीं सैन्यें बाळगून असत. अकबरापेक्षां आपले हक्क श्रेष्ठ आहेत असें मानून त्या लोकांनीं, आपल्या वाडवडिलांचें राज्य कायतें वरवर होतें, पण अकबरच्या बादशाहीचीं मुळें देशांत खोलवर जात आहेत, ही गोष्ट ओळखिली नाहीं, त्याच्या वर्चस्वास विरोध केला; व त्याची सत्ता जुमानिली नाहीं. या लोकांना अनुकूल करण्याकरितां अकबरानें कसे प्रयत्न केले व केवळ त्यांनीं आपल्या कृतीनेंच स्वतःला त्याच्या कडून कसें हद्दपार करवून घेतलें याचें वर्णन मागील भागांत केलेंच आहे.

सुधारणा करणाऱ्या या अकबर बादशहानें सुरू केलेल्या नवीन राज्यपद्धतीवर, फैझी आणि अबुलफझल यांच्या सहवासानें दृढ झालेल्या अशा त्याच्या नैसर्गिक उदार तत्वांचा परिणाम कसा काय झाला हें निरूपण

करण्याचें आतां आह्मी योजिलें आहे. "मी. आपल्या राजवट्यांत एकेकाळीं हिंदूंना जबरदस्तीनें पेगमबराची दीक्षा दिलेली आहे," या अर्थाचें अकबरानें प्रदर्शित केलेल्या उक्तीचें अवतरण या भागांत मागें एके ठिकाणीं दिलें आहे. ही गोष्ट खरोखरीच घडली असली पाहिजे; कारण अकबरानें ती स्वतः सांगितलेली आहे. परंतु अशा जबरदस्तीनें दीक्षा दिल्याबद्दलचा दाखला इतिहासांत कोठें सांपडत नाहीं. अकबर ल्हान असतां बैरामखान मुख्य सत्ता चालवीत होता, तेव्हां या गोष्टी घडून आल्या असाव्यात. राजवेत्र आपल्या हातीं घेतल्यापासून,—ह्मणजे तोपर्यंत सर्वांत प्रबळ होऊन बसलेल्या बैरामखानाला मक्केस जाण्याची रजा दिली त्या दिवसापासून—जातिभेद मनांत न आणितां हिंदु व मुसलमान या उभयतांना समदृष्टीनें आपल्या चाकरींत घेण्याचा जो आपला हेतु त्यानें जाहिर केला, त्यापासून तो कधींही तिळमात्र सुद्धां ढळला नाहीं. जिंकणाऱ्या पक्षाच्या सैनिकांनीं पराजित झालेल्या शत्रूंच्या बायका मुलें व आश्रित यांना जबरदस्तीनें, विकावें, अथवा गुलाम करून टाकावें, अशी जी आजपावेतों वहिवाट चालत आली होती ती अकबरानें आपल्या राजवट्याच्या सातवे वर्षी ह्मणजे वयाच्या एकविसावे वर्षी मोडून टाकिली. शत्रूंचे कांहींही अपराध असोत पण बादशहानें प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्याप्रमाणें त्यांच्या मुलांमाणसांना व आश्रितांना त्यांच्या इच्छेनुरूप स्वगृहीं अथवा आप्तवर्गाच्या घरीं जाण्याची पूर्ण मुभा असे. ल्हान असो अथावा थोर असो गुलाम ह्मणून कोणास करावयाचें नाहीं. "नवरा दुर्वतनी असला तर त्यांत त्याच्या बिचाऱ्या बायकोचा काय अपराध आहे? व बाप बंडास प्रवृत्त झाला, तर त्याबद्दल त्याच्या मुलाकडे कसा दोष येईल?" अशी त्या उदार बुद्धीच्या बादशहाची विचारसरणी होती.

राज्यव्यवस्थेंत जीं कांहीं अवांतर दोषस्थळें होतीं त्यांच्या निरसनार्थ हेंच उदार व दूर दृष्टीचें धोरण त्यानें मोठ्या उत्साहानें सतत चालू

ठेविलें. कारभार हातीं घेतल्यापासून दुसऱ्याच ह्मणजे आपल्या राजवट्याचे आठवे वर्षी, अकबरानें एक पुरातन काळापासून चालत आलेला कर उठविण्याचा निश्चय केला. या कराचें उत्पन्न जरी फार जबर होतें, तरी तो आपल्या हिंदू प्रजेच्या अंतःकरणास अन्यायकारक व विचारस्वातंत्र्यास बाधक वाटणारा आहे, असें त्याच्या मनानें घेतलें होतें. हिंदू लोकांसारखी यात्रा करण्याविषयींची आसक्ति जगांतील दुसऱ्या कोणत्याही लोकांस नाहीं. साधुमाहात्म्य व स्थानमहात्म्य यांबद्दल नावाजलेलीं त्यांचीं पुण्यस्थळें हरएक प्रांतांत जागोजागीं आहेत. यात्रेकरू लोकांना अनेक प्रसंगीं दूरदूरचे व कंटाळवाणी प्रवास करावे लागतात. किंबहुना, जितकी दूरची यात्रा तितकी जास्त पुण्यप्राप्ति, असें प्रमाण असतें. मोंगलापूर्वी होऊन गेलेल्या अफगाण बादशहांना या यात्रा ह्मणजे एक विपुल व सतत वाहणारा असा उत्पन्नाचा झराच आहे असें वाटत होतें. ह्मणून त्यांनीं सर्व यात्रेकरूंवर, त्यांच्या अजमावलेल्या ऐपतीप्रमाणें अथवा लौकिकाप्रमाणें कर बसविला होता.

अबुलफझल यानें असें लिहिलें आहे कीं, हा कर मोठ्या किफायतीचा होता; त्यापासून सालिना कोट्यावधि रुपयांचें उत्पन्न होई. परंतु लोकांस तो फार क्लेशप्रद असा वाटे. हिंदूंच्या दृष्टीनें यात्रा ह्मणजे बहुतेक धर्मानें किंवा धर्माचा अर्थ करून सांगणाऱ्या ब्राह्मणांनीं निवेदिलेलें एक अवश्य कर्तव्य होय. यात्रेकरू आपल्या देहास अति मोठ्या अडचणी भोगावयास लावितो व नमस्कार किंवा कोटांगणें घालीत शेंकडों कोस जातो, ह्मणून सरकारानें त्याला कां बुचाडावें असा प्रश्न हिंदुलोक करीत. हे त्यांचे विचार लवकरच अकबराच्या कानापर्यंत जाऊन पोहोंचले. इकडे त्याच्या दरबारांत हा कर ह्मणजे महसुलाचा एक अनायासाचा झरा आहे येवढ्याच गोष्टीकडे लक्ष देणाऱ्या मुत्सद्यांनीं बादशहास असें प्रतिपादन केलें कीं, यात्रा करणें हा पोकळ धर्मभोळेपणाचा अत्याचार आहे; व हिंदुलोक तो कदापि ही सोड-

णार नाहींत; तेव्हां या कराची वसूली खात्रीची आणि सततची अशी आहे; करितां तो उठविणें ह्मणजे एक वसुलाच्या बाबतींत नुकसानीची मसलत आहे. यावर बादशहानें प्रत्युत्तरादाखल असा बुद्धिवाद केला कीं, जनसमूहाच्या अत्याचारावर हा कर आहे; व यात्रा न करितां घरीं बसणाऱ्या हिंदूंना तो चुकवितां येण्याजोगा आहे, हें जरी मान्य केलें, तरी, ज्या अर्थी यात्रा करणें हा हिंदुधर्माचा एक भाग बनला आहे, व एका अर्थी त्यांनीं तो ईश्वरोपासनेचा एक प्रकार मानिला आहे, त्या अर्थी, अशा ईश्वरप्रणीतविधि ह्मणून मानिलेल्या कर्मांत काडी इतकीही आडकाठी आणणें अन्यायाचें आहे. तो कर शेवटीं त्यानें अजीबात बंद केला.

याचप्रमाणें मुसलमान बादशहांनीं परधर्मी लोकांवर जिझिया अथवा प्रत्येक माणसावर डोईकर बसविला होता, तो ही बादशहानें रद्द केला. प्राचीनकाळीं हिंदुस्थान जिंकणाऱ्या अफगाण बादशहांनीं हा कर बसविलेला होता. कर देणाऱ्या लोकांत याच्या योगानें जसें वैमनस्य उत्पन्न झालें तसें दुसऱ्या कोणत्याही करानें झालें नसेल. तसेंच प्रजापीडन करण्यास या करामुळें जशी सवड सांपडली, तशी दुसऱ्या कोणत्याही करानें सांपडली नसेल. अकबरापूर्वी होऊन गेलेल्या बादशहांना या देशांतील रहिवाशांची सहानुभूति संपादितां आली नाहीं, याचें कारण हा कर वसूल करणाच्या हकीकतीकडे नजर दिली असतां कळण्याजोगें आहे. यासंबंधानें, तारीख ई फिरूझशाही नांवाच्या इतिहासकारानें लिहिलें आहे कीं "दिवाणीच्या तहशीलदारांनीं हिंदुलोकांना या कराची वसूली मागितली असतां, त्यांनीं त्याची आदाई मोठ्या नम्रतेनें व दीनतेनें केली पाहिजे; व या अंमलदारांना त्यांचे तोंडांत थुंकावेंसें वाटल्यास आपण बाटून जाऊं याची यत्किंचितही भीति मनांत न आणितां त्यास थुंकतां यावें ह्मणून त्यांनीं लागलींच आ केला पाहिजे. या अवहेलनेचा व तोंडांत थुंकण्याचा हेतु हा कीं, खऱ्या धर्माची ह्मणजे

पेगमबर पंथाची प्रतिष्ठा वाढवावी, खोट्या धर्माची परिभावना करावी, व आपल्या संरक्षणाखालीं असलेले काफर लोक आपल्या अर्ध्या वचनांत कसे वागतात हें जगास जाहीर करावें." याप्रमाणें वागणाऱ्या अधिकाऱ्यांचें आचरण पेगमबर धर्माच्या खऱ्या तत्वाविरुद्ध होतें, हें सिद्ध करून दाखविण्याचें प्रयोजन नाहीं. दुराग्रही धर्माभिमान्यांच्या अमर्याद आस्थेमुळें ज्याची हानि झाली नाहीं, असा दुनियेंत धर्मच नाहीं; आणि या कारणानें निदान इतर धर्माइतकी तरी मुसलमान धर्माची हानि झाली आहे यांत संशय नाहीं. तथापि फिरूझशाहासारखा लोकोत्तर सुज्ञ व समंजस बादशाहा दिल्लीच्या तक्तावर विराजमान असतां, आपल्या वर्तनानें धर्माचा केवळ विपर्यास करणारे अशा कारभारी लोकांना, जिंकिलेल्या प्रजाजनांस धर्माच्या नांवावर, जुलूम करण्याची व निर्भर्त्सना करण्याची केवढी सवकत होती, हें वरील अवतरणावरून शाबीत होतें.

अशा प्रकारचा कर वसूल करण्यांत अधिकाराचा दुरुपयोग होण्याचा निसर्गतःच संभव आहे; इतकेंच नाहीं, तर हा करच मूळीं दोषार्ह आहे, हेंही अकबरास समजून चुकलें; काफर ह्मणजे नास्तिक हा नुसता शब्द देखील उपयोगांत आणिलेला त्या उदार अंतःकरणाच्या बादशहास सहन होत नसे. कारण तो नेहमीं ह्मणे "आपण ह्मणतों तेंच खरें असा जिम्मा घ्यावा तरी कोणी?" हरएक धर्मांत कांहींना कांहीं श्रेय आहेच; तेव्हां कोणत्याही मनुष्यानें मनोभावानें उपासिलेल्या धर्मावर कर बसविण्याची त्याची इच्छा नसे. यामुळें, आपल्या राजवट्याच्या आरंभीं, ह्मणजे तक्तावर विराजमान झाल्यापासून नववे वर्षीं, आणि वयाच्या तेविसावे वर्षीं,—त्याचप्रमाणें लक्षांत ठेवावयाचें कीं प्रख्यात बंधुद्वय फैझी व अबुलफझल यांचा समागम जडून त्यांनीं उपदेशिलेल्या ज्ञानाचा पगडा बसण्यापूर्वीं तीन वर्षें—केवळ स्वतःच्याच योग्यायोग्यविचारबुद्धीनें अकबरानें आज्ञापत्र जाहीर करून हा कर अजीबात उठविला. तेव्हां-

पासून धर्माच्या बाबतींत अनाद्यनंत परमेश्वरापुढें सर्व लोक सारखे झाले.

हिंदुप्रजेशीं अकबर बादशहाचा जो व्यवहार होता तो फक्त त्यांच्या धर्मसंबंधी करांचें निर्मूलन करण्यापुरताच होता असें नाहीं. प्रजाजनांचें कल्याण व सुखसंपदा यांच्या आड येणाऱ्या गोष्टी नाहींशा करण्याच्या कामीं त्यानें आपल्या अधिकाराचा, यत्किंचित ही दम न दाखवितां, अश्रांत खटपट केली. सती जाण्याची क्रूर चाल बंद करण्याकरितां त्यानें जे प्रयत्न केले त्याचा उल्लेख पूर्वींच केला आहे. सतीशीं ज्याचा अगदीं निकट संबंध आहे, असा जो विधवा–पुनरुद्वाहाचा प्रचार तो सुरू करण्यास ही अकबराच्या हातून उत्तम प्रकारचें उत्तेजन मिळालें. या बाबतींत तो एक पाऊल पुढें ही गेला. विधवेचा पुनरुद्वाह कायदेशीर आहे, असें आज्ञापत्र काढून त्यानें चोहोंकडे प्रसिद्ध केलें. हिंदुलोकांत फार प्राचीनकाळापासून वधुवरें वयांत येण्यापूर्वीं लग्न करण्याची वहिवाट पडून गेली आहे; व जी सध्यांच्या मोठमोठ्या शाहाण्या पुरुषांनीं तत्वदृष्ट्या निषेधिली असतां ही, सांप्रत सुरू आहे, ती बंद करण्याचा ही त्यानें हुकूम दिला. याचप्रमाणें बळी ह्मणून पशुवध करण्याची व दिव्य* करून इनसाफ करण्याची त्यानें मनाई केली. इकडे आपल्या धर्मांतील लोकांशीं ही त्यांचें वर्तन कमी कडकपणाचें होतें असें नाहीं. मात्र अमुक गोष्ट करा, किंवा, करूं नका, असा स्पष्ट हुकूम न करितां आपल्या स्वतःच्या वर्तनाचा कित्ता दाखविणें, त्यांचें मन वळविणें, व कधीं कधीं त्यांची कानउघाडणी करणें ह्या मार्गाचा, त्यानें त्यांच्याशीं वागण्यांत, स्वीकार केला.

---

* एखाद्या मनुष्यावर आरोप आला असतां त्यांतून मुक्त होण्याचा दिव्य करणें हा एक मार्ग होता. आरोपितानें किंवा आरोप आणणाऱ्यानें तप्त सुवर्ण हातीं घ्यावें अगर तप्त तैलांत हात घालावा व त्यास त्यामुळें इजा न झाल्यास त्याचा पक्ष खरा आहे, असें मानण्याचा संप्रदाय होता. हा प्रचार तीन शतकांपूर्वीं यूरोप खंडांत, व खुद्द इंग्लंडांत ही जारी होता असें इतिहासावरून कळतें.

ईश्वरोपासना, उपवास दानधर्म व यात्रा इत्यादि गोष्टी त्यानें मना केल्या नाहींत. तथापि त्या बेसुमार होऊं लागल्यास तो त्यांचा निषेध करी. या बाबतींत, व्यक्तिपरत्वें भिन्न रुचि असण्याचा संभव आहे. तथापि लोकांस धर्माचा बाणा दाणविणें, हें बहुतेकअंशीं दांभिकपणाचें एक पांघरूण आहे व दीर्घकाल नाक धरून न बसतां व जोग्याचें रूप धारण न करितां जीवित्वाचें सार्थक करण्याचे अनेक मार्ग आहेत, हें त्यास समजून चुकलें होतें. अकबरास मुसलमान लोकांना सुंता करण्याची पूर्ण मनाई तर करितां येईना; तथापि त्यानें अशी ताकीद दिली कीं, हा विधि मुलांना-बारावें वर्ष लागेपर्यंत करूं नये. हिंदु लोकांचा संतोष राखण्याकरितां त्यानें गोवध बंद करण्याचा निग्रह केला. दुसरे पक्षीं, सूकरवध व त्याचें मांस भक्षण हें सशास्त्र आहे, असें त्यानें सर्वत्र जाहीर केलें. मुसलमान लोक कुत्र्यांना नापाक ह्मणजे अमंगल जनावर समजत व आजपावतों कडकडीत मुसलमानांचा असाच समज आहे. परंतु ते अमंगळ नाहींत असें अकबरानें फरमाविलें. महमुदीयांस मदिरापानाची बंदी आहे तथापि तिचें मितसेवन करण्यास अकबराचें अनुमोदन असे.

आपल्या बादशाहीच्या अखेरीस ह्मणजे इ० स० १५९२ त अकबरानें दाढी काढविण्याची वहिवाट पाडिली. यामुळें त्याच्या दरबारांतील हटवादी मुसलमानांचा फार संताप झाला. हिंदुस्थानासारख्या उष्ण देशांत श्मश्रु केल्यापासून होणारे फायदे इतके ढळढळीत आहेत कीं, त्याजविषयीं जास्त चर्चा करण्याचें प्रयोजन नाहीं. दाढी काढण्याबद्दल बादशहानें जरी सक्तीचा हुकुम दिला नव्हता, व हें प्रत्येकाच्या मर्जीवर बहुतेक ठेविलें होतें, तथापि या वहिवाटीप्रमाणें वागणें अगर न वागणें, हें दरबारांत एकप्रकारें मोठें भेदसूचक चिन्ह झालें होतें. धर्मनिष्ठ मुसलमान लोकांना दाढी काढणें, हें फारच नास्तिकतेचें कृत्य वाटे. अकबर बादशहाच्या राजवट्यांत असाच त्यांचा ग्रह होता; व तो आज तागाईत तसाच कायम आहे. ह्मणून, या बाबतींत बादशहानें जो कित्ता घालून

दिला होता, त्या योगानें कुरकुर व आंतल्याआंत फारच असंतोष उत्पन्न झाला.

अकबराच्या अंगीं जे अनेक नैसर्गिक गुण होते, त्यांत स्वतःच्या संबंधी जनांविषयीं प्रेम हा एक होता. त्याचा एक दूधभाऊ असे. तो नेहमीं गैरशिस्तपणें वागून बादशहास रंजीस आणी. एकदां त्यास अगदीं हलकी शिक्षा देतांना अकबर ह्मणाला:—"काय करूं, माझ्या व आझी-झच्या दरम्यान एक दुधाची नदी वाहत आहे व ती मला ओलांडून जातां येत नाहीं." या शब्दाच्या भावार्थानुरूपच तो आपल्या संबंधी जनांशीं सदैव वागत असे. त्यांनीं हत्या करून रक्तानें आपले हात भरविलें असल्यास किंवा ते माणसांतून अगदीं उठलेले असल्यास गोष्ट निराळी; एरव्हीं तो त्यांना सामोपचारानें व सौजन्यानें रस्त्यावर आणण्याची नेहमीं खटपट करी. कृतापराधांची माफी करणें, बहाली करणें व विश्वास ठेवणें या मार्गाची त्याला फार आवड असे. या अशा उदार दिलाच्या वर्तनानें तो कधीं कधीं फसे, ही गोष्ट खरी; तथापि परिणामीं याच कामास येत. अकबर हा सुपुत्र, अनुरक्त भ्रतार, व अति लाडकरणारा पिता होता.

अकबराचीं मुलें गर्भश्रीमंत होतीं, हें एक दुर्दैवासारखें त्यांच्या नुकसानीस कारण झालें. त्याच्या तिन्ही मुलांत शाहाजादा दानियल हा फारच होतकरू होता. परंतु त्याच्या सभोंवतीं चोहोंकडे मन चंचल करण्याच्या गोष्टी असल्यामुळें व त्याचे गुरूंनीं त्याचें त्यांपासून निवारण न केल्यामुळें, तो अकालींच मृत्युमुखीं पडला. शहाजादा मुराद याचीही अशीच अवस्था झाली. त्याचा वारस जहानगीर हा तर बहुतेक बाबतींत आपल्या बापाच्या अगदीं उलट होता. त्यानें अकबर बादशहाच्या कारकीर्दीचे अखेरीस घालून दिलेला कित्ता, ह्मणजे बापाच्या हयातींतच मुलानें आपण तक्तावर बसण्याची खटपट करणें, हा पुढें मोंगल घराण्यांत एक नियमच होऊन बसला. या अति अयोग्य

मुलाला अकबरानें इतक्या सहनशीलतेनें व क्षमाशीलानें वागविलें कीं, तें केवळ कित्ता घेण्याजोगें होतें. दुसरें, अकबरास क्रूरपणाचा फारच तिटकारा होता. कर्तव्यकर्म हें एक ईश्वराचें पूजनच होय असें तो मानी.

कर्तव्याच्या बाबतींत अमुक गोष्ट ल्हान व अमुक गोष्ट मोठी असा फरक अकबर मुळींच करीत नसे. अमुक एक प्रकारचा फरमान किंवा हुकूम दिला जावा, असें सांगून तो स्वस्थ बसत नसे. त्याची अंमलवारी कशी काय चालली आहे यावर त्याची नजर असे. ते सफळ झाले असल्यास तो ते शोधून अधिक परिपक्व करी. आणि त्यांचे आपल्या प्रजाजनांतील निरनिराळ्या जातींवर काय काय परिणाम होतात हें ही तो बारकाईनें पाही. आपल्याला मनुष्याची पारख फार चांगली आहे, असा त्याला पुष्कळ विश्वास असे. चेहऱ्यावरून माणसाची पारख करण्याची कळा त्याला चांगली साधली होती यांत संशय नाहीं. यासंबंधीं, अबुलफझल यानें असें लिहिलें आहे कीं—"अकबर माणसांची पारख नुसत्या एका नजरेनें करी;" हें बदौनी देखील कबूल करितो, पण हिंदूंविषयीं नाकतोंड मुरडावयाचेंच ह्या त्याच्या नेहमींच्या स्वभावानुरूप त्यानें असें ह्मटलें आहे कीं,—यांतील गम्य अकबर हिंदू जोग्यांपासून शिकला होता.

अकबराच्या अंगीं थोर विचार व उदारता वसत होती; तरी धर्मभोळेपणापासून तो अगदीं मुक्त नव्हता. शुभाशुभ दिवसांवर त्याचा भरंवसा असे. दिवस शुभाशुभ मानणें हें एक पारसिक धर्माचें स्वरूप आहे व त्या धर्माच्या अध्ययनानेंच अकबराची अशा प्रकारची मनोवृत्ति झाली होती, असें मि० ब्लॉकमन यांनीं लिहिलें आहे. त्याच्या दरबारांतील मंडळी व विशेषतः जे अकबरानें सुरू केलेल्या धर्मसंबंधी फेरफारा विरुद्ध होते ते ह्यास अचुक मिळणाऱ्या यशप्राप्ति केवळ त्याच्या सुदैवाचें फळ असें ह्मणत. उदाहरणार्थ, बदौनीनें असें लिहिलें आहे कीं "हुजुरांच्या मामुली सुदैवानें सर्व शत्रूंचा पराभव झाला." वास्तविक

पाहतां त्याच्या कार्य सिद्धीची गुरुकिल्ली ही होती कीं, स्वतः व मंत्रीमंडळीनीं ज्यांचा पूर्ण विचार केला आहे अशा कायदेकानूंची व ठरावांची कलमवार तामिली कशी होत आहे ह्याकडे तो जातीनें विलक्षण जागृत नजर ठेवी.

निशाण मारणें, पट्टा खेळणें वगैरे मैदानांतील खेळांचा, व विशेषतः शिकार करण्याचा अकबराला अतोनात नाद असे. परंतु, त्याच्या मागून बादशाही तक्तावर बसणारा जहानगीर नांवाचा मुलगा झाल्यापासून त्यानें शुक्रवारीं शिकार खेळण्याचें सोडून दिलें. याचें कारण, जहानगीर बादशहाचें ह्मणणें ऐतिहासिक आधार ह्मणून मानितां येईल तर, असें होतें कीं त्याची आई गरोदर असतां, अकबरानें असा नवस केला होता कीं, ती सुखरूपपणें प्रसूत झाल्यास मी पुण्यदिवस जो शुक्रवार त्या दिवशीं कधीं ही शिकार करणार नाहीं; व या नवसास तो आमरण जागला. अकबराला गाण्याचा अतिशय शोक होता; इतकेंच नाहीं, तर त्याचा स्वतःचा कंठ देखील फारच मधुर होता. याविषयीं हवा तितका आधार सांपडतो. गायनपटु ख्वारिझम याच्या सुश्राव्य व पुरातन रागरागिण्या ऐकून तो आनंदभरांत अगदीं तल्लीन होऊन जात असे. अबुलफझलचे ह्मणण्याप्रमाणें खुद्द अकबरानें दोनशांहून जास्त व "आबालवृद्धांस सारखेंच मोहून टाकिणारीं" गाणीं रचिलीं होतीं. याच ग्रंथकारानें असें नमूद केलें आहे कीं, "गायनशास्त्राचे हुजूरांना इतकें ज्ञान आहे कीं, तितकें शिकलेल्या गवयांना देखील नसेल." दररोज दरबारांत गाण्याची मजलस असेच. गायनांचे ध्वनि एशियांतील बादशहांना सर्वकाल विशेष मनोहर वाटले आहेत. कल्पनाशक्तीची ईश्वरी देणगी ही अकबरास बरीचशी होती. त्यानें एक नवीन तऱ्हेचा रथ, बंदुक, साफ करण्याचें चक्र, व हत्तीवर घालण्याचें सामान हीं कल्पनेनें शोधून काढिलीं; व शिवाय त्यानें आपल्या सैनिकांच्या व गोलंदाजांच्या पोषाखांत कसा फेरफार केला याविषयीं आईन ए अकबरींत वर्णन केलें आहे.

अकबराचें खाणेंपिणें अगदीं साधें असे. तो दिवसांतून पोटभर जेवण एकदांच करी. मांस भक्षण त्याला आवडत नसे; व तें तो महिनोगणती खात नसे. तो फळफळावळीचा मोठा भोक्ता होता; व त्यांच्या लागवडीचा तर त्यानें अभ्यासच केला होता. फळफळावळ ही "परमेश्वराच्या महान् देणग्यापैकीं एक देणगी आहे" असें अकबर मानी, व त्यांच्या लागवडीकरितां त्यानें इराण व तुराण येथून हुशार बागवान बोलावून त्यांना आग्रा व फत्तेपूर शिक्री या ठिकाणीं वस्तीस ठेविलें, असें अबुलफझल लिहितो. तेथें "खरबुजें व द्राक्षें हीं फारच उत्तम व विपुल आलीं आहेत; आणि कालिंगडें, सफ्ताळू, बदाम, पिस्तें, दाडिंबें वगैरे तर जिकडे पाहावें तिकडे दिसतात" या इतिहासकारानें आणखी असें ही लिहिलें आहे कीं यावेळीं काबूल, कंदाहार, काश्मीर, बदकशान आणि समरकंद येथून ही अनेक प्रकारचें फळफळावळ व मेवा ही दिल्लीस मनमुराद येत असे. आईन ए अकबरींत ह्यांची एक लांब यादी दिली आहे; व हिंदुस्थानची माहिती आहे अशांनीं ती वाचिली असतां आनंद होण्यासारखा आहे. त्या कालांत देखील हिंदुस्थानांतील सर्व मधुर फाळांत आम्रफळालाच अग्रस्थान देत ही एक मोठी लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. याचा रंग, सुवास व रुचि हीं केवळ अद्वितीय ह्मणून वर्णिलीं आहेत; व इराण व तुराण येथील खादूनंदन मंडळी तर याला खरबुजें, टरबुजें व द्राक्षें याहून ही श्रेष्ठ मानीत."

आग्रा अथवा फत्तेपूर शिक्री येथें रहात असतां अकबर अपला दिवस कसा घालवी व साधारणतः त्याचा नित्य क्रम कसा होता याजविषयीं दोन शब्द लिहिणें अगत्याचें आहे. तो रात्रीचा फार वेळ जागत असे, असें दिसतें. संभाषण व वादविवादास सायंकाळीं आरंभ होऊन ते रात्रभर थेट पहाटपर्यंत चालत. "दिवस उघडण्यापूर्वीं एक प्रहरपर्यंत" तो या व्यासंगांत राही, व मग गवई हजर होऊन गायनास सुरवात होई, असें अबुलफझलच्या इतिहासावरून कळून येतें. दिवस उगवतांच तो

आपल्या खाजगी महालांत जाइ व स्नान करून पोषाख चढवून सासरी एका तासानें दरबारी मंडळींचे मुजरे घेण्याकरितां विराजमान होई. नंतर दररोजच्या कारभारास सुरावत व्हावयाची. हा कारभार बहुतकरून मध्यान्हास बराचसा अवकाश असतांनाच आटोपत असे; अकबरच्या खान्याची मुक्रर ह्मणून वेळ नसे. तथापि या सुमारास तो दिवसांतून जो एक खाना खात असे तो वाढून येई. तिसरा प्रहर ह्मणजे त्याची आराम घेण्याची वेळ समजली जात असे. कधीं कधीं, अकबर पाहाटेची वेळ निशाण मारण्यांत, व शिकार करण्यांत घालवी. व केव्हां केव्हां तो संध्याकाळच्या समयीं चौगन अथवा पोलो नांवाचा खेळ खेळे. या खेळाकरितां पळसाच्या गोव्या केलेल्या असत. व त्या पेटवून रात्रीं खेळ होई. दिवसाच्या जो अतिशय उष्णकाळ तोच त्याच्या विश्रांतीचा व ताजा तवाना होण्याचा वेळ असे.

गादीवर बसून फार दिवस झाले नाहींत तोंच राजपुतान्यांतील हिंदु राजांना केवळ मैत्रीपेक्षां जास्त निकट बंधनानें बादशाही तक्तास जोडण्याचें महत्व अकबराचे लक्षांत आलें. आतां राजस्थानांतील उच्च जातींचे बहुतेक राजे व राजपुत्र मोंगलांशीं शरीरसंबंध करणें ह्मणजे आपल्या पदरीं हलकेपणा घेणें, असें मनांत समजत. तेव्हां त्यांच्या मनांत याप्रमाणें स्वभावतःच आढी असतां ती अकबरानें कोणत्या युक्तिप्रयुक्तीनें दूर केली, हें लक्षांत आणिलें ह्मणजे घटकाभर कौतुक वाटतें. या बाबतींत त्याचा बाप हुमायून यानें बऱ्याच अंशीं त्याचा मार्ग सुगम करून ठेविला होता, असें ह्मणतां येईल. आपल्या राजवट्याच्या प्रारंभीं चितूरची राणी कर्णावती हीस त्यानें आपली भगिनी मानून तिचे संरक्षणार्थ जन्मभर चाकरी करण्याची त्यानें प्रतिज्ञा कशी केली, इत्यादि गोष्टी कर्नल टॉड यांनीं आपल्या मोहक व विद्वत्तासूचक ग्रथांत वर्णिल्या आहेत. ही चाकरी हुमायुनानें फारच इमानानें बजाविली. तो तिला नेहमीं "सद्गुणी व प्रिय भगिनी" ह्मणून हांक मारीत असे. राणी

भगवानदास, ज्याविषयीं या पुस्तकांत अनेक वेळां उल्लेख आला आहे, त्याचा बाप अंबरचा राणा, राजाविहारीमल, याचा ही हुमायुनानें प्रेम व आदर संपादिला होता.

पुढें अकबरानें त्याच्या मुलीशीं लग्न केलें; आणि या योगानें अंबरच्या—जयपूरच्या—घराण्याशीं संबंध जडल्यामुळें, राणा भगवानदास व त्याचा पुतण्या आणि दत्तक पुत्र महापराक्रमी सेनापति राणा मानसिंग हे उभयतां निकट स्नेही झाले, असा त्याला भरंवसा आला. कर्नल टॉड यानें दुसऱ्या एका पानांत राणा भगवानदास याजविषयीं असें लिहिलें आहे कीं, "तो अकबाराचा जिवलग मित्र होता, व अशा पुरुषाची स्वामिभक्ति संपादण्याचें माहात्म्य अकबरास कळून चुकलें होतें." रजपूत राजांचीं खरोखर मनें कशीं होतीं हें समजून घेण्याचीं साधनें कर्नल टॉडच्या सारखीं दुसऱ्या थोडक्याच लोकांना मिळालीं असतील. ते साहेब आणखी असें ही म्हणतातः—"मुसलमानांशीं प्रथमतः शरीरसंबंध घडवून रजपुतांच्या विमलतेस कालिमा आणिली ह्मणून राज्यस्थानांतील लोक राणा भगवानदास याच्या नांवानें अद्याप बोटें मोडतात." अविचार ग्रह हा मोठा बलवत्तर असतो; व कुत्र्याप्रमाणें, केलेल्या वमनाकडे पुनः परतण्याची त्याची प्रवृति असते.

राजस्थानांत राणा भगवानदास व त्याचा पुतण्या राणा मानसिंग यांच्याहून अधिक थोर अंतःकरणाचे व उदार वृत्तीचे राजपुत्र निपजलेच नाहींत. मोंगल बादशहाचें वर्चस्व राजपुतान्यांत संमत झालें, याचें मुख्य कारण या उभयतां नरवीरांशीं दृढ ऐक्य हें होय, हें ऐक्य पुढें राणा भगवानदास याची कन्या व शहाजादा सलीम यांचा पूर्वी सांगितल्याप्रमाणें विवाहसंबंध घडल्यामुळें दृढतर झालें. खुद्द रजपुतापेक्षांही मनानें अधिक रजपूत जो कर्नल टॉड यानें अकबराच्या कारकीर्दीचें संक्षिप्त वर्णन केलें आहे त्यावरून त्याच्या बादशाहीचा या बाणीदार खऱ्या क्षत्रियवंशाचे लोकांवर खरोखर काय परिणाम झाला हें कळून येण्याजोगें आहे.

या ग्रंथकारानें असें लिहिलें आहे कीं "मोंगल राष्ट्राचा खरा संस्थापक अकबर होय. रजपुतांचें स्वातंत्र्य प्रथमतः हस्तगत करून घेण्याचें श्रेय याच्या कडेच आहे. या कामीं त्याच्या सद्गुणाचे त्याला फार मोठें साह्य मिळालें. त्यांच्या मनोवृत्तीचे व त्या मनोवृत्ति कशानें जागृत होतील ह्याचें ज्ञान करून घेण्याची कुशलता त्याच्या अंगीं असल्यामुळें त्याला त्यांना कोणचे सोनेरीपाश घालावे हें सहज समजलें. पुढें, संवयीच्या योगानें आणि विशेषतः बादशहा जसजसा त्यांच्या देशाचा बडेजाव व कांहींसे निंद्य छंद पुरविण्यांत आपल्या अधिकाराचा उपयोग करी, तसतशीं हीं बंधनें त्याच्या आंगवळणी पडलीं. अकबराच्या राजनीतीचें तत्व, ह्मणजे राष्ट्रांत केवळ एकोपा करण्याकरितांच नवीन विजय संपादणें, याचा उमज पडण्याचीं साधनें व आकलन नसल्यामुळें व त्याच्यापूर्वीं होऊन गेलेल्या अफगाण व पठाण बादशहाप्रमाणेंच हा ही असेल या समजुतीनें कर्नल टॉड हे त्याच्या विजयसंपादनास दोष देतात. तथापि, त्यांना देखील लिहिणें भाग पडलें कीं "अकबरानें आपल्या महत्वाकांक्षेनें केलेले घाव अखेरीस भरून आणण्याचें श्रेय घेतलें; आणि त्याच्या कुळांत कधीं कोणास मिळाली नाहीं अशी त्यानें कोट्यावधि प्रजाजनांकडून वाहवा मिळविली" कोट्यावधि प्रजाजनांना सुखसंपदा देणें, हाच जर राजपणाचा मुख्य उद्देश आहे, व ह्या हेतूस्तव एकोपा साधण्यास विजय संपादन जर हवें आहे, तर धारिलेल्या उद्देशासाठीं या योजिलेल्या उपायांना साधुता येते हें मानणें रास्त आहे. राजस्थानांत राज्य करावें ह्मणून अकबरानें राजपुताना जिंकिला नव्हता. हा प्रांत जिंकण्यांत त्याचा इतकाच हेतु होता कीं कधीं ज्याचा जांच ह्मणून वाटला नाहीं अशा आपल्या सार्वभौम बादशाही वर्चस्वामुळें एकंदर राष्ट्रास प्राप्त झालेली शांतता व आबादानी हीं अनुभवून प्रत्येक रजपूत राजाला आपआपल्या संस्थानांत हितकर व उचित असा राज्यकारभार चालवितां यावा.

त्यावेळीं सर्व रजपूत राजांत जो अतिशय प्रबळ, जोधपूरचा राजा, राणा उदेसिंग त्याच्या मुलीचें शहाजादा सलीम याच्याशीं अकबरानें लग्न जुळवून आणिलें. पुढें सलीम अथवा जहानगीर बादशहाच्या मागून तक्तावर विराजमान झालेला जो शहाजाहान बादशहा तो ह्याच राजकन्येचा मुलगा. या शहाजहानामुळें रजपुतलोकांना हिंदुस्थानांत केवळ अश्रुतपूर्व असें महत्व आलें. या लग्नापासून फलनिष्पत्ति खरोखर फारच गोड झाली. याविषयीं, कर्नल टॉड यांनीं असें लिहिलें आहे कीं, हा संबंध जुळवून आणण्यास अकबराला चार सुभ्यांची देणगी लांच द्यावी लागली; ह्या देणगीनें मारवाड ( जोधपूर ) संस्थानाचा वसूल एकदम दुपटीनें वाढला. या ग्रंथकारानें आणखी असें ही नमूद केलें आहे:—"अंबर व मारवाड यांच्या सारखीं उपाहरणें डोळ्यापुढें असल्यामुळें व आमिष सोडून देण्याची निरीच्छता कमी असल्या कारणानें, राजस्थानांतील लहान लहान सरदार आपल्या असंख्यात आणि शूर अनुयायी वर्गासह बादशहाचे मांडलिक बनलें; व या रुपांतरानें त्यांच्यांतील बहुतेक सरदारांचें महत्व दुणावलें." ही सरदार मंडळी "बादशाही तक्ताचे आधार व भूषण आहेत" असें जें मोंगल इतिहासकाराचें म्हणणें तें यथार्थच आहे.

कर्नल टॉड यांना रजपुतांविषयीं अतिशय कळकळ व अभिमान होता; तेव्हां या कैवारी इतिहासकारानें राजापुताना व तेथील राजेरजवाडे यांच्याशीं अकबरानें जें धोरण व कारस्थान लढविलें, त्याचें जें हें समर्थन केलें आहे त्याहून अधिक प्रमाणभूत समर्थन असूंच शकणार नाहीं.

बादशाही घराण्यांतील लग्नसंबंधी गोष्टींचा वृत्तांत लिहीत असतां, अकबरास अनेक बायका होत्या ही गोष्ट ही येथें सांगण्यास हरकत नाहीं. परंतु यापैकीं फक्त आठ बायकांविषयींचाच उल्लेख आधारपूर्वक केलेला आहे. त्याची पहिली बायको त्याची चुलत बहीण, ह्मणजे त्याचा चुलता

हिंदालमिरझा याची मुलगी होती. हिच्यापोटीं कांहीं संतति झाली नाहीं; व अकबराच्या मागें, ती आपल्या वयाच्या चवऱ्याण्णावे वर्षापर्यंत वांचली. त्याची दुसरी बायको बाबरच्या मुलीची मुलगी ह्मणजे त्याची आतेबहीण होती. हिचा बाप मिरझा–नुरुद्दीनमहमद हा होता. ही राणी कवि ह्मणून प्रसिद्ध आहे; व तिनें मखफी ( अथवा गुप्त कवि ) हें नांव घेऊन या नांवावर अनेक पद्यें रचिलीं. त्याची तिसरी बायको राजा बिहारीमल याची मुलगी व राणा भगवानदास याची बहीण होती. इचें लग्न इ० स० १५६० या वर्षीं झालें. त्याच्या चवथ्या बायकोची सौंदर्याविषयीं फार ख्याति होती. तिचें पहिलें लग्न अबदुलवासी याजबरोबर झालें होतें. पांचवी बायको जोधबाई, ही जोधपूरच्या राण्याची कन्या होती. हीच जहानगीरची आई. तेव्हां युवराजमाता ह्मणून सर्व जनानखान्यांत तिचीच गणना अग्रस्थानीं होती. बाकी राहिलेल्या ह्मणजे सहावी, सातवी आणि आठवी, ह्या तिन्हीं बायका मुसलमानिणी होत्या.

देशांतील अंतर्व्यवस्थेकडे पाहिलें असतां, जमीनीचा धारा वसूल करण्याच्या पद्धतीकडे अकबरानें बरेंचसें लक्ष दिलें होतें, असें दिसतें. तो सिंहासनारूढ झाला तेव्हां त्याच्या बापाचा पराभव करून त्यास हिंदुस्थानांतून ज्यानें हांकून लाविलें त्या शीरशहानें काढिलेली पद्धति चालू होती. या पद्धतीची रचना ज्या तत्वांवर होती तीं येणेंप्रमाणें:— ( १ ) जमीनीची बरोबर मोजणी करावयाची. ( २ ) जमीनीचे विभाग करून प्रत्येक विभागांत सरासरीनें एका बिघ्याचें ( ह्मणजे वायव्येकडील प्रांतांत $\frac{५}{८}$ एकरचें व बंगाल्यांत $\frac{१}{३}$ एकरचें ) उत्पन्न किती आहे तें काढावयाचें. ( ३ ) आणि मग या आकारणीवर सरकारांत द्यावा लागणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा ठरवावयाचा ( ४ ) व अशा ठराव केलेल्या हिश्शाचा किंमतीवर बसविलेल्या धान्याच्या रकमेची इयत्ता कायम करावयाची. ही पद्धत न मोडतां ती सुधारून प्रगल्भदशेस आणण्याचा अकबरानें विचार केला; व हा उद्देश साधण्याकरितां तेव्हांपर्यंत चालत

असलेलीं निरनिराळीं व एकमेकांस न जुळणारीं वजनें व मापें मोडून टाकून त्यांच्या ऐवजीं त्यानें एका प्रमाणाचीं वजनें व मापें सुरू केलीं.

आईन ए अकबरींत असें लिहिलें आहे कीं, "या स्तुत्य निर्बंधामुळें ( १ ) "तहसीलदारांच्या मनावरील अनिश्चितपणाचा जंग निघून गेला; ( २ ) प्रजाजन अनेक प्रकारच्या जुलुमांतून मुक्त झाले; ( ३ ) वसुलाची आमदानी वाढली; व सरकारचीही आबादानी झाली;" याचप्रमाणें, जमीनीची मोजदाद करण्याकरितां अकबरानें सुधारलेलीं यंत्रें उपयोगांत आणविलीं व त्यांनीं राज्यांत असलेल्या लागवडीमाफक जमीनीची नवीन जमाबंदी केली. आईन ए अकबारींत असें ही लिहिलें आहे कीं, दरएक बिघ्यामागें दहा शेर धान्य सरकारचा हिस्सा ह्मणून वसूल करण्याची अकबरानें वहिवाट घातली. ही धान्य घेण्याची पद्धति आपल्या राजवटयाच्या उत्तरार्धांत महकूब करून त्याबद्दल नगदी रकम घेण्याचें त्यानें ठरविलें. सरकारी जनावरांना दाणाचारा मिळण्याकरितां, शेतकऱ्यांना पेरणी करण्याका वेळेनुसार बीं मिळावें ह्मणून, दुष्काळ निवारणार्थ आपल्याजवळ धान्याचा संग्रह असावा या हेतूनें, व गोरगरिबांस पोशितां यावें, अशा इराद्यानें या दूरदर्शी प्रजाजनहितैषी बादशहानें जिल्हेनिहाय कोठारें बांधिलीं व त्यांवर निवडक इमानदार व भरंवशाच्या कामगारांची नेमणूक केली.

अकबरानें आपल्या राजवट्याच्या पूर्वार्धांत सुपीकपणाच्या मानानें जमीनीचे तीन वर्ग केले होते. या प्रत्येक वर्गांतून एक एक बिघा जमीन घेऊन व त्यांचें सरासरी उत्पन्न काढून त्या उत्पनाप्रमाणें जमीनीवरील धारा कायम केलेला होता. हें सरासरीनें काढलेलें उत्पन्न एखाद्या खातेदारास नापसंत झाल्यास, आपल्या एकंदर पिकाची मोजदाद करवून त्यांची रास्त किंमत ठरवून घेण्याचा त्यास हक्क असे. त्याप्रमाणेंच उत्पन्नाचे मानानें सर्वांवर सारखाच धारा बसवितां यावा ह्मणून जमीनीचा, मगदूर व पूर वगैरे अपघातांपासून भीति किंवा निर्धास्ती हीं लक्षांत आणून

राज्यांतील जमीनीचे त्यानें पुढें पांच वर्ग केले. जमीनीचे निरानिराळे दर्जे राखतां यावे, ह्मणून आणखी ही कित्येक नियम मोठ्या काळजीनें केले होते. एकंदरींत प्रजेला व सरकाराला ही रास्त अशी जमिनीवरील धाऱ्याची पद्धति ठरवितां यावी, हाच कायतो या सर्व कायदे कानूंचा उद्देश होता.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें, अकबराचें राज्य जसजसें स्थिरस्थावर होऊं लागलें तसतसें सरकारधाऱ्याची रकम ठरविण्याच्या बाबींत चांगलीं चांगलीं तत्वें अंमलांत येऊं लागलीं. याकरितां जमीनीची पाहणी होण्यापूर्वीं एकोणीस वर्षांचे बाजारभावाचे तक्ते पाटील पटवाऱ्यांमार्फत तयार करवून दरबारांत आणविले; व त्यांची सरासरी काढून चालू निरखाप्रमाणें उत्पन्नांची किंमत लाविली. प्रथमतः जमाबंदीचे ठराव दरसाल होत असत. परंतु सालोसाल बदलणारे ठराव त्रासदायक आहेत असें प्रत्यंतरास आलें तेव्हां मागील दहा सालाच्या सरासरीवर पुढील दहा सालांकरतां जमाबंदीचा ठराव एकदम करण्यांत आला.

ही शेतकीच्या धाऱ्याची व्यवस्था पूर्णतेस आणण्याकरितां बादशाही मुलुखाचे अकबरानें वसुलास सोईचे असे नवीन विभाग केले. या योजनेप्रमाणें एक कोटी दामाचा ह्मणजे पंचवीस हजार रुपये तहशिलीचा एक असे एकंदर राज्याचे विभाग केले. दाम हें एक त्यावेळीं तांब्याचें नाणें असून त्याची किंमत रुपयाचा एक चाळिसांश होती. सध्यांची दमडी दामाचा एक अष्टमांश आहे. नवीन केलेल्या प्रत्येक भागाचा वसूल करणाऱ्या अंमलदारास **करोडी** ही संज्ञा दिली. जेव्हां करोडीपाशीं दोनलाख दाम वसूल जमे, तेव्हां ती रक्कम त्यास दिल्ली येथें सदर खजीनदाराकडे रवाना करावी लागे. पुढें, केवळ गणितशास्त्राच्या अनुरोधानें रचिलेल्या या पद्धतीपासून घोंटाळा होऊन अत्यंत पुराणप्रिय अशा हिंदुलोकांना मान्य अशा वहिवाटीस हर-

कत येते असें कांहीं दिवसांनीं आढळून आलें. तेव्हां या गोष्टींचा प्रत्यय आल्यावर हे कृत्रिमविभाग मोडून टाकिले व त्यांच्या ऐवजीं प्राचीन विभागांची, ह्मणजे प्रांताच्या स्वाभाविक स्वरूपावरून झालेल्या भागांची व खेडीं, पाटील, कुळकर्णी इत्यादि व्यवस्थेची पद्धति पुनः सुरू झाली.

जमीनीवरील धारा वसूल करण्याकरितां मक्ते देण्याची वहिवाट अकबरास अगदीं नापसंत होती; कारण असे मक्ते देणें ह्मणजे प्रजेस जाचणूक करण्याचा एक अचुक मार्ग खुला करून देणें आहे, असें त्यास वाटे. त्यानें आपल्या कमावीसदारांना व तहशीलदारांना असा एक मुद्दाम हुकूम फरमाविला कीं, होईल तेथपावेतों गांवचे मुकद्दम पाटील यांच्याशीं व्यवहार न ठेवितां खुद्द खातेदाराशीं ठेवावा. ही व्यवस्था अगदीं नवी होती व ती सुरू करण्यांत त्याचा उद्देश अत्युत्तम होता. तथापि ही व्यवस्था कामास पडली नाहीं. कारण, प्राचीन काळापासून हिंदुलोकांत जुन्या वहिवाटीचें माहात्म्य फार आहे व या जुन्या वहिवाटीप्रमाणें गांवच्या मुकद्दम पाटलाचें वजन सर्वमान्य असें आहे. ह्मणून व्यवहारांत सरकारी अधिकाऱ्यांस त्यांच्याशीं निदान मिळून तरी वागणें भाग पडलें.

जमीनीच्या वहितीसंबंधानें विचार करीत असतां, अकबर बादशाहास असें कळून आलें कीं, आपल्यापूर्वीं होऊन गेलेल्या बादशहांनीं अपात्रीं इनामें व जहागिरी दिल्या आहेत इतकेंच नाहीं, तर आपण नेमिलेले मुलकीकडील कामगार लोक ही थोडे बहुत लांचलुचपत खाणारे व इतर खोटीं कामें करणारे असे आहेत. चितूरचा वेढा चालला असतां फैज्जी अकबराच्या गोटांत जाऊन मिळून, त्याचें बादशहावर चांगलें वजन बसल्यावर लवकरच अकबरास कळून आलें कीं दरबारांत जे दांभिक आपल्या पवित्रपणाचा मोठा डौल मिरवीत, तेच या दुष्ट व अघोर कृत्यांसंबंधानें मुख्य दोषी आहेत. याबद्दल अर्थातच त्यास अत्यंत दुःख

झालें. पुढें लागलींच या कामगार मंडळींना मक्केस पाठविण्याच्या मिषानें हद्दपार केलें. आणि मग मुलकी खात्यासंबंधीं साद्यंत चवकशीस सुरवात झाली. राजानें सरकारांतून फक्त चार प्रकारच्या लोकांनाच काय तें मदत करणें इष्ट आहे असें ठरलें होतें. यांपैकीं पहिल्या वर्गाचे लोक, ह्मणजे ज्यांनीं आपलें तनमन विद्यार्जनाकडे व ज्ञानार्जनाकडे लाविलें आहे व ज्यांचेपाशीं कांहीं संपत्ति नव्हती, अशा प्रकारच्या पुरुषांना मध्यान्हीविषयीं काळजी बाळगावयास लावणें इष्ट नाहीं असें वाटलें. जे लोक आत्मसंयमन व इंद्रियदमन करण्यांत आपला देह सतत कष्टवितात; व मानवी स्वभावाच्या स्वार्थपर मनोविकारांशीं झुंजण्यांत गुंतल्यामुळें, ज्यांनीं संसाराचा परित्याग केला आहे, असे लोक दुसऱ्या वर्गात येत. तिसरा वर्ग ह्मटला ह्मणजे, ज्यांना काम काज करण्याची ताकद नाहीं, असे दुर्बल व अनाथ लोक. सभ्य घराण्यांतील प्रतिष्ठित पण खालावलेले लोक, ज्यांना इतर शिक्षण न मिळाल्यामुळें व्यापारधंदा करून आपलें पोट भरण्याचें सामर्थ्य नाहीं, अशा प्रकारच्या लोकांचा चवथ्या वर्गात समावेश असे.

या चारी वर्गांतील याचकांच्या स्थितीसंबंधीं पूसतपास करण्याकरितां अनुभविक व नेकीचे अंमलदारांची नेमणूक केली होती; त्यास सदर किंवा मुख्य हा किताब असून काजी व न्यायाधीश यांच्यापेक्षां त्यांचा दर्जा श्रेष्ठ होता. पुढें फैझीच्या सांगण्यावरून अकबरानें या एकंदर खात्याची तपासणी सुरू केली, तींत हें खातें ह्मणजे एक लांचलुचपतीचें आगरच आहे, असें त्यास आढळून आलें. तेव्हां थेट सदर अंमलदारापासून तो यःकश्चित काजीपर्यंत त्यानें सर्वांस एकदम फांटा दिला; व त्यांचे जागीं निराळ्या तऱ्हेच्या लोकांची योजना करून सक्त अशा कायदेकानूंनीं त्यांचे अधिकार मर्यादित करून टाकिले.

बादशहा या नात्यानें अकबरास सरकारी नोकऱ्या व कामगिऱ्यांबद्दल इनाम देणें अवश्य होतें, ह्मणून आपल्या इमानी व तत्पर लोकांस जमीन

देण्याचें काम ही त्याजकडे आलें. ह्याप्रमाणें तो मनसबदार अथवा बक्षी या हुद्याच्या लष्करी अमलदारांस रोख तनखा न देतां त्या ऐवजीं जमीनींची हंगामी जहागिरी देत असे. अकबराच्यापूर्वी होऊन गेलेल्या बादशहांत अतिशय प्रबळ, आणि हुमायून यास हिंदुस्थानांतून हांकून लावणारा जो शीरशहा, त्यानें आपल्या हाताजवळील अफगाण सरदारांस इनाम व जहागिरी यांची रेलचेल करून दिली होती. अकबरानें या देणग्या कोणत्या कामगिरीबद्दल, कधीं, व कोणत्या हुकुमावरून दिल्या इत्यादि गोष्टींची बारीक चवकशी केली व पुष्कळ लोकांच्या देणग्या खालसा करून परत घेऊन त्या आपल्या अनुयायांस दिल्या.

अकबरानें हें जें वर्तन केलें तें मागील बादशहांनीं घालून दिलेल्या वळणास अनुरूपच होतें. तथापि, याप्रमाणें वागण्याला मागील वहिवाटीपेक्षां त्यास बलवत्तर कारण होतें; तें हें कीं, इनामदार व जहागीरदार यांस देणगीच्या सनदांत जमीन दिली होती तिचा व वस्तुतः त्यांनीं कबजांत घेतली त्या जमीनीचा क्वचितच मेळ असे. दुसरें, कधीं कधीं असें होई कीं, सनदेंतील मजकूर इतक्या अस्पष्ट व मोघम शब्दांनीं लिहिलेला असे कीं, इनामदारांस व काजी व सदर वगैरे कामगारांना लाचलुचपत देऊन, मनास वाटेल तितकी जमीन बळकावण्यास फावे. तेव्हां न्यायदृष्टीनें व सरकार व रयत ह्यांच्या हिताकडे नजर देऊन पाहतां, सनदेंत दिलेल्यापेक्षां जास्त जमीन कोणाच्या ताब्यांत आहे असें आढळल्यास ती खालसा करण्याचा बादशहास पूर्ण अधिकार होता. याशिवाय, अकबराच्या असें ही लक्ष्यांत आलें कीं, महमुदीय धर्मांतील मौलवी ह्मणविणाऱ्या मंडळीनीं आपण लहान असतां, व फैझीच्या सांगण्यावरून सुरू केलेल्या चवकशी पूर्वी, मनास वाटेल तितकी जमीन बळकाविली होती; ही मंडळी बायबलमध्यें वर्णन केलेल्या अधाशी फारिसीस् नामक महंत वर्गासारखी होती.

त्यांच्या तोडीचा अधाशी व दांभिक असा वर्ग दुसरा कोणता ही इतिहासांत सांपडावयाचा नाहीं. या मंडळीचा अकबरास मनापासून तिटकारा असे. तेव्हां त्यांच्या हक्कासंबंधीं त्यानें अगदीं कसून व बारीक चौकशी केली. त्यांत जेथें दोष सांपडला, अथवा जेथें जहागीर अथवा इनाम लबाडीनें मिळविलें आहे असें त्याचे नजरेस आलें, तेथें त्यानें त्या देणग्या एकदम खालसा केल्या व त्यांचा उपभोग करणारांस सिंधप्रांतांतील बक्कर येथें किंवा बंगाल्यांत हद्दपार केलें; कारण या दोन्ही ठिकाणचें हवापाणी फारच वाईट आहे, असा त्यावेळीं बोभाट होता. शिवाय, अकबरानें याबाबतींत सुधारणा चालली असतां सदरचे अधिकार अतिशय कमी केले व ते बहुतेक आपणाकडेसच घेतले.

राज्यांतील मुलकी खात्यांत अकबरानें ज्या सुधारणा केल्या त्यांचा साधारण झोंक व परिणाम कोणत्या प्रकारचे होते याविषयीं प्रख्यात इतिहासकार आनरेबल माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनीं आपलें मत दिलें आहे कीं "त्याच्या जमाबंदीच्या पद्धतींत सुरू केलेल्या सुधारणांच्या योगानें तत्कालीन प्रजाजनांच्या सुखांत भर पडली हें खरें. तथापि त्या सुधारणा दिवसेंदिवस वाढत जातील असें कांहीं तत्व त्यांच्यांत नव्हतें. दुसरें, खेड्यापाड्यांतील लोक इतर रोजगार धंद्यास लागतील, किंवा व्यक्ति पराक्रमानें उदयास येतील असे कांहीं मार्ग काढून त्यांना उमेद देतील अशा त्या नव्हत्या." या ग्रंथकाराविषयीं आमची मोठी पूज्यबुद्धि आहे व ह्मणून संकोच धरूनच हें त्याचें मत आह्मांस ग्राह्य नाहीं असें ह्मणण्याचें आह्मी धाडस करितों. अकबरानें आपल्या पिढीच्या लोकांत सुखाची भर घातली, ही गोष्ट तर निर्विवादच आहे. परंतु, एल्फिन्स्टन साहेबांनीं सुचविलेल्या मार्गानें अकबर वागला असता, तर त्या योगानें त्यावेळच्या हिंदु-समाज-स्थितीचे अस्तित्वास अत्यवश्यक असलेल्या तत्वांचा नाश झाला असता. गांवचा अधिकारी पाटील याच्या

मार्फत व्यवहार न ठेवितां खुद्द खातेदाराबरोबर व्यवहार ठेवण्याचा अकबरानें यत्न केला, तेंव्हांच वरील तत्वास धक्का पोहोंचून इमारत ढासळण्यापर्यंत पाळी येऊन पोहोंचली होती. परंतु, तो लौकरच सावध झाला व कायदेकानूप्रमाणें मान्य असून ज्यांचा अंमल आहे अशा पुरातन चालीरीतींत मोठ्या बेताबातानें व सावधगिरीनेंच हात घातला पाहिजे हें त्याला समजलें व त्यानें आपला हुकूम तावडतोब फिरविला.

जमाबंदी, वसूल, व चलनी नाणें इत्यादि कारभारांत अकबराचा मुख्य सलाहगार, राजा तोडरमल हा होता. या मुत्सद्याविषयीं मागील भागांत उल्लेख केलाच आहे. या पुरुषाचें बुद्धिवैभव फार मोठें होतें; व त्याची इमानदारी कसोटीस उतरलेली होती. बादशाही दरबारांत होता तरी धर्मांत तो मोठा कडकडीत हिंदु होता. स्नानसंध्यादि कर्में तो मोठ्या मनोभावानें करी. एके प्रसंगीं अकबराबरोबर पंजाबांत मोहिमेवर गेला असतां निघण्याच्या गडबडींत तो आपले देव बरोबर घेण्यास विसरला. आन्हिक देवपूजा केल्याशिवाय कोणतें हीं काम न करण्याचा त्याचा नियम असल्यामुळें कित्येक दिवसपर्यंत त्यानें अन्न व पाणी वर्ज केलें होतें; व अखेरीस अकबर बादशहानें मोठ्या मुष्कीलीनें त्याची समजूत घातली.

अकबराच्या दळभाराचा मुख्य भाग ह्मटला ह्मणजे घोडेस्वार. त्याचप्रमाणें त्याच्या सेनेंत युद्ध रचनेचे प्रसंगीं हत्ती हे ढळढळीत दिसावयाचेच. गजभार हा बादशहाच्या स्वारीचें एक द्योतक ह्मणून साधारपणें समजलें जाई. ह्मणजे जेथें गजभार तेथें खास बादशहाची स्वारी असावयाची असा बहुतेक ग्रह होऊन बसला होता; किंबहुना, गजभार नाहीं तेथें बादशहाची स्वारी असूंच शकणार नाहीं असाच ग्रह झालेला होता; व यामुळें ईश्वर कृपेनें अकबराचा एक प्रबळ शत्रु कसा फसून गोत्यांत आला हें मागील एका भागांत वर्णिलेंच आहे.

आपल्या राज्याचे विंध्याद्रीच्या उत्तरेकडील भागाचे अकबर बादशाहानें एकंदर बारा सुभे अथवा प्रांत केले होते. या प्रत्येक प्रांतावर राज्यकारभार चालविण्याकरितां एका अधिकाऱ्याची नेमणूक असे. ह्या अधिकाऱ्यास—त्यास सुभा ही संज्ञा असे—वरिष्ठ फक्त बादशहाच. नेकीनें वागेल तितकेच दिवस काय तो त्याचा अधिकार चालावयाचा असा नियम असे; आणि बादशहाचे हुकूम त्यास सदा शिरसावंद्य करावे लागत. ह्याच्या हाताखालीं स्थानिक लष्करी अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली असे. या कामगारांना फौजदार ह्मणत. यांच्याकडे सेनानायकाचे अधिकार असून शिवाय सध्याचे पोलीस खात्यांतील श्रेष्ठ कामगारांचे अधिकारही ह्यांचेचकडे असत. ह्यांच्याकडेसच आपापल्या निरनिराळ्या प्रांतांत सुरक्षितपणा व शांतता राखणें; लष्करी खात्यांतील कामगारांवर देखरेख ठेवणें; स्थानिक सेनेवर हुकूम चालविणें; व सर्व सामान्य तंटाबखेडा न होऊं देणें; हीं सर्व कामें असत.

अकबरापूर्वी होऊन गेलेल्या अफगाण बादशहांनीं प्रजेस न्याय देण्याची जी पद्धति घालून दिली होती, त्या प्रद्धतीप्रमाणेंच त्याचे कामगार न्यायाचें काम करीत. कुराण हें सर्व कायदेकानूंचा आधारस्तंभ होतें. तथापि, रीतभात व मागील वहिवाटीस अनुरूप अशा रीतीनें कायदेकानूंच्या शब्दशः अर्थांत थोडाबहुत फेरफार होत असे. याशिवाय, ज्या ज्या ठिकाणीं कायद्याची कडकपणाची प्रवृत्ति दृष्टोत्पत्तीस येई, त्या त्या ठिकाणीं बादशहाच्या अगर त्याच्या अतालिकाच्या हुकुमावरून त्यांत पुनः फेरफार होत असत. न्याय व दया ह्यांचा सुसंयोग व्हावा, हें या हुकुमाचें मुख्य धोरण होतें. देहान्त शिक्षा फारच फार विचारानें व मोठ्या बेताबातानें द्यावी अशी वरिष्ठ न्यायाधिशांना ताकीद होती. एका आज्ञापत्रांत अकबर बादशहानें दूर असलेल्या गुजराथ प्रांताच्या सुभेदाराला हुकूम फरमाविला होता कीं, राज्यास घातक असाच राजद्रोहाचा गुन्हा खेरीज करून कोणत्या

ही मुकदम्यांत बादशहाकडून त्यांतील कागदपत्रांचें अवलोकन होऊन केलेला ठराव मंजूर होईपर्यंत देहान्त शिक्षा देऊं नये.

विंध्याद्रीच्या दक्षिणेस दक्षिण अथवा महाराष्ट्र या नांवानें प्रसिद्ध असलेल्या प्रदेशांतील बादशाही इलाख्याचे तीन सुभे केले होते. पुढें त्यांत नवीन जिंकिलेल्या मुलुखांची व परगण्यांची भर पडल्यामुळें त्याचे सहा सुभे करावे लागले. अकबराच्या मरणानंतर हा सर्व विस्तीर्ण मुलूख एका अंमलदाराच्या स्वाधीन करण्यांत आला; व त्यास सुभेदार असा किताब दिला. दक्षिणेचा सुभेदार हा पुढें प्रसिद्ध झालेल्या निजामाचा पूर्वावतार होय. सुभेदाराच्या बरोबरच पण त्याच्या हाताखालीं दिवाणाची नेमणूक केलेली असे. वसुलाचें व कारभाराचें काम त्याकडे सोंपविलेलें होतें.

अकबर हा एक महान वैभवशाली व ऐश्वर्यवान् बादशहा होऊन गेला. त्याची वागणूक अगदीं साधी होती. तथापि, पूर्वेकडील प्रजेवर अंमल चालविण्यास मोठा थाट व ऐश्वर्य दाखविणें अवश्य आहे, हें तत्व ब्रिटिश राज्यांत सर्वांत मोठा होऊन गेलेल्या व्हाइसराय साहेबांस जसें समजलें होतें तसें तें त्याला ही समजून आलें होतें. प्रजाजनांच्या डोळ्यांत ऐश्वर्याचें तेज भरविणें, ज्या नरश्रेष्ठाची नुसती मान हलली ह्मणजे मोठ्या घडामोडी घडून येतात व जो इहलोकीं ईश्वरी गुणांची एक साक्षात् मूर्तिच मानिली जातो त्याचा डामडौल व थाटमाट त्यांना दृग्गोचर करणें, व याचप्रमाणें त्याचें अधिकारऐश्वर्य त्यांना दिसूं देणें, या सर्व गोष्टी हिंदुस्थानांतील राज्यशकट चालविण्यास फार अगत्याच्या आहेत. ही केवळ कल्पनासृष्टि आहे असें नाहीं. "नीचे आप और उपर खुदा" अशा तऱ्हेचे जे हिंदुस्थानांतील लेकांचे उद्गार अद्यापपर्यंत निघतात त्यावरून 'नाविष्णुः पृथिवी पतिः' ही पुरातन समजूत त्यांच्या कल्पनांत किती भिनून गेली आहे हें समजतें. सर्व सत्ताधीश व अधिकारसंपन्न पुरुषाला आजमितीस देखील ते ईश्वरस्थानींच मानितात. 'राजाकालस्य

कारणं' या उक्तीप्रमाणें राजाच्या हुकुमावर आपली संपदा किंवा आपदा, सुख किंवा दुःख अवलंबून आहेत असें मानण्याचा प्रचार लोकांत अद्यापपर्यंत आहे. तेव्हां सणावाराचे व महोत्सवाचे दिवशीं या सर्वशक्तिमान् नरश्रेष्ठानें आपलीं राजचिन्हें दाखवावींत व त्याच्या सभोंवती प्रभुत्वदर्शक ऐश्वर्य व वैभव झळकावें अशी त्यांची इच्छा असते. अकबराला हें पूर्णपणें कळून आलें होतें व ह्याप्रमाणें तो वागत असे.

अकबराच्या दरबारांत उत्सवानिमित्त जो भव्य थाटमाट उडत असे त्याची कल्पना मनांत ठसण्यास केवळ आईन ए अकबरींतील वर्णनावरच अवलंबून राहणें नको. त्याचे ते ५००० हत्ती, १२००० घोडे स्वार, तो लष्करी इतमाम, व त्यांतील ते छानदार, मनोरम, उत्तम सरंजामाचे व नानाविध आणि शोभिवंत रंगांचे तंबू, त्यांच्यामधील ते मोठमोठे दरबारचे दिवाणखाने, मेजवान्यांचीं दालनें, व्यायामाकरितां काढलेले सज्जे, व विश्रांतीकरितां तयार केलेले महाल, या सर्वांचें वर्णन फारशींत लिहिणाऱ्या मुसलमान इतिहासकारांनीं ही केलेलें आहे. विशेष उत्सवाचे दिवशीं दोन एकर जमीनीवर अतिशय मऊ गालिच्यांच्या बिछाइतीच्या मध्यभागीं ज्याच्या चांदण्या येत आहेत अशा मौल्यवान् व शोभायमान तंबूंत बादशहा विराजमान झालेला आहे व आपल्या अमीर उमरावांचे मुजरे घेत आहे असा देखावा प्रत्येकानें वर्णिला आहे. या अमीर उमरावांचे तंबू देखील तसेच मूल्यवान फक्त बादशाही तंबूपेक्षां कांहीं प्रमाणानें कमी असे असत. मुजरे घेण्याचें काम आटोपल्यावर, सर्व लोकांसमक्ष नानाप्रकारच्या जिनसांनीं बादशहाच्या तुला करण्यास आरंभ होत आहे; व या जिनसा हव्या असतील त्या लोकांना वांटून देत. बादशहाचे वयास जितकीं वर्षें झालीं असतील, तितकीं बकरीं, मेंढरें व कोंबडीं हीं तीं तीं जनावरें पाळणारांस दिलीं जात. या शिवाय अनेक लहान लहान पशूंचे उत्सर्ग होत. बदाम, पिस्ते

वगैरे लहान मेवा खुद्द बादशहा आपल्या हातानें दरबारांतील लोकांना वांटून देत असे.

मोठ्या सणाचे दिवशीं अकबर देदीप्यमान रत्नखचित सिंहासनावर विराजमान होई; व त्याचे सभोंवार थाटमाटाचे पोषाख केलेले अमीर उमराव मंडलाकार बसत. नंतर "कर्णी लोंबति चामरे चमकती माळा गळा साजिऱ्या" असे व गंडस्थळ व वक्षस्थळ यांवर हिरेमाणकांच्या पदकांनीं शृंगारिलेले असे हत्ती, उत्तम वस्त्रभूषणांनीं शृंगारिलेले घोडे, गेंडे, सिंह, वाघ, शिकारीचे चित्ते, बिवटें, शिकारीचे कुत्रे, बहिरी ससाणे इत्यादिकांची सलामी होई. व अखेरीस लखलखीत वस्त्रालंकारांनीं विभूषित अशा घोडेस्वारांची सलामी होऊन हा समारंभ आटपे. हें केवळ कल्पनासृष्टीचें चित्र नव्हे. कारण अकबराचा मुलगा व वारस जहानगीर याचे राज्यांत हा दरबारचा सर्व थाटमाट व डामडौल हॉकिन्स, रो व टेरी या गृहस्थांनीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिलेला आहे, व या भव्य देखाव्याचें वर्णन या प्रसिद्ध प्रवाशांनीं अत्यंत वेधक शब्दांनीं केलें आहे.

हे असले समारंभ मोठमोठ्या उत्सवाचे दिवशीं व सणावारींच दृष्टीस पडत. इतर वेळीं अकबर साधा, प्रांजल, कळकळीचा, व सदैव सत्यशोधक असा असे. त्यानें केलेलें काम तो असाच मनुष्य असावा अशी साक्ष देतें. हें काम ह्मणजे मागील चार शतकांत मुसलमान जेत्यांनीं जिचे तुकडे तुकडे करून टाकिले व त्या शतकांच्या अखेरीस देखील जी अझून ही अव्यवस्थित व विस्कलित राहिली होती, अशी हिंदुस्थानची बादशाही एकवट व दृढ करणें हें होतें; या चारशें वर्षांत अफगाण जेत्यांनीं कुराणांतील तत्वांचा हटवादीपणानें भलभलता ओढूनताणून अर्थकरून त्या जोरावर हिंदूप्रजेस लुटून नागविलें. अकबरापूर्वी होऊन गेलेल्या बादशहापैकीं अतिशय शहाणा व इंग्लिश इतिहासकारांनीं उदार व दयाळू या विशेषणांनीं नावाजलेला असा जो

सुलतान फिरुझ, यानें आपल्या पेगमबराचा पंथ ज्यानीं स्वीकारिला नाहीं, अशा लोकांना आपण कसें छळिलें हें आपल्या तोंडानें कबूल केलें आहे. अकबर राज्यपदारूढ झाला तेवेळीं ही मनोदेवतेनिमित्त छळ करण्याचीं हीं तत्वें फार झपाट्यानें सुरू होतीं. तीं फक्त त्यानेंच स्वतः प्रथम नाहींशीं करून टाकिलीं.

सर्व हिंदुस्थान एकछत्राखालीं आणून त्यांत ऐक्य स्थापन करावें, असा अकबराचा थोर विचार होता. धर्माच्या बाबतींत ऐक्य होणें अशक्य आहे, हें त्यास आपल्या कारकीर्दीचे प्रारंभींच कळून चुकलें. तेव्हां जें ऐक्य करावयाचें तें प्रजाजनांच्या हिताहितासंबंधींचेंच होईल हें त्यानें जाणिलें. अशा प्रकारचें ऐक्य स्थापन करण्यास ज्या अवश्यक गोष्टी आहेत त्यांत देश काबीज करून एकछत्र स्थापणें ही पहिली होती. दुसरी गोष्ट ही कीं, सर्वांच्या मनोदेवतेच्या आणि ईश्वरोपासनेच्या हरएक सांप्रदायास स्वातंत्र्य देऊन त्याचा आदर राखणें. ही कल्पनासिद्धीस नेण्याकरितां महमुदीयधर्मविधि, अकबरानें थोडेसें रूपांतर करून स्वीकारिला. "परमेश्वर एकच आहे व महमद हा त्याचा पेगमबर आहे" हें जें जुनें धर्मवाक्य, कीं ज्याच्यामुळें परधर्मी प्रजेचे छळ करण्याकरितां अनेक प्रकारचे मार्ग काढण्यांत आले, त्याच्या ऐवजीं "परमेश्वर एकच आहे व अकबर हा त्याचा पृथ्वी वरील प्रतिनिधी आहे" असा नवीन सुधारलेला पाठ त्यानें स्वीकारिला. परमेश्वर कायतो एकच आहे ह्या सत्याचा एका जागींच्या मूर्तिपूजकांस उपदेश करण्याकरितां पेगमबरानें अवतार घेतला व महमद हा या लोकांना शुभवर्तमान कळविणारा एका रीतीनें देवदूत होता हें अकबरानें मान्य केलें. पण या देवदूतानें जे विधिमार्ग घालून दिले व ज्यांचा संग्रह कुराणांत केलेला आहे, त्यांचा अर्थ, एकेश्वरीमताचा उपदेश तरवारीच्या धारेनें करावा, असा करण्यांत आला, हें अनुचित होय असें तो प्रतिपादी.

कुराणांतील विधींचा हा केलेला अर्थ अकबराच्या मतें अगदीं खोटा होता, व त्याप्रमाणें वागल्यामुळें निदान हिंदुस्थानांत तरी तो फलद्रूप झाला नाहीं. अकबराचे पूर्वींचा चारशांहून अधिक वर्षांचा काळ हा याविषयीं साक्ष देत होता. अशा तत्वावर चालविलेल्या राज्यपद्धतीनें प्रजेची अनुरक्ति नष्ट होणें अपरिहार्थ आहे, असें अकबरास आपल्या कारकीर्दीच्या एकविसावे वर्षास प्रारंभ होतो न होतो इतक्यांतच कळून चुकलें. आपल्या सर्व प्रजांना एकत्र करणें, त्यांना आपलेसें करून टाकणें, प्रेमबंधनांनीं त्यांना एकमेकांशीं सांधणें, व त्या सर्वांत सामायिक हित साधील अशा तत्वांची पेरणी करणें, हा अकबराचा मुख्य हेतु होता हें पुनः पुनः सांगितलें तरी अधिक होणार नाहीं. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें फेरफार केलेल्या महमुदीय धर्मांतच या तत्वाचा अंकुर त्यास दृष्टोत्पत्तीस आला. महमदाच्या वचनांचा खोटा अर्थ करून त्यांचा दुरुपयोग केल्यामुळें प्रजाजनांत बेबनाव मात्र होणार; म्हणून आपल्या राजवटयांत व आपल्या शतकांत अकबर स्वतःच पेगमबर होण्यास तयार झाला; व सर्व शक्तिमान् प्रभूच्या उदार व दयाशील आज्ञांचा अर्थ करून सांगणारा मीच आहे असें त्यानें जाहीर केलें.

कुराणाचा अर्थ करून सांगण्याचा अधिकार जोंपर्यंत आपणांकडे आहे तोंपर्यंत प्रबळ धर्म ह्मणजे तरवारीच्या जोरावर चालणारा धर्म असें कधींही होऊं द्यायाचें नाहीं असा अकबरानें निश्चय केला. उलटपक्षीं त्या धर्मापासून सर्व हिंदुस्थानभर आराम उत्पन्न व्हावा, मागील धर्मच्छलाचें स्मरण नाहींसें व्हावें, व विचारस्वातंत्र्य सर्वत्र जाहीर करून धर्मस्वातंत्र्य पूर्ण चालूं ठेवावें, अशी त्याची व्यवस्था होती. या प्रकारचा फरक साधारणतः लोकसंमत झाल्यावर प्रजेचें संरक्षण करून तीस जाचणूक करणार नाहीं, अशा एकाच बादशहाचें सार्वभौमत्व तुह्मी मान्य करा, ह्मणून हिंदुस्थानांतील राजांना व अनेक लोकांना आळवून ह्मण-

ण्याचें अकबरानें योजिलें होतें. राजकीय व सामाजिक गोष्टींत सुधारणा करून त्यांचें पुनरुज्जीवन करण्याचे खटपटीस लोकांची मदत मागावयाची तिचा उद्देश, स्वहित साधणें हा नसून, परकीय लोकांच्या स्वाऱ्यांनीं, आपसांतील लढायांनीं, व या दोहोंच्या मागून येणाऱ्या धर्मच्छलानें, चार शतकेंपर्यंत गांजून गेलेल्या प्रजाजनांचें हित व्हावें हा होता. अकबरानें ज्या लोकांस आळविण्याचा हा प्रयत्न केला ते लोक विचारशून्य व दुराग्रही नव्हते. फक्त एक चितूरचा ( हल्लींच्या उदेपूरचा ) राणा खेरीज करून बाकी सर्व रजपूत राजे व हिंदुस्थानच्या सर्व मुख्य प्रांतांतील लोक त्यास या गोष्टीस अनुकूल झाले. त्यांच्यांतील अतिशय बलाढ्य संस्थानें जयपूर व जोधपूर यांकडून बादशहास, हिंदू, परंतु जे त्याचे अतिशय भरंवशाचे सेनापति झाले, असे लोक सल्ला मसलतीसाठीं व उत्तम फौज लढण्यासाठीं मिळाली. या बाबतींत त्यास मुख्य विरोध केला तो त्याच्याच जातीच्या दरबारांतील हटवादी मंडळींनीं व बंगाल, ओरिसा व पश्चिम हिंदुस्थान या प्रांतांत चिरस्थायी झालेल्या अफगाण स्वारी करणाऱ्या घराण्यांतील वंशजांनीं. त्याचें हितकरकार्य सिद्धीस जाण्याकरितां या लोकांना आपलेसें करून घेणें अगत्याचें होतें. ह्यांनीं आपलें सार्वभौमत्व मान्य करावें, म्हणून अकबरानें प्रथमतः त्याचें मन वळविण्याची खटपट केली. त्यांनीं बंड करण्याची संधि मिळावी, येवढ्याच करितां प्रथमतः हें सार्वभौमत्व मान्य केलें. तेव्हां त्यांच्यावर स्वारी करून त्यांना जिंकण्याशिवाय दुसरा मार्गच उरला नाहीं. याकरितां, त्यांना त्यानें जिंकिले; व विजय मिळतांच त्या त्या प्रांतांत विचार व आचार ह्यांचें स्वातंत्र्य, चांगले व सर्वांस सारखे लागू पडतील असे कायदेकानू, व सर्वत्रांस समान न्याय, इत्यादि हितकारक गोष्टी प्रसृत झाल्या.

यप्रमाणें हिंदुस्थानावर स्वारी करणारे मुसलमान जेत्यांपैकीं, प्रथमतः जिंकिलेल्या प्रांतांचें एकीकरण केलें व त्या सर्वांत एकछत्र पाद-

शाही स्थापिली ती अकबरानें. ही पादशाही दक्षिण खेरीज करून सर्व हिंदुस्थानची होती. याच गोष्टींनीं पुढील पिढ्यांकडून वाहवा मिळविण्याचा अधिकार अकबरास प्राप्त झाला. त्यानें केलेलें महत्कृत्य आपण लक्षपूर्वक पाहिलें आहे; व त्याच्या हेतूंचें हृद्गत आपणाला कळून आलें आहे. तेव्हां त्याच्या अंतःकरणाची विशुद्धता आपणास कळते. ईश्वराप्रमाणें आपली आराधना करून लोकांनीं आपल्या आज्ञेंत वागावें अशी अकबराची इच्छा होती असें जें त्याच्या दरबारांतील हटवादी लोकांनीं ह्मटलें आहे तशी खचित त्याची इच्छा नव्हती. छे! अशा प्रकारची अभिलाषबुद्धि त्याच्या मनींमानसीं देखील येण्यासारखी नव्हती.

परोपकाराचीं, आचारविचार ह्यांच्या स्वातंत्र्याचीं, व श्रद्धादि भेदांचा मनांत विचार न आणितां सारखा न्याय करण्याचीं, जीं खऱ्या धर्माचीं उदार तत्वें, त्यांचा लोकांत उपदेश करण्यासाठीं महमद पैगमबर ज्या धर्माचा देवदूत अवतरला होता त्या धर्माचा मी ही एक अर्थ करून सांगणारा आहे, येवढेंच काय तें त्यानें जाहीर केलें होतें. राजास व विशेषतः राज्यसंस्थापकांस जी राजनीति अत्युदार तीच अकबरानें उचलली होती.

"सर्व धर्मपंथांत चांगलें म्हणून आहेच; तेव्हां त्यांतील चांगलें तेवढें घेऊन बाकीचे टाकून देऊं" हें अकबराचें प्रमाणवचन होऊन बसलें. हिंदूधर्माची प्रवृत्ति सौम्य व सात्विक रीतीची आहे; त्यांत स्वजनाविषयीं व कुटुंबाविषयीं प्रीति वहावी अशी आज्ञा आहे; व परधर्मीयांस आपल्या धर्मांत आणण्याचा प्रयत्न करूं नये असा उपदेश आहे, या गोष्टींत त्यास त्याचें श्रेष्ठत्व दिसून आलें. पारशीलोकांच्या साध्या धर्मांत ही त्यास सत्याचें स्वरूप दिसलें; व ख्रिस्तीधर्मांत ही तें दिसलें. सर्वांत चांगलें ह्मणून कांहीं आहेच, त्याप्रमाणें सर्व जातीच्या मनुष्यमात्रांत ही कांहीं चांगलें आहे, असा त्याचा समज होता; आणि ह्मणूनच तो अतिशय

सहनशील असे. जोंपर्यंत ताळ्यावर आणितां येण्याची कांहीं आशा आहे तोंपर्यंत एखाद्याला शासन करण्याची बुद्धि त्याला होत नसे. त्यास क्षमा करण्याची अति आवड असे. "जा, पुनः पापकर्म करूं नकोस" हें एक त्याचें प्रमाणवचन होतें व तेंच त्याच्या वर्तनांतील सार होतें.

असा हा मोंगल बादशाही स्थापन करणारा अकबर होऊन गेला; व ज्यांच्या योगानें त्याला ती बादशाही स्थापितां आली तीं तत्वें अशीं होतीं. त्या तत्वांना धरून वर्तन झालें असतें तर ती बादशाही कायम राहिली असती; व सांप्रत त्याच तत्वानुसार वर्तन ठेऊन अकबरामागून आलेले पाश्चिमात्यलोक ही आपली बादशाही कायम राखीत आहेत.

येथपर्यंत अकबराचे व त्याच्या महत्कृत्यांचें वर्णन अशा तऱ्हेनें केलें आहे कीं जणोंकाय आपण त्याची सांप्रतच्या राजाशींच तुलना करीत आहों. अलीकडील दोनशें वर्षांचा अनुभव व ज्ञान त्याला नव्हतें तरी देखील आजकालच्या राजाशीं त्याची बरोबरी साजेल. युरोपखंडांत त्याच्या समकालीन झालेले राजे आपआपल्या देशांत अति विख्यात होऊन गेले. उदाहरणार्थ, अकबर हिंदुस्थानांत स्थिरस्थावर करीत असतां इंग्लंदांत इलिझाबेथ राणी राज्य करीत होती, व फ्रान्स देशांत चवथा हेनरी राज्यपदारूढ होता. या विख्यात राज्यकर्त्यांशीं देखील अकबराची बरोबरी केली असतां संकोच वाटण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. त्याच्या पश्चात राहिलेल्या महत्कृत्यांवर त्याचा कीर्तिध्वज उभारिलेला आहे. त्याच्या मागून गादीवर बसलेला जहानगीर बादशहा, हा जर हुमायुनाच्या नंतर तक्तावर बसला असता तर, वडिलोपार्जित मिळालेल्या अगर बाहुबलानें जिंकिलेल्या विस्कळित प्रांतांत त्याला खचित ऐक्यता स्थापन करितां आली नसती किंवा त्यांतील प्रजाजनांस अनुकूल ही करून घेतां आले नसते; अशी सर्व साक्ष देतील. त्याचा स्वभाव तामशी

व हट्टवादी असल्यामुळें अशा प्रकारचें जोखमीचें काम त्याला अगदीं अशक्यच झालें असतें. परंतु, आपल्या बादशाहीचा पाया अकबरानें इतका खोल नेला होता कीं, त्याचा मुलगा त्याच्याहून इतका निराळा असतांही बापानें श्रेष्ठतत्वांवर एकत्र केलेली बादशाही त्याला सांभाळितां आली. अकबरानें काय काय केलें, तें कोणत्या काळांत केलें, व तें साधण्यासाठीं त्यानें कोण कोणत्या पद्धतींची योजना केली; ह्याचा आपण विचार केला ह्मणजे संकटांनीं राष्ट्र ग्रासिलें असतां कोट्यावधि लोकांच्या सौख्याचें साधन जी देशांतील शांतता व विचार आणि आचार ह्यांचें स्वातंत्र्य, त्यांच्या द्वारें त्याची मुक्तता करण्यास्तव परमेश्वर ज्या महापुरुषांच्या विभूति निर्माण करितो त्या कोटीपैकीं अकबर हा एक महापुरुष होता असें आपणास कबूल करावेंच लागतें.

समाप्त.

## अकबराची वंशावळ.

तैमूरलंग.
- सुलतान महमद मिरझा.
  - सुलतान अबुसय्यद मिरझा.
    - उमरशेख मिरझा.
      - बाबर १ ला मॉ. बादशहा (१५२६–३०.)
        - हूमायून. दुसरा मॉगल बादशहा (१५३०–४०.)
          - अकबर तिसरा मॉ. बादशहा (१५५६–१६०५.)
            - सलीम अथवा जहांगीर. ४ था मॉगल बादशाह (१६०५–२७.)
              - खुराम अथवा शहाजहान. ५ वा मॉगल बादशाह. (१६२७–५८.)
            - मुराद.
            - दानियल.
        - कामरान.
        - हिंदाल.
        - आस्कारी.

- दारा.
- सुजा.
- अवरंगझेब ६ वा मों. बादशहा (१६५८-१७०७.) (अथवा पहिला अलमगीर)
  - मुआझम अथवा बहादुरशहा ७ वा मों. बादशहा. (पहिला शहाआलम १७०७-१२.)
    - जहानदरशहा ८ वा मों. बादशहा (१७१२-१३.)
      - दुसरा अलमगीर (१४ वा मों. बादशहा १७५४-५९.)
        - अल्लीगोहर (अथवा २ रा शहाआलम) (१५ वा मों. बादशहा १७५९-१८०६.)
          - दुसरा अकबर (१८०६-३७) (१६ वा मों. बादशहा.)
            - दुसरा महमद बहादुरशहा १७ वा मों. बादशहा. (१८३७-१८५७.)
    - अझीमुसशान.
      - फिरुकशायर ९ वा मों. बादशाह (१७१३-१९.)
    - रफिअसशान.
      - रफिउद्दवला. ११ वा मों. बादशहा.
      - रफिउद्दरजात. १० वा मों. बादशहा.
    - महमदअखत्यार.
      - रोषनखत्यार अथवा महमदशहा १२ वा मोंगल बादशहा (१७१९-४८.)
        - अहमदशहा १३ वा मों. बादशहा. (१७४८-५४.)
- मुराद.

# ऐतिहासिक, भूगोलविषयक व अवंतर माहितीच्या टिपा.

**मोंगल** ( पान १, ओळ १. ):—मानवी प्राण्यांचे एकंदर पांच वर्ग केले आहेत. काकेशियन, मँगोलियन, इथियोपियन, मले आणि अमेरिकन. त्यांपैकीं दुसऱ्या वर्गांत मोंगल लोकांचा समावेश होतो. याच वर्गाला टयुरेनियन असेंही म्हणतात. तिबेट, तार्तरी, जपान, सियाम, लॅपलंड, तुर्कस्थान इत्यादि देशांत राहणारे लोक या जातींत मोडतात. हे लोक एके ठिकाणीं वसाहत करून न राहतां चोहोंकडे भटकत फिरणारे आहेत. प्राचीन काळीं सिथियन व हून या नांवानें हे लोक प्रसिद्ध होते. मध्यकाळांत याच लोकांना मोंगल, तार्तार व तुर्क असें म्हणूं लागले. इ० स० १३ व्या शतकाच्या प्रारंभीं चेंगीजखान नांवाच्या सरदारानें संपूर्ण मध्य एशिया व पूर्व एशिया हे पादाक्रांत केले होते. पुढें याच घराण्यांत तैमूरचा उदय झाला. आणि त्याच्याच वंशांतील एका शाखेंत बाबर जन्मला व त्यानेंच दिल्ली येथें १६ व्या शतकांत आपल्या राज्याची स्थापना केली. त्यालाच मोंगल बादशाही असें म्हणतात.

**समरकंद** (पान ८, ओळ ९.):—हें शहर हिंदुकुश पर्वताच्या उत्तरेस तुर्कस्थानांत आहे. प्राचीन काळीं, विशेषतः टयमूरलेनच्या राजवट्यांत तें वैभवाच्या अत्यंत शिखरास जाऊन पोहोंचलें होतें. तेथेंच त्यानें आपली राजधानी स्थापिली होती. तें महमुदीय विद्येचें शेंकडों वर्षेपर्यंत आदिपीठ होऊन बसलें होतें. परंतु सांप्रत त्याची अवस्था फार दीनवाणी झाली आहे. इ० स० १८६८ त हें शहर रशियाचे राष्ट्रास जोडिलें गेलें.

**टायमूर** ( पान ८, ओळ १२. ):—यास टयमूरलेम ( Lame ) असेंही इंग्लिश इतिहासकार म्हणतात; कारण लढाईत जखम लागल्यामुळें तो एका पायानें लंगडा ( लेम ) झाला होता. त्याचा स्वभाव क्रूर व निर्दयी असून तो तरवारबहादर व पहिल्या प्रतीचा धाडसी होता. बालपणींच तो योद्धा बनला. वयास बारा वर्षे पुरीं होतात न होतात तोंच तो दिग्विजयास निघाला. त्यानें रशया, इराण वगैरे देश पादाक्रांत करून समरकंद येथें आपली राजधानी स्थापिली. इ० स० १३९७ त तो हिंदुस्थानावर स्वारी करण्याकरितां निघाला. यथतर त्यानें आपल्या पराक्रमाची व निष्ठुर स्वभावाची पराकाष्ठा केली. मार्गां-

तील प्रदेश उध्वस्त करीत तो दिल्लीवर चालून गेला. तेथें त्यानें बंदिवान केलेल्या लोकांची जी कत्तल उडविली तिच्या वर्णनानें अंगावर शहारे उभे राहतात. आपल्या नांवाचें हिंदुस्थानांत नाणें पाडून तो तुर्कस्थानांत परत गेला. तो १३३६ त जन्मला व १४०५ त मरण पावला.

**चेंगीझखान्** (पान ८, ओळ १३.):—हा शब्द जेंगीझखान् याप्रमाणें लिहिण्याचा व उच्चारण्याचा सांप्रदाय विशेष आहे. हा पुरुष एका लहानशा मंगोलियन संस्थानिकाचा पुत्र होता. तो फारच प्रतापशील व रणधीर निपजला. इ० स० १२०५ यावर्षी त्यानें चीनदेशावर स्वारी करून तेथील राजधानी हस्तगत केली. त्यानें इ० स० १२९८ त आपल्या बाहुबलानें समरकंद व बुखारा हीं शहरें सर करून दोनलाख लोकांची कत्तल उडविली. त्याचें राज्य फार विस्तीर्ण होतें. त्यांत चीन, तार्तरी व इराण यांचा समावेश होत असे. तो इ० स० ११५५ त जन्मला व १२२७ त मरण पावला.

**ऑक्सस** ( पान ८, ओळ २०. ):—या नदीला सांप्रत अमू आणि झिहून अशीं ही नांवें आहेत. इचा उगम तुर्कस्थानांत सारिकोला नांवाच्या सरोवरापासून आहे व ती बदकशान, बुखारा आणि खीवा या प्रांतांतून वाहत जाऊन आरल समुद्रास जाऊन मिळते. तिची लांबी ११५० मैल आहे.

**झगझारटीस** (पान ८, ओळ २०.):—या नदीचा उगम थियानशन पर्वतापासून आहे. व ती आरल समुद्रास जाऊन मिळते. सांप्रत ती सिहून किंवा सरदारिया म्हणजे पीत नदी या नांवानें प्रसिद्ध आहे.

**डारडेनेलीस** ( पान ९, ओळ ५. ):—ही एक लहान सामुद्रधुनी, यूरोप आणि एशिया यांचेमध्यें असून इच्या योगानें मार्मोराचा समुद्र व ग्रीशियन आर्चिपेलेगो हे जोडलेले आहेत.

**अबुसय्यद** ( पान ९, ओळ १०. ):—चेंगीझखानाच्या वंशांतील हा शेवटला सुलतान होता. तो इ० स० १३३६ त मरण पावला.

**युझबेक अथवा युझबेग** ( पान १०, ओळ २६. ):—हे तुर्कजातीचे लोक आहेत. यांनीं १५ व्या शतकाच्या अखेरीस तुर्कस्थानावर स्वाऱ्या करून त्यांतील संस्थानें हस्तगत केलीं. त्या प्रांतांत अद्याप ही त्याच लोकांचा अंमल चालू आहे. या लोकांचें वास्तव्य स्वतंत्र तार्तरी, चिनी तार्तरी व रशियन तार्तरी या देशांत आहे. खीवा, बुखारा, खोकन व रशियन तार्तरी या निरनिराळ्या प्रांतांत राहणाऱ्या युझबेग लोकांची भाषा व आचार विचार हे एकमेकांहून भिन्न आहेत. या लोकांस गायन कलेचा व कवितेचा फार नाद आहे.

यांच्या मूळ सरदाराचें नांव युझबेग होतें व त्यावरूनच हल्लींचे जातिवाचक नांव त्यांस पडलें आहे.

**खोरासन** (पान १२, ओळ १०.):—इराणांतील प्रांतांत हा फारच विस्तीर्ण प्रांत आहे. याचें क्षेत्रफळ २,१०,००० चौरस मैल असून त्यापैकीं एक तृतीयांश लवणमय निर्जन प्रदेश आहे. बाकीच्यांत बराचसा भाग वालुकामय असून राहिलेला भाग मात्र सुपीक आहे. प्राचीनकाळीं यांत अनेक कालवे व पाटस्थळें होतीं, परंतु सतत लढाया व दंगेधोपे झाल्यामुळें सांप्रत चोहोंकडे बंडाळी व अव्यवस्था माजलेली आहे.

**काबूल** (पान १२, ओळ १८.):—हिंदुकुश पर्वताच्या दक्षिणेकडील अफगाणिस्थानाच्या प्रदेशाला हें नांव दिलेलें आहे. फार प्राचीन काळापासून हा भाग इतिहासांत सुप्रसिद्ध आहे. काबूल नांवाच्या शहरावरून या प्रदेशास हें नांव पडलें आहे. या शहराभोंवतीं प्राचीन काळीं मातीचा परिकोट होता; पण सांप्रत तो नष्ट झालेला आहे. सुलतान बाबरच्या वेळीं हेंच शहर मोंगल राज्याची राजधानी होतें व सांप्रत ही इ० स० १८६८ पासून या शहरास अफगाणिस्थानाचें राजधानित्व आलें आहे. अगदीं अलीकडे येथें अनेक ऐतिहासिक उलाढाली घडून आल्या. इ० स० १८३९ त इंग्लिश लोकांनीं तें काबीज करून घेतलें; परंतु, पुढील सालीं फंदफितुर होऊन बंडावा झाल्यामुळें तें त्यांस सोडून द्यावें लागलें.

**गिझनी** (पान १२, ओळ १८.):—हें शहर अफगाणिस्थानांत आहे. हें ठिकाण निसर्गतःच फार मजबूत असून याच्या सभोंवती ३५ फूट उंचीचा परिकोट व पाण्यानें भरलेला खंदक असल्यामुळें त्याची मजबुती द्विगुणित झालेली आहे. इ० स० ११ व्या शतकांत गिझनी नांवाच्या प्रबळ घराण्यानें जें विस्तीर्ण राज्य स्थापिलें त्याची राजधानी हेंच शहर होतें. इंग्रज लोकांनीं इ० स० १८३९ या वर्षीं लॉर्ड कीनच्या अधिपत्याखालीं या शहरावर हल्ला करून तें सर केलें, परंतु, अखेरीस बाकीच्या प्रदेशासमेत तें ही दोस्त महमदाच्या स्वाधीन केलें. या शहरावरून आसमंतातच्या प्रदेशांसही तेंच नांव पडलें आहे.

**कंदाहार** (पान १३, ओळ २.):—हें काबूलची पूर्वींची राजधानी होतें. हें शहर फार सुरक्षित असून सुपीक प्रदेशांत वसलेलें आहे. प्रख्यात शिकंदर बादशहानें याची स्थापना केली असें म्हणतात. याच्या आसमंतांतील प्रदेश महाभारतांत वर्णिलेला गांधार देशच असावा असा आधुनिक विद्वानांचा समज आहे.

**महमूद गिझनी** (पान २१, ओळ १०.):—अफगाणिस्थानांत गिझनी येथें एक प्रख्यात राजघराणें होऊन गेलें त्यास गिझनी असें नांव आहे. या घराण्याचा

मूळ संस्थापक सबक्तगीन हा होता. याचाच मुलगा महमदगिझनी बापामागून इ० स० ९९६ त तो राज्यपदारूढ झाला. त्यानें हिंदुस्थानावर १७ स्वाऱ्या करून अपार संपत्ति मिळविली. या देशांतील मोठमोठालीं देवालयें लुटून फस्त केलीं, व पंजाब प्रांतांत आपला अंमल सुरू केला. परंतु, या काळच्या अखेरीस घोरी घराण्यांतील सुलतानांनीं त्याचा पाडाव करून आपली गादी स्थापिली.

**ब्राह्मणधर्म** ( पान २१, ओळ १६.):—म्हणजे हिंदुधर्म याविषयीं फारसें लिहावयास नकोच.

**बुद्ध अथवा बौद्ध** (पान २१, ओळ १६.):—या धर्माचा संस्थापक गौतम बुद्ध या नांवानें प्रसिद्ध असलेला कपिल-वस्तूचा राजपुत्र सिद्धार्थ हा होय. अगदीं बालपणापासून याचें मन संसाराविषयीं विरक्त होतें. गृहनिवास फार त्रासदायक आहे; ही पातकमय स्थिति घर सोडल्यानेंच नष्ट होऊन मनुष्यास स्वातंत्र्य मिळणार आहे, असा विचार करून भरजवानींत नाना प्रकारच्या ऐषआरामास व राज्योपभोगास लाथ मारून गौतम अरण्यांत निघून गेला. संसार पापमय म्हणून कष्टमय आहे असें यास समजून आलें. तो जागृत होऊन ज्ञानी झाला. यावरून त्याला बुद्ध असें ह्मणूं लागले. या धर्माचीं रहस्यें येणेंप्रमाणें आहेतः— ( १ ) संसार दुःखमय आहे; ( २ ) तृष्णा दुःखाचें साक्षात कारण होय; ( ३ ) दुःख नाहींसें करावयाचें असल्यास इच्छा समूळ हाकलली पाहिजे; ( ४ ) हें साधण्याचा सुलभ उपाय म्हणजे अष्टगुणात्मक धर्ममार्ग होय. हा अष्टगुणात्मक पवित्र धर्ममार्ग असा आहे:—(१) योग्य श्रद्धा; (२) योग्य निश्चय; ( ३ ) योग्य भाषण; ( ४ ) योग्य कर्म; ( ५ ) योग्य आचरण; ( ६ ) योग्य प्रयत्न; ( ७ ) योग्य विचार, आणि ( ८ ) वृत्ति विरोध. याप्रमाणें आचरण केलें असतां मनुष्यास निर्वाणपद ( स्वर्गसुख ) प्राप्त होतें. हा धर्म हिंदुस्थानांत स्थापित झाला, परंतु श्रीशंकराचार्यानें त्याचें निर्मूलन केल्यामुळें आजमित्तीस त्याची थोरवी भरत वर्षांत मुळींच राहिली नाहीं. सांप्रत तो फक्त नेपाळांत प्रचलित आहे. परंतु ब्रह्मदेश, तिबेट, चीन, व लंका या देशांत त्याचेंच प्राबल्य आहे.

**जैन** (पान २१, ओळ १६.):—या धर्माची स्थापना बुद्धधर्मानंतरची आहे. जिन नांवाच्या साधुपुरुषानें त्याची स्थापना केली म्हणून त्यास जैन असें नांव प्राप्त झालें. या धर्मांतील लोकांस अर्हत असेंही म्हणतात. "अहिंसा परमो-धर्मः" हें त्याचें मुख्य रहस्य आहे. नरदेहालाच पुण्याचरणानें मोक्षप्राप्ति होते असें यांत सांगितलें आहे. त्यांत वेदाला मान नाहीं. मेवाड व मारवाड हें त्याचें माहेरघर असून उत्तर हिंदुस्थानांत त्याचा विस्तार फार आहे. गुजराथेंत

व मलबार किनाऱ्याच्या उत्तर बाजूस ही या धर्माचे अनुयायी पुष्कळ आहेत. यति, श्रावका, दिगंबर व श्वेतांबर असे यांचे अनेक पंथ आहेत.

**घोर अथवा घूर** (पान २२, ओळ ४.):—या घराण्याचा संस्थापक शहाबुद्दीन हा होता. महमूद घोरी या नांवानें हा इतिहासांत प्रख्यात आहे. यानें हिंदुस्थानावर स्वारी करून स्थानेश्वर येथें इ० स० ११९३ त पृथु राजाचा पराभव करून मुसलमान बादशाहीची स्थापना केली. त्याच्या पदरीं कुतुबुद्दीन नांवाचा एक शूर व प्रबळ सरदार होता. तोच त्याचे मागून हिंदुस्थानच्या गादीवर बसला. त्याला व त्याचे वंशजांना गुलाम वंशांतील राजे असा म्हणण्याचा परिपाठ आहे.

**खिलजी** (पान २२, ओळ ५.):—हे लोक मूळचे अफगाण अथवा पठाण जातीचे होते. जलालउद्दीन त्यांचा मुख्य नाईक होता. कैकोबाद बादशानें त्याला आपला वजीर केला होता; परंतु यानें त्यास पदच्युत करून त्याचा खून केला व आपणच त्याची गादी बळकाविली. खिलजी घराण्यांत इ० स० १२९० पासून १३२० पर्यंत तीस वर्षे बादशाही राहिली. परंतु येवढ्या अवकाशांत त्यांनीं मुसलमानांची राज्यसत्ता महाराष्ट्रांत व गुजराथेंत नेऊन पोहोंचाविली.

**तघलख** (पान २२, ओळ ११.):—खिलजी बादशहाच्या पदरीं गाझीबेग तघलघ नांवाचा एक सरदार होता. त्यानें गादीवर असलेल्या बादशहास कंठस्नान घालून दिल्लीचें तक्त बळकाविलें व आपणास ग्यासउद्दीन तघलखशहा असें नांव घेतलें. हाच तघलख घराण्याचा मळपुरुष. या घराण्यांत इ० स० १३२० पासून तों १४१२ पर्यंत सुमारें एका शतकांत आठ बादशहा होऊन गेले.

**सय्यद** (पान २२, ओळ १९.):—हिंदुस्थानावरील स्वारी आटोपून टायमूर स्वदेशीं परत जात असतां त्यानें सय्यद खिजरखान नांवाच्या सरदारास मुलतानाचा सुभेदार नेमिलें. त्यानें लवकरच ही नांवाची ताबेदारी झुगारून दिली. व तो आपण स्वतंत्रपणें दिल्लीचा बादशहा बनला. त्याचें मागून त्याचा मुलगा, नातु व पणतु हे राज्यपदारुढ झाले. हेच सय्यद घराण्यांतील बादशहा. इ० स० १४१४ पासून १४५०पर्यंत या घराण्यानें दिल्लीच्या बादशाहीचा अनुभव घेतला.

**लोदी** (पान २२, ओळ २३.):—बहलोलखान लोदी हा मूळचा लाहोरचा सुभेदार होता. त्यानें दुर्बळ सय्यदांना पदच्युत करून बादशाहीपद बळकाविलें. त्याचे मागून त्याचा मुलगा व नातु हे गादीवर बसले. यांच्या राजवट्यांत पठाण बादशाहीचा अंत होऊन मोंगल बादशाहीचा उदय झाला. इ० स० १४५० पासून तों १५२६ पर्यंत या घराण्यानें बादशाही वैभव भोगिलें.

**नॉरमन लोक** (पान २५, ओळ २२.):—फ्रान्स देशाच्या उत्तरेस नॉरमंडी नांवाचा एक प्रांत आहे. तेथील लोकांना नॉरमन्स असें ह्मणत. दाहाव्या शतकाच्या प्रथमार्धांत विजयी वुइलयम् या नांवाचा ड्यूक तेथें राज्य करीत होता. त्यानें इंग्लंदावर मोहीम करून इ० स० १०६६ त सिनूल्याक् येथें दुसरा हेराल्ड या राजाचा पराभव करून आपण त्या राज्यपदारूढ झाला. तेव्हां इंग्लंदांत नॉरमन लोकांचें प्राबल्य फार माजलें. इंग्लंडचे मूळचे रहिवाशी सॅक्सन लोक या पराजयामुळें परकीय राज्याच्या अमलाखालीं गेले. विजयी वुइलियम राजा होतांच त्यानें सर्वसत्ता आपल्या अनुयायी मंडळींच्या स्वाधीन केली व इंग्लंडांतून नेलेल्या लुटीनें आपल्या प्रांतांतील देवस्थानांची भरती केली. यावेळीं, इंग्लिश लोकांची स्थिति फार शोचनीय झालेली होती. अधिकार व सन्मान यांस ते मुकले, इतकेंच नाहीं तर त्यांचीच जमीन त्यास पारखी झाली. विजयी नॉरमन् लोक पराभूत झालेल्या सॅक्सन लोकांस नानाप्रकारें गांजीत व त्यांचा पदोपदीं छळ करीत. ही स्थिति सुमारें शतसंवत्सर चालली. या अवधीच्या अखेरीस निकट सहवासानें, परस्परांत रोटीव्यवहार व बेटीव्यवहार होऊं लागल्यानें व दीर्घ सान्निध्यामुळें एकमेकांविषयीं सहानुभूति उत्पन्न झाल्यानें नॉरमन् व सॅक्सन् लोकांचा एकजीव होऊन त्यां उभयतांपासून सांप्रतचे इंग्लिश लोक व इंग्लिश राज्यपद्धति निर्माण झाली.

**पानिपत** (पान २८, ओळ २४.):—हें अति पुरातन स्थळ आपल्या इतिहासांत सुप्रसिद्ध आहे. कौरवाशीं संधि करण्याकरितां युधिष्ठिरानें जीं पांच प्रस्थें (गांवें) मागितलीं त्यांपैकीं हें एक होतें. महाभारतांत वर्णिलेली कौरव पांडवांची समरभूमि—कुरुक्षेत्र—तेंच सांप्रतचें पानिपतचें मैदान होय. हें स्थळ दिल्लीच्या उत्तरेस ५३ मैलांवर पंजाब प्रांतांतील कर्णास जिल्ह्यांत आहे. अर्वाचीन इतिहासांत पानिपताजवळील अपरंपार मैदानांत तीन निकराच्या लढाया झाल्या; व त्यांत पराभूत झालेल्या पक्षाची राजसत्ता नष्ट झाली. पहिली लढाई इ० स० १५२६ या वर्षीं इब्राहिमलोदी व बाबर यांच्यामध्यें झाली. पुढें तीस वर्षांनीं इ० स० १५५६ त बाबरचा नातू अकबर यानें याच समरांगणांत हेमूचा पराभव करून थोड्या दिवसांपूर्वी हिरावून नेलेल्या बादशाहीचें पुनरुज्जीवन करून दृढ स्थापना केली. नंतर ता. १७ माहे जानेवारी सन १७६१ इ० रोजीं पानिपतच्या मैदानांत तिसरी घनघोर लढाई झाली. या प्रसंगीं अहमदशहा दुराणीनें महाराष्ट्र वीरांची वाताहत करून त्यांचा राज्यद्रुम तोडून टाकिला, आणि त्यामुळें इंग्लिश बादशाही स्थापन करण्याचा मार्ग सुगम झाला. सांप्रत हें ठिकाण नष्टवैभव झालेलें आहे.

**ब्राह्मणीराज्य** ( पान ३०, ओळ १२. ):—महंमदतघलख बादशहा दिल्लीच्या तक्तावर विराजमान असतां झापरखान नांवाच्या अफगाण सरदारानें दक्षिणेंत एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्यासच ब्राह्मणी राज्य म्हणतात. झापरखान हा पूर्वी गांगो नांवाच्या ज्योतिषी ब्राह्मणाजवळ गुलाम होता. त्यानें यास फार ममतेनें वागवून तूं मोठा भाग्यशाली होशील असें भविष्य सांगितलें होतें. पुढें झापरखानाचें दैव उघडून तो राजा बनला तेव्हां त्यानें आपल्या पूर्वीच्या धन्याविषयीं कृतज्ञता दाखविणारें सुलतान अल्लाउद्दीन हसन गांगोब्राह्मणी असें आपणास नांव घेतलें. हें राज्य इ० स० १३४७ पासून तों १५२६ पर्यंत सुमारें १५० वर्षे चालूं होतें, व या वंशांत एकंदर १८ राजे होऊन गेले.

**विजयनगरचें राज्य** ( पान ३०, ओळ १२. ):—ब्राह्मणी राज्याप्रमाणेंच महंमदतघलख याचे राजवटींत इ० स० १३३६ च्या सुमारास या राज्याची स्थापना झाली. सांप्रत ज्यास मद्रास इलाखा म्हणून म्हणतात त्याचाच या राज्यांत समावेश होत असे. विजापूर, अहंमदनगर, गोवळकोंडा, आणि बेदर येथील मुसलमान राजे एकत्र होऊन त्यांनीं इ० स० १५६५ त तालीकोट येथील लढाईत रामराजाचा पराभव करून या राज्याचा नाश करून टाकिला.

**आग्रा** ( पान ३१, ओळ १४. ):—हें इतिहास प्रसिद्ध शहर उत्तर हिंदुस्थानांत यमुना नदीचे तीरीं आहे. येथवर यमुना दक्षिण वाहिनी असून ह्या ठिकाणीं तिचा ओघ पूर्वेकडे वळला आहे. या वळणामुळें जो कोन बनला त्यावर आग्र्याचा भव्य किल्ला उभा राहिलेला दिसतो. हा किल्ला अकबराचे राज्यांत बांधिला व त्याचे राजवटींत या शहराची थोरवी इतकी वाढली कीं तें मोंगल बादशाहीची राजधानी बनलें. शहाजहान बादशहानें येथें अनेक भव्य व रमणीय इमारती बांधवून या शहरास अपूर्व शोभा व अवर्णनीय वैभव आणिलें. मोतिमशीद, जुम्मामशीद, खास महाल, व ताजमहाल इत्यादि विशाल व मनोहर भुवनप्रासाद पाहून पथिक जनांची चित्तवृत्ति सोल्हासचकित होते. परंतु "यदृष्टं तन्नष्टं" या न्यायानें या नगरीचे पूर्व वैभव अवरंगझेबाचेच राजवटींत नष्ट होण्यास प्रारंभ झाला. त्यानें दिल्ली येथें आपली राजधानी स्थापिली. सांप्रत या शहराचें वैभव अवशेष मात्र राहिलें आहे तरी त्या योगानें प्रेक्षक दंग होऊन जातो.

**दिल्ली** ( पान ३१, ओळ २३. ):—यालाच प्राचीनकाळीं इंद्रप्रस्थ असें म्हणत. सांप्रतचें दिल्ली हें नांव पहिल्या शतकांत या नगराला प्राप्त झालें असावें असा आधुनिक समज आहे. हें शहर यमुना नदीच्या उजव्या अंगास वसलें असून तिन्ही बाजूंनीं दगडाच्या मजबूतशा परिकोटानें वेष्टिलेलें आहे. पूर्वेकडेस

मात्र परिकोट नसून यमुनेचा जलाशय आहे. या परिकोटास दहा दरवाजे आहेत. मोंगल बादशहाच्या अमदानींत ही नगरी वैभवाच्या अत्युच्च शिखरास जाऊन पोहोंचलेली होती. कित्येक वर्षेपर्यंत ती मोंगलांची राजधानी होती. बादशाही अमलांत येथें अनेक भव्य व रमणीय इमारती बांधिल्या गेल्या. त्यांत बादशहाचा महाल, जुमामशीद, कुतुबमिनार इत्यादि स्थळें फारच प्रेक्षणीय होतीं. तीं आतां शेषमात्र उरलीं आहेत तरी प्रेक्षकांना तटस्थ करून टाकितात.

**रणथंबोर** ( पान ३४, ओळ ९. ):—हा इतिहास प्रसिद्ध किल्ला राजस्थानांतील जयपूरच्या संस्थानांत आहे. हा किल्ला खडकावर बांधिलेला असून त्यास बुरुजांनीं व गोपुरांनीं मजबुती आलेली आहे. अकबर बादशहानें हा हस्तगत करून मोंगल बादशाहीस जोडिला होता, परंतु १७ व्या शतकांत त्या राज्यास उतरतीकळा लागली तेव्हां जयपूरच्या राजानें तो आपले स्वाधीन करून घेतला व सांप्रत त्याचेंच त्यावर आधिपत्य आहे.

**ग्वालेर** ( पान ३४, ओळ २६. ):—हें शिंदेसरकारच्या संस्थानाची राजधानी असून आग्र्याच्या दक्षिणेस ६५ मैलांवर आहे. येथें जैनधर्माच्या उपासनेचें पुरातन पीटस्थान आहे, एक प्रचंड व भव्य किल्ला आहे आणि हिंदुलोकांच्या कलाकौशल्याची साक्ष देणारीं अनेक भुवनें व मंदिरें आहेत. या तीन गोष्टींमुळें या नगरीला प्रख्याति व थोरवी आलेली आहे. इ० स० १८५७ च्या बंडाचे प्रसंगीं रावसाहेब पेशवे, तात्या टोपी, व झांशीची राणी लक्ष्मीबाईसाहेब यांनीं हा किल्ला आपले स्वाधीन करून घेतला व आंतील सैन्य ही त्यांस अनुकूळ झालें होतें. परंतु खुद्द शिंदेसरकार व त्यांचे दिवाण सर राजेराव दिनकरराव यांनीं आपली अलौकिक स्वामिभक्ति यत्किंचितही ढळूं न दिल्यानें बंडवाल्यांचें थोडक्याच काळांत निर्मूलन झालें. सांप्रत महाराज जयाजीराव शिंदे या संस्थानच्या गादीवर विराजमान आहेत. त्यांनां ब्रिटिशराज्यांत २१ तोफांच्या सलामीचा मान आहे. यांचें मूळचें निशाण भगवें असून त्यावर नागाची आकृति काढिलेली आहे. व त्यांत अलीकडे युनियन्ज्याक्—इंग्लिश बादशाहीचें निशाण—ही मिसळलेलें आहे.

**काल्पी** ( पान ३५, ओळ २. ):—हें लहानसें टुमदार शहर यमुना नदीच्या कांठीं आहे. यमुना उत्तर-दक्षिण-वाहिनी असून तिच्या पश्चिम किनाऱ्यावर काल्पीचा किल्ला बांधलेला आहे. त्यास तिन्ही बाजूंनीं मोठा मजबूत कोट असून चवथे बाजूस यमुनेचा खोल प्रवाह आहे त्यामुळें हा किल्ला फार शोभिवंत व बळकट झाला आहे. किल्ल्याच्या पश्चिमेस मैदान असून त्या पलीकडे शहर वसलें आहे. काल्पी येथें साखरेचा व्यापार फार मोठा चालत असल्यामुळें तेथें अनेक व्यापाऱ्यांच्या मोठमोठ्या हवेल्या पुष्कळ आहेत व रस्ते ही चांगले रुंद आहेत.

हें शहर बादशहाचे वेळेपासून फार इतिहासप्रसिद्ध झालें आहे. येथें एक "चौऱ्याशी घुमटांचें मैदान" म्हणून प्रसिद्ध रणभूमि आहे. तेथें बादशहाचे वेळीं मोठी लढाई झाली होती. तींत बादशहाचे चौऱ्याशी नामांकित सरदार पतन पावले व नंतर विजयश्री प्राप्त झाली म्हणून बादशहानें त्या चौऱ्याशी सरदारांच्या प्रेतावर चुनेगची मजबूत व सुंदर कबरी बांधून त्यांचें चिरस्मारक केलें आहे. म्हणून त्यास "चौऱ्याशी घुमटांचें मैदान असें म्हणतात." इ० स० १८५७ त शिपायांच्या बंडामुळें उत्तर हिंदुस्थानांत धुमश्चक्री माजल्यानें जीं शहरें प्रख्यातीस आलीं त्यांतच या शहराची प्रमुखत्वेंकरून गणना केली पाहिजे. यासंबंधी व बंडाच्या वृत्तांताची खुलासेवार माहिती पाहिजे असल्यास **पारसनीसकृत झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांचें चरित्र** पहावें अशी आमची शिफारस आहे. त्यांतूनच वरील उतारा घेतला आहे.

**फत्तेपुरशिक्री** (पान ३५, ओळ ९.):—हें शहर अकबरानें इ०स० १५७० यांत वसविलें. सांप्रत हें आग्रा जिल्ह्यांत तहसिलीचें ठाणें आहे.

**कुराण** (पान ३५, ओळ १७.):—मुसलमान लोकांचें धर्मपुस्तक. याचा शब्दशः अर्थ वाचनीय अथवा वाचनार्ह असा आहे. म्हणून महमद पेगंबर यानें प्रतिपादिलेल्या हरएक धर्मवचनाला कुराण असें म्हणत. पुढें या शब्दाचा अर्थ विस्तृत होऊन धार्मिक, व्यवहारिक, सामाजिक, व्यापारसंबंधी व लष्करी कायदाकानूंच्या संग्रहाला कुराण ही संज्ञा प्राप्त झाली. मुसलमानी धर्माप्रमाणें कुराण हें अपौरुषेय असून अनादि आहे. तें अरबी भाषेंत गद्यरूपानें लिहिलेलें आहे. त्याची भाषा अगदीं शुद्ध व प्रौढ आहे. परमेश्वर एक आहे व त्यानें प्रतिपादिलेला सत्यधर्म एकच आहे, असें कुराणांत वर्णिलें आहे. पुण्याचरणानें प्राप्त होणारीं सुखें व पापमूलक दुःखें यांचें ही त्यांत सविस्तर विवेचन असून बायबलांतील दृष्टांत घेऊन तीं परिस्फुट करून दाखविलीं आहेत. या शिवाय त्यांत आदिपुरुषांच्या चरित्रांचा समावेश झाला असल्यामुळें कुराण ग्रंथ फारच विस्तृत व मनोरंजक झालेला आहे.

**राजपुताना** (पान ३६, ओळ १२.):—या नांवाखालीं मोडणारीं वीस संस्थानें असून शिवाय कांहीं इंग्लिश सरकाराचाही मुलुख आहे. यांत अंतर्भूत होणारीं संस्थानें आहेत तीं येणें प्रमाणें. (१) जैसलमेर (२) मारवाड किंवा जोधपूर (३) आणि बिकानेर हीं पश्चिम व उत्तर बाजूस आहेत. ईशान्येस (४) अलवाड व (५) शेखावाटी (६) जैपूर (७) भरतपूर (८) ढोलपूर (९) करौळी (१०) बुंदी (११) कोठा (१२) झालावाड हीं पूर्वेस व आग्नेयीचे बाजूनें आहेत. नैर्ऋत्येस (१३) प्रतापगड (१४) बनस्वाडा (१५)

डुंगारपूर ( १६ ) मेवाड अथवा उदेपूर आणि ( १७ ) सिरोही. मध्य भागांत ( १८ ) किशनगड ( १९ ) शाहापूर व ( २० ) टोंक हीं संस्थानें असून इंग्रज सरकारचा अजमीर जिल्हा हा मध्यवर्तीच आहे.

**चंदेरी** (पान ३६, ओळ १९.):—हें शहर याच नांवाच्या जिल्ह्याचें अधिष्ठान असून शिंद्याच्या राज्यांत आहे. येथील किल्ला फारच नामांकित होता. त्याच्या सभोंवतीं दगडाचा परिकोट असून त्यांत ठिकठिकाणीं संरक्षणार्थ गोल असे बुरुज बांधिलेले होते. हा किल्ला फारच मजबूत व भक्कम होता तो इतका कीं एके प्रसंगीं शत्रूंनीं यास आठमहिने वेढा घातला असतां तो काडीमात्र देखील डगमगला नाहीं. येथें १४००० दगडी घरें, ३८४ बाजार, ३६० धर्मशाळा व १२००० मशीदी होत्या असें आईन ए अकबरींत वर्णिलें आहे.

**बिहार** (पान ३७, ओळ ९.):—हा प्रदेश बंगाल इलाख्यांत आहे. प्राचीनकाळीं यास मगध देश म्हणत. बौद्ध धर्माची जन्मभूमी म्हणून या प्रांतास पवित्रता आलेली आहे. येथून लंका चीन, तार्तरी व तिबेत या देशांत धर्मोपदेशक जाऊन त्यांनीं त्याची प्रसृति केली. बुद्ध लोकांच्या मठास "विहार" असें म्हणतात. व या प्रांतांत त्यांचें प्राचूर्य असल्यानें सर्व देशास हें नांव प्राप्त झालें आहे.

**ढोलपूर** ( पान ३७, ओळ १५. ):—राजपुतान्यांत याच नांवाचें एक संस्थान आहे. त्याची हें शहर राजधानी आहे. याची स्थापना राजा धोलनदेव यानें ११ व्या शतकांत केली असें म्हणतात. येथें आक्टोबर महिन्याच्या अखेरीस दरसाल यात्रा भरत असते. ते वेळीं, दिल्ली, आग्रा, कानपूर, लखनौ इत्यादि ठिकाणांहून अनेक जिनसा व माल येतो. याशिवाय घोडे व इतर जनावरें ही येतात. याच्याजवळच मुचकुंद नांवाचें एक विस्तीर्ण सरोवर आहे. तेथें दरवर्षी मे महिन्यांत स्नान करून देहपावन करण्याकरितां भक्तिमान लोकांच्या झुंडीच्याझुंडी जमा होतात.

**जैसलमेर** (पान ४६, ओळ ४.):—राजपुतान्यांत जैसलमेर या नांवाचे एक संस्थान असून त्याची हें शहर राजधानी आहे. इ० स० ११५६ सालीं रावलजैसल यानें त्याची स्थापना केली. येथील इमारती पिंवळ्या दगडाच्या केलेल्या आहेत. हा दगड दुरून मातीसारखा दिसतो परंतु जवळून पाहिला म्हणजे त्याची योग्यता लक्ष्यांत येते. हा दगड मजबूत आहे, इतकेंच नाहीं तर त्यावर नक्षीचें खोदीव काम फारच उत्तम प्रकारचें करितां येतें. येथें टेकडीवर एक किल्ला आहे त्याची उंची २५० फूट असून त्याच्या सभोंवती २५ फूट उंचीचा

परिकोट आहे. येथें ओसवाल व पालीवाल व्यापाऱ्यांची वस्ती असून ते श्रीमान आहेत. हे जैन धर्मानुयायी असल्यामुळें या पंथाचें तेथें एक पुरातन देवालय आहे.

**अमरकोट** ( पान ४६, ओळ ९. ):— हें शहर सिंध प्रांतांत आहे. उमर नांवाच्या एका मुसलमान सरदारानें तें वसविलें म्हणून त्यास उमरकोट असें नांव दिलें. अमरकोट हा त्याचा मराठी अपभ्रंश असावा. अकबरची जन्मभूमि म्हणून इतिहासांत याला महत्व आलें आहे. येथें एक मोठा जबरदस्त किल्ला होता. त्यांतच हल्लीं सर्व कचेऱ्या आहेत.

**कलिंजर** ( पान ५४, ओळ १४. ):—हा भव्य व जुनाट डोंगरी किल्ला बुंदेलखंडांत आहे. यास सात दरवाजे आहेत. सत्ययुगांत त्यास रत्नकूट हें नांव होतें; त्रेतायुगांत त्यास महागिरी म्हणूं लागले; व द्वापारांत त्यास पिंगलू ही संज्ञा मिळाली. फार प्राचीन काळापासून याची पुण्यस्थळांत गणना आहे. याच्याजवळपास अनेक सरोवरें, गुहा, देवालयें व समाधी आहेत. या ठिकाणीं मृगधारा नांवांचें एक जलाशय आहे. हल्लीं हा किल्ला उध्वस्त झालेला आहे.

**लाहोर** (पान ५६, ओळ ४. ):—प्रख्यात सूर्यवंशीय दाशरथी रामाचा मुलगा लहू यानें या शहराची स्थापना केली अशी लोककथा आहे. मोंगल बादशाहींत हें शहर वैभवाच्या व भरभराटीच्या उच्च शिखरास जाऊन पोहों-चलें होतें.

**शिवालिख** ( पान ५६, ओळ २१.):—ही पर्वतावली वायव्येकडील प्रांतांत देहरादुन जिल्ह्यांत आहे. ती हिमालय पर्वताला हरिद्वारापासून तों बियास नदी-पर्यंत समांतर आहे. या पर्वताच्या खालच्या बाजूस साल व सैन यांचे दाट जंगल माजलें असून वरच्या बाजूस देवद्वार वृक्षांची गर्दी झालेली आहे. या पर्वतश्रेणींत, वाघ, बिबट, चित्ते, तरस, हत्ती व चितळ यांचे मोठमोठे कळप आहेत.

**शिया व सुन्नी** ( पान ६२, ओळ ५. ):—हे मुसलमान धर्मांत दोन पंथ आहेत. शिया या शब्दाचा अक्षरशः अर्थ पक्ष असा आहे. शिया हे महंमद पैगमबरचा जांवई जो अली त्याचे अनुयायी. यांचीं मतें, आचार, विचार व धर्मसंस्कार हीं सुन्नी सांप्रदायाहून अगदीं भिन्न आहेत. सुन्नी लोक अलीस मानीत नाहींत असें नाहीं पण ते अबुबकर उस्मान आणि उमर या दोन खलीफांस ही पूज्य मानतात. मोंगल, थोडे आरब व हिंदुस्थानांतील खोजे व बोहोरी हे बहुतेक शिया आहेत. अफगाण, तुर्क वगैरे बाकीचे मुसलमान सुन्नी सांप्रदायांत

मोडतात. सुन्नी याचा शब्दार्थ श्रुति असा आहे. मुसलमान धर्मांत श्रुतीप्रमाणें ज्यांचें वर्तन त्यांना सुन्नी असें म्हणतात, यांच्या मतें शिया हे काफर होत. या दोन्हीं पंथांत भिन्न मतामुळें प्राचीन काळापासून मोठाच विरोध माजलेला आहे. मोहरमच्या सणांत शिया लोक बहुतेक दुःखांत मशिदींत घालवितात व सुन्नी लोकांचा धांगडधिंगा त्यांस मुळींच पसंत पडत नाहीं.

**ओरिसा** ( पान ६६, ओळ १९. ):—बंगाल इलाख्याच्या नैऋत्येकडील प्रदेश. याचे स्वभावतःच दोन विभाग झालेले आहेत. महानदी, ब्राह्मणी व वैतरणी या नद्यांच्या चिमट्यांतील भाग सुपीक असून बाकीचा भाग निर्जन व ओसाड आहे. या प्रांतांत जगन्नाथाचें देवालय असल्यामुळें त्यास पुण्यभूमित्व प्राप्त झालें आहे. यालाच स्वर्गद्वार असें म्हणतात. महाराष्ट्रीयांना जशी पंढरी, दाक्षिणात्यांना जशी त्रिपथी, तशी वंगदेशीय व उत्तर हिंदुस्थानांतील जनांना जगन्नाथपुरी होय. याच प्रांतांत कबीर व चैतन्य इत्यादि परमहंस साधु व धर्मसंस्थापक उदयास आले. जगन्नाथाच्या रथोत्सवाकरितां दरसाल हजारों भाविकलोकांच्या झुंडीच्या झुंडी जातात. परंतु त्यांपैकीं अनेक जन अकालींच मृत्युमुखीं पडतात. याच प्रांतांत विख्यात चिलका सरोवर आहे.

**माळवा** ( पान ६७, ओळ ५. ):—हा प्रांत मध्यहिंदुस्थानांत असून फारच सुपीक आहे. यांत पुढील संस्थानें मोडतात.:–इंदूर, भोपाळ, धार, रतलाम, जावरा, राजगड, नरसिंगगड. प्रागैतिहासकालीं या प्रांताची राजधानी प्रख्यात उज्जयिनी नगरी होती. विक्रमशकाचा कर्ता प्रसिद्ध विक्रमादित्य राजा येथेंच राज्य करीत होता. या शकाला संवत् असें ह्मणतात व तो नर्मदेच्या दक्षिणेस चालतो. याची स्थापना इ० सनापूर्वीं ५७ वे वर्षीं झाली. ह्या प्रांतात अफु फारच पिकते व त्यामुळेंच त्याला सांप्रत प्रसिद्धि आलेली आहे.

**जयपूर** (पान ६७, ओळ १८. ):—राजपुतान्यांत जीं अनेक संस्थानें आहेत त्यांत हें ठळक व प्रख्यात आहे. या संस्थानाची स्थापना इ० स० ९६७ त ढोलराव नांवाच्या राजानें केली. येथील राजे आपण, रघुवंशांतील आहोंत असें समजतात. अकबरच्या राज्यांत या संस्थानाचें महात्म फारच वाढलें होतें. तेवेळीं भगवानदास हा गादीवर असून त्यानें आपली मुलगी शहाजादा सलीम यास लग्नांत दिली होती. इ० स० १८५७ सालीं जें बंड झालें ते वेळीं या संस्थानानें ब्रिटिशसरकारास उत्तम प्रकारची मदत केली. त्यामुळें त्यास दत्तकाची परवानगी मिळालेली आहे. हल्लीं गादीवर कैमसिंग महाराज आहेत. त्यांस २१ तोफांच्या सलामीचा मान आहे. प्रख्यात सांभर सरोवराचा बराचसा भाग या संस्थानांत असून बाकी राहिलेला भाग जोधपूरांत गेलेला आहे.

हें विस्तीर्ण सरोवर वीस मैल लांब, तीनपासून दहा मैल रुंद व एक ते चार फूट खोल आहे. यांत प्रतिवर्षी सुमारें चार कोटी मण मीठ उत्पन्न होतें. इ० स० १८७० पर्यंत ही प्राप्तीची बाब त्या त्या संस्थानाकडे होती. परंतु १८७० सालीं नवीन तह ठरून इंग्रजसरकार या मिठाच्या कारखान्याचे कौलमक्तेदार बनलें आहे.

**जोधपूर** ( पान ६७, ओळ २३. ):—यालाच मारवाड असें ही ह्मणतात. हें संस्थान राजपुतान्यांत आहे. जोधराव नांवाच्या राण्यानें याची स्थापना केली ह्मणून त्यास जोधपूर असें ह्मणतात. येथील राणे राठोर घराण्यापैकीं असून ते आपणांस सूर्यवंशीय ह्मणवितात. या संस्थानांत मूळचे रहिवाशी, चारण, भाट, जाट, मिना व भिल्ल इत्यादि आहेत. हें संस्थान मारवाड्यांचें आगर आहे. हे लोक उद्योगधंद्याकरितां जरी सर्व हिंदुस्थानभर पसरले आहेत तरी त्यांच्या अंतःकरणांत स्वराजनिष्ठा सदैव जागृत असते. अकबरच्या राजवट्यांत राणा उदेसिंग यानें ही मोंगल बादशहाशीं शरीरसंबंध जोडिला होता. यामुळें बादशहाची मर्जी त्यावर सुप्रसन्न असे.

**विकानेर** ( पान ६८, ओळ २. ):—मारवाडचा राजा जोधराव याचा सहावा मुलगा विक यानें इ० स० १४३८ त हें संस्थान स्थापिलें. ह्मणून त्यास हें नांव दिलें. याचा राजपुतान्यांत समावेश झालेला आहे. या प्रदेशांत नदी नाले मुळींच नाहींत. येथें उन्हाचा व थंडीचा अतिरेक असल्यामुळें दोन्ही ऋतूंत लोकांचे हाल होतात. येथील मुख्य धान्य बाजरी असून कलिंगडे व काकड्या तेथें विपुल पिकतात. गाई, म्हशी, बैल वगैरे जनावरें या प्रदेशांत उत्तम प्रकारचीं होतात. येथील घोडे मजबूत व राकट असतात. या संस्थानचे अधिपति रजपूत वंशांतील राठोड जातीचे आहेत. सांप्रतचे महाराज दत्तक पुत्र आहेत.

**मेवात** ( पान ६८, ओळ ५. ):—हा प्रांत आतां इतिहासांत मात्र राहिला आहे. तो दिल्लीच्या दक्षिणेस होता. हल्लीचा मथुरा जिल्हा, गुरगांव, अलवाडचा बराचसा भाग व भरतपूरचा कांहीं भाग यांचा या प्रदेशांत समावेश होत असे. येथील लोकांना मेओ ह्मणतात. आपण रजपुतांचे वंशज आहोंत असें ते समजतात. परंतु वास्तविकपणें पाहिलें असतां त्यांची जात विविध असावी. यांचे आचारविचार कांहींअंशीं हिंदूप्रमाणें व कांहींअंशीं मुसलमानांप्रमाणें आहेत. यांच्यांत सुंता, निका व मृतांस पुरण्याची वहिवाट आहे. दिवाळी व होळी हे सण ते करितात. सगोत्रांत विवाह करीत नाहींत.

**पार्शीधर्म** ( पान ७७, ओळ १४. ):—याचा संस्थापक झोरोआस्टर नांवाचा पुरुष होऊन गेला. या धर्मांतील ग्रंथास झेंदावेस्टा असें नांव आहे.

पार्शीलोक आपल्या देवाला ओरमज्द अथवा अहूरमज्द असें म्हणतात. हे लोक सूर्योपासक आहेत. अग्नि हा सूर्याचाच अंश असल्यामुळें त्याचीही ते उपासना करितात.

**चौगन** ( पान ९८, ओळ २. ):—( आधुनिक पोलो )—हा खेळ फार श्रमाचा, चालाखीचा व धोक्याचा आहे. तो घोड्यावर बसून कुबडीप्रमाणें टोंकें वांकविलेल्या लांब काठ्यांनीं खेळतात. या करितां सपाटीची जागा मुद्दाम साफ करून ठेवावी लागते; व तिच्या दोन्ही बाजूंनीं चिंचोळी वाट केलेली असते. प्रत्येक बाजूला चार चार इसमांची टोळी घोड्यावर स्वार होऊन खेळण्यास उभी राहते. सपाटीच्या मध्यभागीं चेंडू ठेविला असतो व तो वांकविलेल्या टोंकांनीं आपले बाजूच्या वाटेंतून पार घेऊन जाण्यास प्रत्येक टोळी खटपट करिते. व ज्यांना ती साधते त्यांनीं खेळ जिंकिला असें समजतात.

**जोगी** ( पान ९९, ओळ ११. ):—हा योगी शब्दाचा अपभ्रंश होय. योग्याची व्याख्या भगवद्गीतेंत दिली आहे ती अशी:—

**आत्मौ पम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ॥**
**सुखं वा यदिवा दुःखं स योगी परमोमतः ॥**

जोगी हे शैव सांप्रदायाचे असून त्यांना कानफाटे असें नांव आहे. ते गोरखनाथाचे शिष्य होत. वास्तविक पाहिलें असतां यांनीं आपलें आयुष्य परमेश्वराचे चिंतनांत घालवावयाचें, परंतु सांप्रत ते आपल्या मूळच्या वृत्तीपासून पराङ्मुख होऊन संसारी लोकांपेक्षांही अधिक भोगी झाले आहेत.

**संन्यासी** ( पान ९९, ओळ ११. ):—'ज्ञेयः स नित्य संन्यासी यो न द्वेष्टिन कांक्षति.' म्हणजे ज्याला द्वेष नाहीं व आवड नाहीं तो संन्यासी जाणावा. आश्रमचतुष्टयांतील चवथ्या आश्रमाला संन्यास अशी संज्ञा आहे व तो धारण करणारा संन्यासी होय. पहिल्या तीन आश्रमांना, ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य आणि वानप्रस्थ्य अशीं नांवें आहेत. काशीस संन्याशांचा भरणा फार असून ते आपल्या आश्रमानुरूप न वागतां व्याज बट्टयाचा रोजगार करितात असें म्हणतात.

**धर्मयुद्ध** ( पान १११, ओळ १. ):—मुळांत या ठिकाणीं शिव्हलरी (chivalry) शब्दाची योजना केलेली आहे. त्याचा अर्थ धर्मयुद्धापेक्षां जास्त व्यापक आहे. बाराव्या व तेराव्या शतकांत शिव्हलरी नांवाची एक संस्था सर्व युरोपभर वरिष्ठ स्थितींतील लोकांत प्रचलित होती. तिचीं मुख्य तत्वें चार होतीं. तीं अशीं (१) स्त्रीजनाविषयीं अत्यादर व स्वतः जी निवडली असेल ती देवतेप्रमाणें मानून तिजला सर्वस्व अर्पण करणें, (२) दुर्बळाविषयीं

कळवळा व त्यांना मदत करण्याची उत्कट इच्छा; व (३) युद्धांत शत्रूशीं निष्कपटानें व नीतीनें संग्राम करण्याची बुद्धि (४) धर्म आणि सत्य व स्वतःचा मान यांसाठीं सदा मरण्यास तयार असणें. भारतीय युद्धाचा इतिहास पाहिला असतां हीं चारि तत्वें पृथक्त्वानें ते वेळीं मान्य होतीं असें आढळून येईल. रसगंगाधरींत युद्धवीरता म्हणून जी वर्णिलेली आहे तीच शिव्हलरी होय असें वाटतें.

**तोडरमल** (पान ११२, ओळ ४.):—हा क्षत्रिय होता. अलीकडील शोधावरून त्याची जन्मभूमी अयोध्या प्रांतांत लाहोरपूर गांवीं आहे असें कळतें. इ. स. १५६४ त त्यानें अकबराच्या दरबारांत लहानशी नोकरी पतकरली व दहा वर्षांच्या अवकाशांत आपल्या नैसर्गिक गुणांच्या प्रभावानें तो मोठ्या हुद्याच्या दर्जास जाऊन पोहोंचला. अकबरानें गुजराथ प्रांत सर केल्यावर तेथील वसुलाची व्यवस्था लावण्याचें काम तोडरमलाकडे सोंपविलें (१५७४). त्याची विशाल बुद्धिमत्ता, निःसीम कार्यभक्ति, व सत्यैकनिष्ठा यांमुळें अकबर प्रसन्न झाला व त्यानें त्यास आपल्या संपूर्ण बादशाहीचा दिवाण नेमिलें. (१५८३). तेव्हां तोडरमल्लानें जमीनीवरील धाऱ्यासंबंधीं व वसुलाच्या बाबीसंबंधीं पूर्वीच्या वहिवाटींत अनेक फेरफार करून सुधारणा केल्या. त्यांत मुख्य ही होती कीं हा कालपर्यंत सर्व हिशेबी काम हिंदी भाषेंत चालत असे. तें त्यानें बंद करून इतउत्तर सर्व हिशेब फारशी भाषेंत लिहिले पाहिजेत असा हुकूम फरमाविला. या गोष्टीमुळें हिंदू लोकांना दरबारांतील भाषेचा—फारशीचा अभ्यास करणें जरूर पडलें. राजा तोडरमल लेखणीचा मजबूत व हिशेबाचे कामांत फर्डा होता इतकेंच नाहीं तर समरांगणांतही तो पहिल्या प्रतीचा तरवार बहाद्दर होता. युसफझै लोकांनीं बिरबलाचा वध केला तेव्हां बादशहानें त्यांच्या मोहिमेवर राजा मानसिंगास रवाना करून समागमें राजा तोडरमल यासही पाठविलें. याशिवाय दुसऱ्या कित्येक लढाईत त्यानें आपलें बाहुवीर्य प्रगट केलेलें आहे. तो जसा पराक्रमी होता तसाच निग्रही व कर्मठही होता. मरण समयीं तो चारहजारी म्हणजे चार हजार सैन्याचा अधिपति झाला होता.

**राजा बिरबल** (पान १२८, ओळ १६.):—हा जातीचा ब्राह्मण असून याचें मूळचें नांव महेशदास असें होतें. त्याची स्थिति फार गरीबीची असल्यामुळें बंदीजनवृत्तीनें तो आपली उपजीविका चालवी परंतु जात्या बुद्धिवान व विचक्षण असल्यामुळें अकबराच्या दरबारांत प्रवेश झाल्यावर लवकरच त्याचें तेज पडूं लागलें. त्याचें भाषण समयोचित व सुभाषितांनीं प्रचुर असल्यानें थोडक्याच काळांत दरबारांत त्याची चहा होऊं लागली. त्यानें हिंदी भाषेंत रचलेलीं

काव्यें अत्यंत सुरस व आल्हादकारक आहेत. त्याच्या कवित्वगुणास लुब्ध होऊन बादशहानें त्यास कविराज अशी पदवी देऊन त्यास आपल्या समागमांत ठेविलें. इतर राजांशीं बोलणें लाविण्यास अकबर त्याची योजना करीत असे. तो बहुधा दरबारांतच राही. परंतु इ. स. १५९० त युसफझे लोकांवर जी मोहीम रवाना केली तिच्या कुमके करितां म्हणून मागाहून रवाना केलेल्या सैन्याबरोबर बिरबलासही पाठविलें होतें. ही मोहीम सर्वस्वी अपयशस्वी होऊन तींत बिरबलाचा अंत झाला. त्याच्या मृत्यूमुळें बादशहा शोकाकुल झाला; कारण बिरबलावर त्याचें प्रेम फार होतें.

बदौनी, शाबासखान वगैरे हटवादी मुसलमान लोक बिरबलाचा द्वेष करीत. कारण, त्यांचा असा ग्रह झाला होता कीं त्यानें बादशहास महमुदीय धर्मापासून पराङ्मुख केलें. तो गायनकलेंत अत्यंत निपुण होता. दानशूरतेबद्दलही त्याची कीर्ति आहे.

**ओरच्छा येथील राजा** (पान १३६, ओळ २.):—याचें नांव बिरसिंगदेव असें होतें. यानें "आपल्या कारकीर्दीत झांशी येथें प्रचंड किल्ला बांधून त्यास चांगलें स्वरूप आणिलें. बिरसिंगदेव हा मोठा क्रूरकर्मा होता. त्यानें १६०२ ह्यावर्षीं दिल्लीपति अकबर बादशाहाच्या अति मर्जीतला मुत्सद्दी व इतिहासकार अबुल फजल ह्यास ठार मारिलें. त्यावरून अकबर बादशहास त्याचा मनस्वी राग आला, व त्यानें त्याचें पारिपत्य करण्याकरितां आपला मुलगा सेलिम ह्यास फौज देऊन बुंदेलखंडांत पाठविलें. तेव्हां बिरसिंगदेव भिऊन कोठें पळून गेला. हाच सेलिम पुढें तीन वर्षांनीं, ह्मणजे इ. स. १६०५ यावर्षीं दिल्लीच्या गादीवर बसला. जहांगीर ह्मणून पुढें जो सुप्रसिद्ध बादशहा उदयास आला तोच हा. त्याची बिरसिंगावर पुनः मेहेरबानगी होऊन त्यानें त्यास अपराधाची क्षमा करून झांशी प्रांत परत दिला."—(महाराणी लक्ष्मीबाई यांचें चरित्र.)

**आईन-ए-अकबरी** (पान १४२, ओळ ५.):—सुप्रसिद्ध इतिहासकार शेख अबुल फझल यानें अकबर बादशहाचे राज्याचा सविस्तर इतिहास लिहिला आहे. त्याचें नांव अकबरनामा. या ग्रंथांतील तिसऱ्या पुस्तकाला आईन-ए-अकबरी असें म्हणतात. आईन ह्मणजे राज्य-पद्धति. या पुस्तकांत अकबराची राज्यपद्धति खुलासेवार वर्णिलेली आहे. या पुस्तकाचे एकंदर पांच भाग आहेत. प्रोफेसर ब्लॉकमन यांनीं याचें इंग्रजींत भाषांतर केलें आहे. त्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत या संबंधीं लिहिलें आहे तें असें:—आईन हें अकबराच्या राज्यकारभाराचें चित्र होय. राज्यांतील निरनिराळीं खातीं, व त्यांचा परस्पराशीं असलेला संबंध; दरबारांतील व खानगी कडील व्यवस्था; पदरीं असलेल्या वीर

पुरुषांचीं, कवींचीं, इतर गुणिजनांचीं व राजकारणी मुत्सद्यांचीं चरित्रें; न्याय खात्याची, वसुलाची व मुलकी कडील कामाची व्यवस्था व कायदे कानू; जमीनींची मोजणी व त्यावर धारा बसविण्याचीं तत्वें; एकंदर राज्याची जमाबंदी व राजा तोडरमल यानें ठरवून दिलेली वसुलाची पद्धति; जनतेची स्थिति व रीतिरिवाज, साहित्यशास्त्रादिकलेंचा प्रसार, धर्म व षड्दर्शनादि तत्वज्ञानांचा विचार, इत्यादि गोष्टींची परिपूर्ण माहिती या पुस्तकांत संग्रहीत केलेली आहे. यापूर्वी मुसलमान लोकांनीं लिहिलेले इतिहास ह्मणजे राज्यांतील अगणित घडामोडींचीं व लढायांचींच फक्त टिपणें होत. त्यांत व्यवहारिक व सामाजिक गोष्टींचा उल्लेख ह्मणून नाहीं. परंतु आईन-ए-अकबरींत मात्र राज्यांतील निरनिराळे लोक, तत्कालीन विचारणीय गोष्टी, जनतेचे समज, त्या वेळचीं तत्वें व आचारविचार यांचें चित्र हुबेहूब व चटकदार असें उठवून दिलेलें आढळतें. यावरून हें पुस्तक हिंदुस्थानांतील पूर्वीच्या सर्व इतिहास ग्रंथांत केवळ अपूर्व असून इतिहास या संज्ञेस सर्वतोपरी पात्र आहे.

**लेब्यानॉन** (पान १४९, ओळ २२.):—एशियाखंडाचे पश्चिमबाजूस सिरिया प्रदेशांत हा पर्वत आहे. वर्षांतून सहा महिने याचीं शिखरें बर्फाच्छादीत असतात. याच पर्वतांत जोरडन नदीचा उगम आहे. या पर्वताच्या श्रेणी अगदीं शांत व निर्जन आहेत. तेथें अनेक मठ आहेत. व श्रांत झालेल्या पथिक जनांस तेवढीच कायती आरामाची जागा आहे. चोहोंकडे शांतता असल्यामुळें हें स्थळ परमेश्वराचें चिंतन करण्याला फारच योग्य असें आहे.

**लामा** (पान १४९, ओळ २३.):—तिबेट व मंगोलिया येथील धर्मगुरूस लामा असें म्हणतात. यांचा धर्म बुद्धधर्मासारखाच आहे. यांतील धर्मपुस्तकाला कंजर असें ह्मणतात. त्याचे सात भाग आहेत.

**झेंदावेस्ता** (पान १४९, ओळ २५.):—पारशी लोकांचें धर्मपुस्तक.

**जेसुइट** (पान १५८, ओळ २१.):—रोमन क्यॉथोलिक धर्मांत हा एक धर्मगुरूंचा पंथ आहे. याची स्थापना इ. स. १५३४ त झाली. या पंथाची मुख्य तत्वें पवित्राचरण, निर्धनता, व आज्ञानुवर्तन हीं होत. लष्करी खात्याप्रमाणें या पंथांत व्यवस्था आहे. वरिष्ठ सांगेल तें सर्वांस वंद्य करावें लागतें. कसेंही कोणाचें खाजगी उत्पन्न म्हणून नाहीं. या पंथांतील स्त्रिया व पुरुष अविवाहित असतात. हा पंथ स्थापन करण्याचा उद्देश युरोपांत धर्मक्रांति होऊन नवीन निघालेल्या प्रॉटेस्टंट पंथाचा नाश करून क्यॉथोलिक धर्माची उन्नती करावी हा होता. जेसुइट लोकांनीं याबद्दल अतोनात खटपट करून बरेंच यश मिळविलें. परंतु तसें करण्यांत त्यांनी महान् पातकें केलीं. त्यांचें मत असें असे व आहे कीं

साधावयाचा हेतु जर चांगला असला तर वाटेल ते उपाय योजावेत. यामुळें व त्यांच्या राज्यकारभारांतील ढवळाढवळीमुळें यांचा लोकांस अतीच तिटकारा आला. सध्यां जेसुइट लोक राज्यकारभारांत मुळींच पडत नाहींत. फक्त विद्यादान व ख्रिस्ती धर्माचा प्रसार यांकडेसच त्यांचें लक्ष आहे. यामुळें हा पंथ पुनः अभ्युदयास आलेला आहे. हिंदुस्थानांत पहिला मोठा जेसुइट आला तो फ्रॅन्सिस झेविअर. त्यांनें व त्याच्या अनुयायांनीं हजारों हिंदूंस बळजबरीनें ख्रिस्ती केलें, तेच आपले "गोव्याचे किरस्तांव."

**प्यारिसीझ** (पान १८९, ओळ २६.):—ज्यु लोकांपैकीं एका पंथांतील लोकांचें हें नांव आहे. हे लोक ईश्वर उपासनेचा पोकळ डौल घालीत. अंतः-करणांत भक्ति तिळमात्र नसून बाहेरील डामडौल दाखविण्यांत हे फार पटाईत होते. अंतर्गत भाव लक्षांत न आणितां केवळ शब्दानुरूप वागण्याकडे यांची प्रवृत्ति फार असे.

**इलिझाबेथराणी** (पान २००, ओळ १८.):—ही आठव्या हेन्रीची मुलगी. इचा जन्म इ. स. १५३३ त होऊन ती इ. स. १५५८ त गादीवर विराजमान झाली. ही फार तेजस्वीनी होती. तिचा दरारा कांहीं विलक्षण असे. इच्या राजवटीत इंग्लिश राज्याच्या व इंग्लिश लोकांच्या उत्कर्षास सुरवात झाली. इंग्लडचा कट्टा शत्रू स्पेनदेश, त्याचा पराभव होऊन राज्यांत चोहोंकडे शांतता नांदूं लागली. इंग्लिश राज्यास संमत जो राजाश्रित एपिस्कोपल धर्म तो हिनें स्थापन केला व क्यॅथोलिक धर्माच्या पुनरुज्जीवनाच्या आशांचा लव-लेशही तिनें उरूं दिला नाहीं. कविशिरोमणी शेक्सपीअर व स्पेन्सर आणि प्रसिद्ध तत्ववेत्ता बेकन यांचा उदय याच काळीं झाला. तेव्हां हा काल इंग्लंदला सर्वस्वी वैभवशालीच समजला पाहिजे. हिचे राज्यांत इंग्लंडचा परराष्ट्रांशीं व्यापार वाढला व इंग्लंडच्या वसाहतींस व परमुलुखांच्या विजयास आरंभ झाला. पुढें नांवारूपास चढून हिंदुस्थानांत सार्वभौम पद पावलेली ईस्ट इंडिया कंपनी याच वेळेस उदयास आली. पार्लमेंटचें माहात्म्य वाढून प्रजाजन आपआपल्या हक्कांचा उपभोग वाढत्या प्रमाणावर घेऊं लागला. ह्या सर्व गोष्टी एलिझाबेथनें आपल्या मुत्सद्दीपणाचे जोरावर घडवून आणिल्या. म्हणून इंग्लंडच्या तक्तावर जे राजे बसले त्यांत बहुतेक अग्रस्थानीं हिची गणना करतात.

**फ्रान्सचा चवथा हेन्री** (पान २००, ओळ १८.):—याला "मोठा" व "चांगला" अशीं टोपण नांवें होतीं. याचा जन्म इ. स. १५५३ त झाला त्या वेळीं फ्रान्स देशांत प्रॉटेस्टंट व क्यॅथोलिक या दोन पक्षांत मोठा रणकल्होळ चालून अतोनात रक्तपात होत होता. हेन्री प्रॉटेस्टंट होता म्हणून त्यास

5/31

गादीवर वसूं देऊं नये अशी मोठी खटपट झाली. ती त्यानें बाहुबलानें मोडली. १५८९ मध्यें गादीवर बसल्यावर त्यानें कॅथोलिक धर्म स्वीकारला. तथापि गृहकलह शमविण्यासाठीं त्यानें राजशासन काढून प्रॉटेस्टंट पंथांतील लोकांना आपल्या मनोदेवतेनुरूप वागण्याची पूर्ण मुभा दिली. हें शासन 'एडिक्ट ऑफ-न्यांटिस' या नांवानें प्रसिद्ध आहे. याच्या आमदानींत राज्यांतील दंगेधोपे नाहींसे झाल्यानें त्यानें आपलें लक्ष अंतर्गत व्यवस्थेकडे लाविलें. पूर्वी होऊन गेलेल्या राजांनीं अनुदार व संकुचित असें राज्यधोरण चालविल्यानें अधिकारी मंडळी कह्याबाहेर गेली होती. ते प्रजाजनांना नानातऱ्हेनें पीडा करीत व त्यांजवर नवेनवे कर बसवून त्यांना गांजीत; व बिगारीच्या बाबतींत ही त्यांचा छळ करीत. हेन्रीनें हे सर्व दुराचार बंद केले. याच्या राजवटींत देशांत रस्ते व कालवे होऊन व्यापार उदीमाची वृद्धि झाली. त्यानें वसुलाच्या बाबतींत फेरफार करून त्यावेळचा प्रसिद्ध मुत्सद्दी सली याच्या सल्ल्यानें जमाबंदीच्या पद्धतींत सुधारणा केली. जशी एलिझाबेथच्या राजवटींत इंग्लंडच्या अभ्युदयास, तशीच हेन्रीचे राज्यांत फ्रान्स देशाचे अभ्युदयास सुरवात झाली. अकबरानें ही असाच मुत्सद्दीपणा व पराक्रम दाखविला असें ग्रंथकर्ता म्हणतो तें यथार्थच आहे.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २ | ७ | राजानीं | राजांनीं |
| ६ | ११ | त्यांपैकीं | त्यापैकीं |
| १० | १९ | कोणाचाच | कोणचाच |
| १४ | ८ | वेळीं किताब | वेळीं हा किताब |
| १७ | २२ | झुलनन वेग | झुलन वेग |
| १८ | २,२१ | „ | „ |
| २० | १४ | आपलीं | आपली |
| २१ | ९ | इतिहासातील | इतिहासांतील |
| २६ | ८ | हे व यांच्या° | ह्यांच्या व ह्यांच्या° |
| ३१ | ८ | अनुयायानीं | अनुयायांनीं |
| ३१ | १४ | जसा | जसजसा |
| ३६ | १६ | त्यापैकीं | त्यांपैकीं |
| ३८ | १ | होते | होतें |
| ४२ | ८ | मानोभावें | मनोभावें |
| ४३ | १९ | क्रमिण° | क्रमेण° |
| ४५ | २२ | होती | होईल |
| ४६ | ३ | मारवाड्याच्या | मारवाड्च्या |
| ५० | २१ | अबूफझल | अबुलफझल |
| ५१ | २१ | आस्कवर | आकससवर |
| ५२ | २५ | झाली | झालीं |
| ५३ | २३ | आपलें | आपले |
| ६६ | ४ | मुंक्ता | भुंक्ता |
| ७३ | ७ | घोरची | घोर |
| ८२ | ३ | आपले | आपलें |
| ८४ | ८ | अमीरीची | अमीरीचीं |
| ८७ | ९ | ही | हीं |
| ९६ | २५ | बंडाच्या | बंडाचा |
| ९९ | ९ | साडून | सोडून |
| १०६ | १० | संबायतेस | खंबायतेस |
| १०८ | २५ | पाठणावर | पाटणावर |
| ११० | ५ | गोळकरून | गोळा करून |
| ११४ | २६ | बा | दबा. |
| ११५ | १० | नायकाकडून | नायकां कडून |
| ११६ | १५ | त्यानीं | त्यांनीं |
| ११६ | २१ | प्राताचा | प्रांताचा |
| ११६ | २६ | त्यान | त्यानें |
| ११९ | २१ | इबातखाना | इबादतखाना |
| १२० | ११ | आपणापैकीं | आपणांपैकीं |
| १२१ | ५ | मान्यं | मान्य. |
| १२१ | १० | राणासग | राणासंग |
| १२१ | १८ | जारीन | जारीनें |
| १४५ | १८ | मिळवावा | मिरवावा |
| १४६ | १८ | करावीसें | करावींसें |
| १४६ | २१ | मान्य | अमान्य |
| १४७ | २१ | पुस्तकाचा | पुस्तकांचा |
| १५२ | २५ | यानीं | यांनीं |
| १५४ | १२ | मतवैचित्र | मतवैचित्र्य |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १५६ | ११ | १२३५ | १२१५ |
| १५७ | ७ | लेखीलें | लेखिलें |
| १६१ | १५ | आगदीं | अगदीं |
| १६२ | १२ | जेणेंकडून | जेणेंकरून |
| १७४ | ८ | त्याचा | त्यांचा |
| १७४ | १८ | त्यांचें | त्याचें |
| १७५ | २० | त्याजविषयीं | त्यांजविषयीं |
| १७६ | १० | भरविलें | भरविले |
| १७६ | १२ | आपण्याची | आणण्याची |
| १७७ | २ | क्ररपणाचा | क्रूरपणाचा |
| १७९ | १२ | प्रकारचें | प्रकारचे |
| १७९ | १६ | फाळांत | फळांत |
| १७९ | २४ | उघडण्यापूर्वी | उजाडण्यापूर्वी |
| १८२ | ३ | सद्गुणाचे | सद्गुणाचें |
| १८३ | ११ | उपाहरणें | उदाहरणें |
| १८३ | १४ | बनलें | बनले |
| १८४ | २४ | हिश्शाचा | हिश्याच्या |
| १८५ | २४ | त्यांची | त्याची |
| १९७ | ५ | अपरिहार्थ | अपरिहार्य |
| १९९ | २५ | जातीच्या | जातींच्या |
| २०० | २६ | आले नसते | आलें नसत |